महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी आय एन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४६

GST NO.: 27AAECM2936N1Z2

# १९ वा वार्षिक अहवाल
# वित्तीय वर्ष २०२३-२०२४



महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी आय एन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४६
GST NO.: 27AAECM2936N1Z2

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## १९ वा वार्षिक अहवाल वित्तीय वर्ष २०२३-२०२४

## अनुक्रमणिका


| अनु.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | कंपनीची माहिती | १ |
| २ | संचालकांचा संक्षिप्त परिचय | २ |
| ३ | संचालकांचा अहवाल | ५ |
| ४ | संचालकांच्या अहवालातील परिशिष्टांची सूची | ३३ |
| ५ | ताळेबंद पत्रक | १४४ |
| ६ | नफा व तोटा पत्रक | १४५ |
| ७ | रोकडता प्रवाह पत्रक | १४६ |
| ८ | समभागातील बदलाचे विवरण पत्रक | १४८ |
| ९ | वित्तीय विवरण पत्रकांवरील टिपा | १४९ |
| १० | एकत्रित वित्तीय विवरण पत्रक | २१४ |

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
सी आय एन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४६
GST NO.: 27AAECM2936N1Z2

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## १९ वा वार्षिक अहवाल वित्तीय वर्ष २०२३-२०२४

## कंपनीची माहिती

**संचालक मंडळ ***

| अनु.क्र. | संचालकांची नावे | पद |
|---|---|---|
| १. | श्री. संजीव कुमार - भा.प्र.से. | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक |
| २. | श्रीमती आभा शुक्ला - भा.प्र.से. | नामनिर्देशीत संचालिका |
| ३. | श्री. सतीश चव्हाण | संचालक (प्रवर्तने) |
| ४. | श्रीमती तृप्ती नितिन मुधोळकर | संचालिका (वित्त) |
| ५. | श्री. विश्वास व्ही. पाठक | स्वतंत्र संचालक |

| कंपनी सचिव | सांविधिक लेखा परिक्षक |
|---|---|
| श्रीमती विनीता श्रीवाणी | मे. एम एस के ए ऑण्ड असोसिएटस सनदी लेखापाल |

**नोंदणीकृत कार्यालय :**

‘प्रकाशगंगा’ इमारत, भूखंड क्र. सी-१९ इ ब्लॉक, वांद्रे -कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
वेबसाईट : www.mahatransco.in
सी आय एन क्र. यू ४०१०९ एम एच २००५ एस जी सी १५३६४६

दि. १७-०१-२०२५ रोजीचे

## संचालकांचा संक्षिप्त परिचय

### श्री. डॉ. संजीव कुमार - भा.प्र.से.

### अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

श्री. डॉ. संजीव कुमार, (भा.प्र.से) यांनी दि. ०३.०५.२०२३ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक या पदाची सूत्रे स्वीकारली. ते भा. प्र. सेवेच्या वर्ष २००३ च्या तुकडीचे जेष्ठ आय ए एस अधिकारी आहेत. यापूर्वी महाराष्ट्र शासनाने त्यांची नियुक्ती मुंबई महानगर पालिकेचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त या पदावर केली होती.



श्री. डॉ. संजीव कुमार हे जम्मू येथील वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय पदवीधर आहेत. या शिवाय त्यांनी किंग्ज कॉलेज, लंडन येथून सार्वजनिक धोरणे आणि व्यवस्थापन या विषयातून पदव्यूत्तर - (मास्टर्स) पदवी मिळविली आहे. गेल्या वीस वर्षात त्यांनी व्यवस्थापन आणि प्रशासन यातील विविध जबाबदारीच्या पदांवर कामे केले. त्यांना सांघिक नियोजन करणे, प्रकल्पांचे नेतृत्व करणे, प्रशासन व व्यवस्थापन करणे या क्षेत्राचा समृद्ध अनुभव आहे.

### श्रीमती आभा शुक्ला - भा.प्र.से.

### नामनिर्देशित संचालिका

श्रीमती आभा शुक्ला ह्या सन १९९३ च्या तुकडीच्या वरिष्ठ भा.प्र.से. अधिकारी आहेत. त्यांची महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित मध्ये दि.२९/११/२०२२ पासून नामनिर्देशित संचालक म्हणून संचालक पदावर नेमणूक झाली.



श्रीमती शुक्ला दि.०३/११/२०२२ पासून प्रधान सचिव (ऊर्जा) महाराष्ट्र शासन ह्या पदावर कार्यरत आहेत आणि त्यांनी दि. २९/११/२०२२ पासून व्यवस्थापकीय संचालक मरावीमं सूत्रधारी कं.म.हा कार्यभार धारण केला आहे. याआधी त्यांनी प्रधान सचिव (लेखा आणि कोषागारे) वित्त विभाग, मंत्रालय महाराष्ट्र शासन या पदाचा कार्यभार सांभाळला होता

## श्री. सतीश चव्हाण
### संचालक (प्रवर्तने)



श्री. सतीश चव्हाण यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, संभाजी नगर येथून विद्युत अभियांत्रिकी ची पदवी संपादन केली, सुमारे ३७ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ट्रान्समिशन आणि डिस्ट्रिब्युशनमधील पोलाद आणि वीज क्षेत्रातील क्षेत्रांमध्ये अप्रेंटिस इंजिनीअर ते संचालक, बोर्ड सदस्य स्तरापर्यंत विविध पदांवर काम केले आहे. महावितरणच्या भारनियमन, वीज खरेदी, नियामक व वाणिज्य कक्ष, ऊर्जा संक्रमण व्यवस्थपन, संचालन व देखभाल विभागात अधीक्षक अभियंता ते संचालक (वाणिज्य) स्तरावर सुमारे १२ वर्ष त्यांनी काम केले आहे.

यापूर्वी ते महापारेषण कंपनीच्या प्रकल्प विभागात ७ वर्ष उप कार्यकारी अभियंता या पदावर होते, विजेच्या प्रकल्पांची आखणी करणे, ते उभारुन त्यांची देखभाल करणे यावर त्यांचे प्रभुत्व आहे. भारत व परदेशातील पोलाद प्रकल्पाच्या देखभालीचाही त्यांना अनुभव आहे. कौशल्याचे मनुष्यबळ तयार करणे आणि उर्जा क्षेत्रातील तांत्रिक, वाणिज्य, अर्थशात्र आणि कायदे इ. समस्या विशेष कौशल्याने सोडविण्यात ते वाकबगार आहेत.

## श्रीमती तृप्ती नीतिन मुधोळकर
### संचालिका (वित्त)



श्रीमती तृप्ती एन. मुधोळकर यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (एम एस ई टी सी एल)येथे दिनांक १९.०७.२०२४ पासून संचालक (वित्त) या पदाची सुत्रे स्वीकारली.

श्रीमती मुधोळकर या पूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (एम एस ई टी सी एल)येथे वित्तीय तज्ञ म्हणून दिनांक २२.०१.२०२१ पासून संचालिका म्हणून रुजू झाल्या आणि महानिर्मिती कंपनीतून २९.०२.२०२४ रोजी निवृत झाल्यामुळे त्यांचे संचालकपद संपुष्टात आले.

श्रीमती मुधोळकर सनदी लेखपाल (चार्टर्ड अकाउटंट) असून, त्यांना महानिर्मिती कंपनीत २५ वर्षांचा विस्तृत अनुभव आहे. कोराडी औष्णिक वीज निर्मिती केंद्रात त्या महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदावर कार्यरत होत्या आणि मुख्य महाव्यवस्थापक पदावरुन निवृत्त झाल्या, वीज क्षेत्रातील वित्तीय विषयात त्या जाणकार तज्ञ आहेत.

## श्री.विश्वास पाठक
### स्वतंत्र संचालक



श्री. विश्वास व्ही. पाठक हे दि.२२/०८/२०२२ पासून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) मध्ये विधी तज्ञ या क्षमतेत स्वतंत्र संचालक म्हणून रुजू झाले आहेत.

श्री. पाठक हे कंपनी व्यवस्थापन व्यावसायिक असून त्यांना खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राचा अनेक वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. त्यांनी पायाभूत सुविधा, उत्पादन, टेलिकॉम, विमानचालन, उर्जा निर्मिती, पारेषण आणि वितरण, रेल्वे, कोळसा, खाणक्षेत्र, वेब आणि मुद्रण माध्यमे आणि सहकारी बँकिंग अशा विविध क्षेत्रातील कंपन्यांच्या संचालक मंडळात आपले योगदान दिले आहे.

श्री. पाठक हे मराविमंसूकंम, महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण यांच्या लेखापरीक्षण समित्यांचे अध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक तसेच महानगर टेलिफोन निगम मर्यादित मध्ये स्वतंत्र संचालक म्हणून कार्यरत आहेत. ह्या पदांव्यतिरिक्त ते स्वतंत्र कंपनी व्यावसायिक सुद्धा आहेत आणि त्यांची झिरोमाईल कन्स्लटंटस प्रा.लि. ही स्वत:ची सल्लागार कंपनी आहे.

याआधी त्यांनी विविध कंपन्यांमध्ये विविध व्यवसाय परिचालने, भांडवली बाजार, कंपनी व्यवहार, विधी, धोका व्यवस्थापन, कंपनी शासन, विलिनीकरण आणि संपादन, विलगीकरण, कंपनी / मत्ता मूल्यांकन, फेमा आणि कंपनी कायदा कार्ये हाताळली असून त्यांनी वित्तीय जगतातील विविध विनियामक प्राधिकाऱ्यांसमोर बाजू मांडली आहे. ते २०२१-२०२२ दरम्यान मा.रेल्वे, कोळसा आणि खाण राज्यमंत्र्यांचे अतिरिक्त खाजगी सचिव आणि सन २०१५-२०१९ दरम्यान ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र यांचे सल्लागार सुद्धा होते.

महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी आय एन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४६

GST NO.: 27AAECM2936N1Z2

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# संचालकांचा अहवाल

# वित्तीय वर्ष २०२३-२०२४

# वित्तीय वर्ष - २०२३-२०२४ संचालकांच्या अहवालाची अनुक्रमणिका



| अनु. क्र. | विषय |
|---|---|
| १. | **कंपनीच्या उद्योगाची स्थिती व भविष्याचे चित्र**<br>ए) कंपनीच्या स्थापनेपासून मार्च २०२४ पर्यंतची वाटचाल पारेषणाच्या परवाना धारकांची कर्तव्ये<br>बी) पारेषण परवाना धारक<br>सी) एसटीयु - राज्य पारेषण संस्था<br>डी) संयुक्त साहसी उपक्रम (JV)<br>इ) मानव संसाधने व विकास |
| २. | **संचालक आणि व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्ती**<br>ए) संचालक<br>बी) स्वतंत्र संचालकांचे घोषणापत्र<br>सी) व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्ती<br>डी) बैठका |
| ३. | **वित्तीय ठळक वैशिष्ट्ये**<br>ए) कंपनीची कामगिरी<br>बी) राखीव<br>सी) भाग भांडवलात बदल<br>डी) लाभांश<br>इ) अंतर्गत नियंत्रणे<br>एफ) उपकंपन्या<br>जी) परिव्यय लेखापरिक्षक<br>एच) सांविधिक लेखापरिक्षक<br>आय) सांविधिक लेखापरिक्षकांच्या अभिप्रायांवर स्पष्टीकरणे<br>जे) ठेवी<br>के) कर्जे, हमी किंवा गुंतवणूकीची माहिती<br>एल) संबंधित व्यक्ती / संस्था सोबतचे व्यवहार<br>एम) व्यवसायाच्या स्वरुपात बदल (काही असल्यास) त्याचे निवेदन |
| ४. | **इतर अनुपालने**<br>ए) सेक्रेटेरीयल ऑडीट रिपोर्ट<br>बी) धोके व्यवस्थापन धोरण<br>सी) वार्षिक विवरणांचा उतारा<br>डी) कंपनीचे वित्तिय वर्ष संपल्यानंतर कंपनीच्या वित्तिय विवरण पत्राच्या तारखे पासून अहवाल सादरीकरणाच्या तारखेपर्यंत वित्तिय स्थितीवर परिणाम करणारे बदल किंवा बांधिलकी जर उद्भवल्या असल्या तर त्यांची माहिती.<br>इ) कंपनीची विद्यमान - चालू असलेली स्थिती या दर्जावर परिणाम करु शकतील असे काही न्यायालय व लवादांचे लक्षणीय व प्रत्यक्ष आदेश वितरित झाले असल्यास, त्यांचा कंपनीवर सध्या किंवा भविष्यात होऊ शकणाऱ्या परिणामांविषयी निवेदन<br>एफ) गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी यामध्ये केलेल्या रक्कमेचे स्थानांतरण |
| ५. | **ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञान अंगिकार आणि परकीय चलनातील मिळकती व खर्च** |
| ६. | **कंपनीची सामाजिक जबाबदारी (CSR)** |
| ७. | **संचालकांच्या जबाबदारी संबंधीचे निवेदन** |
| ८. | **ऋण निर्देश** |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## संचालकांचा अहवाल

**प्रति,**

**मा. सदस्य,**

आपल्या महापारेषण कंपनीने दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षात केलेल्या उद्योग, व्यावसायिक व संचलन क्षेत्रातील कामगिरीचा अहवाल आपणास सादर करताना मला आनंद होत आहे.

### १) कंपनीच्या उद्योगाची स्थिती व भविष्याचे चित्र

### अ) कंपनी स्थापन झाल्यापासून मार्च २०२४ पर्यंत कंपनीचा प्रवास :

आपण मार्च २००६ मध्ये असलेल्या ४६८ उपकेंद्रांच्या तुलनेत दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत आपल्या मालकीची ७४२ उपकेंद्रे बांधली आहेत. आपल्या एकत्रित विकासाचा वार्षिक दर (CAGR) २.४६ टक्के आहे. प्रत्येक नवे उपकेंद्र हे वीजेची वाढती मागणी पूर्ण तर करतेच पण त्याचबरोबर ते २४×७ स्वरुपात विश्वासार्ह आणि दर्जेदार वीज देणे, वीज जाळे स्थिर ठेवणे आणि पारेषणातील वीज हानी कमी करणे ही सुद्धा कामे करत आहे. प्रत्येक नव्या उपकेंद्राची भर झाल्याने मागणीनुरुप वाढत्या वीज निर्मिती क्षमतेनुसार वीज पारेषणाची क्षमतासुद्धा वाढत गेली आहे हे आपल्या लक्षात येईल.

**वीज उपकेंद्राच्या संख्येत झालेली वर्ष निहाय वाढ**




याशिवाय आपल्या मालकीचे एक राज्यव्यापी अति उच्च दाब पारेषण क्षमतेच्या विजेचे जाळे आहे. त्यामध्ये ६६ के व्ही ते ४०० के व्ही क्षमतेपासून ५०० के व्ही क्षमतेची एचव्हीडीसी विजेचे पारेषण केले जाते. मार्च २००६ रोजी आपल्याकडे एकूण ३५,०२८ सर्कीट कि मी लांबीच्या वीज पारेषण तारा होत्या. त्यांचा विस्तार केला आहे. ३१ मार्च २०२४ रोजी आपल्या विज जाळ्यानी तारांची लांबी ५१,५१८ सर्कीट कि मी झाली आहे. त्यांच्या एकत्रित वार्षिक वाढीचा दर (CAGR)२.०५टक्के आहे.



**व्होल्टेजच्या पातळीवर वर्ष २००५-०६ पासून मार्च २०२४ पर्यंत झालेली वाढ खालील तक्त्यात दिली आहे.**

| अनु. क्र. | व्होल्टेज क्लास | उपकेंद्राची संख्या | | अति उच्च दाब वीज जाळे (सर्किट किमी) | |
|---|---|---|---|---|---|
| | | मार्च २००६ | मार्च २०२४ | मार्च २००६ | मार्च २०२४ |
| १. | ५०० केव्ही एचव्हीडीसी | २ | २ | १५०४ | १५०४ |
| २. | ७६५ केव्ही | ० | १ | ० | ० |
| ३. | ४०० केव्ही | १७ | ३३ | ६३७६ | ८४६४ |
| ४. | २२० केव्ही | १३४ | २५४ | ११४७८ | १९८८२ |
| ५. | १३२ केव्ही | २१७ | ३६५ | १००८५ | १८५६९ |
| ६. | ११० केव्ही | ३१ | ४१ | १६३७ | १७९८ |
| ७. | १०० केव्ही | २५ | ३९ | ६७८ | ७०६ |
| ८. | ६६ केव्ही | ४२ | ७ | ३२७० | ५९५ |
| | **एकूण** | **४६८** | **७४२** | **३५०२८** | **५१५१८** |

टिपा: ६६ केव्ही स्तर टप्प्या टप्प्याने बंद करण्याचे महापारेषणचे धोरण आहे. म्हणून विद्यमान ६६ केव्ही उपकेंद्रांचा दर्जा उंचावण्यात येत आहे आणि सध्याच्या तारा बदलून तेथे जास्त दाबाच्या टाकल्या किंवा काढून टाकल्या जातात.

**विद्यमान पारेषण जाळे व संबंधित माहिती (३१/०३/२०२४ रोजी)**

| अनु. क्र. | व्होल्टेज क्लास | अति उच्च दाब उपकेंद्राची संख्या | पारेषण क्षमता (एमव्हीए) | पारेषण तारा (सी के एम) |
|---|---|---|---|---|
| १. | ५०० केव्ही एचव्हीडीसी | २ | ३५८२ | १५०४ |
| २. | ७६५ केव्ही | १ | ३००० | ० |
| ३. | ४०० केव्ही | ३३ | ३४०४८ | ८४६४ |
| ४. | २२० केव्ही | २५४ | ६०८४० | १९८८२ |
| ५. | १३२ केव्ही | ३६५ | ३१५२९.५ | १८५६९ |
| ६. | ११० केव्ही | ४१ | २६०५ | १७९८ |
| ७. | १०० केव्ही | ३९ | २८२३ | ७०६ |
| ८. | ६६ केव्ही | ७ | १७०.५ | ५९५ |
| | **एकूण** | **७४२** | **१३८५९८** | **५१५१८** |

**वर्ष २०२३-२४ मधील नियोजन केलेली आणि पूर्ण केलेली कामे**

| अनु. क्र. | व्होल्टेज क्लास | उपकेंद्र (संख्या) | | | पारेषण तारा (सीकेएम) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियोजित | प्रत्यक्ष | एमव्हीए | नियोजित | प्रत्यक्ष |
| १. | ५०० केव्ही एचव्हीडीसी | ० | ० | ० | ० | ० |
| २. | ७६५ केव्ही | ० | ० | ० | ० | ०.०० |
| ३. | ४०० केव्ही | ० | ० | ५०० | ० | ०.०० |
| ४. | २२० केव्ही | ५ | ४ | ७५० | ७०२ | ५१६.४० |
| ५. | १३२ केव्ही | ३ | ९ | ५२५ | २२६ | ३६०.०६ |
| ६. | ११० केव्ही | ० | १ | १२५ | ० | ९.९५ |
| ७. | १०० केव्ही | ० | ० | ० | ० | ०.०० |
| ८. | ६६ केव्ही | ० | ० | ० | ० | ०.०० |
| | **एकूण** | **८** | **१४** | **१९००** | **९२८** | **८८६.४१** |

- यावरुन असे दिसून येईल की, आपण वीज उपकेंद्राची संख्या आणि पारेषण तारांची लांबी (CKMS)यात भर टाकून यशस्वी वाढीचे प्रमाण सिध्द केले आहे.
- व्होल्टेज लेव्हल सब स्टेशन्स (उपकेंद्रे) याचे लक्ष्य ०८ उपकेंद्रे असताना प्रत्यक्षात आपण १४ उपकेंद्रे इतकी वाढ केली. यात आपल्या वाढीचा दर १७५ टक्के असा सिध्द केला.
- विविध व्होल्टेज लेव्हल लाईन्स साठीचे लक्ष्य ९२८सर्किट किमी होते. मात्र आपण पूर्ण केलेली संख्या ८८६.४१ सीकेएम अशी आहे यात आपला दर ९५.५ टक्के असा आहे.
- वर्ष २०२३-२४ मध्ये कार्यान्वित केलेल्या नवीन अतीउच्च दाब उपकेंद्राच्या नावाची यादी परिशिष्ट -अ मध्ये आहे.
- वर्ष २०२३-२४ मध्ये कार्यान्वित केलेल्या अती उच्च दाब वीज ताराची यादी परिशिष्ट – ब मध्ये आहे.

| मागील पाच वर्षांची तुलना | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | तपशील | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | एकूण |
| १ | नवीन उपकेंद्रे | ९ | १३ | १२ | २२ | १४ | ७० |
| | अ) नव्या उपकेंद्रामुळे एम व्ही ए मध्ये झालेली भर | २०० | ४७५ | १५०२ | १००० | ५५० | ३७२७ |
| | ब) अतिरिक्त ट्रान्सफॉमर मुळे झालेली एम व्ही ए मध्ये भर | ७७५ | ७४० | ७७५ | १९१५ | ११५० | ५३५५ |
| | क) ट्रान्सफॉमर बदलल्यामुळे झालेली एम व्ही ए मध्ये भर | ० | ४४० | ६६१ | २०० | २०० | १५०१ |
| | एकूण झालेली एम व्ही ए मध्ये भर | ९७५ | १६५५ | २९३८ | ३११५ | १९०० | १०५८३ |
| २ | इ एच व्ही लाईन्स सी के एम मध्ये | १०१६.९२ | ८४५.४२६ | ६४६.८०३ | ८१८.२३ | ८८६.४१ | ४२१३.७८ |
| ३ | भांडवली खर्च (रु. कोटीमध्ये) | **१४९९** | **१६०३** | **१२५०** | **१४६४** | **१०३७** | **६८५३** |

**भविष्यातील वाटचालीचा आराखडा -**

राज्याचा विकासाच्या वाढीचा दर खूप उच्च आहे आणि ह्या वाढीला गती देण्यासाठी वीज हे महत्वाचे चालक आहे. म्हणून महापारेषणने २०२४-२५ या कालावधी दरम्यान १० नवीन उपकेंद्रे आणि १४८५ सकिमी बांधण्याचे योजले आहे. व्होल्टेज स्तरनिहाय उद्दिष्टे खालील तक्त्यात दिली आहेत.

| अनु. क्र. | व्होल्टेज वर्ग | उपकेंद्रे (संख्या) | पारेषण लाईन्स (सकिमी) |
|---|---|---|---|
| १ | ७६५ केव्ही | ० | ० |
| २ | ४०० केव्ही | ० | ४५६ |
| ३ | २२० केव्ही | ४ | ७७३ |
| ४ | १३२ केव्ही | ६ | २५५ |
| ५ | ११० केव्ही | ० | ० |
| ६ | १०० केव्ही | ० | ० |
| ७ | ६६ केव्ही | ० | ० |
| | एकूण | १० | १४८५ |

**ब) पारेषणाचे परवाना धारक**

**(१) एचव्हीएसी आणि एचव्हीडीसी प्रणालीची उपलब्धता २००५-२००६ पासून २०२३-२४ पर्यंत**




| वर्ष | ०५-०६ | ०६-०७ | ०७-०८ | ०८-०९ | ०९-१० | १०-११ | ११-१२ | १२-१३ | १३-१४ | १४-१५ | १५-१६ | १६-१७ | १७-१८ | १८-१९ | १९-२० | २०-२१ | २१-२२ | २२-२३ | २३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एचव्हीएसी | ९८.७२ | ९८.८२ | ९८.९९ | ९९.२९ | ९९.४८ | ९९.६२ | ९९.७२ | ९९.७१ | ९९.७२ | ९९.७२ | ९९.७२ | ९९.६४ | ९९.६१ | ९९.५८ | ९९.५९ | ९९.६७ | ९९.६७ | ९९.६५ | ९९.६९ |
| एचव्हीडीसी | ६३.४८ | ९१.७३ | ९२.२९ | ९३.५५ | ९४.९६ | ९७.६२ | ९६.५५ | ९७.५४ | ९८.४ | ९७.९६ | ९४.५६ | ९७.०७ | ९६.४१ | ९५.८९ | ९७.६४ | ९३.६४ | ९४.२७ | ९५.३४ | ९५.२९ |

**एचव्हीएसी (हाय व्होल्टेज अल्टरनेट करंट सिस्टम), आणि एचव्हीडीसी (हाय व्होल्टेज डायरेक्ट करंट सिस्टम) वित्तिय वर्ष २००५-२००६ पासून २०२३-२४ पर्यंत सिध्द केलेली उपलब्धता.**

| वर्ष | एचव्हीएसी | एचव्हीडीसी |
|---|---|---|
| २००५-०६ | ९८.७२% | ६३.४८% |
| २००६-०७ | ९८.८२% | ९१.७३% |
| २००७-०८ | ९८.९९% | ९२.२९% |
| २००८-०९ | ९९.२९% | ९३.५५% |
| २००९-१० | ९९.४८% | ९४.९६% |
| २०१०-११ | ९९.६२% | ९७.६२% |
| २०११-१२ | ९९.७२% | ९६.५५% |
| २०१२-१३ | ९९.७१% | ९७.५४% |
| २०१३-१४ | ९९.७२% | ९८.४०% |
| २०१४-१५ | ९९.७३% | ९७.९६% |
| २०१५-१६ | ९९.७२% | ९४.५६% |
| २०१६-१७ | ९९.६४% | ९७.०७% |
| २०१७-१८ | ९९.६१% | ९६.४१% |
| २०१८-१९ | ९९.५८% | ९५.८९% |
| २०१९-२० | ९९.५९% | ९७.६४% |
| २०२०-२१ | ९९.६७% | ९३.६४% |
| २०२१-२२ | ९९.६७% | ९४.२७% |
| २०२२-२३ | ९९.६५% | ९५.३४% |
| २०२३-२४ | ९९.६९% | ९५.२९% |

## (बी) (२) पारेषण हानी



| अ. क्र. | वर्ष | पारेषण हानी टक्केवारी % |
|---|---|---|
| १ | २००६-०७ | ५.९३ |
| २ | २००७-०८ | ४.६७ |
| ३ | २००८-०९ | ४.८८ |
| ४ | २००९-१० | ४.६१ |
| ५ | २०१०-११ | ४.३१ |
| ६ | २०११-१२ | ४.२५ |
| ७ | २०१२-१३ | ४.१२ |
| ८ | २०१३-१४ | ४.०९ |
| ९ | २०१४-१५ | ३.८९ |
| १० | २०१५-१६ | ३.९२ |
| ११ | २०१६-१७ | ३.६३ |
| १२ | २०१७-१८ | ३.३० |
| १३ | २०१८-१९ | ३.११ |
| १४ | २०१९-२० | ३.१७ |
| १५ | २०२०-२१ | २.९४ |
| १६ | २०२१-२२ | ३.१९ |
| १७ | २०२२-२३ | ३.२६ |
| १८ | २०२३-२४ | ३.२१ |

वर्ष २०२३-२४ मध्ये पारेषण हानी ३.२१ टक्के होती आणि देशातील इतर सर्व पारेषण संस्थांमध्ये सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.

**(बी) (३) विद्यमान पारेषण जाळे व संबंधित माहिती** **(३१/०३/२०२४ रोजी)**

| व्होल्टेज क्लास | अति उच्च दाब उपकेंद्राची संख्या | पारेषण क्षमता (एमव्हीए) | तारा (सीकेटी कि. मी.) |
|---|---|---|---|
| ७६५ केव्ही | १ | ३००० | ० |
| ५०० केव्ही एचव्हीडीसी | २ | ३५८२ | १५०४ |
| ४०० केव्ही | ३३ | ३४०४८ | ८४६४ |
| २२० केव्ही | २५४ | ६०८४० | १९८८२.४ |
| १३२ केव्ही | ३६५ | ३१५२९.५ | १८५६८.७ |
| ११० केव्ही | ४१ | २६०५ | १७९८.४ |
| १०० केव्ही | ३९ | २८२३ | ७०६ |
| ६६ केव्ही | ७ | १७०.५ | ५९५ |
| **एकूण** | **७४२** | **१३८५९८** | **५१५१८.५** |

**पारेषण प्रणालीची विद्यमान उपलब्धता आणि त्यासाठी म.वि.नि. आयोगाने दिलेले स्थिर चिन्ह :**

| वर्ष | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एचव्हीएसी उपलब्ध % | (म. वि. नि. आयोगाचे स्थिर चिन्ह) ९८ % | | | | | | | |
| | ९९.६४% | ९९.६१% | ९९.५८% | ९९.५९% | ९९.६७% | ९९.६७% | ९९.६५% | ९९.६९% |
| एचव्हीडीसी उपलब्ध % | (म. वि. नि. आयोगाचे स्थिर चिन्ह) ९५ % | | | | | | | |
| | ९७.०७% | ९६.४१% | ९५.८९% | ९७.६४% | ९३.६४% | ९४.२७% | ९५.३४% | ९९.२९% |

**(बी) (४) पारेषण परवाना धारकांपुढील आव्हाने :**

१) पारेषण यंत्रणा उपलब्धता – एचव्हीएसी आणि एचव्हीडीसी प्रणाली उपलब्धतेची देखभाल करणे आणि त्यात आणखी सुधारणा करणे.
२) पारेषण हानी – पारेषण हानी कमी करणे.
३) वेळेवर प्रकल्प पूर्ण करणे – वेळेची आणि खर्चाची बचत करुन हानी टाळण्याकरिता प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे.
४) सायबर सुरक्षा – सायबर हल्ल्यांपासून महत्वाच्या प्रणाली डेटाचे रक्षण करणे आणि सायबर सुरक्षा सुनिश्चित करणे यासाठी प्रणाली सुधारणे.
५) नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार – नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी वेगात सुधारणा करणे.

६) व्यवसाय प्रक्रीयांना वेग देणे :- सविधिक मान्यता, भूसंपादन, व रस्ता वापर हक्क संबंधी समस्या सोडवणे यातील विलंब टाळणे.

७) परिचालन आणि परिक्षण यावर इष्टतम खर्च - परिचालन आणि परिक्षण यावरील कमीतकमी खर्च आणि स्वयंचालनाकडे वाटचाल यासह विश्वासार्हता, सुरक्षा आणि दर्जा यात तडजोड न करता पायाभूत सुविधा परिक्षण करणे.

८) नेटवर्क वीज जाते आणि मनुष्यबळ यांचा इष्टतम वापर करणे.

९) फायबर ऑप्टिक कम्युनिकेशन नेटवर्क विकसित करणे आणि त्यासंदर्भातील व्यवसाय पर्यायांचा शोध घेणे.

१०) अपघात कमी करणे आणि शून्य अपघात सुनिश्चित करणे.

**बी (५) - नाविन्यपूर्ण कल्पना आणि नवीन तंत्रशास्त्रे यांचा स्वीकार.**

**१) रिमोट एअरबोर्न निरीक्षण आणि स्कॅनिंग प्रणाली (रिमोट नियंत्रण ड्रोन) -**

महापारेषण ही संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पसरलेल्या खूप मोठ्या इएचव्ही जाळ्याचे परिचालन व परिक्षण करत आहे. इतक्या मोठ्या जाळ्याला सुलभतेने कार्यरत ठेवण्यासाठी आणि पारेषण यंत्रणेची उपलब्धता आणि विश्वासार्हता टिकवण्यासाठी महापारेषणला पारेषण लाईन्सबाबत समस्यांमुळे घडणाऱ्या घटना कमीतकमी होण्यासाठी सावधगिरीचे आवश्यक उपाय योजणे आवश्यक आहे. ही बाब पारेषण लाईन्सच्या सुस्थितीची तपासणी करण्यासाठी नियतकालिक सर्वेक्षण / गस्त तपासणी या उपायांनी साध्य होऊ शकते. याआधी कंडक्टर / हार्डवेअर / अर्थवायर यांना काही हानी झाली आहे का हे तपासण्यासाठी जमीन गस्त / माकड गस्त यासारख्या पारंपारिक पद्धती वापरल्या जात होत्या. मात्र लाईन गस्तीच्या सदर पारंपारिक पद्धती वेळखाऊ आहेत आणि अकार्यक्षम परिचालन कार्यपद्धतीच्या आहेत. त्यामुळे महापारेषणने लाईन गस्तीचे नवीनतम तंत्रज्ञान स्वीकारले आहे आणि रिमोट एअरबोर्न निरीक्षण आणि स्कॅनिंग प्रणालीचा वापर सुरु केला आहे जे रिमोट पद्धतीने नियंत्रित केले जाणारे ड्रोन आहेत. ड्रोनच्या वापराने लाईन्सची गस्त आणि त्यावर देखभाल यासाठी होणारा खर्च आणि वेळ यात बचत करण्यास सहाय्य होत आहे.

महापारेषणने कंडक्टर / इन्सुलेटर्स मध्ये तूटफुट, हार्डवेअर कमी होणे / हानी होणे, कंडक्टर किंवा अर्थवायर हॉटस्पॉट यांचे नुकसान इत्यादींची तपासणी करण्यासाठी इएचव्ही लाईन्सचे जवळून निरीक्षण करण्याकरिता २४ रिमोट एअरबोर्न निरीक्षण आणि स्कॅनिंग प्रणाली (रिमोट नियंत्रित ड्रोन्स) खरेदी केल्या आहेत. सदर रिमोट नियंत्रित ड्रोन्सवर कोणत्याही दोष / उणीवा यांचे नेमके सनियंत्रण करण्यासाठी तसेच सीमा उल्लंघन / अतिक्रमण बाबी व रस्ता वापराचा हक्क यांचे नेमके सनियंत्रण करण्यासाठी आधीपासून प्रतिष्ठापित थर्मोव्हिजन आणि जीपीएस सह उच्च संवेदनशील व्हिज्युअल कॅमेरे लावण्यात आले आहेत. याचबरोबर इएचव्ही लाईन्सची सुस्थिती सुनिश्चित करण्यासाठी ह्या सर्व डिजिटल स्वरुपात रेकॉर्ड केलेले तपशील संनियंत्रित / विश्लेषित केले जात आहेत. याप्रकारे, रिमोट नियंत्रित ड्रोनद्वारा पारेषण लाईनच्या सध्याच्या स्थितीची माहिती मिळते आणि काही मोठी घटना / ब्रेकडाऊन होण्याआधी योग्य सुधारक / दुरुस्ती कृती / उपाय योजणे शक्य होते.



**२) हॉट लाईन परीरक्षण कामांकरिता इन्सुलेटेड प्रकारचे एरियल वर्क प्लॅटफॉर्म -**

उच्च प्रमाणकानुसार कामगिरी मानके पाळून मोठ्या पसरलेल्या इएचव्ही जाळ्याचे परिचालन आणि परीरक्षण करण्यासाठी उर्जा क्षेत्रातल्या तंत्रज्ञान विषयक प्रगतीशी जुळवून घेण्याकरिता नवीन तंत्रे आणि तंत्रज्ञान स्वीकारणे आवश्यक आहे. महापारेषणने हॉट लाईन परीरक्षण पद्धती स्वीकारल्या आहेत ज्याद्वारे उपकरणांचे लाईव्ह लाईन परीरक्षण शक्य आहे. ते प्रणाली उपलब्धतेत सुधारणा घडवते आणि इएचव्ही लाईन्सवरील व्यत्यय (खंड) कमी करते. महापारेषणने लाईव्ह प्रणालीवर कामे करण्यासाठी विशेष हॉट लाईन परीरक्षण पथके स्थापन केली आहेत ज्यामुळे सेवा बंद न ठेवता प्रणालीच्या डाऊनटाईममध्ये घट करण्यास सहाय्य होत आहे.

याशिवाय, महापारेषणने २३ मीटर्स उंची पर्यंत हॉट लाईन परीरक्षण कामे परिणामकारकपणे पार पाडण्यासाठी नागपूर आणि पुणे विभागासाठी प्रत्येकी एक असे दोन इन्सुलेटेड प्रकारचे एरियल वर्क प्लॅटफॉर्म खरेदी केले आहेत. ते एक मेकॅनिकल साधन असून सामान्यत: पोहोचणे अशक्य अशा उंच ठिकाणी कर्मचारी किंवा उपकरणास तात्पुरता प्रवेश मिळण्यासाठी वापरले जाते. परीरक्षण काम प्रगतीपथावर असताना असे वर्क प्लॅटफॉर्म कामाच्या ठिकाणी ड्राईव्ह केले जाऊ शकतात.



**३) हॉट-लाईन वॉशिंग-**

महापारेषणच्या अनेक इएचव्ही लाईन्स औद्योगिक आणि धुके असलेल्या भागातून जातात ज्यामुळे ह्या लाईन्सवर जास्त प्रमाणात ट्रिपिंग होते. ही ट्रिपिंग कमी करण्यासाठी हॉट लाईन पथकांना ह्या लाईन्सवर नियमितपणे हॉट लाईन वॉशिंगचे कार्य करावे लागते. आता महापारेषण मध्ये प्रत्येक परिमंडळसाठी एक या प्रमाणे (७) हॉटलाईन वॉशिंग उपकरणे खरेदी केली आहे.




**४) हॉटलाईन परीरक्षण / पंक्चर इन्सुलेटर तपास - (पी आय डी)**

पंक्चर इन्सुलेटर डिटेक्टर हे एक कमी वजनाचे उपकरण आहे जे एर्नजीजाईज्ड सस्पेन्शन इन्सुलेटर्स, स्टेशन पोस्ट, बुशिंग्ज आणि लाईटनिंग अरेस्टर यावरील दोष आणि धोकादायक परिस्थिती याची नोंद करते ते इन्सुलेटरवरील विद्युत क्षेत्राची मोजणी करते, विद्युत क्षेत्राचे तसेच सर्व कंडक्टिव्ह इन्सुलेटर दोषांचे जसे की गळणारे इन्सुलेटलर, पंक्चर झालेले इन्सुलेटर, सरफेस कंटामिनेशन, कार्बन ट्रॅकिंग, कॅप्टिव्ह मॉईश्चर यांचे अभिलेखन नोंद करते.

**५) डिजिटल उपकेंद्र आणि डिजिटल बे -**

महापारेषण उपकेंद्रांचे डिजिटलीकरण आणि दूरस्थ परिचालन हाती घेण्याचे नियोजन करत आहे. ही पारंपारिक तांब्याच्या जोडण्या ऐवजी फायबर ऑप्टिक केबलच्या वापरामुळे प्रणालीची विश्वासार्हता कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढेल. सध्या नाशिक विभागात २२०/३३ केव्ही केकत निंभोरा डिजिटल उपकेंद्र सेवेत असून दिनांक १९.०१.२०२४ पासुन, सध्याच्या ४००/२०० के. व्हि. लोणीकंद - २ उपकेंद्रातून एक २२० के. व्हि. डिजिटल बे कार्यान्वित केला आहे.

**६) रॅपिड रिस्टोरेशन प्रणालीचे कार्यान्वयन** (RRS) - **(गतीमान पूतर्स्थापना प्रणालीचे वर्गीकरण)**

इएचव्ही उपकेंद्रातील कोणतेही आयसीटी साधन बंद पडले तर त्याचा परिणाम संपूर्ण प्रणालीचे नुकसान होण्यात होतो आणि बंद पडलेली आयसीटी बँक पुन्हा परिचालनात येईपर्यंत सक्तीचे लोड शेडिंग अपरिहार्य होऊन जाते. त्यामुळे, महापारेषणच्या प्रणालीतील ४०० केव्ही उपकेंद्रातील आयसीटी बँकेचे कोणतेही सिंगल फेज साधन बंद पडले तर अशा वेळी स्थिती सामान्य करण्यातील विलंब कमीतकमी व्हावा याकरिता प्रभावी तोडगा या रुपात रॅपिड रिस्टोरेशन योजना (RRS) कार्यान्वयित करण्यात येत आहे. यातून इएचव्ही परिचालन आणि परीरक्षण यासाठी अधिक लवचिकता आणि त्याद्वारे प्रणालीची विश्वासार्हता वाढणे या बाबी साध्य होत आहेत.

**७) इंटरफेस उर्जा मीटर्सकरिता ऑटोमेटेड मीटर वाचन (AMR) प्रकल्प –**

ऑटोमेटेड मीटर वाचन (AMR) प्रकल्प हा अधिक चांगली ग्रॅन्युलारिटी आणि रॅम्प संनियंत्रण याकरिता महापारेषणच्या संपूर्ण भौगोलिक क्षेत्रात आणि अदानी, बेस्ट व टाटा यासारख्या मुंबईतील संस्थांमध्ये पारेषण आणि उपपारेषणाकरिता टप्प्या टप्प्याने कार्यान्वित केला जात आहे. ह्या प्रकल्पाने मानवी हस्तक्षेपाशिवाय इंटरफेस उर्जा मीटर डेटा संग्रहणाची स्वयंचलित, पारदर्शक आणि विश्वासार्ह प्रक्रिया शक्य केली आहे. हा प्रकल्प SAMAST मार्गदर्शक तत्त्वाच्या समान महाराष्ट्र राज्यात विचलन फेड कार्यतंत्राच्या (DSM) प्रभावी कार्यान्वयनासाठी प्रत्यक्ष उर्जा डेटा पुरवतो. विचलन फेड कार्यतंत्र ही GRID शिस्तीची गरज आहे आणि AMR ABT प्रणालीद्वारा ती नेमक्या आणि वेगवान पद्धतीने साध्य होऊ शकते. वि.फे.का (DSM) करिता जुना इंटरफेस उर्जा मीटर (IEM) डेटा मनुष्यबळाने अपलोड करण्यात आला होता. ह्या प्रकल्पाच्या कार्यान्वयनानंतर सुमारे ९५% IEM डेटा हा AMR द्वारा उपलब्ध झाला आहे. AMR प्रकल्प राज्य भार प्रेषण केंद्राच्या (SLDC) स्तरावर वेळापत्रक आणि देयक विषयक कार्यांमध्ये सुद्धा सहाय्य करतो.

**८) महाराष्ट्र पारेषण मत्ता व्यवस्थापन केंद्र (MTAMC) –**

महाराष्ट्र पारेषण मत्ता व्यवस्थापन केंद्र (MTAMC) हे निगडित टेलिकम्युनिकेशन प्रणाली आणि अनुकुलित उपकेंद्रे यासह महापारेषणच्या पारेषण प्रणालीचे दूरस्थ केंद्रिकृत प्रवर्तन, संनियंत्रण आणि नियंत्रण शक्य होण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. महापारेषण हे २२EHV उपकेंद्रांच्या स्वयंचलनाचा स्थापनेचे नियोजन करत आहे. ही उपकेंद्रे नियंत्रण केंद्रांद्वारा OPGW जोडणीसह संनियंत्रित आणि नियंत्रित केली जातील. सदर केंद्र ऐरोली येथील नियंत्रण केंद्राद्वारा महापारेषण उपकेंद्रांच्या केंद्रीकृत संनियंत्रण आणि नियंत्रणात सहाय्य करेल. दूरस्थ संरक्षण व्यवस्थापन आणि रिले मापदंडीकरण, स्वयंचलित DR आणणे (Fetching) आणि त्याचे विश्लेषण, VMS व PIDS द्वारा उपकेंद्रांचे व्हिडिओ देखरेख ट्रान्स्फॉर्मर संनियंत्रण प्रणाली (ऑनलाईन बुशिंग संनियंत्रण, ऑनलाईन डीजीए, सहायक प्रणाली) यासारखे उपकेंद्रांचे स्वयंचलन शक्य होईल. हे केंद्र कंपनी डेटा वेअरहाऊस प्रणाली (CDWS) स्थापन करण्यात सुद्धा सहाय्यभूत होईल.

**९) आणीबाणी पुनर्स्थापना प्रणाली (ERS) –**

नैसर्गिक / मानवनिर्मित संकटांमुळे पारेषण प्रणालीत खंड पडणे ही संस्था / पारेषण अनुज्ञप्ती धारकांसाठी चिंतेची बाब असते कारण खंड हे वीज बाहेर काढणे मर्यादित तर करतातच पण वीजेची मागणी पुरवण्यात गंभीर समस्या निर्माण करतात. पारेषण लाईन्सचे शक्य तितक्या कमी वेळेत पुन:स्थापन करणे ही बहुतेक सर्व संस्था / पारेषण अनुज्ञप्तीधारकांसाठी आव्हानात्मक आणि कठीण कामगिरी असते. नैसर्गिक / मनुष्यनिर्मित संकटे सौम्य करण्यासाठी तात्पुरत्या आकस्मिक निकड पुन:स्थापन प्रणालीवर (ERS) पारेषण प्रणालीचे त्वरित पुन:स्थापन करणे हे हॉस्पिटल / रेल्वे यासारख्या आवश्यक सेवा कार्यरत ठेवण्यासाठी आणि त्या कालावधीत इतर कार्ये करण्यासाठी आवश्यक असते.

सध्या महापारेषणकडे दोन आणीबाणी पुनर्स्थापना प्रणाली (ERS) आहेत त्यापैकी एक कळवा (मुंबई) तर दुसरी मूर्तीजापूर (जिल्हा अकोला) येथे ठेवण्यात आली आहेत. ह्या प्रणाली ४०० केव्ही स्तरापर्यंत पुन:स्थापन कार्य करण्यास सक्षम आहेत. सदर उपलब्ध दोन ERS ह्या आकस्मिक निकडीच्या प्रसंगी गरज भागविण्यासाठी मोक्याच्या ठिकाणी ठेवण्यात आल्या आहेत. तसेच त्या जिथे आणि जशी गरज भासेल तशा वापरण्यात येत आहेत आणि त्या अतिशय उपयोगी असल्याचे आढळले आहे. महाराष्ट्र राज्याच्या खूप मोठ्या भौगोलिक क्षेत्रावर पसरलेल्या महापारेषणच्या विस्तृत EHV जाळ्याचा विचार करता, आकस्मिक निकड / संकटकालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळण्यासाठी १३२ केव्ही ते ४०० केव्ही वर्गाच्या पारेषण लाईन्सच्या कामांसाठी उपयुक्त अशा दोन अतिरिक्त ERS प्रणालींचे प्रापण करणे विचाराधीन आहे.





**ब) राज्याच्या वीज जाळ्याचे प्रवर्तन - व्यवस्थापन**

**राज्य भार प्रेषण केंद्र (SLDC):-**

भार प्रेषण केंद्र ही राज्य वीज प्रणालीचे प्रवर्तन कार्य एकात्मिक रित्या होत असल्याची खातरजमा करणारी शिखर संस्था आहे. भार प्रेषण केंद्राची कामे खालील प्रमाणे आहेत.

अ) राज्यातील वीज निर्मितीचे परवानाधारक किंवा ते निर्मिती करण्याऱ्या संस्था यांच्यासोबत पारेषणा संबंधी – जे करार झालेले आहेत. त्यानुसार राज्यात विजेचा पर्याप्त वापर करणे, आखणी करणे आणि विजेचे पारेषण करणे.

ब) वीज जाळ्याच्या (GRID) कार्यावर लक्ष ठेवणे – संनियंत्रण करणे.

क) राज्याच्या वीज जाळ्यातून पारेषित होणाऱ्या विजेच्या प्रमाणाचे हिशेब लेखे ठेवणे.

ड) आंतर राज्य पारेषण प्रणालीचे पर्यवेक्षण व नियंत्रण करणे.

इ) वीज जाळ्याचे काम प्रत्यक्ष वेळेनुसार नियंत्रण करण्याची जबाबदारी पार पाडणे. वीज जाळ्याच्या कार्यक्षमतेसाठी निर्धारीत केलेली मानके आणि राज्य जाळ्यासाठीची संहिता यानुसार राज्याच्या वीज जाळ्याचे काम सुरक्षित रित्या आणि आर्थिक दृष्ट्या योग्य प्रकारे करणे.

राज्य भार प्रेषण केंद्र प्रत्यक्ष वेळेनुसार त्याचे कार्य करीत आहे. यामध्ये वीज जाळ्यावर लक्ष ठेवून त्याचे नियंत्रण निश्चित केलेल्या मापदंडानुसार करणे, आकस्मिक परिस्थिती आणि व्यत्यय यांचे व्यवस्थापन करणे, पश्चिम प्रदेश भार प्रेषण केंद्र आणि आंतरराज्य निर्मिती कंपन्या, पारेषण परवानाधारक वितरण संस्था आणि खुल्या प्रवेशातील संस्था यांच्याशी समन्वय साधून राज्यांच्या वीज जाळ्याचे आरोग्य सांभाळणे व आर्थिक दृष्ट्या योग्य प्रकारे राज्याला वीज पुरविणे, राज्य भार प्रेषण केंद्राकडे राज्य वीज लेखांकन करणे, पारेषण हानीची मोजणी करणे, आंतरराज्य एबीटी यंत्रणे मार्फत विचलन वाद दूर करणे आणि ऊर्जा प्रवेश-वापर यांचा अहवाल आर इ सी च्या प्रमाणिकी करणासाठी राज्याच्या नवीकरणीय ऊर्जा आयोगाकडे पाठविणे या कामांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील अल्पमुदतीच्या खुल्या प्रवेशासाठी समन्वयक संस्था म्हणून राज्य भार प्रेषण केंद्र काम करते.

**(ब) (१) वि.वि. २०२३-२४ करिता ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत. -**

१) राज्यात महत्तम पुरवलेली मागणी फेब्रुवारी २०२४ मध्ये २८९६९मेवॅ होती.

२) वर्षभरात ७३.९१ टक्के वेळेसाठी ४९.९० हर्टझ्-५०.०५ हर्टझ् इतक्या मान्य श्रेणीत प्रणाली वारंवारता राहिली. (जुलै २०२३ मध्ये ५०.४२ हर्टझ् इतकी कमाल वारंवारता आणि ऑक्टोंबर २०२३ मध्ये ४९.४६ हर्टझ् इतकी किमान वारंवारता होती.) सरासरी वारंवारता ४९.९९ हर्टझ् होती.

३) एकूण २०६६८२ दशलक्ष युनीट एवढी वीज मागणी पूर्ण केली.

**(सर्व आकडेवारी प्रवर्तनातील असून (SCADA-Data) च्या आधारे आहे.)**

**ब) (२) पूर्ण केलेली महत्वाची कामे :-**

**१) खालील विद्युत निर्मिती केंद्रात 'ब्लॅक स्टार्ट' ही पद्धती सुरु करण्यात आली.**

| |
|---|
| भिवपूरी (एच पी एस) -२५/०६/२३ आणि १९.१२.२०२३ |
| खोपोली (एच पी एस) - २५/०६/२०२३ आणि १९/१२/२०२३ |
| भिरा एच पी एस (एच पी एस) - १८/०६/२३ आणि १९/१२/२०२३ |
| उरण (जी टी पी एस) - ०५/०६/२३ आणि १२/१२/२०२३ |
| कोयाना (एच पी एस) - २०/११/२३ |
| घाटघर (एच पी एस) - २२/१२/२३ |
| पेंन्च - १२/०९/२३ |

२. बॅक अप कंट्रोल सेंटर (बी सी सी) याची प्रवर्तने दि. १३/०९/२०२३ रोजी ए एल डी सी अंबाझरी येथे यशस्विरित्या पूर्ण करण्यात आली. या साठी डब्ल्यू आर एल डी सी आणि इतर संबधितांचे साध्य झाले

३. मा. केंद्रिय विद्युत नियामक प्रधिकरण (सी इ आर सी) यांनी आंतर राज्य पारेषण प्रणालीसाठी जोडणी करणेसाठी आणि जनरल नेटवर्क ॲक्सेस (जी एन ए) या साठी एक नवीन नियमन दि. ०१.१०.२०२३ पासून अमलात आणले. या नियमानुसार महाराष्ट्र राज्यस्तरावर जी एन ए ची यशस्वीरित्या कार्यवाही करण्यात आली त्यात इतर संबधित व डब्ल्यु आर एल डी सी यांच्याशी समन्वयन योग्य प्रकारे झाले.

४. अक्षय ऊर्जा व्यवस्थापन केंद्राचा कॅलेंडर वर्ष २०२२ साठीचा वार्षिक अहवाल तयार करुन तो महाराष्ट्र राज्य प्रेषण केंद्राच्या (MAHASLDC) च्या वेबसाईटवर प्रकाशित केला

५. महापारेषण व महाराष्ट्र राज्य भारप्रेषण केंद्र यांनी संयुक्तपणे एम एस के व्ही वाय २ यावर एक अहवाल तयार केला आहे. तो महावितरण कंपनीच्या मागणी वी निर्मीती प्रकल्प याच्या विश्लेषणाच्या आधारे तयार केला असुन तो एम एस केव्ही वाय-१.० या अस्तित्वात असलेल्या योजनेतील प्रकल्पानुसार आहे. त्यात क्लस्टर्स (गट) निश्चित करुन त्यासाठी पारेषणचे स्तर अधिक शक्तीशाळा कशा कराव्यात आदी बाबी समाविष्ट आहे.

६. महाराष्ट्र वीजजाळे संहिता २०२० (एम इ जी सी-२०२०) यातील क्लॉज २८ च्या तरतुदीप्रमाणे राज्य भार प्रेषण केंद्राने विविवध कार्यपध्दती विकसीत केल्या आहेत. या सर्व कार्यपध्दती महाराष्ट्र भा. प्रे. केंद्राच्या अधिकाऱ्यानी स्वता राज्य भा. प्रे. केंद्राच्या कार्यालयात तयार केल्या आहेत. त्या सर्व राज्य भा. प्रे. केंद्राच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. भारतीय विद्युत क्षेत्रत श्रेष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या भार प्रेषण केंद्राला एल डी सी एक्सलन्स ॲवॉर्ड हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्याची योजना सुरु केली आहे. भारतातील सर्व भार प्रेषण केद्रांचे एक सचिवालय (फोरम)स्थापन करण्यात आले आहे. या फोरम मध्ये सर्व भा. प्रे. केंद्रासाठी ठेवलेल्या या पुरस्काराची माहिती जमा केली जाते. त्यातून या पुरस्कारांसाठी नामनिर्देशनाचे फॉर्म्स जमा केले जातात व त्याची माहिती स्वतंत्र परिक्षक मंडळ (ज्युरी) यांच्याकडे पाठविली जाते. या ज्युरींची रचना आ यू सी पी एस कोअर स्टिअरींग कमिटी तर्फे करण्यात येते व ते पुरस्कार विजेत्याची निवड करतात. दिनांक १८.१२.२०२३ या वर्षी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला मोठ्या (लार्ज) क्षेत्रातील भार प्रेषण केंद्राच्या श्रेणीतील सर्वात्तम कामगिरीचा तिसरा क्रमांक मिळाला

८. राज्य भा. प्रे. केंद्राने वीज खंडित होण्याच्या प्रकारासाठी एलिमेट्स तयार केले.

४०० केव्ही व त्यावरील – संख्या २२४४

२२० केव्ही व त्यावरील – संख्या ६२२५

राज्य भा. प्रे. केंद्राने एच टी एल एस, मेट्रो, एन एच एस आर सी एल आणि डी एफ सी सी आय एल यांच्य प्रकल्पासाठी खालील मोठ्या स्वरुपातील वीज पुरवठा बंद ठेवण्यासाठी सुविधा करुन दिली.

| अनु क्र. | प्रकल्पाचे नांव | घटकांचे नांव | कालावधी | खंडीत पुरवठा सुविधेचे दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | समृद्धी महामार्ग | ४०० केव्ही पडघे – नागोठणे सीकेटी-२ | ०८/०६/२०२३ -१३/०६/२०२३ | ९ |
| २ | डी एफ सी सी आय एल एन एच एस आर सी एल आणि मेट्रोचे काम | १)२२० केव्ही वर्सोवा- घोडबंदर आणि घोडबंदर – गोराई<br>२)११० केव्ही धारावी – विक्रोली १सीकेटी आणि ११० केव्ही धारावी – विक्रोली सीकेटी-२ | १)३१.०५.२०२३-०६.०६.२०२३<br>२२.०७.२०२३-२९.०७.२०२३<br>२)२५.११.२०२३-२९.१२.२०२३ | १) १३ (दैनंदिन आधारावर)<br>२) ३४ |
| ३ | एच टी एल एस | १)४०० केव्ही चंद्रपुर जी सी आर चंद्रपुर २ सीकेटी-१<br>२)४०० केव्ही चंद्रपुर जी सी आर चंद्रपुर २ सीकेटी-२<br>३)४०० केव्ही कोल्हापुर (एम एस) कोल्हापुर (पीजी) सीकेटी-२<br>४)४०० केव्ही परळी न्यु परळी (एम एस) सीकेटी-१<br>५)४०० केव्ही परळी न्यु परळी (एम एस) सीकेटी-२<br>६)४०० केव्ही कलवा-पडघे सीकेटी-२<br>७)४०० केव्ही कलवा-पडघे सीकेटी-१ | १) २३.११.२०२३- ०८.१२.२०२३<br>२) ०९.१२.२०२३-२१.१२.२०२३<br>३) २०.०३.२०२३-३०.०८.२०२३<br>४) १९.०८.२०२३-०८.१२.२०२३<br>५) २०.१२.२०२३-१६.०२.२०२४<br>६) ३०.१२.२०२३-२१.०१.२०२४<br>७) ११.०२.२०२४-२३.०३.२०२४ | १) १५<br>२) १२<br>३) १६३ (पॉवरग्रिड वर्क)<br>४) १११ (पॉवरग्रिड वर्क)<br>५) ५८ (पॉवरग्रिड वर्क)<br>६) २२ (४०० केव्ही कळवा – पडघा सर्कीट २ लाईनवर टेंपररी टॅपींग केले जाईल. त्यासाठी लॉक नं ३ ते ४०० केव्ही पडघा-खारघर (डेड लाईन) चे पडघा उपकेंद्र परिसरातील लॉक १३२ पर्यत टेपींग अरेंजमेन्ट केली जाईल)<br>७) ४१ (४०० केव्ही कळवा – पडघा -१ लाईन (लॉक नं. १११३) ४०० केव्ही कळवा-खारघर लाईन सोबत टॅप केली जाईल. |
| ४ | इतर प्रकल्पांची कामे | १) खारघर बस – १<br>२) खारघर बस – २<br>३) खारघर बस – ३ | १) २७.०५.२०२३<br>२) ०३.०६.२०२३<br>३) २५.०५.२०२३ | ४०० केव्ही विक्रोळी उपकेंद्र प्रथमच (चार्जिंग करण्यासाठी खारघर उपकेंद्रातील बस या उपकरणाचा विस्तार (बस-एकस्टेंशन) ४०० केव्ही खारघर – विक्रोळी सर्कीट १ व २ या मधून करण्यात येईल. |

९) वि. वर्ष २०२३-२४ मधे जी सी सी च्या एकूण २ बैठका (मिटींग्ज) आणि ओ सी सी च्या २ बैठकांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय आवश्यकतेनुसार विविध सबंधित (स्टेक होल्डर्स) यांच्याही बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या.

१०) राज्य भार प्रेषण केंद्राने डी एस एम बिलांचे साप्ताहीक तत्वावर आणि ठरलेल्या मुदतीत वितरण केले.

११) स्काडा (SCADA), REMC स्काडा आणि यु आर टी डी एस एम या सिस्टीमचे सायबर सिक्युरिटी जोखीमांच्या निधार्रणाचे ऑडीट (परिक्षण) दि. ०५ जुन २०२३ ते ९ जुन २०२३ या कालावधीत एन सी आय आय पी सी ने केले.

१२) मेसर्स ए के एस संस्थेमार्फत, दिनांक ०८ मे २०२३ रोजी आर इ एम सी आणि दिनांक १८ ऑगस्ट २०२३ रोजी यू आर टी डी एस एम प्रणालीचे सायबर सिक्युरिटी ऑडीट करण्यात आले

१३) स्काडा, आर इ एम सी आणि यु आर टी एस एम या सिस्टिम्स च्या मत्तांचे, सिस्लॉग (सिस्टिम लॉगींग प्रोटोकोल) सर्व्हर्स यांचे एन सी आय आय पी सी एस डी एस यां सिस्टिम सोबत एकत्रिकीकरण करण्यात आलेले आहे.

१४) स्काडा, आर इ एम सी –स्काडा आणि यु आर टी डी एस एम यांचे एन सी आय आय पी सी, सी इ आर टी–इन ,सी इ आर टी–ट्रान्स, सायबर स्वाथ छाता केंद्र व सी इ ए यांच्या तसेच सायबर सिक्युरिटीचे सल्लागार यांच्या मार्गदर्शक सुचना वेळेवर पुर्ण करण्यात आल्या.

१५) दि. ०१ एप्रील २०२३ ते मार्च२०२४ या काळात स्काडा सिस्टीमची उपलब्धता ९९.९५% इतकी होती.

१६) दि. ०१ एप्रील २०२३ ते मार्च२०२४ या काळात महापारेषणची उपर्केद्रे, आय पी पी / सी पी पी (आर इ, सोलार, विंड) यांचे जनरेटर्स स्काडा व आर इ एम सी–स्काडा सिस्टिम मधे खालील प्रमाणे एकत्रिकीकरण करण्यात आलेले आहे.

अ) महापारेषण ची वीज उपर्केद्रे – (संख्या) २४

बी) सौर वीज निर्मिती संच – (संख्या) ३०

सी) पवन ऊर्जा निर्मिती संच – (संख्या) ०२

डी) बगास / लघु (जल विद्दुत) / इतर निर्मिती संच – (संख्या) १५

**बी (३) वि.वर्ष. २०२३-२४ निर्मिती क्षमतेत वाढ (मेवॅ मध्ये)**

| राज्यातील निर्मात्याचे नांव | युनिट क्र. | मेवॅ मध्ये भर | शेरा |
|---|---|---|---|
| **राज्य क्षेत्र** | | | |
| **महानिर्मिती** | निरंक | | |
| **अक्षय क्षमता** | जे पी एल युनिट – १ | १५० | सी ओ डी वर ०१-११-२०१७ पुन्हा सिंक्रोनाइझ केले १४-०९-२०२३ |
| | जे पी एल युनिट – २ | १५० | सी ओ डी वर २२-११-२०२३ |
| | | ६६५ | सोलार – ४६९ एम मेवॅ विंड – १९६ मेवॅ |

**केंद्र सरकारचे क्षेत्र वि.वर्ष. २०२३-२४ मधील सी ओ डी**

| निर्माते | मेवॅमध्ये क्षमता | महावितरणकंचा वाटा मेवॅ | सीओडी तारीख |
|---|---|---|---|
| काकरापार अणुऊर्जा केंद्र युनिट-३ | ७०० | २२३.१०५ | ३०-०६-२०२३ |
| काकरापार अणुऊर्जा केंद्र युनिट-४ | ७०० | २२३.१०५ | ३१-०३-२०२४ |

**बी (४) वि.वर्ष. २०२३-२४ मधील अल्प मुदतीसाठी मान्यता दिलेले.**

आंतर राज्यासाठी खुला प्रवेशाच्या नियमनानुसार महाराष्ट्र राज्यात अल्प मुदतीचे खुले प्रवेश मंजूर करण्यासाठी रा. भा. प्रे. केंद्र (SLDC) ही समन्वयक (नोडल) संस्था आहे. यासाठी एस टी ओ ए ची रचना करण्यात आली आणि त्यानुसार राज्य भा. प्रे. केंद्राने या वर्षात खालील खुल्या प्रवेशावर प्रक्रीया केली

**अ) राज्यांतर्गत / आंतरराज्य एस टी ओ ए**

| वि. वर्ष | फर्म पॉवर | पुढच्या / त्याच दिवशीची वीज | एकूण अर्जांची संख्या |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | ३९१३ | ५७३ | ४४८६ |

**बी (४) ब) वीज विनिमय केंद्रा मार्फत (आयइएक्स) आंतर राज्य अल्प मुदतीचे खुले प्रवेशः-**

| वि. वर्ष | प्रकीया केलेल्या समाशोधन एनओसीची एकूण संख्या |
|---|---|
| २०२३-२४ | ३०० |

**सी) आर इ सी अर्जाची प्रक्रीया**

| वि. वर्ष | प्रक्रीया केलेल्या अर्जाची संख्या |
|---|---|
| २०२३-२४ | २६४७ |

**डी) अल्प मुदतीच्या खुल्या प्रवेशाद्वारे ऊर्जा व्यवजार**

| वि. वर्ष | एकुण संख्या दशलक्ष युनिट |
|---|---|
| २०२३-२४ | ५००५१ |

| सरासरी वार्षिक एकत्रित हानी | | | | |
|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | वर्ष | हानी | व्हिलींग युनीट्स दश लक्ष युनीट | |
| | | | एर्नजी आय / पी | एर्नजी ओ/ पी |
| १. | वार्षिक – ०६-०७ | ५.९३ % | ९३६६६ | ८८७४९ |
| २. | वार्षिक – ०७-०८ | ४.६७ % | ९३५५७ | ८९१८९ |
| ३. | वार्षिक – ०८-०९ | ४.८८ % | ९५४७७ | ९०८१५ |
| ४. | वार्षिक – ०९-१० | ४.६१ % | १०१८७९ | ९७१७८ |
| ५. | वार्षिक – १०-११ | ४.३१ % | १०७८१० | १०३१६३ |
| ६. | वार्षिक – ११-१२ | ४.२५ % | ११७५५५ | ११२५६२ |
| ७. | वार्षिक – १२-१३ | ४.१२ % | १२०३११ | ११५३५० |
| ८. | वार्षिक – १३-१४ | ४.०९ % | १२२२९१ | ११७२८९ |
| ९. | वार्षिक – १४-१५ | ३.८९ % | १३५३७३ | १३०१०७ |
| १०. | वार्षिक – १५-१६ | ३.९२ % | १४१७६६ | १३६२१५ |
| ११. | वार्षिक – १६-१७ | ३.६३ % | १४३८२८ | १३८६१३ |
| १२. | वार्षिक – १७-१८ | ३.३० % | १५०३४० | १४५३८५ |
| १३. | वार्षिक – १८-१९ | ३.११ % | १५८७९७ | १५३८६५ |
| १४. | वार्षिक – १९-२० | ३.१७ % | १५५१७४ | १५०२६१ |
| १५. | वार्षिक – २०-२१ | २.९४ % | १५१७७९ | १४७३२२ |
| १६. | वार्षिक – २१-२२ | ३.१९ % | १६८३०७ | १६२९३१ |
| १७. | वार्षिक – २२-२३ | ३.२९ % | ११८१७६ | ११४२८४ |
| १८. | वार्षिक – २३-२४ | ३.२७ % | १९८३२१ | १९१८३१ |

**सी) राज्य पारेषण संस्था**

**सी)-१) वर्ष २०२३-२४ मधील नियमन व वाणीज्य कृती निरंक**

**सी)-२) वर्ष २०२३ ते २४ दरम्यान खुल्या प्रवेशाच्या व जाळेजोडणी संबंधित कृती :-**

➤ **खुला प्रवेश :** दीर्घ मुदती चे प्रवेश (अंतरराज्य) – निरंक
मध्यम मुदती चे प्रवेश (अंतरराज्य) – निरंक
दीर्घ मुदती चे प्रवेश (अंतरराज्य) – निरंक
मध्यम मुदती चे प्रवेश (अंतरराज्य) – निरंक
अंशंत दीर्घ मध्यम मुदती चे प्रवेश – १ (५ मेवॅ)
अंशंत मध्यम मुदती चे प्रवेश – २१ (६७६.१९मेवॅ)

**वीज जाळ्याशी जोडणी (ग्रिड कनेक्टीव्हीटी)**

➤ **स्वतंत्र वीज प्रकल्प / सी पी पी**

➤ अंतिम स्वरुपाची वीज जाळ्यात जोडणी दिली – संख्या ०२, क्षमता – ६६५ मे. वॅ.
वीज जाळ्यात जोडणी दिली – संख्या ०२, क्षमता – २६८० मे. वॅ.

➤ **सह-निर्मितीचे वीज प्रकल्प**

सह निर्मितीच्या एकुण ०८ वीज प्रकल्पाना अंतिम वीज जाळ्यात जोडणी दिली. त्याची एकुण क्षमता २३२.०९ मे. वॅ. आहे या शिवाय अन्य ७ सह-निर्मिती प्रकल्पाना वीज जाळ्यांशी जोडणी दिली. त्याची एकूण क्षमता १०४.१९ मे. वॅ. आहे

- **पवन वीज प्रकल्प**
  अंतिम वीज जाळ्यात जोडणी दिली- संख्या ०३ प्रकल्प क्षमता १४९ मे. वॅ. या शिवाय अन्य ०६ प्रकल्पाना वीज जाळ्यात जोडणी दिली त्यांची क्षमता - ९५० मे. वॅ. आहे.
- **सौर वीज प्प्रकल्प**
  अंतिम स्वरुपाची वीज जाळ्यात जोडणी १८ प्रकल्पांना दिली त्यांची एकूण क्षमता ७२६ मे. वॅ. आहे. याशिवाय अन्य ४० प्रकल्पाना वीज जाळ्याना जोडण्यात आले त्याची एकूण क्षमता १७९२ मे. वॅ. आहे.
- **हायब्रीड वीज प्रकल्प**
  या प्रकारात अंतिम स्वरुपाची वीज जाळे जोडणी कुठल्याही प्रकल्पाला दिल नाही. मात्र १०० मे. वॅ. क्षमतेचा एक प्रकल्प वीज जाळ्याशी जोडण्यात आला आहे
- **लघु-जल विधुत निर्मिती प्रकल्प**
  अंतिम स्वरुपात वीज जाळे जोडणी देण्याची संख्या निरंक आहे. अन्य २ प्रकल्पांना वीज जाळ्याशी जोडण्यात आले त्याची क्षमता ७.५ मे. वॅ. आहे
- **नगर पालिका घन / औधोगिक कचरा**
  या प्रकारात अंतिम स्वरुपाची वीज जाळे जोडणी ०१ प्रकल्पाला दिली त्याची क्षमता १४ मे. वॅ. आहे. अन्य एक प्रकल्प वीज जाळ्यात जोडण्यात आला त्याची क्षमता १४ मे. वॅ.
- **इ एच व्ही ग्राहक**
  अंतिम स्वरुपाची वीज जाळ्याची जोडणी एकूण १९ इ एच व्ही ग्राहकांना दिली त्यांची वीज मागणी ५८३.०९२ मे. वॅ. आहे. वीज जाळ्यात जोडणी करण्याचे सूचना पत्र अन्य ५१ इ एच व्ही ग्राहकांना पाठविले (इंटीमेशन) त्यांची वीज मागणी ३२६३.३५९ मे. वॅ. आहे.
- **रेल्वे इ एच व्ही टी एस एस**
  अंतिम स्वरुपाची वीज जाळ्याशी जोडणी १५ इ एच व्ही रेल्वे ग्राहकांना दिली. त्याची वीज मागणी २२० मे. वॅ. आहे. या शिवाय अन्य ११ इ एच व्ही रेल्वे टी एस एस याना वीज जाळ्याशी जोडणी करण्याचे सूचनापत्र (इंटीमेशन) पाठवले. त्यांची वीज मागणी २१९.५७ मे. वॅ. आहे.

### (सी) (३) एस टी यू ची पंचवार्षिक योजना - कालावधी २०२२-२३ ते २०२६-२७

राज्य पारेषण लोकोपयोगी संस्थासाठी एक पंचवार्षिक योजना, मंडळाने मंजूर केलेली आहे. तिचा कालावधी वर्ष २०२२-२३ ते वर्ष २०२६-२७ असा आहे. वित्तीय वर्ष २०२३-२४ साठी तांत्रिक सारांश येथे खालील प्रमाणे आहे.

**प्रस्तावित केलेली नवीन उपकेंद्रे**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | १ | १४ | ९ | १ | १ | २६ |

**नव्या उपकेंद्रांच्या सहयोगी विजतारा (सर्किट कि.मी. मध्ये)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ३ | ४३५.६ | ४५०.५ | ३२ | २ | ९२३.१ सीकेटी, की. मी. |

**लिंक लाईन्स (सीकेटी कि.मी. मध्ये)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ३७४.५ | २५८ | १६० | ० | ७९२.५ | १५८५ सीकेटी, की. मी. |

**सेकंड सर्कीट स्ट्रिंगींग (सीकेटी कि.मी. मध्ये)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ० | ० | ४१३.३ | ३५ | | ४४८.३ |

**एच टी एल एस (सीकेटी कि.मी. मध्ये)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ६२ | ३३२ | ४८२.३ | ३३ | ६३.५० | ९७२.८० |

**नवीन उपकेंद्रातील जादा ट्रान्फॉरमेशन क्षमता (एम व्ही ए)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | १००० | २००० | ५०० | १०० | १०० | ३७०० |

**(न्यु लेव्हल क्रिएशन) नवीन स्तराची निर्मिती (ए म व्ही ए)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ० | ५०० | ० | ० | ० | ५०० |

**आय सी टी भर (ॲडीशन)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | १००० | ३०० | ० | ० | ० | १३०० |

**आय सी टी बदलणे (रिप्लेसमेंट)**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ३७० | ३५० | ० | ० | ० | ७२० |

**ट्रान्स्फॉमर ची भर**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | १५० | ७५० | ८७५ | ५० | १२५ | १९५० |

**ट्रान्स्फॉमर बदलणे**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | ४०० केव्ही | २२० केव्ही | १३२ केव्ही | ११० केव्ही | १०० केव्ही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ५५० | २७५ | २५ | ० | ८५० | ९०२० |

**(सी) (४) राज्य पारेषणाच्या लोकोपयोगी संस्थांपुढील आव्हाने**

**१) विश्वासार्ह माहिती उपलब्ध नसणे :-**

राज्य पारेषण लोकपयोगीची संस्थांच्या वीज जाळ्यातातिल सर्व ठिकाणी प्रणाली – कार्यक्षमतेचे महत्वाचे मापदंड उपलब्ध नाहीत, ही महत्वाची कमतरता आहे. त्यामुळे विकासाचे प्रक्षेप वाढविणे, संभाव्य कोंडी, दाटी वापराविषक निर्धारण आणि इतर अभ्यास करणे यात अडचणी येतात. या हेतुसाठी एक विश्वास माहिती तंत्रज्ञान यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

**२) नवीकरण योग्य ऊर्जा बाहेर काढणे व तिचे एकत्रिकरण करणे.**

शासनाच्या धोरणात नवी करण योग्य ऊर्जेची महत्वाची लक्ष्ये आहेत. मात्र महाराष्ट्रातील नवी करण योग्य ऊर्जेची निर्मितीची संभाव्यता नाही. यामुळे यासाठी वीज पारेषणाच्या जाळ्याच्या योजनेला योग्य आधार उपलब्ध नाही.

**३)**काही क्षेत्रात पारेषणाची योजना तयार करुन ती प्रत्यक्ष अमलात आणणे यात बराच वेळ जातो. त्यामुळे त्या प्रदेशातील पारेषण वीज जाळ्याच्या उभारणीत आव्हाने आहेत.

**४)पारेषणातील कर्मचाऱ्यांचे कौशल्य व क्षमता वाढविणे.**

यंत्रणेची नियोजन हाताळण्यासाठी कर्मचाऱ्यांची कुशलता, क्षमता वाढविण्यासाठी आय आय टी मुंबई साररची तांत्रिक प्रशिक्षण संस्था, आणि अशा सेवा देणाऱ्या इतर कंपन्या यांच्या साह्याने कर्मचारी वृंदात कौशल्य विकास करता येईल.

**(डी) महापारेषण कंपनीचे संयुक्त साहस उपक्रम (JVs)**

**(डी) (१) महापारेषण आणि जे एस डब्ल्यू : जयगड पॉवर ट्रान्स्को लि.** (JPTL)

जे पी टी एल ही कंपनीने, महाराष्ट्रात पारेषण यंत्रणा विकसीत करण्यासाठीच्या सार्वजनिक खाजगी सहभागाचे एक लक्षवेधी उदाहरण निर्माण केलेले आहे. महापारेषण आणि जे एस डब्ल्यू यांनी एकत्र येऊन 'जयगड पॉवर ट्रान्स्को लि.' या नांवाची एक कंपनी महाराष्ट्रात पारेषण प्रणाली विकसीत करण्यासाठी स्थापन केली. संयुक्त साहसी संस्थेचे दोन्ही भागीदार यांच्या संयुक्त शक्तीचा उपयोग करता यावा या उद्देशाने हा उपक्रम सुरु करण्यात आला. यासाठी महापारेषणचा वाटा २६ टक्के समभागाचा असून उर्वरित ७४ टक्के वाटा जे एस डब्ल्यू इ एल चा आहे.

जे एस डब्ल्यू इ एल (JSWEL) च्या १२०० मेगावॅट जयगड औष्णिक वीज प्रकल्पातून वीज बाहेर काढण्यासाठी तसेच रत्नागिरी प्रदेशातील इतर प्रस्तावित विज प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज बाहेर काढण्यासाठी आंतरराज्य ट्रान्समिशन प्रणलीचा अविभाज्य भाग म्हणून ट्रान्समिशन प्रणलीचा विकास करण्यासाठी जे पी टी एल (JPTL) ची स्थापना करण्यात आली.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एम इ आर सी) यांनी विद्युत अधिनियमाच्या कलम १४ नुसार जे पी टी एल कंपनीला दि. ०८ फेब्रुवारी २००९ रोजी पारेषणाचा परवाना दिला. या परवाण्यामुळे जे पी टी एल कंपनीला पारेषणाच्या प्रणालीची स्थापना तसेच प्रवर्तन व देखभाल करण्याचा अधिकार मिळाला असून त्यामधे ४०० केव्ही क्षमतेच्या जयगड – न्यू कोयना आणि जयगड – कराड पारेषण तारमार्ग यांचे २५ वर्ष प्रवर्तन करण्याचा समावेश आहे.

या संपूर्ण पारेषण तारां टाकण्याचा मार्ग अतिशय खडतर भौगोलिक प्रदेशातील होता, तरीही हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले. हा पारेषण प्रकल्प दि. ०२ डिसेंबर २०११ रोजी पूर्णपणे कार्यरत झाला. त्यामुळे जे पी टी एल ने प्रवर्तन आणि देखभलीच्या क्षेत्रात प्रवेश केला.

ही पारेषण प्रणाली आता १२०० मे. वॅ. क्षमतेच्या रत्नागिरी वीज प्रकल्पात निर्माण केलेली वीज बाहेर काढीत आहे. तसेच राज्यांतर्गत न्यु कोयना आणि कराड या परिसरात विजेचे पारेषण करीत आहे.

जे पी टी एल ने पारेषण आकाराच्या वसुलीसाठी कॉस्ट प्लस ही पध्दती अनुसरली आहे. या पध्दतीमधे पारेषणाचे आकार निश्चित केलेले आहेत. त्या मुळे संचालन व सुव्यवस्था (ओ ॲण्ड एम) खर्च, व्याजाचा खर्च, घसार इत्यादिच्या वसुलींची हमी मिळते. तसेच समभागावर करोत्तर १५.५ टक्के परतावा मिळतो. मात्र वितरण कंपन्यांच्या स्तरावरील वसुली कमी होत असल्याने रोकडता प्रवाहावर तात्पूरता परिणाम होऊ शकतो.

वि. वर्ष २०२३-२४ मध्ये पारेषण यंत्रणेची उपलब्धता ९९.७९ टक्के इतकी उंचावली आहे. (कंपनी स्थापन झाल्यापासून प्रथमच एव्हढी सर्वाच्च उपलब्धता असून तिने एक नाव मापदंड (बेंच मार्क) तयार केला आहे. वास्तविक उपलब्धता मानक ९८ टक्के एवढेच आहे.

जे पी टी एल कंपनीने या वित्तीय वर्षात मा. म. वि. नि. आयोग यांनी परवान्यासाठी दिलेल्या सर्व आवश्यक नियमनांचे अनुपालन केले आहे.

**(डी) (२) महापारेषण व स्टरलाईट टेक्नॉलॉजी लि. यांचे संयुक्त साहस महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्टर लीमीटेड** (MTCIL)

महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्टर लीमीटेड. हा एक संयुक्त साहस (जेव्ही) उपक्रम आहे. त्यात सटरलाईट टेक्नॉलॉजीजचे (एस पी टी एल) (५१ टक्के) आणि महापारेषण (४९ टक्के) असा वाटा आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ३३०० कि.मी. चे विश्वासार्ह ओ पी जी डब्ल्यू नेटवर्क उभारण्यासाठी ही कंपनी स्थापित करण्यात आली आहे. महापारेषण या संपर्क जाळ्याचा उपयोग सिमलेस व्हॉईस, डेटा, दुरवरुनसंनियंत्रण टेलि प्रोटेक्शन मत्ता व्यवस्थापन आणि स्काडा जोडली यासाठी वापर करते. याशिवाय असलेली जादा तंतू-क्षमता (फायबर) ही दुरसंचार सेवा पुरविण्याच्या इतर संस्थाना भाड्याने दिली जाते या शिवाय संपर्क जाळ्यातील सुट्या-जादा ओ पी जी डब्ल्यू फायबर द्वारे लक्ष ठेवले जाते. महाराष्ट्रातील विविध जागेवर ग्राहकांना जोडणी दिली जाते. याची रचना (रिंग आर्कीटेक्चर) वर्तुळाकार असून त्यात महाराष्ट्रातील प्रमुख शहरे जोडलेली आहेत. आघाडीच्या सर्व दुरसंचार संस्था, कंपन्या, आय् एस पी ज्, एम एस ओ, धाऊक वाहक आदिकडून या श्रेष्ठ स्तरावरील संपर्क जाळ्याचा वापर होतो. पायाभूत ग्राहकांची व्याप्ती वेगाने वाढत आहे.

एम टी सी आय एल ने मुंबई शहरांतर्गत डेटा सेंटर ओ पी जी डब्ल्यू कॉरिडॉर तयार केला आहे. कारण मुंबई शहरात देशातील महत्वाचे डेटा सेंटर्स आहेत. कारिडॉर महत्वाच्या डेटा सेंटर जवळून जातो आणि तेथील सेवा पुरवठादारांना जवळ जवळ एडं टू एडं प्रकारे ओ पी जी डब्ल्यू जोडणी पुरविते. त्यामुळे या संस्थांची संपर्क जाळ्यातील कामगिरी वाढते आणि त्यामुळे नव्या काळात आलेल्या ओ टी टीज्, आणि हायपर स्केलर्स अशा कमी अप्रकटता असलेल्या ग्राहकांना सेवा देऊ शकतात.

एम टी सी आय एल ने यशस्वीरित्या ९६ एफ ओ पी जी डब्ल्यू विकसित करुन स्थापित केले आहे. त्याचा उपयोग प्रथमच वाणिज्य वापराकार्यांना होतो. शिवाय विद्यमान ४८ एफ ओ पी जी डब्ल्यू लिंकचे ९६ एफ ओ पी जी डब्ल्यू अशी वृद्धीसुद्धा केली आहे. जेथे जादा महसूल मिळण्यासाठी फायबर मोठ्या प्रमाणात मागणी आहे. तेथे त्याचा उपयोग होतो.

एम टी सी आय एल कडे विजेच्या लोकोपयोगांची पायाभूत साधने आहेत. (ओ पी जी डब्ल्यू, पारेषण व वितरणाचे मनोरे, वीज उपकेंडे इ.) त्यांचा अधिक उपयोग करण्यासाठी, दुरसंचार संस्था (टेस्कोज्) तसेच संपर्काच्या सेवा पुरविणाऱ्यांना परवानगी दिली जाते. त्याचा उपयोग माहितीची देव घेव करणे आणि आवाजाच्या साह्याने सेवा पुरविणे (व्हाइस सर्विसेस) यासाठी केला जातो.

आपण संपूर्ण देशात त्याच्या श्रेणीतील सर्वोत्तम (बेस्ट इन क्लास) सेवा पुरवठादार म्हणून आघाडीवर आहोत त्यासाठी आपण डार्क फायबर प्रकारची सुविधा पुरवितो. आपले ओ पी जी डब्ल्यू नेटवर्क (संपर्क जाळे) उच्च प्रतीची विश्वासार्हता देणारे असून त्याचा उपयोग केला जातो. 'उद्योग क्षेत्रात सर्वात जास्त वेळ उपलब्ध असलेली संपर्क सेवा' असा लैकिक आपण मिळविला आहे. आतिऊच्य दर्जाच्या फायबरची रुंदी कमी करुन त्याचा उपयोग करीत आहोत. आपल्या को.लोकेशन सेवा अखंडीत वीज पुरवठा व विजेसाठी बहूविध बॅकस्पेस असलेल्या सुरक्षित ठिकाणी लवचिक रेंटल रॅक स्पेस पुरवितात.

आपण भारतीय दुरसंचार उद्योगात सर्वात प्रथम एज कांप्यूटींगसाठी कंटेनराईज्ड डेटा सेंटर्स (सी डी सी) यांचा प्रारंभ केला आहे. या सी डी सी मुळे कामातील मोठे बदल घडविण्यास लागणारा वेळ कमी होतो व ग्राहकांना उच्च दर्जाच्या सेवेचा अनुभव मिळतो कोलोकेशन सुविधा व दुरसंचाराची साधने या सोबत ही सी डी सी आहेत

एम टी सी आय एल कंपनीने सौर विजेचे उपयोग यशस्वीरित्या स्थापित केले आहेत. त्यामुळे एक पर्यायी, वापरण्यास योग्य आणि विश्वासार्ह वीज पुरवठा समान जागेवर उपलब्ध झाला आहे. सौर विजेमुळे कंपनी ५० टक्के ओपेक्स खर्च कमी होतो विज देयकात कपात होणे शक्य झाले आहे. तसेच कार्बन फूटप्रिंट मध्ये ५०० केजी/प्रती जागा इतकी कपात करता आलेली आहे, वित्तीय वर्ष २०२४ मधे या विजेचा वापर ३-४ ठिकाणी करता आला, वित्तीय वर्ष २०२५ मधे आणखी किमान १० (दहा) जागी ही सुविधा निमार्ण करण्याची योजना आहे.

महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फास्ट्रकचर कंपनी ली. (एम टी सी आय एल) या कंपनीला २००० कि. मी. जादा ऑप्टीकल ग्राउंड वायर (३० पी जी डब्ल्यू) नेटवर्क तयार करण्यास मंजुरी मिळाली आहे. महापारेषण स्काडा सिस्टिमची संपर्क यंत्रणा बळकट करण्यासाठी ७४ वी उपकेंद्रे जोडण्याच्या विस्तार योजने अंतर्गत ही मंजुरी मिळाली आहे. तसेच या मुळे संभाव्य दुरसंचार पुरवणाऱ्यांना सुटे फायबर भाड्याने देऊन जादा महसूल मिळविता येईल.

वि. वर्ष २०२३-२४ मधे सुमारे १३५० किमी लांबीचा वायर यशस्वीरित्या स्थापित करण्यात आली आणि आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश आणि कर्नाटक या राज्यातील लगतच्या जागा जोडण्याचे महत्वाचे फायबर रुट तयार झाले

**माहितीची वाढ आणि फायबरची गरज**

भारत देश हा दुर संचाराच्या सर्वात मोठा बाजारपेठेतील दुसऱ्या क्रमांकाचे स्थानावर आहे. एकूण पायाभूत सबस्क्रायबर वायरलेस सबसक्रिप्शन्स आणि वायरसहीत ब्रॉड बॅंड सबस्क्रिप्शन्स यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. टेलिडेन्सिटी मार्च २०२४ पर्यंत ८४.५१ टक्के वाढ झाली. एकूण ब्रॉड बॅंड सबसक्रिप्शन्स मार्च २०२४ पर्यंत ८४६.५७ दशलक्ष झाली.

पुढील पाच वर्षात, मोबाईलचा प्रवेश आणखी वाढेल डेटा कॉस्ट कमीहोइल मी नव्याने इंटरनेट वापरकरत्याच्या संख्येत ५०० दशलक्ष वाढ होईल. त्यामुळे या नवीन उद्योगामध्ये संधी निर्माण होतील

फायबर आणि बीटीएस कनेक्टिव्हिटी वाढीचे ५ जी रोलआऊट जिओ आणि एअरटेलने २४ मार्च पर्यत देशभरातील ९५% ठिकाणी पूर्ण केले आहे आणि व्हीआयएल वित्तीय वर्ष २०२५ मध्ये सुधारित निधीसह आपली ५ जी सेवा सुरु करण्याची योजना आखत आहे. यामुळे वित्तीय वर्ष २०२४ मध्ये इंटरसिटी मध्ये जिओ आणि एअरटेलडून ओपीजीडब्ल्यू फायबरचा चांगला व्यवसाय झाला आहे. या मुळे टेलिकॉम टॉवर्स आणि अन्य जागी आणि पॉईंट्स ऑफ फायबरायझेशन देखील मोठ्या प्रमाणात होईल आणि त्यामुळे पुढील २-३ वर्षात संपूर्ण महाराष्ट्र आणि देशभरात विश्वसनीय फायबर, विशेषत: ओपीजीडब्ल्यूची प्रचंड मागणी असेल.

वर्ष २०२५ पर्यंत भारताला प्रामुख्याने इंटरनेट ऑफ थिंग्ज (IOT) कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजंस), यंत्रमानवी तंत्रज्ञान आणि कला कॉम्प्युटींग सारख्या ५ जी केंद्रित तंत्रज्ञानात २२ दशलक्ष कामगारांची अवश्यकता असेल. ओ टी टी आणि हायपर स्केलअर्सच्या उदयासह डेटाच्या स्थानिकीकरणासाठी मोठ्या प्रमाणात डेटा सेंटर कनेक्टिव्हिटीची आवश्यकता आहे आणि बऱ्याच डेटा सेंटर्सच्या चालकांनी मुंबई, एन सी आर, हैद्राबाद मध्ये नवीन सुविधा तैनात करण्याची योजना जाहीर केली आहे आणि यासाठी फायबर कनेक्टिव्हिटीची देखील आवश्यकता असेल. एम टी सी आय एल ने कळवा-खारघर-ट्रॉबे-नेरुळ-मुलुंड-कळवा या ७२ किलोमीटरच्या रिंग नेटवर्कवर मुंबईत एक अनोखा फायबर कॉरिडॉर तयार केला आहे, जो १०-१५ प्रमुख डीसींना जोडत आहे आणि म्हणूनच मोठ्या टेलीकॉम कंपन्या आणि एडब्ल्यूएस आणि गुगलसारख्या मोठ्या टेलिकॉम कंपन्यांकडून त्याची मागणी केली जात आहे.

**एम टी सी आय एल व्यावसायिक दृष्टिकोन.**

एम टी सी आय एल ने मोठया प्रमाणात दुरसंचार सेवांच्या पुरवठा दारांची तसेच आय एस पी आणि एम एस ओज् (MSOS) यांच्या पसंतीची स्थान असणे चालू ठेवले आहे. या सेवा पुरवठा दारांच्या संपर्क जाळ्याची (नेटवर्क्स) कामगिरी अधिक सशक्त करतील. आपल्या कंपनीची पायाभूत ग्राहकांची स्थिती अतिशय कृतीशील आहे. कारण दि. ३१ मार्च २०२४ रोजी आघाडीचे २० (वीस) दुरसंचार व इंटरनेट सेवा पुरवठादार त्यात आहेत. यामध्ये रिलायन्स, जीओ इन्फोकॉम लि., व्होडाफोन इंडिया लि. टाटा कम्युनिकेशन्स लि. आणि भारती एअरटेल लि. या नामांकितांचा सामावेश आहे. वि. वर्ष २०२३-२४ हे आपल्या कंपनीसाठी एक महत्वपूर्ण वर्ष ठरले आहे. कारण या वर्षी आपण विक्रमी मागणी नोंद दिली. या वर्षी अंदाजे भारतीय रुपयात ३०० कोटीच्या ऑर्डर्सचे बुकींग आपल्या कंपनीत झाले. त्यात विद्यमान आणि नवीन ग्राहकांचा समावेश आहे. वि. वर्ष २४ मधील रोकड जमा रु. १८० कोटी झाली.व्यवसाय सुरु केल्यापासून इतकी प्रचंड वाढ आपण प्रथमच केली. वि. वर्ष २०२४ मध्ये एम टी सी आय एल ने रु. १८० कोटी सर्वकालीन उच्च बिलिंगसह वर्ष बंद केले.

एम टी सी आय एल ने वि. वर्ष २०२४ मध्ये डेटा ट्राफीक मध्ये उपरोक्त प्रचंड यश कोवीड साथीनंतर मिळविले. त्यामुळे पुढील नियोजन करण्यास आपल्यास चांगले बळ मिळाले आहे. आपल्या संपर्क जाळ्याची – नेटवर्कची क्षमता काही निवडक रुट्सवर दुप्पट करण्याचे लक्ष्य आहे. त्यात ४८ एफ फायबरचे दर्जा उंचावून तो ९६ एफ इतका वाढविण्याचे आपण ठरविले आहे. भारतामध्ये ओ पी जी डब्ल्यू चा वापर ९६ एफ करणारे आपण प्रथम ठरलो आहोत.

यामुळे सर्वात जास्त व्यापक डिजीटल पायाभूत सेवा पुरविणारी कंपनी म्हणून एम टी सी आय एल च्या क्षमता अधिक वाढतील प्रदेशातील सर्व संपर्क सेवा पुरवठादारांमध्ये आपला ओ पी जी डब्ल्यू सर्वांत शक्तीशाली असेल.

एम टी सी आय एल ने आपले नेटवर्क अधिक सामर्थ्यपूर्ण करण्याची योजना चालू ठेवली आहे. ओ जी डब्ल्यू स्थिर आहे व मोठे ओ टी टी चालक यांना दाखवून दिली आहे. एक स्थैर्य असलेली ओ जी डब्ल्यू त्यामुळे ते एम टी सी आय एल च्या संपर्क जाळ्याकडे आशेने बघत आहेत. वि. वर्ष २५ मध्ये परवाना धारक सेवा पुरवठादारांमध्ये ओ टी टी चा मोठा वाटा एम टी सी आय एल कडे येण्याची अपेक्षा आहे.

५ जी ची पुढील पिढी (नेक्स्ट जनरेशन), आय् ओ टी तंत्रज्ञान व त्याचा आधार या सर्वांच्या भावी गरजा आपली वाढती क्षमता भागविल आणि प्रादेशिक आर्थिक व्यवस्थेच्या वृद्धीला हातभार देईल.

एम टी सी आय एल ने वि. वर्ष २५ मध्ये ३५० कोटी रु. च्या आर्डर बुकींगचे आणि सुमारे १८० ते २०० कोटी रोकड जमा करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. ५ जी चे वापरकर्ते व डी सी जोडणी यांच्या मागण्यांमुळे हे शक्य होईल.

**इ. मानव संसाधन विभाग**

इ) (१) महापारेषण कंपनीचा विश्वास आहे की, अखंडीतपणे विकसीत होणाऱ्या उद्योग विश्वात यशश्वीपणे वाटचाल करण्यासाठी कंपनीचे मानवी भांडवल विकसीत करणे व त्यास अधिक शक्तीशाली करणे गरजेचे आहे. कंपणीचा विकासाचा पथ जोमदार होण्यासाठी आपले कर्मचारी हे आपल्या प्रगतीचा कणा आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. कर्मचारी वृंदाची सबलता आपल्या लांब पल्याच्या शर्यतीत अतिशय महत्वाची भूमिका बजावणार आहे.

म्हणून मानव संसाधनांचा विकास करणे हे आपल्य कंपनीच्या व्युहरचनेचा मुख्य गाभा आहे. म्हणुन अत्यंत सक्षम मानवी कार्यशक्ती निर्माण करणे या साठी आम्ही सतत प्रयत्न करीत आहोत. आमचे कर्मचारी केवळ कुशल असणे पुरेसे नाही तर ते खंबीर मनाने आपल्या कंपनीच्या धेय्य-मुल्य यांच्याशी बांधिलकी बाळगणारे असले पहिजेत. मागील काही वर्षात आमच्या प्रगतीचे सिंहावलोकन केले तर असे दिसते आमच्या कंपनीच्या माणसांचा दृष्टीकोन व विकास आपल्या यशाला कारणीभुत आहे. म्हणुन आता पुढे पावले टाकताना यशासाठी समान संधी देणे यावर आम्ही लक्ष केंद्रीत केले आहे.

**(इ) (२) ३१ मार्च २०२४ रोजी आमचे कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या ८८३४ आहे. (यात या वर्षाच्या अतिरीक्त (सुपरन्यूमररी) कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे)**

**(इ) (३) मानव संसाधन विकासासाठी घेतलेले उपक्रम**

१. मानव संसाधन प्रक्रीयेचे स्वयंचलन

२. कर्मचारी विकासासाठी प्रशिक्षणाच्या धोरणाची अंमलबजावणी

३. प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रांचा नवीन नफा केंद्र म्हणून विकास

४. प्रशिक्षणाच्या गरजा ओळखणे

**(इ) (४) महापारेषण मधील प्रशिक्षण आणि विकास**

**(अ) महापारेषणचे प्रशिक्षण धोरण**

महापारेषणचे प्रशिक्षण धोरण हे भारत सरकारच्या वीज मंत्रालयाने वितरीत केलेल्या राष्ट्रीय प्रशिक्षण धोरणाशी सुसंगत आहे. महापारेषणने प्रशिक्षणासाठी एक सर्वकष आराखडा तयार केला आहे. या धोरणानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रतिवर्ष किमान सात दिवसाचे प्रशिक्षण मिळालेच पाहिजे, या सात दिवसात चार दिवस कामाचे प्रशिक्षण देणे तर उर्वरित तीन दिवस वर्तनाचे प्रशिक्षण दिले जाते

**(बी) कौशल्य निर्मितीद्वारे डिजीटल परिवर्तन**

आता कामाचे विश्वात आमुलाग्र बदल हो आहेत. हे आम्ही ओळखले आहे ऊद्योग क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमत्ता, यांत्रिकीकरण, आणि डिजीटल तंत्रज्ञान यामुळे पूनर्रचना होत आहे. म्हणून आमची माणसे सुध्दा या बदलास सुसज्य करणे हे आमचे प्रशिक्षणाचे धेय्य आहे. म्हणून आमच्या प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात डिजिटलचा व्यापक उपयोग करीत आहोत. प्रशिक्षणात अनुभवासाठी आभासी रचनेसाठी वर्चुअल आणि ए-आय आदिचा उपयोग करीत आहोत.

आमचे मानव संसाधन विकास धोरण काळाच्या अनुषंगाने विकास होत राहील, याची खात्री करुन आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांना डिजिटल - प्रथम अर्थव्यवस्थेत उत्कृष्ट काममिगरी करण्यासाठी आवश्यक ज्ञान, साधने आणि मानसिकतेने सुसज्ज करु.

**(सी) सन २०२३-२४ मध्ये प्रामुख्याने खालील क्षेत्रांमध्ये विविध गरजेवर आधारित प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

| | |
|---|---|
| पॉवर ट्रान्सफॉर्मर | हॉटलाईन-पी आय डी |
| उपस्टेशन स्वयंचलन | लाइव्ह लाइन इन्सुलेटर धुणे |
| निविदा काढणे | करार व्यवस्थापन |
| ड्रोन पायलट | बसबार संरक्षण |
| सायबर सुरक्षा | |

**याशिवाय महापारेषणने काही मार्गदर्शक आणि आघाडीचे कार्यक्रम सुद्धा आयोजित केले होते. ते असे :-**

| | |
|---|---|
| प्रशिक्षकांची संमेलन | कर्मचारी संघटनांची परिषद |
| मानव संसाधनातील शिखर सभा | प्रकल्पांची शिखरसभा |
| ऑटोमेशन परिषद | |

**डी) महापारेषण मधील प्रशिक्षणाच्या अंतर्गत सुविधा**

कंपनीतील कर्मचाऱ्यांना विद्युत क्षेत्रातील अद्यावत व आधुनिक कौशल्याचे ज्ञान मिळावे व त्यांचा सर्वागीण विकास व्हावा या उद्देशासाठी कंपनीने सर्व-सात परिमंडळात स्थापन केलेली प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रे अधिक प्रभावी करण्यात येत आहेत

या केंद्रामधे वेतन गट तीन व चार या मधील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम नियमीतपणे चालू असतात. तसेच सहाय्यक अभियंता पदांवर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांसाठी कंपनीच्या कामाची व्याप्ती व कार्य पध्दती याची माहिती देणारे अभ्यासक्रम (इंडक्शन कोर्सेस) आयोजित केले जातात. त्यात संचालन व सुव्यवस्था, वर्तन, व्यवस्थापन आदी विषय शिकविले जातात. उजळणीचे वर्ग (रिफ्रेशर) सुध्दा आयोजित केले जातात.

**इ) मूल्यवर्धनाचे इतर कार्यक्रम :**

- महापारेषणमध्ये एम सी क्यू (बहू पर्यायी प्रश्न) या आधारित विभागीय परिक्षा ऑनलाईन घेण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे.
- महापारेषणच्या कर्मचाऱ्यांना प्रेरणा देण्यासाठी एक पुरस्कार योजना (रिवार्ड स्किम) आयोजित करण्यात येत आहे.
- कर्मचाऱ्यांना इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रीकल ॲड इलेक्ट्रॉनिक इंजिनियर्स (आय इ इ इ) संस्थेची वार्षिक वर्गणीचे प्रापण करण्यात येते वित्त व लेखा तसेच मानव संसाधन इ आर पी आदि संबधित विषयांवर आवश्यकतेनुसार कार्यक्रम आयोजित केले जातात

**एफ) वर्ष २०२३-२४ मध्ये आयोजिलेले प्रशिक्षण कार्यक्रम आणि त्याचा खर्च याची माहिती खालील प्रमाणे आहे.**

| प्रशिक्षणाचे एकूण मनुष्यदिवस | केलेला खर्च (रु. लाखात) |
|---|---|
| ४४३४९ | ६१७ |

**जी) भविष्यातील योजना :**

- प्रगत प्रशिक्षणाचे कार्यक्रम :- एच व्ही डी सी, जी आय् एस, स्मार्ट ग्रिड, उपकेंद्राचे स्वयं प्रवर्तन, डिजीटल सबस्टेशन्स, प्रकल्प व्यवस्थापन, वीज जाळ्याचे व्यवस्थापन, सायबर सुरक्षा इ. विषयावर अद्यावत माहितीचे प्रशिक्षण आयोजणे
- महापारेषण मधील प्रशिक्षणाच्या गरजांचे विश्लेषण.
- डिजीटल ट्रान्सफॉर्मेशनसाठी कौशल्य निर्मिती.
- ई-शिक्षण.
- मार्गदर्शन धोरण.

**इ. ४) मिळवलेले पुरस्कार :**

*** महापारेषणला वर्ष २०२३-२४ मध्ये खालील दिलेले राष्ट्रीय स्तरावर नामांकित पुरस्कार देण्यात आले आहेत.:-**

| अनु. क्र. | पुरस्काराचे नांव | क्षेत्र / श्रेणी | पुरस्काराचा प्रकार | पुरस्कार देणारी संस्था | ज्या विशेष कामगिरी पुरस्कार दिला ते | पुरस्काराची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पी आर एस आय राष्ट्रीय पुरस्कार-२०२३ | राज्य उपयुक्तता | तिसरे पारितोषिक | जनसंपर्क सोसायटी ऑफ इंडिया | सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया आणि पी आर | २५.११.२०२३ |
| २ | पी आर एस आय राष्ट्रीय पुरस्कार-२०२३ | राज्य उपयुक्तता | तिसरे पारितोषिक | जनसंपर्क सोसायटी ऑफ इंडिया | ब्रँडिंग आणि सर्वोत्कृष्ट चित्रपट (इंग्रजी) | २५.११.२०२३ |
| ३ | पी आर एस आय राष्ट्रीय पुरस्कार-२०२३ | राज्य उपयुक्तता | प्रथम पारितोषिक | जनसंपर्क सोसायटी ऑफ इंडिया | भारत रत्न श्री. अटल बिहारी वाजपेयी राष्ट्रय जागृती प्रचाराचा पुरस्कार | २५.११.२०२३ |

**(इ) (५) कर्मचारी पुरस्कार योजना**

कर्मचाऱ्याना प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांच्यात संघभावना वाढावी, या हेतुने पुरस्कार व मान्यता योजना कार्यालये / युनीट्स यांच्या श्रेणीत सुरु केली आहे. या योजनेतून राज्य व क्षेत्रीय स्तरावरील विजेते कार्यालये / युनीट्स यांना पारितोषिके दिली जातात

राज्य स्तरीय पुरस्कर वितरणाचा कार्यक्रम कंपनी स्थापना दिनी म्हणजे ०६ जून २०२३ रोजी मुख्यालयात आयोजि केला होता.

**(इ) (६) कर्मचारी कल्याण कार्य :**

- महापारेषण कंपनी वेळोवेळी कर्मचारी कल्याण धोरणाची आखणी करुन अमंलबजावणी करीत असते. एम एस इ बी एच सी. एल अंतर्गत गृप मेडीक्लेम विमा धोरण अंतर्गत कर्मचारी आणि त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या पांच (०५) व्यक्ति यांना मेडीक्लेम विम्याचे छत्र पुरविण्यात आले आहे.
- कंपनी विभाग डिव्हिजन, मंडल आणि परिमंडळ स्तरावर क्रीडा स्पर्धा आयोजित करुन नंतर राज्यस्तरीय क्रिडास्पर्धा दर दोन वर्षांनी आयोजित करते. विविध खेळ, स्पर्धा करीता महापारेषणचे संघ निवडून त्यांना आंतर कंपनी व इतर राष्ट्रीय स्पर्धांना सहभागी होण्यासाठी पाठविले जाते.
- अखिल भारतीय विद्युत क्रिडा नियंत्रण मंडळ (एआय् इ एस सी बी) या संघटनेने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये महापारेषण कंपनीचे संघ / खेळाडू सहभागी होतात. आपल्या खेळाडूंनी या राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय स्तरांवरील स्पर्धांमध्ये सूवर्ण / रौप्य / कास्य पदके मिळविली आहेत. तसेच एआय इ एस सी बी स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षीसे देऊन सत्कार करण्यात आला.
- नाट्य स्पर्धा – कंपनी तर्फे परिमंडळ व राज्यस्तरांवर नाट्य स्पर्धा दर दोन वर्षांनी आयोजित केल्या जातात. राज्यस्तरीय व अन्य आंतर कंपनी नाट्य स्पर्धेत भाग घेण्यासाठी कलावंत कर्मचाऱ्यांना उत्तेजन देण्यात आले.
- विविध स्पर्धा परिक्षा व व्यवसायिक, शिक्षणाच्या परिक्षांमध्ये गुणवत्ता मिळवून निवडल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना रोख बक्षीसे देऊन गौरविले जाते. उदा. एम बी बी एस, विज्ञान संशोधन, केंद्रीय व महाराष्ट्र लोक सेवा आयोगांच्या स्पर्धेतून वर्ग एक साठी निवडलेले उमेद्वार याशिवाय कर्मचाऱ्यांच्या घरात कन्या जन्माला आल्यास रु. ५०००/– चे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र दिले जाते.
- कर्मचाऱ्यांचे जे पाल्य दहावी परिक्षेत गुणवत्तेने ऊत्तीर्ण होतात. त्यांना एम एस इ वी स्टाफ वेलफेअर कमिटीतर्फे पदवी परिक्षेपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाते. पडघा येथील दुरवरील उपकेंद्रांच्या वसाहतीतील पाल्यांसाठी विशेष स्कूल बसची व्यवस्था केली आहे.
- ज्या कर्मचाऱ्यांचे पाल्य किमान ४० टक्के दिव्यांग असल्याचे मूक–बधीर असल्याचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांना दिले असेल त्यांना म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समिती द्वारे तीन चाकी सायकल / श्रवण यंत्र खरेदी करण्यासाठी रु. ५०००/– चे साह्य दिले जाते.
- कंपनीने कर्मचाऱ्यांसाठी रु. २० लाखाची मुदत विमा योजना सुरु केली.
- कंपनीने कर्मचाऱ्यांसाठी रु. १० लाखाची अपघात योजना सुद्धा महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने सुरु केली आहे.

**(इ) ७) <u>औद्योगिक व कामगार कायद्यांतर्गत सांविधिक पुर्तता :</u>**

अ) कामगार कायद्यांनुसार – कर्मचारी कामावर असतांना अपघात झाल्यास त्यांचे वैद्यकीय खर्च व भरपाई याचे दावे प्रकरणी समझोते घडविण्यासाठी विविध शासकीय प्राधिकाऱ्यांशी संपर्क करुन प्रयत्न केले जातात.

ब) कर्मच्याऱ्यांच्या गाऱ्हाण्यासाठी व्यवस्थापन व कर्मचारी संघटन यांच्यात बैठका आयोजित करुन मध्यस्थाचे काम हा विभाग करतो.

**(इ) ८) <u>कामाच्या जागी महिलांचे लैगिक छळास आळा घालण्याविषयीचा (आळा, बंदी व सोडवणूक) अधिनियम २०१३ नुसार कंपनीला बंधने.</u>**

कामाच्या जागी होऊ शकणाऱ्या महिलांच्या लैगिक छळाला आळा घालण्यासाठी उपरोक्त नवीन कायदा ०९/१२/२०१३ रोजी अधिसुचित करण्यात आला. त्यानुसार कंपनीने अशा तक्रारीच्या निवारणार्थ एक अंर्तगत तक्रार समिती स्थापित करावयाची असते. ही समिती अशा तक्रारींची शहानिशा करते कामाच्या ठिकाणी महिलांना लैंगीक छळ होऊ नये आणि त्यास आळा घालावा या हेतुने महापारेषणकडे एक यंत्रणा आहे. यासाठी एक समिती अस्तित्वात असून तिच्याकडे लैंगीक छळाच्या तक्रारींची चौकशी केली जाते.

**(२) संचालक आणि महत्वाच्या पदावरील व्यक्ती.**

**(अ) संचालक**

वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये कंपनीच्या संचालक मंडळात खालील बदल महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभाग आणि म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी यांच्या आदेशानुसार करण्यात आले :

| अनु. क्र. | संचालकांची नावे | नियुक्तीची तारीख | समाप्तीची तारीख |
|---|---|---|---|
| १. | श्री. डॉ. संजीव कुमार – भा.प्र.से. | ०३/०५/२०२३ | – |
| २. | श्री. अशोक फळणीकर | ०५/१०/२०२० | ३१/०१/२०२४ |
| ३. | श्री. काद्री नासिर सईद मझहर | ०५/१०/२०२१ | १०/१०/२०२३ |
| ४. | श्री. सुगत गमरे | १०/०१/२०२२ | – |
| ५. | श्रीमती तृप्ती मुधोळकर | २२/०१/२०२१ | २९/०२/२०२४ |
| ६. | श्री. विश्वास पाठक | २२/०८/२०२२ | – |
| ७ | श्रीमती आभा शुक्ला–भा.प्र.से. | २९/११/२०२२ | – |
| ८. | श्री. सतीश चव्हाण | ०५/०३/२०२४ | – |

**अहवालाच्या तारखेस खालील व्यक्ती संचालक पदी होत्या.**

| अनु. क्र. | संचालकांची नावे | पद | नियुक्तीची तारीख |
|---|---|---|---|
| १. | श्री. डॉ. संजीव कुमार - भा.प्र.से. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | ०३/०५/२०२३ |
| २. | श्रीमती आभा शुक्ला - भा.प्र.से. | नामनिर्देशित संचालिका | २९/११/२०२२ |
| ३. | श्री. सतीश चव्हाण | संचालक (प्रवर्तने) | ०५/०३/२०२४ |
| ४. | श्रीमती तृप्ती मुधोळकर | संचालिका (वित्त) | १९/०७/२०२४ |
| ५. | श्री. विश्वास पाठक | स्वतंत्र संचालक | २२/०८/२०२२ |

**ब) संचालकांच्या कामगिरीचे मुल्यांकन :-**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १७८ (२) नुसार संचालकांच्या कामगिरीचे मुल्यमापन करण्याची आवश्यकता सरकारी कंपन्यांना, कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसुचना दि. ५ जून २०१५ नुसार लागू नाही.

याशिवाय अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची नेमणूक, मुदत आणि पारिश्रमिक महाराष्ट्र शासनातर्फे निश्चित केले. जाते. इतर पूर्ण वेळ संचालकांची नियुक्ती व मुदत मराविमं सुत्रधारी कंपनी ठरविते. आणि पूर्ण वेळ संचालकांचे पारिश्रमिक नियुक्तीच्या अटी व शर्ती नुसार निश्चित होते. स्वतंत्र संचालकांना फक्त ते ज्या बैठकांना/समितीच्या कामाला उपस्थित राहतील त्याचे फक्त शुल्क दिले जाते. (याचा दर मंडळ - निश्चित करते. कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १९७ सोबत वाचन केले जाणारे कंपनी (व्यवस्थापकीय व्यक्तींची नियुक्ती व पारिश्रमिक) नियमावली २०१४ यातील नियम ४ अनुसार आणि मंडळ व समितीच्या बैठकी उपस्थिती यासाठी शासनाच्या मंजुरी शिवाय उपस्थिती शुल्कासाठी निश्चित केलेल्या मर्यादित कंपनीचे संचालक मंडळ स्वतंत्र संचालकांचे उपस्थिती शुल्क दिले जाते. मंडळावरील शासकीय नामनियुक्त संचालक कंपनीच्या मंडळ / समिती या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी कोणतेही पारिश्रमिक / उपस्थिती शुल्क घेत नाहीत. अ-कार्यकारी संचालक / स्वतंत्र संचालकांना मंडळ / समिती यांच्या बैठकीच्या उपस्थितीचे शुल्क रु. ५,०००/- प्रती बैठक - या दराने दिले जाते.

**क) व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्ती :-**

वित्तीय वर्ष २०२३ -२४ मध्ये कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार कंपनी व्यवस्थापनातील महत्वांच्या व्यक्ती संबंधीची माहिती खालील प्रमाणे आहे :-

| अनु. क्र. | व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्तींची नावे | पद | नियुक्तीची तारीख | कार्यकाल समाप्ती |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. दिनेश वाघमारे - भा.प्र.से. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | २३/०१/२०२० | ०२/०५/२०२३ |
| १. | श्री. डॉ. संजीव कुमार - भा.प्र.से. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | ०३/०५/२०२३ | - |
| २. | श्री. अशोक फळणीकर | मुख्य वित्त अधिकारी | ०५/१०/२०२० | ३१/०१/२०२४ |
| ३. | श्रीमती विनीता श्रीवाणी | कंपनी सेक्रेटरी | २२/०६/२०१५ | - |

**ड) बैठक :**

**१. मंडळाच्या बैठका :**

**आढावा वर्षात झालेल्या मंडळांच्या ०७ बैठकांच्या तारखा खालील प्रमाणे**

| अनु. क्र. | मंडळाच्या बैठकीचा क्रमांक मंडळाच्या | बैठकीच्या तारीख |
|---|---|---|
| १. | १६१ वी मंडळ बैठक | १५/०५/२०२३ |
| २. | १६२ वी मंडळ बैठक | ०८/०४/२०२३ |
| ३. | १६३ वी मंडळ बैठक | २१/०९/२०२३ |
| ४. | १६४ वी मंडळ बैठक | २७/१०/२०२३ |
| ५. | १६५ वी मंडळ बैठक | २९/१२/२०२३ |
| ६. | १६६ वी मंडळ बैठक | १९/०१/२०२४ |
| ७. | १६७ वी मंडळ बैठक | ०४/०३/२०२४ |

दोन बैठकांमधील अंतर हे कंपनी अधिनियम २०१३ मधील विहित अंतराप्रमाणे आहे.

**वि.व. २०२३-२४ मध्ये संचालकाची संचालक मंडळ बैठकीत उपस्थिती**

| संचालकाचे नाव | झालेल्या संचालक मंडळ बैठका | |
|---|---|---|
| | झालेल्या | उपस्थित |
| श्री. डॉ. संजीव कुमार -भा.प्र.से. | ७ | ७ |
| श्री. सुगत गमरे | ७ | ७ |
| श्री. विश्वास पाठक | ७ | ७ |
| श्रीमती आभा शुक्ला - भा.प्र.से. | ७ | ३ |
| श्री. काद्री नासिर सईद मजहर [१] | ७ | ३ |
| श्री. अशोक फळणीकर[२] | ७ | ६ |
| श्रीमती तृप्ती मुधोळकर [३] | ७ | ४ |

[१] श्री. काद्री हे दि. १०/१०/२०२३ पासून संचालक नाहीत.
[२] श्री. फळणीकर हे दि. ०१/०२/२०२४ पासून संचालक नाहीत.
[३] श्रीमती मुधोळकर दि. ०१/०३/२०२४ पासून संचालक नाहीत.

**(२) संचालक मंडळाच्या समित्या.**

कंपनी मध्ये मंडळाच्या खालील समित्या आहेत.

**लेखापरिक्षण समिती. (AC )**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १७७ नुसार दि. २४/०८/२०१५ रोजी लेखा परिक्षण समितीचे पूनर्गठन करण्यात आले.

कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना दि. ०५/०७/२०१७ नुसार, कंपनी (नियुक्त्या व संचालकांची पात्रता) नियमावली २०१४ यातील नियम क्र. ४ च्या दुरुस्त्यानुसार तसेच कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधीसुचना दि. १३/०७/२०१७ नुसार कंपन्यांची (संचालक मंडळाच्या बैठका व त्यांचे अधिकर) नियमावली २०१४ यातील नियम क्र. ६ नुसार, महापारेषण ही मराविमं सुत्रधारी कंपनी लि यांच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे. त्यामुळे तीला स्वतंत्र संचालक नेमणे किंवा लेखा परिक्षण समिती गठीत करणे आणि मंडळाचा नामनिर्देशन व परिश्रमिक समिती नेमणे यांची आवश्यकता नाही.

महापारेषणने एक योग्य प्रशासन पद्धती म्हणून कंपनीमध्ये स्वतंत्र संचालकांची तसेच लेखापरिक्षण समिती नियुक्त करणे चालू ठेवले. वि. वर्ष २०१९-२० मध्ये श्री. विश्वास पाठक यांनी दि. ०८/०१/२०२० रोजी आणि श्रीमती पुष्पा चव्हाण यांनी दि. १०/०६/२०२० स्वतंत्र संचालक पदांचे राजीनामे दिले.

वि. वर्ष २०२२-२३ मध्ये श्री. विश्वास पाठक यांना महापारेषणचे स्वतंत्र संचालक म्हणून दि. २२/०८/२०२२ रोजी नियुक्ती करण्यात आले. त्यानंतर चांगली प्रशाकीय पद्धती म्हणून लेखा परिक्षण समिती पुनर्गठीत करण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या दि. २९/१२/२०२२ रोजी १५९ व्या बैठकीत घेण्यात आला. तिची रचना खालील प्रमाणे करण्यात आली.

| अनु. क्र. | समिती सदस्य | श्रेणी |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष (समिती) | स्वतंत्र संचालक |
| २. | कार्यकारी | संचालक (प्रकल्प) |
| ३. | स्वतंत्र संचालक अकार्यकारी | स्वतंत्र संचालक / अकार्यकारी संचालक |
| | **कायम स्वरुपी निमंत्रक** | |
| ४. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | |
| ५. | संचालक (वित्त) | |

**लेखा परिक्षण समितीमध्ये अहवाल वर्षात खालील प्रमाणे**

| अनु.क्र. | समिती सदस्याची नावे | पद | पद सिध्द अधिकारांनुसार |
|---|---|---|---|
| १. | श्री. विश्वास पाठक | अध्यक्ष | स्वतंत्र संचालक |
| २. | श्री. अविनाश निंबाळकर | सदस्य | संचालक (प्रकल्प)(ए/सी)-कार्यकारी |
| ३. | श्री. डॉ. संजीव कुमार - भा.प्र.से. | कायम स्वरुपी निमंत्रक | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |
| ४. | श्रीमती तृप्ती मुधोळकर | कायम स्वरुपी निमंत्रक | संचालक (वित्त) कार्यकारी |

**या वित्तीय वर्षात लेखा परिक्षण समितीच्या चार सभा खालील तारखेला झाल्या.**

| अनु.क्र. | सभेचा क्रमांक | सभेची तारीख |
|---|---|---|
| १. | २ री लेखा परिक्षण समिती | २०/०७/२०२३ |
| २. | ३ री लेखा परिक्षण समिती | २६/१०/२०२३ |
| ३. | ४ थी लेखा परिक्षण समिती | २९/१२/२०२३ |
| ४. | ५ वी लेखा परिक्षण समिती | ०४/०३/२०२४ |

**लेखा परिक्षण समितीच्या वि. वर्ष २०२३-२४ मध्ये झालेल्या सभेत संचालकांची उपस्थिती खालील प्रमाणे होती.**

| मा. संचालकांची नावे | झालेल्या सभांची संख्या | |
|---|---|---|
| | आयोजन | उपस्थिती |
| श्री विश्वास पाठक | ३ | ३ |
| श्रीमती तृप्ती मुधोळकर | ३ | ३ |
| श्री. काद्री नासिर सईद मजहर[१] | ३ | १ |

१. श्री. काद्री हे दि. १०/१०/२०२३ पासून संचालक नाहीत.

### नाम निर्देशन आणि पारिश्रमिक समिती (NRC)

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १७८ च्या तरतुदीनुसार नामनिर्देशन नियम आणि पारिश्रमिक समितीचे पुनर्गठन दि. २४/०८/२०१५ रोजी करण्यात आले.

कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना दि. ०५/०७/२०१७ नुसार कंपनीज् (संचालकांच्या नियुक्त्या व पात्रता) नियमावली २०१४ यातील नियम क्र. ४ यातील दुरुस्त्या आणि कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना दि. १३/०७/२०१७ नुसार कंपन्यांच्या (मंडळाच्या सभा व त्यांचे अधिकार) नियमावली २०१४ यातील नियम ६ नुसार महापारेषण ही मराविमं सूत्रधारी कंपनी लि. यांच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी आहे. त्यामुळे स्वतंत्र संचालकाची नियुक्ती करणे किंवा लेखापरिक्षण समिती तसेच नामनिर्देशन व पारिश्रमिक समिती गठीत करण्याची आवश्यकता नसते.

आढाव्यातील वित्तीय वर्षात नामनिर्देशन व पारिश्रमिक समितीची सभा झालेली नाही.

### कंपनीची सामाजिक जबाबदारी समिती (CSRC)

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३५ च्या तरतुदीनुसार दि. १९/०५/२०१४ रोजी कंपनीची सामाजिक जबाबदारी समिती स्थापित करण्यात आली कंपनीने ०३/१२/२०१५ पासून कंपनीच्या सामाजिक जबाबदारीचे धोरण स्वीकारले आणि त्यासाठी नेमलेल्या समितीची रचना खालील प्रमाणे आहे :-

| अनु.क्र. | समितीच्या सदस्याची नावे | पद | पद सिध्द अधिकारांनुसार |
|---|---|---|---|
| १. | श्री. डॉ. संजीव कुमार - भा.प्र.से. | अध्यक्ष | अध्यक्ष अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |
| २. | श्री. अविनाश निंबाळकर | सदस्य | संचालक (प्रकल्प)(ए/सी)-कार्यकारी |
| ३. | श्रीमती तृप्ती मुधोळकर | सदस्य | संचालक (वित्त) कार्यकारी |
| ४. | श्री. विश्वास पाठक | सदस्य | स्वतंत्र संचालक |

**आढाव्याच्या वित्तीय वर्षात, या सी एस आर समितीच्या तीन सभा खाली निर्देशित तारखांना संपन्न झाल्या :-**

| अनु. क्र. | सी एस आर सी सभेचा क्रमांक | सभेचा दिनांक |
|---|---|---|
| १. | ३४ वी कंपनीची सामाजिक जबाबदारी समितीची सभा | २०/०७/२०२३ |
| २. | ३५ वी कंपनीची सामाजिक जबाबदारी समितीची सभा | २९/१२/२०२३ |
| ३. | ३६ वी कंपनीची सामाजिक जबाबदारी समितीची सभा | ०४/०३/२०२४ |

**वि. वर्ष २०२३-२४ मध्ये झालेल्या कंपनी सामाजिक जबाबदारी समितीच्या / बैठकांतील संचालकांची उपस्थिती**

| अनु.क्र. | संचालकांची नावे | आयोजित सभांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | आयोजन | उपस्थिती |
| १. | श्री. डॉ. संजीव कुमार - भा.प्र.से. | ३ | ३ |
| २. | श्री. काद्री नासिर सईद मजहर [१] | ३ | १ |
| ३. | श्री. अशोक फाळणीकर [२] | ३ | २ |
| ४. | श्री. विश्वास पाठक | ३ | ३ |

[१] श्री. काद्री हे दि. १०/१०/२०२३ पासून संचालक नाहीत.
[२] श्री. फळणीकर हे दि. ०१/०२/२०२४ पासून संचालक नाहीत.

**कंपनीच्या सभासदांच्या बैठका (AGM) :-**

**वाषिक सर्वसाधारण सभा :-**

मागील तीन वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) खालील प्रमाणे झाल्या.

| अनु.क्र. | सभा क्र. | वित्तीय वर्ष | स्थळ | दिवस व दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | १६ वी | २०२०-२१ | सभागृह, ३रा मजला, एच एस बी सी इमारत, फोर्ट, मुंबई ४००००१. | बुधवार २९ डिसेंबर २०२१ | १७.०० वा. |
| २. | १६ वी (विसर्जीत) | २०२०-२१ | सभागृह, ३रा मजला, एच एस बी सी इमारत, फोर्ट, मुंबई ४००००१. | गुरुवार २४ फेब्रुवारी २०२२ | १२.३० वा. |
| ३. | १७ वी | २०२१-२२ | सभागृह, अतिथी गृह, बिजली नगर, नागपूर - ४४०००१. | बुधवार २९ डिसेंबर २०२२ | १६.४५ वा. |
| ४. | १८ वी | २०२२-२३ | सभागृह, ३रा मजला, एच एस बी सी इमारत, फोर्ट, मुंबई ४००००१. | शुक्रवार २९ डिसेंबर २०२३ | १७.०० वा. |

**३. वित्तीय ठळक वैशिष्ठ्ये :-**

**ए) आपल्या कंपनीची, आढावा वर्षातील कामगिरी खालील प्रमाणे आहे.** (रु.कोटीत)

| अनु. क्र. | तपशील | २०२३-२४ | २०२२-२३ |
|---|---|---|---|
| १. | एकूण उत्पन्न | ७,२१०.०६ | ५,६८१.८५ |
| २. | एकूण खर्च | ४,४७१.३५ | ४,११७.८९ |
| ३. | **कर पूर्ण नफा** | **२,७३८.७१** | **१,५६३.९६** |
| ४. | करारासाठी तरतुद | (९६२.२५) | (५२७.२८) |
| ५. | **निव्वळ नफा / निव्वळ तोटा** विनियोजनासाठी उपलब्ध करानंतरचा | **१,७७६.४६** | **१,०३६.६८** |
| ६. | **इतर सर्वसमावेशक उत्पन्न** | (१०८.०७) | (८.५१) |
| ७. | **एकुण सर्वसमावेशक उत्पन्न** | **१,६६८.३९** | **१,०२८.१७** |

वर्ष २०२३-२४ चा करपूर्व नफा रु. २,७३८.७१ असा वाढला मागील वर्ष २०२२-२३ मध्ये रु. १,५६३.९६ कोटी होता.

वि. वर्ष २०२३-२४ चा करोत्तर नफा रु. १,७७६.४६ कोटी होता. मागील वर्ष २०२२ - २३ चा करोत्तर नफा रु. १,०३६.६८ कोटी होता. कंपनीच्या महसूलाचा महत्वाचा स्त्रोत पारेषणाचे आकार हा आहे. तो राज्य पारेषण लोकोपयोगी संस्था (एस टी यू) कडून जमा केला जातो.

**बी) राखीव :**

कंपनीने रु. ७७.०७ कोटी आकस्मिक राखीव निधीमध्ये स्थानातंरित केले. विशेष राखीव निधीमध्ये आणि भार पारेषण केंद्र सबलीकरण राखीव निधीत रु. निरंक हस्तांतरित केले. लोड डिस्पॅच सेंटर एम्पॉएर रिझर्व फंड (LDCD) यामध्ये रु. २४.६७ स्थानांतरित केले.

**सी) शेअर भांडवली बदल :-**

कंपनी भांडवल रचना खालील प्रमाणे आहे. (रु.कोटीत)

| तपशील | रक्कम |
|---|---|
| अधिकृत भाग (शेअर) भांडवल | १५,०००,००,००,००० |
| **जारी केलेले अभिदत्त आणि पूर्ण भरणा केलेले भाग भांडवल** | **८९,८४,९७,४७,३३०** |

वि. वर्ष २०२३-२४ मध्ये कंपनीच्या भाग भांडवलात बदल झालेला नाही.

**डी) लाभांश :-** कंपनीस प्रणाली कंपनी सुधारणा आणि विविध पायाभूत प्रकल्प यासाठी निधीची आवश्यकता असल्याने संचालक ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षासाठी कोणत्याही लाभांशाची शिफारस करीत नाहीत.

**इ) अंतर्गत नियंत्रणे :-** कंपनीच्या सर्व मत्ता सुरक्षित ठेवणे आणि कोणत्याही अनाधिकृत वापर किंवा गैरव्यवस्थेपासून होऊ शकणाऱ्या हानी किंवा विल्हेवाट होणे यापासून संरक्षण करण्यासाठी कंपनीमध्ये योग्य आणि पुरेशा प्रमाणात अंतर्गत नियंत्रणाच्या प्रणाली कार्यरत आहे. सर्व व्यवहार अधिकृतरित्या केले जातात, त्यांची नोंदणी केली जाते व निर्दोषपणे अहवाल लेखन केले जाते.

**एफ) उपकंपन्या आणि सहयोगी कंपनी :-**

महापारेषण ही कंपनी अधिनियम १९५६ चे कलम ४ (१) (ए) व ४ (२) यातील तरतुदीनुसार मराविमं सुत्रधारी कंपनीची एक उपकंपनी आहे, महापारेषणच्या दोन सहयोगी कंपन्या खालील प्रमाणे आहेत.

१) जयगड पॉवर ट्रान्सको लि.

२) महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रा. लि.

**जी) परिव्यय लेखापरिक्षक :-** भारत सरकारच्या कंपनीव्यवहार मंत्रालयातील लेखापरिक्षण शाखा, नवी दिल्ली यांनी कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४८ नुसार दिलेल्या अधिकाराचा वापर करुन कंपनी (परिव्यय अभिलेखा आणि लेखापरिक्षण) दुरुस्ती नियमावली २०१४ विद्युत कंपनी तर्फे जतन केलेल्या लेखे अभिलेख व लेखा नोंदवह्या यांना लागू केली आहे. कपंनीच्या संचालक मंडळाने वित्तीय वर्ष २०२३-२४ साठी मे.बी.जे.डी. नानाभाई ॲण्ड कंपनी, परिव्यय लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केली होती.

कंपनीच्या संचालक मंडळने वि.वर्ष २०२४-२५ साठी धनंजय व्हि जोशी ॲण्ड असोशिएट लेखापाल यांची परिव्यय लेखापरीक्षक म्हणुन नियुक्ती केली आहे आणि कंपनी व्यवहार मंत्रालयाने त्यांची नियुक्ती अभिलेख्यात घेतली आहे.

**एच) सांविधिक लेखापरिक्षक**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम २ (४५) या नुसार महापारेषण ही एक शासकीय कंपनी आहे. त्यामुळे भारताचे माननीय लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक (सीए अँड जी) (कॅग) हे कंपनी अधिनियमन २०१३ चे कलम १३९ (५) नुसार कंपनीच्या वार्षिक लेखांकनाचे लेखापरिक्षण करण्यासाठी सांविधिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करतात त्यानुसार मा. सीए अँड जी, नवी दिल्ली, यांना त्यांचे पत्रक सी ए व्ही/सी ओ वाय/महाराष्ट्र, एम एस इ सी एम (१)/१०१३ दि. २०/०९/२०२३ या द्वारे मेसर्स एम एस के ए अँड असोशिएटस, सनदी लेखापाल यांची वित्तीय वर्ष २०२३-२४ साठी सांविधिक लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती केली.

मा. सीए अँड जी, नवी दिल्ली, यांनी पत्र क्र. सी ए व्ही / महाराष्ट्र, एम एस इ टी सी एम (१)/९७५ दि. २१/०९/२०२४ या द्वारे एम एस के ए अँड असोशिएट्स, सनदी लेखापाल फर्म यांची वित्तीय वर्ष २०२४-२५ या साठी सांविधिक लेखा परिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

मा. सी अँड एजी यांनी नियुक्त केलेले सांविधिक लेखा परिक्षक हा पदभार सांभाळणार आहेत

**आय) सांविधिक लेखा परिक्षकांच्या अभिप्रायांवर स्पष्टीकरणे :-** सांविधिक लेखापरिक्षकांच्या अहवालावर स्पष्टीकरणे देणारे अभिप्राय परिशिष्ट - (VI) मध्ये जोडले आहे. कंपनी अधिनियम २०१३ चे कमल १४३ (६) मधील अटीनुसार भारत देशाचे मा. लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कंपनीच्या ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या लेख्यांवर दिलेले अभिप्राय या अहवालाचे परिशिष्ठ (VII) यात जोडले आहे.

**जे) ठेवी :-** कंपनी अधिनियम २०१३ चे प्रकरण - पाच (V) यात समावेश केल्याप्रमाणे महापारेषण कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी, आढावा वर्षात स्वीकारलेल्या नाहीत.

**के) कर्जे, हमी किंवा गुंतवणूकीची माहिती :-**

आपल्या कंपनीने थेट किंवा अप्रत्यक्षपणे.

ए) सामानाच्या पुरवठ्याची कंत्राटात तरतुद केलेली नेहमीची अग्रिमे वगळता, अन्य कुणा व्यक्ती, अगर संस्था यांना कोणतेही कर्ज दिलेले नाही.

बी) कोणत्याही कंपनी किंवा व्यक्ती यांच्या कोणत्याही कर्जास महापारेषणने कोणतीही हमी किंवा प्रतिभूती दिलेली नाही.

सी) अन्य कोणत्याही कंपनीच्या पूर्ण भरणा केलेल्या भांडवलात, मुल्य, राखीव किंवा अधिमूल्य लेख्यांच्या प्रतिभूती यांच्या बाबत ६० टक्क्यांपेक्षा जास्त किंवा मुक्त प्रतिभूतीच्या किंवा मुक्त राखीव यांच्या शंभर टक्के किंवा अधिमुल्याची प्रतिभूती अभिदान करुन किंवा अन्य व्यवहारातून संपादन किंवा खरेदी केलेल्या नाहीत.

**(एल) संबंधित पक्षांसोबत व्यवहार :-**

वित्तिय वर्षात संबंधित पक्षांसोबत कंपनीने केलेली कोणताही कंत्राटे / व्यवहार हे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १८८ च्या तरतुदी यानुसार नाहीत.

**(एम) व्यवसायाच्या स्वरुपात बदल (काही असल्यास) :-**

महापारेषण कंपनीच्या उद्योग -व्यवसायाच्या स्वरुपात कोणताही बदल केलेले नाहीत.

**(एन) निधी व्यवस्था / संस्थाकडून कर्जे-उसनवारी-**

महापारेषणने वि. वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ साठी सुमारे रु. ८,३७१ कोटीची भांडवली खर्चांची योजना तयार करुन ती महाराष्ट्र वीजनियमक आयोगाला सादर केली आहे.

२०२३-२४ आर्थिक वर्षात महापारेषणने कर्ज घटकाद्वारे रु. १५६ कोटींचा निधी उभारला आहे. कर्ज घटकासाठी महापारेषण कंपनीने ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ (REC), पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (PFC) आणि राष्ट्रीय बँका यांच्या सोबत निधी विषयक करार केले आहे.

**४) इतर अनुपालने**

**ए) सेक्रेटरीयल ऑडीट रिपोर्ट :-**

कायमच्या कलम २०४ व त्यातील नियमावली यानुसार मेसर्स अजित साठे, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी यांची कंपनीची सेक्रेटरीयल ऑडीटर्स म्हणून नेमणूक करण्यात आली. या सेक्रेटरीयल ऑडीटर्सचा अहवाल संचालकांच्या अहवालाच्या जोडपत्र तीन येथे जोडला आहे. हा अहवाल स्वयंस्पष्ट असून त्यावर आणखी काही भाष्ये करण्याची गरज नाही.

**बी) धोके व्यवस्थापन धोरण :-**

महापारेषण संचालक मंडळाने धोके व्यवस्थापन धोरण दि. ०२/०६/२०१६ रोजी मंजुर करुन तात्काळ त्याची अंमलबजावणी त्याच तारखेला सुरु केली अनिश्चित परिस्थितीच्या व्यवस्थापनाची पूर्व तयारी करणे आणि अंतर्गत व बाह्य पर्यावरण बदलाचे आघात नकारात्मक मर्यादेत व्हावेत यासाठी हे धोरण अंगिकारण्यात आलेले आहे. यातील संधीचा लाभ घ्यावा असे ही या धोरणात ठरविले आहे. कंपनीच्या व्यवसायाच्या धोक्यासंबंधीत पूर्ण तयारीचा दृष्टीकोन तयार करणे. त्यासाठी अहवाल देणे, मूल्यमापन करणे व व्यवसायासंबंधीत जोखीमांचा मुकाबला करणे त्यातून टिकाऊ व्यवसाय वृद्धी आणि स्थैर्य या प्रोत्साहन देणे हे धोरणाचे ध्येय आहे. हे धोरण कंपनीची वेबसाईट.

http://www.mahatransco.in/information/details/risk_management_policy येथे उपलब्ध आहे.

**सी) वार्षिक विवरणांचा उतारा :-**

कंपनी अधिनियम २०१३ यातील नियम ८ आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियमावली २०१४ कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४(३)(ए)९(MGT-९) यात असून तो जोडपत्र ४ येथे आहे.

**डी) कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांचा ज्याच्याशी संबंध आहे ते कंपनीचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर अहवालाची तारीख या काळात कंपनीच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणारे महत्वपूर्ण बदल किंवा बांधिलकी, जर असल्यास, त्याची माहिती.**

कंपनीच्या ताळेबंदाची ज्याच्याशी निगडीत आहे ते कंपनीचे आर्थिक वर्ष संपल्यानंतर या अहवालाच्य तारखेपर्यंतच्या काळात कोणतेही महत्वपूर्ण बदल झाले नाहीत. यामध्ये कर दायित्वे चुकती करणे, पेटंट हक्काचा वापर, गुंतवणूकीच्या बाजार मूल्यात घसरण, कंपनीने किंवा कंपनीच्या विरोधात दावे, भांडवली मत्तांची खरेदी-विक्री किंवा कोणतीही मत्ता नष्ट करणे आदि कोणतेही बदल घडले नाहीत.

**इ) कंपनीची सद्यस्थिती व भविष्यातील कार्य यावर परिणाम करणारे महत्वाचे व लक्षणीय आदेश नियामक, न्यायालये किंवा लवाद यांनी दिले असल्यास त्यांचा तपशील :**

कंपनीच्या सद्यस्थितीवर किंवा भविष्यातील कार्यावर ज्याचा आघात किंवा प्रभाव पडेल असे कोणतेही आदेश नाहीत.

**एफ) गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीत रक्कम हस्तांतरित करणे.**

आपल्या कंपनीचे सात वर्षांच्या कालावधीसाठी कोणतेही निधी प्रदान करणे बाकी नाही किंवा मागणी केली नाही असेही नाही. त्यामुळे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (IEPF) मध्ये कोणताही निधी हस्तांतरित करण्याची आवश्यकता नाही.

**५) ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञान अंगिकार व परकीय चलनातील मिळकत व खर्च :**

कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४ (३) (एम) ज्याचे सहवाचन कंपनी अधिनियम (लेखा) नियमावली २०१४ नियम ८ सोबत होते, त्यातील प्रकटनाच्या आवश्यकतेनुसार, ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान अंगिकार, परकीय चालनातील मिळकत व कमाई या संबंधीची माहिती खालील प्रमाणे :

उर्जेचे संवर्धन करण्यास कंपनी पूर्णपणे वचनबद्ध असून व त्यासाठी ऊर्जा संवर्धनासाठी अद्यावत तंत्रज्ञानाचा जबाबदारीचे वापर केला जातो.

- ➤ कंपनीची सर्व उपकेंद्रे /कार्यालये यात कार्यक्षम ऊर्जा वापराच्या प्रकाशनलिकांचा (ट्यूब) वापर करणे.
- ➤ कार्यक्षम ऊर्जा वापराचे साह्यकारी साहित्य वापरणे व स्वच्छ तंत्रज्ञान वापरणे.
- ➤ ऊर्जा हानी करु शकणाऱ्या सैल जोडणीच्या जागा शोधणे व परिस्थितीवर लक्ष ठेवणे.
- ➤ सहाय्यक वीज वापरण्याच्या प्रमाण मानकांचे पालन करणे – त्याकडे लक्ष ठेवणे, त्याचे संनियंत्रण करणे.
- ➤ सभेत तारांच्या देखभाल करण्याचे तंत्रज्ञान अंगिकारुन त्यातील वीज जाळे गळतीमूळे होणारी पारेषण हानी कमी करणे.
- ➤ पारेषण हानी कमी करण्यासाठी वीज जाळ्यांच्या पर्याप्त वापर करणे.
- ➤ कॅपसिटर बँक यासाधनांचा पुरेपुर वापर करुन रिॲक्टीव हानीची भरपाई करण्याकडे लक्ष ठेवणे.
- ➤ इ एच व्ही उपकेंद्रात ऊर्जेचे लेखापरिक्षण करणे.

**तंत्रज्ञानाचा वापर**

**उपकेंद्रात व पारेषण तारांच्या अभियांत्रिकी मध्ये सुधारणा व नवीन तंत्रज्ञानाचा वापर.**

- ➤ इ एच व्ही श्रेणीतील उपकेंद्रात सबस्टेशन ॲटोमेशन सिस्टम वापरणे.
- ➤ इ एच व्ही साधनांकरीता ऑनलाईन कंडीशन मॉनिटरींग टेकनिक वापरणे.
- ➤ इ उच व्ही लाईन्ससाठी एक खांबी (Monopole) संकंल्पचित्र.
- ➤ इ एच व्ही श्रेणीतील ट्रान्सफॉर्मर मध्ये खालील एकात्मिक नवे तंत्रज्ञान
  - ✓ नायट्रीजन इंजेक्शन फायर प्रोटेशन सिस्टम
  - ✓ तापमान मोजण्यासाठी फायबर ऑप्टीक सेन्सर
  - ✓ वायू व ओलेपणा यांचे मापन ऑनलाईन करणे.
  - ✓ नव्या पारेषण तारांसाठी लाईन सिग्नेचर व्हॅल्यू.
- ➤ गॅस इन्शूलेटेड सबस्टेशन्स –१३२ केव्ही ते ४०० केव्ही उपकेद्रांसाठी
- ➤ हायब्रीड स्विच गियर टेक्नॉलोजी १३२ केव्ही व २२० केव्ही उपकेंद्रे यांच्या साठी
- ➤ ऑप्टीकल फायबर ग्राउँड वायर संपर्क व रक्षण प्रणाली-एफ ओ टी इ यावर पथदर्शक प्रकल्प
- ➤ पारेषणाच्या मत्तांच्यासाठी जिओग्राफीकल इन्फॉर्मेशन सिस्टम.

**परकीय चलनातील मिळकत व खर्च :-**

अर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये परकीय चलनातील कोणतीही मिळकत किंवा खर्च नाहीत.

**६) कंपनीची सामाजिक जबाबदारी (CSR) :**

महापारेषण कंपनीचा कंपनीच्या सामाजिक जबाबदारी (CSR) यावर विश्वास आहे. ती कंपनीच्या हितकर्त्याशी बांधिलकी आहे. कंपनीचा उद्योग व्यवसाय आर्थिक दृष्ट्या योग्य प्रकारे, सामाजिक व पर्यावरणाच्या बाबतीत टिकूण राहील अशाप्रकारे चालविणे, तो पारदर्शक व नैतिक असणे या हेतूने कंपनी कार्य करील, कंपनीचे कार्येकर्ते म्हणजे कंपनीच्या कार्याचा थेट परिणाम ज्यांच्या जीवनावर होतो अशा सर्व व्यक्ती, स्थानिक समुदाय, पर्यावरण आणि सर्व समाज यामध्ये समाविष्ट आहेत. नव्याने कंपनीच्या कार्याच्या भोवताली राहणारा आणि जे सीमांत स्तरावर व अविकसीत समाज घटक आहेत. त्यांच्याकडे कंपनी लक्ष पुरवणार आहे. यासाठी आपली कंपनी विविध प्रकारचे कार्य करणार आहे त्यात ग्रामीण विकास / पायाभूत विकास, कौशल्य विकास, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आदि क्षेत्रांवर देण्यात येईल. तपशीलवार टिप्पणी ह्या अहवालाच्या परिशिष्ट क्र. ५ येथे आहे.

**७) संचालकांच्या जबाबदारी संबंधीचे निवेदन : -**

आपल्या संचालकांचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास तसेच त्यांच्या कडून मिळालेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३४, कलम (३), खंड (सी), यातील अटीनुसार आपले संचालक खालील प्रमाणे निवेदन करीत आहेत.

(अ) दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचे वार्षिक लेखे तयार करताना त्यासाठी लागू होणाऱ्या मानकांचे अनुसरण करण्यात आले आहे. व जेथे प्रत्यक्ष विचलन झाले असल्यास, त्याची योग्य स्पष्टीकरणे दिली आहे.

(ब) दि. ३१ मार्च २०२४ रोजी कंपनीचा व्यवहार व त्या दिवशी संपणाऱ्या वर्षातील नफा किंवा तोटा याबाबत सत्य व रास्त दर्शन घडावे म्हणून संचालकांनी योग्य अशी लेखा धोरणे निवडली आहेत, व ती सातत्याने लागू केली आहेत व योग्य आणि सूज्ञ पणे निर्णय घेतले व अंदाज केले.

(क) कंपनीच्या मत्तांचे रक्षण करणे, कोणत्याही लबाडी किंवा अनियमियतता यांना आळा घालणे किंवा तसे प्रकार शोधणे यासाठी संचालकांनी या अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यकता लेख्यांचे दस्तऐवज नीट जतन करण्यासाठी योग्य व पुरेशी काळजी घेतली आहे.

(ड) संचालकांनी दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या कंपनीच्या वर्षाचे वार्षिक लेखे एक सतत कार्यरत असलेली संस्था या तत्वाच्या आधारे केले आहे. लागू असणाऱ्या सर्व कायद्यांच्या तरतूदीच्या अनुपालनाची हमी मिळावी यासाठी, संचालकांनी योग्य प्रणाली तयार केल्या आहेत आणि या प्रणाली पुरेशा हून प्रभावीरित्या कार्यरत आहे.

**८) ऋण निर्देश :**

आपले संचालक, ज्याच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले त्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त करीत आहे. यामध्ये केंद्रिय वीज मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र वीज नियामक आयोग, कर प्राधिकारी, राज्य व केंद्र शासनातील विविध स्तरावरील अधिकारी यांनी वेळोवेळी पाठिंबा दिला त्याबद्दल आभारी आहे. तसेच व्यवस्थापन हे पुरवठादार आणि उभारणी एजन्सीजचे रचनात्मक सहाय्यासाठी मन:पूर्वक आभार मानत आहे.

तसेच विविध बँका व वित्तिय संस्था यांनी कंपनीवर जो विश्वास सातत्याने दाखविला व कंपनीचे प्रकल्प वेळेवर यशस्वीपणे पूर्ण होऊन अंमलात यावेत यासाठी इतर निधी देऊन साह्य केले त्याबद्दल आपले संचालक कृतज्ञ आहेत.

संचालक मंडळ मराविमं, सुत्रधारी कं. मर्या. यांनी केलेले सहकार्य, दिलेल्या मौल्यवान पाठिंबा कंपनीस प्रत्येक क्षेत्रात मार्गदर्शन करणे याबद्दल सुत्रधारी कंपनीस धन्यवाद देत आहेत. आणि शेवटचा पण तितकाच महत्वाचा म्हणजे कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अत्यंत मौल्यवान दर्जाची सेवा दिली त्याबद्दल कंपनी तिच्या परिश्रमाची प्रशंसा करुन अभिलिखित करीत आहे.

**संचालक मंडळाच्या वतीने व त्यांच्याकरिता**
**सही/ -**
**(डॉ. संजीव कुमार)**
**(अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक)**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : १७/०१/२०२५**

## संचालकांच्या अहवालातील परिशिष्टांची सूची

| परिशिष्ट क्र. | विषय |
|---|---|
| १. | आ. वर्ष २०२३-२४ मध्ये कार्यान्वित केलेल्या इ एच व्ही उपकेंद्रांची यादी |
| २. | आ. वर्ष २०२३-२४ मध्ये कार्यान्वित केलेल्या इ एच व्ही पारेषण तारांची यादी |
| ३. | एम आर-३ सेक्रेटरीयल ऑडीट रिपोर्ट |
| ४. | वार्षिक विवरणाचा उतारा -एम जी टी-९ मध्ये |
| ५. | कंपनीच्या सामाजिक जबाबदारीचा वार्षिक अहवाल |
| ६. | सांविधिक लेखा नियंत्रक अभिप्राय व त्याला व्यवस्थापनाने दिलेली उत्तरे |
| ७. | भारताचे मा. लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय आणि त्यावर व्यवस्थापनाची उत्तरे |

## वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये कार्यान्वित केलेल्या इ एच व्ही उपकेंद्रांची यादी — परिशिष्ट - १

| (अ) महापारेषणाचे प्रकल्प | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ए) | नवीन उपकेंद्रे | | | | | |
| अनु. क्र. | उपकेंद्र व त्याची व्याप्ती | व्याप्ती | एमबीआर | एमव्हीए / एमव्हीआर | दिनांक (सीओडी) | जिल्हे |
| १ | २२०/३३ केव्ही जीआयएस उलवे नोड उपकेंद्र | २ x ५० एमव्हीए, २२०/३३ केव्ही टी /एफ | बीआर १२६/२५ दि.२३.०२.२०१८ | १०० | १२-जुलै-२३ | रायगड |
| २ | २२० केव्ही वाघिवली जीआयएस स्विचिंग उपकेंद्र | फक्त खाडी | बीआर ९८/२० दि.१६/०४/२०१५ | ० | ०१-सप्टेंबर-२३ | ठाणे |
| ३ | १३२/३३ केव्ही तीर्थपुरी उपकेंद्र | २ x २५ एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी /एफ | बीआर १४५/११ दि. २२.०१.२०२१ | ५० | ०८-जानेवारी-२४ | जलना |
| ४ | २२०/३३ केव्ही खेड शहर उपकेंद्र | २x५० एमव्हीए,२२०/३३ केव्ही टी / एफएस. | बीआर १२८/२२ दि.२१.०४.२०१८. | १०० | २२-फेब्रुवारी-२४ | पुणे |
| ५ | सध्याच्या १३२ केव्हीचे अद्ययावतीकरण पांढरकवडा उपकेंद्र २२० केव्ही पातळीवर | २x १०० एमव्हीए, २२०/ १३२ केव्ही आयसीटी | १२०/०६, दि.१४-०९-२०१७ | २०० | २७-मार्च-२४ | यवतमाळ |
| ६ | १३२/२२ केव्ही बिबवेवाडी उपकेंद्र | २ x ५० एमव्हीए, १३२/२२ केव्ही टी /एफ | बीआर १३६/२४ दि.२९.०७.२०१९ | १०० | २९-मार्च-२४ | पुणे |
| | **एकूण एमव्हीए** | | | **५५०** | | |
| बी) | **ट्रान्सफॉर्मर ऑग्युमेंटेशन (प्रकल्प)** | | | | | |
| १ | २२० केव्ही पेठ येथे ११० केव्ही पातळीची निर्मिती. | १x १०० एमव्हीए,२२०/ ११० केव्ही आयसीटी | बीआर ११७/१६ दि.१९-०६-२०१७ | १०० | ३०-मार्च-२४ | सातारा |
| | **एकूण एमव्हीए** | | | **१००** | | |
| सी) | **ट्रान्सफॉर्मर ऑग्युमेंटेशन (ओ अँड एम)** | | | | | |
| १ | २२० केव्ही कोलशेत उपकेंद्र | १ x ५० एमव्हीए,१००/ २२ केव्ही टी / एफ | बीआर १३१/५२ दि. ०२.११.२०१८ | ५० | १९-मे-२३ | ठाणे |
| २ | १३२ केव्ही सातारा (देवळाई) उपकेंद्र | १ x ५० एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | बीआर १४२/१८ दि.१०.०९.२०२० | ५० | २३-जून-२३ | सीएसएन |
| ३ | १३२ केव्ही गोंदिया उपकेंद्र | १ x ५० एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | डिआयआर/ ४५८ दि.२७.०३.२०२३ | ५० | ०१-मे-२३ | गोंदिया |
| ४ | १२० केव्ही वाशिम उपकेंद्र | १x२५ एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | सीएमडी / एमएसईटीसी एल/५४२ दि. ०५.०७.२०२१ | २५ | १८-सप्टेंबर-२३ | वाशीम |
| ५ | १३२ केव्ही रिसोड उपकेंद्र | १x२५ एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | सीएमडी / एमएसईटीसी एल /५४२ दि.०५.०७.२०२१ | २५ | २३-नोव्हेंबर-२३ | वाशीम |
| ६ | १३२ केव्ही हरसूल उपकेंद्र | १ x ५० एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | बीआर १४२/१८ दि.१०.०९.२०२० | ५० | २३-नोव्हेंबर-२३ | सीएसएन |
| ७ | ४०० केव्ही वाळुंज | १ x ५० एमव्हीए, २२०/३३ केव्ही टी / एफ | सीएमडी /८७० दि. ०४/०१/२०२१ | ५० | ३०-नोव्हेंबर-२३ | सीएसएन |
| ८ | ४०० केव्ही बाभळेश्वर उपकेंद्र | ३x१६७ एमव्हीए, ४४०/ २२०/३३ केव्ही आयसीटी | बीआर १३८/०७ दि. १८/०९/२०१९ | ५०० | २८-फेब्रुवारी-२४ | अहमदनगर |
| ९ | १३२/३३ केव्ही उमरखेड उपकेंद्र | १x२५ एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | डीआयआर (ओपी)-१०३० दि. ०२/०५/२०२२ | २५ | २९-फेब्रुवारी-२४ | यवतमाळ |
| १० | १३२ केव्ही मोरगाव अर्जुनी उपकेंद्र | १x२५ एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | १४९/०६ दि. ०२/०९/२०२१ | २५ | २६-मार्च-२४ | भंडारा |
| ११ | ११० केव्ही नेरळ उपकेंद्र | १x२५ एमव्हीए, ११०/२२ केव्ही टी / एफ | १४२/१६ दि.१०.०९.२०२० | २५ | २४-मार्च-२४ | रायगड |
| १२ | ४०० केव्ही खारघर उपकेंद्र | १ x ५० एमव्हीए, २२०/३३ केव्ही टी / एफ | बीआर १३१/५२ दि. ०२.११.२०१८ | ५० | १५-मार्च-२४ | रायगड |
| १३ | २२० केव्ही नांदेड शहर उपकेंद्र | १ x ५० एमव्हीए, २२०/२२ केव्ही टी / एफ | बीआर १३०/०७ दि.२७.०८.२०१८ | ५० | २९-मार्च-२४ | पुणे |
| १४ | १३२ केव्ही मोताळा उपकेंद्र | १x२५ एमव्हीए, १३२/३३ केव्ही टी / एफ | डीआयआर (ओपीएस)/ २२७ दि.२४.११.२०२१ | २५ | २८-मार्च-२४ | अकोला |
| १५ | १३२ केव्ही सणसवाडी उपकेंद्र | १ x ५० एमव्हीए, १३२/२२ केव्ही टी / एफ | बीआर १४२/१५ दि. १०.०९.२०२० | ५० | २२-मार्च-२४ | पुणे |
| | **एकूण एमव्हीए** | | | **१०५०** | | |

| (अ) महापारेषणचे प्रकल्प | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ए) | नवीन उपकेंद्रे | | | | | |
| अनु. क्र. | उपकेंद्र व त्याची व्याप्ती | व्याप्ती | एमबीआर | एमव्हीए / एमव्हीआर | दिनांक (सीओडी) | जिल्हे |
| डी) | ट्रान्सफॉर्मर बदलणे | | | | | |
| १ | १३२ केव्ही इंदापूर उपकेंद्र | १ X (५०-२५) एमव्हीए 132/33 के व्ही टी एफ , | १०८/१८ दि.०२.०६.१६ | २५ | ०३-ऑक्टोबर-२३ | सोलापूर |
| २ | १३२ केव्ही यावत उपकेंद्र | १ X (५०-२५) १३२/३३ के व्ही टी एफ | डिआयआर(ओपी)/२६८५ दि.२९.१२.२०१५ | २५ | २८-नोव्हेंबर-२३ | सोलापूर |
| ३ | २२० केव्ही बोईसर-२ उपकेंद्र | १ X (२००-१५०) एमव्हीए, २२०/१३२ के व्ही आय सी टी | बीआर१३९/१८ दि.१२.१२.२०१९ | ५० | ०९-फेब्रुवारी-२४ | पालघर |
| ४ | २२० केव्ही पंढरपूर उपकेंद्र | १ X (२००-१००) एमव्हीए, २२०/१३२ के व्ही आय सी टी | बीआर १३९/१७ दि.१२.१२.२०१९ | १०० | २०-मार्च-२४ | सोलापूर |
| | एकूण एमव्हीए | | | २०० | | |
| इ) | बस रिएक्टर | | | | | |
| १ | ४०० केव्ही, १२५ एमव्हीएआर बस शंट रिॲक्टर ४०० केव्ही अकोला एस/एस | ४०० के व्ही, १२५ एमव्हीएआर बस शंट रिएक्टर | बीआर ११२/२१ दि.१७.११.२०१६ | १२५ | २७-एप्रिल-२३ | अकोला |
| २ | ४०० केव्ही, १२५ एमव्हीएआर बस शंट रिॲक्टर ४०० केव्ही नांदेड (कुंभारगाव) एस.एस. | ४०० के व्ही, १२५ एमव्हीएआर बस शंट रिएक्टर | बीआर ११२/ २१ दि.१७.११.२०१६ | १२५ | १२-मे-२३ | नांदेड |
| | एकूण एमव्हीएआर | | | २५० | | |
| II) | ओ आर सी | | | | | |
| ए) | नवीन उपकेंद्रे | | | | | |
| १ | १३२ केव्ही चुडावा टीएसएस | फक्त खाडी | सी एम डी-२०१८ दि.०३.०६.२०१९ | ० | १५-जून-२३ | नांदेड |
| २ | १३२ केव्ही कुंभेफळ टीएसएस | फक्त खाडी | सी एम डी-२०१८ दि.०३.०६.२०१९ | ० | २०-जून-२३ | सीएसएन |
| ३ | १३२ केव्ही जालना टीएसएस | १x १३२ के व्ही bays | सी एम डी-२०१८ दि.०३.०६.२०१९ | ० | २४-ऑगस्ट-२३ | जलना |
| ४ | १३२ केव्ही वडगाव नीला टीएसएस | १३२ के व्ही Bays-२ nos | सी एम डी-३७८ दि.२४.०७.२०२० | ० | १०-ऑगस्ट-२३ | परभणी |
| ५ | १३२ केव्ही हिमायतनगर टीएसएस | १३२ के व्ही Bay | डिआयआर(प्रोज.)/३४ दि. ०१.०२.२१ | ० | १०-ऑगस्ट-२३ | नांदेड |
| ६ | १३२ केव्ही इगतपुरी टीएसएस | २ x १३२ के व्ही Bay | सी एम डी-१५६ दि.१२.०२.२०१८ | ० | २३-सप्टेंबर-२३ | नाशिक |
| ७ | ११० केव्ही सालगारे टीएसएस | २ x १३२ के व्ही Bay | सी एम डी-१८९४ दि. ०९.०५.२०१९ | ० | १३-मार्च-२४ | सांगली |
| ८ | १३२ केव्ही मुकुटबन टीएसएस | Only bays | सी एम डी-२४८ दि. १९.०३.२०२१ | ० | ०३-मार्च-२४ | यवतमाळ |
| | एकुण | | | ० | | |
| | उपबेरीज एम व्ही ए | | | १९०० | | |

## वि. वर्ष २०२३-२४ दरम्यान ई एच व्ही ट्रान्समिशन लाइन कार्यान्वित

परिशिष्ट - २

| (I) महापारेषणचे प्रकल्प | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | विज तारेचे नांव | एम बी आर | टाईप / प्रकार | मंडळ / परिक्षेत्र | सी के एम | सी ओ एम |
| १ | १३२ केव्ही सिंगल सर्किट पर्वती- कोथरूड भूमिगत केबल. | बी आर ११७/१४ दि. १९-०६-२०१७ | यू/जी केबल | पुणे | ३.५२५ | ३१-मे-२३ |
| २ | २२० केव्ही वणी- पांढरकवडा डी/सी लाइन (पीकेजी-१) | बी आर १२०/०६ दि. १४-०९-२०१७ | डी/सी डी/सी | अमरावती | ६५ | ३०-मे-२३ |
| ३ | रिओरिएंटेशन चे काम १३२ केव्हीचे दुसरे सर्किट सिंदेवाही-ब्रह्मपुरी एससीडीसी मार्ग. | सी एम डी-११३८ दि. २९.०९.२०१६. | एस/सी डी/सी | नागपूर | ०.१३१ | ०५-जून-२३ |
| ४ | उरण-खारघर मार्गावर २२० केव्ही एलआयएलओ ईएचव्ही केबलद्वारे उलवे नोड एसएस. | बी आर १२६/२५ दि. २३.०२.२०१८ | लीलो | वाशी | ० | १०-जुलै-२३ |
| ५ | १३२ केव्ही खर्डा-आष्टी डीसी लाइन (जीईसी-१) | बी आर ९८/०८, दि. १६-०३-२०१५ | डी/सी | सीएसएन | ९१.२ | ०७-सप्टेंबर-२३ |
| ६ | २२० केव्ही डीसी कळमेश्वर-वरुड (टप्पा १ व २) | बी आर ३४/०४ दि. ०४-१०-२००८ | डी/सी डी/सी | अमरावती | ५२.८ | ३१-ऑक्टोबर-२३ |
| ७ | यवतमाळपर्यंत २२० केव्ही देवळी-घाटोडी लिलो पॉइंट १ | बी आर ३३/०७ दि. ११-०९-२००८ | डी/सी | अमरावती | ९८.८ | ०७-ऑक्टोबर-२३ |
| ८ | १३२ केव्ही राहुरी-अहमदनगर एमआयडीसी मार्ग (आयएसएमटी लिलो पॉईंटपर्यंत)(जीईसी लाइन) | बी आर ९८/०८ दि. १६.०३.२०१५ | डी/सी | नाशिक | ५१.४ | २३-नोव्हेंबर-२३ |
| ९ | ४०० केव्ही जेजुरीपासून २२० केव्ही डीसी लाइन सध्याच्या २२० पैकी २८ क्रमांकाचे उपकेंद्र के.व्ही. जेजुरी-लोणंद सी.के.टी. | बी आर ११५/२२ दि. २०.०४.२०१७ | लीलो | पुणे | १४.४ | ३०-डिसेंबर-२३ |
| १० | १३२ केव्ही भूम-परांडा येथे लिलो १३२ केव्ही आयडीए सबस्टेशन (टॅप लाइन) | बी आर/सी-०१ २०२२-२३ दि. १४.०४.२०२२ | लीलो | सीएसएन | ०.७३६ | २९-डिसेंबर-२३ |
| ११ | १३२ केव्ही किनवटची दुसरी सर्किट स्ट्रिंग- हिमायतनगर लाइन . | बी आर | एस/सी | सीएसएन | ५०.४ | २३-डिसेंबर-२३ |
| १२ | १३२ केव्ही अंबड-घनसावंगी मार्गावर लिलो १३२ केव्ही तीर्थपुरी उपकेंद्रावर. | बी आर १४५/११ दि. २२.०१.२०२१ | लीलो | सीएसएन | १४.३०६ | ०८-जानेवारी-२४ |
| १३ | काठापूर- लोणीकंद -१ वर २२० केव्ही लिलो २२० केव्ही खेड सिटी येथे लाइन. | बी आर १२८/२२ दि. २१.०४.२०१८ | लीलो | पुणे | ११.१२ | २२-फेब्रुवारी-२४ |
| १४ | अहमदनगर एमआयडीसीला दुसरा स्त्रोत २२० केव्ही सोनेवाडी पासून सबस्टेशन सबस्टेशन गॅन्ट्री ते विद्यमान एलओसी १३ १३२ केव्ही सोनेवाडी-अहमदनगर एमआयडीसी मार्ग. | सी एम डी/३२४६ दि. ०४.११.२०१९ | एस/सी | नाशिक | ०.९६२ | ०४-फेब्रुवारी-२४ |
| १५ | ४०० केव्हीवरून २२० केव्ही डीसी लाइन कुंभारगाव (नांदेड) - कुरुंदा - पी.के.जी. अ (एलओसी १ ते ११२) | बी आर ११५/२१, दि. २०-०४-२०१७ | डी/सी डी/सी | सीएसएन | ६६.६ | २०-मार्च-२४ |
| १६ | १३२ केव्ही समुद्रल सबस्टेशनसाठी (एक सर्किट) १३२ केव्ही नारंगवाडी-ओमेरगा लाईनवर लिलो | बी आर/सी-०२/२०२२ १४-०४-२०२२ | लीलो | सीएसएन | ०.८३ | ०७-मार्च-२४ |
| १७ | २२० केव्ही डीसी कळमेश्वर-वरुड (टप्पा ४ व ५) | बी आर ३४/०४, दि. ०४-१०-२००८ | डी/सी डी/सी | अमरावती | ८४ | २६-मार्च-२४ |
| १८ | २२०/११० केव्ही पेठ उपकेंद्र ते ११० केव्ही बोरगाव एस/एस | बी आर ११७/१६ दि. १९-०६-२०१७ | एस/सी डी/सी | कराड | ९.९५ | ३०-मार्च-२४ |
| १९ | २२० केव्ही वणी पांढरकवडा डीसी लाइन टप्पा २ | बी आर १२०/०६ दि. १४-०९-२०१७ | डी/सी | अमरावती | ५१ | २७-मार्च-२४ |
| २० | १३२ केव्ही कोथरूड-फुरसुंगी मार्गावर लिलो १३२ केव्ही बिबवेवाडी उपकेंद्रासाठी | बी आर १३६/२४ दि. २९.०७.२०१९ | लीलो | पुणे | १.२ | २९-मार्च-२४ |
| २१ | २२० केव्ही उमरेड - नागभीड डीसीडीसी लाइन भाग-1 (उमरेड एसएस ते एलओसी क्रमांक ९५). | बी आर ११६/११ दि. १८-०५-२०१७ | डी/सी डी/सी | नागपूर | ५२.६८६ | २८-मार्च-२४ |
| | **एकुण सी के एम** | | | | **७२१.०५** | |
| II) | **ओ आर सी** | | | | | |
| २२ | स्टरलाइट वर १३२ केव्ही लिलो - ह्योसुंग ईएचव्ही मेसर्स आयनॉक्स एअर प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड येथे केबल लाइन. | सी एम डी/एम एस इ टी सी एल/६०२ दि. २२.०७.२०२१ | यु/जी केबल | सीएसएन | ०.८ | २६-एप्रिल-२३ |

## (अ) महापारेषणचे प्रकल्प

| अनु. क्र. | विज तारेचे नांव | एम बी आर | टाईप / प्रकार | मंडळ / परिक्षेत्र | सी के एम | सी ओ एम |
|---|---|---|---|---|---|---|
| २३ | १३२ केव्ही एससीडीसी लाइन १३२ केव्ही पूर्णा एस / सेकंद ते १३२ केव्ही चुडावा टीएसएस (शिल्लक काम) एलओसी ५४ ते टीएसएस ) | सी एम डी-२०१८ दि. ०३.०६.२०१९ | एस/सी डी/सी | सीएसएन | ०.२५ | १५-जून-२३ |
| (एम) | परिमंडळ कार्यालयीन ट्रान्स्फार्मर्स व उपकेंद्रातील काही साधने दुरुस्तीसाठी अन्य दूकानाकडे पाठवितात काही थोड्या परिमंडळात अशाप्रकारे साधने दुरुस्तीसपाठविणे व परत आणणे यातील दुरुस्तीनंतरची गुणवत्ता या संबधीची लेखी नोंदणी अहवाल जतन केलेले नाहीत. | महापारेषणच्या पारेषण संचालन व सुव्यवस्था विभागाने क्षेत्रीय कार्यालयांना निर्देश दिले आहेत की, त्यांनी दुरुस्तीची कामे करणाऱ्या संस्थांना कामाचे आदेश देतांना खालील मार्गदर्शक सुचनांचे पालण करावे :-<br>१)कामाचा आदेश दतांना दुरुस्ती करणाऱ्यांकडे किती कामांचा सद्या भार आहे हे विचारात घ्यावे आणि शक्यतो नजीकच्या संस्था ट्रान्स्फाटर्मर आय सी टीज् यांच्या दुरुस्तीचे काम निश्चित वेळेनुसार करुन देतात त्यांना प्राधान्य द्यावे.<br>२)ज्या दुरुस्तीचे काम करणाऱ्या संस्था ट्रान्स्फॉर्मर आय सी टीज् यांच्या दुरुस्तीचे काम निश्चित वेळेनुसार करुन देतात त्यांना प्राधान्य आहे.<br>३)दुरुस्ती संस्था काम देणेस मुख्यालयाची संमती घेतली पाहिजे. |
| | याशिवाय या मत्तांचे वर्गीकरण वापरात नसलेल्या मत्ता विक्रीसाठी काढलेल्या असे केलेले आहे. ही कृती भा. ले मानक १६ : पीपीई यास सुसंगत नाही. जर याचा काही परिणाम स्वायत वि.वि पत्रकांवर होणार असल्यास, त्यावर आम्हास, मत देता येत नाही. | उपकेंद्रातील उपकरणे / ट्रान्स्फॉर्मरचे सुटे भाग दुरुस्तीला देण्यापूर्वी संबधीत पी पी ई मधुन काढून घ्यावेत. त्यामुळे अशा मत्तांची घसारा आकारणी थांबविता येईल. |
| (एन) | व्यापारी येण्याची रक्कम दि. ३१ मार्च २०२४ रोजी रु. २,८६,७३०.७० लाख आहे. या व्यापारी येण्यास शिलकीचे अस्तित्व, अचूकता आणि मूल्यांकन यावर अभिप्राय देण्यास, आम्ही खालील कारणामुळे असमर्थ आहोत. | |

| | | |
|---|---|---|
| (१) | व्यापारी येण्यांची संस्था (पार्टीनुसार) विभागणी आणि त्या येण्याचा कालावधी – वय याची माहिती वितरण मधून तयार करण्यात आली. ती सदोष दिसते. स्वायत्ता वि.वि. पत्रकांची टिपा क्र. ३७ हा व्यापारी येण्याच्या कालावधी / वयासंबधी आहे. त्यात प्रकट केलेल्या रकमेच्या अचूकतेवर आम्हास भाष्य करता येत नाही. | व्यापारी येण्यांचे वय (थकीत – कालावधी) याची माहिती एक्सेल वर्कशीट मध्ये देण्यात येते. वितरणाचे काम करणाऱ्या लोकोपयोगी संस्था (डिस्ट्रीब्यूशन युटीलीटीज) यांच्या कडून येणाऱ्या रकमेचे विनियोजन प्रथम जुन्या बाकी कमी करण्यासाठी केले जाते. म्हणून थकीत येणे हे ताज्या बिजकांशी निगडीत असते. त्या प्रमाणे लेखा परिषणाच्या काळात थकबाकीचे वयानुसार विश्लेषण दिले जाते. |
| (२) | कंपनी दीर्घकाळ थकीत शिलकी यासाठी अपेक्षित पत हाती (इ सी एल) यासाठी तरतूद केलेला नाही. ही बाब भा.ले. मानक १०९ वित्तीय साधने यातील आवश्यकते नुसार नाही. | ज्यांच्याकडून व्यापारी येणी पैशात मिळतात त्या ग्राहकाचे वर्तनाचे स्वरुप विचारात घेतल्यानंतर असे दिसते त्यातील महावितराण कंपनी ही महापारेषणची सहोदर/भगिनी कंपनी आहे. व तीच सर्वात जास्त पैसे महापारेषण देते. त्यामुळे अपेक्षित पत हानीची तरतूद महापारेषणने केलेली नाही. |
| (३) | या शिवाय एक संस्था व्यापारी ठराव प्रक्रीया यामध्ये गेलेली आहे. या प्रकरणातील थकीत प्राप्तीच्या हानीची रक्कम रु. १०,२८२.९० लाख आहे. त्यासाठी तरतूद कंपनीने केली नाही | इ सी आय् – शांघाय लि. या ग्राहकाचे येणे वित्तीय विवरण पत्रात रु. १,१४१ लाख असे दिले आहे. हे येणे संशयास्पद झाले आहे. कारण या विक्रेत्याने दिवाळखोरी/नादारी ठरावाच्या प्रस्तावाची प्रक्रीया करत आहे. आणि येणे वसूल होण्याची शक्यता नाही. यासाठी तोट्यासाठी तरतूद करावी लागू शकते. मात्र इ सी आय् शांघाय लि. ची जोखीम व खर्च समायोजनाची देय शिल्लक रु. १२, ४०० लाख आहे. यासाठी योग्य मेळ केल्यावर आवश्यक समायोजने केली जातील. या कारणास्तव संशयास्पद कर्जाची राखीव तरतूद केली नाही. |
| (४) | व्यापारी येण्याच्या शिल्की संबधी स्वतंत्र्य खातरजमा मिळण्याबाबत आम्ही असमर्थ ठरले. तसेच त्या विषयी पर्यायी कार्यपद्धती आम्हाला करता आलेली नाही. यामुळे त्यांची अचुकता आणि मुल्यमापन यावर मत आम्हाला देता येत नाही. कारण या शिलकीचा मेळ व त्यांचे परिणाम याचे अधीन आहेत. | विक्रेत्यांना विनंती केली आहे की, त्यांनी त्यांच्या शिलकी कायम करुन लेखापरिक्षक यांचे कडे पाठवाव्यात. |
| (ओ) | सांविधिक देणी – यामध्ये स्त्रोतांपाशी झालेली कर कपात, भ.नि. निधी आणि व्यावसायिक कर यांचा समावेश असून त्यांची रक्कम रु. २,९२०.६० लाख आहे. त्यात जुनी दायित्वे समाविष्ट असून ती मेळ करण्याच्या अधीन आहेत. ह्या मेळ करतांना होणारी समायोजने / तडजोडी यावर आम्हास मत देता यत नाही. | वर्षानिहाय योग्य मेळ करण्याची प्रक्रीया चालू आहे. |
| (पी) | झाडे / पीके यांसाठीचे खर्च व त्यांसाठी तरतूद या गोष्टींचा समावेश अल्प मुदतीसाठीच्या तरतुदीसाठीच्या तरतुदीमध्ये होतो. ती रक्कम एकूण रु. ५,३०९.५५ लाख आहे. मात्र त्याची तपशीलवार सूची व तरतुदीचा आधार उपलब्ध नाहीत. यामुळे या तरतुदींची परिपूर्णता व अचुकता यावर आम्हास अभिप्राय देता येत नाही. याचा जर काही संभाव्य परिणाम स्वायत्त वि.वि. पत्रकांवर होणार असेल. तर त्याची खात्री देता येत नाही. | पारेषण (सं.व सु .) कक्षाने सर्व क्षेत्रीय कर्यालयांना निर्देश दिले आहेत की, त्यांनी या योजना बंद करण्यासाठी वृक्ष / पीके भरपाई साठी तरतूद करावी. (रु. १ कोटी पर्यंत) |
| (क्यू) | दीर्घ मुदतीच्या तरतुदींमध्ये रु. १२,५७३.५७ लाख रकमेची भांडवली कामे आहेत. त्याचा तपशीलवार सूची व तरतुदीचा आधार उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्याची परिपूर्णता व अचूकता यावर आम्हास मत देता येत नाही. या तुरतुदींच्या तात्रीक आधाराचा आढावा घेतांना त्यात जर काही मेळ केले गेले त्याचे स्वायत्त वि.वि. पत्रकांवरील परिणामाची खात्री देता येत नाही. | मागील काही वर्षात पूर्ण झालेल्या कामाच्या थकीत दायित्वासाठी केलेल्या जादा तरतूदी सोबत समायोजने करावे अशा आवश्यक सूचना देण्यात आल्या. |

| | | |
|---|---|---|
| (आर) | कंपनीने सुरक्षा अनामत (ठेव) रु. ३,९९१.२५ लाख जमा केले. ते तीन वर्षापेक्षा जास्त काळापासून थकीत आहे. कंपनीच्या धोरणांप्रमाणे ती संपवितांना परत केली नाही किंवा 'इतर उत्पन्न' यात स्थानांतरित परत केलेल नाही. याशिवाय, सुरक्षा अनामतीचे 'चालू नसलेल्या' या गटात केलेले वर्गीकरण योग्य नाही. काही रक्कम ३६५ दिवसांपेक्षा थकीत आहेत. यामुळे अधिनियमाची कलमे क ७३ ते ७६ यातील तरतुदीचे अनुपालन झालेले नाही. | जेव्हा संबधित योजना पूर्ण होते. तेव्हा त्यासाठी घेतलेली अनामत रक्कम कंत्राटाच्या अटी व शर्ती नुसार परत करता येते किंवा तिचे उपादन समायोजन करता येते. |
| (एस) | परिसमापनातील नुकसान आणि कंपनीत मिळालेली इसार रक्कम ठेव (EMD) यांच्या रकमा अनुक्रमे रु. ३,४४०.८५ लाख आणि रु. २११.७१ लाख या तीन वर्षापेक्षा जास्त काळापासूनच्या आहेत. (कंपनी धोरणाप्रमाणे) त्या संबंधितांना परत केल्या नाहीत किंवा इतर उत्पन्नात स्थानांतरित केलेल्या नाहीत. तसेच त्यांचे चालू व चालू नसलेल्या असे केलेले वर्गीकरण योग्य नाही. कंपनीचे धोरणाचे अनुसरण न करणे आणि त्यामुळे जर काही समायोजने उद्भवली तर त्यांचे स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांवरील होउ शकणाऱ्या परीणामांची खातरजमा करता येत नाही. | दायित्वाचे नुकसान यासाठी सक्षम प्राधिकारी यांनी दंडाचा आदेश मंजूर केला असेल तर अशा दायित्वाच्यासाठी ठेवून घेतलेल्या रकमेला योग्य प्रकारे 'उत्पन्न' असे मानले जाते तोपर्यंत दायित्व नुकसानाचा ठेवून घेतलेला पैसा याला वित्तीय पत्रकांमध्ये थकीत दायित्व असे नोंदले जाते. ई.र. ठेव – या संदर्भात जर एस आर एम मोडुल मूळ याद्वारे मिळाली असेल तर ती परत करण्यात येते. |
| (टी) | कंपनीला काही फरकांचा सामना करावा लागला. त्यात काही विक्रेत्यांचे काम कंत्राटाच्या मुदतीत खंडित करावे लागते. यामुळे किंमत वाढली. संबधित फरकांची ओळख निश्चिती करता आलेली नाही. ही समायोजने सध्या 'जोखीम व खर्च समायोजने' या लेजर मध्ये दिसतात. आता सलग्न समायोजन रकमा रोटेंशम मनी रिसीव्हेबल या सोबत आहेत. मात्र संबधितांची तपशीलवार माहिती आणि या खात्या संबंधीच्या माहितीचा कालावधी / वय उपलब्ध नाही. तसेच एकूण थकीत शिल्लक आणि ठेवून घेतलेले पैसे यांचे योग्य वाटत नाही. त्यामुळे शिल्लकीच्या असण्याबाबत आणि अचुकतेबाबत भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत. | जोखीम व खर्च समायोजन यासाठी ठेवून घेतलेली रक्कम समायोजनासाठी बाजूला ठेवली जाते. तिचे योजना पूर्ण करण्यासाठी केलेल्या जादा भांडवली खर्चाच्या सोबत समायोजन केले जाते. पूर्ण केलेल्या योजनांच्या प्रकरणी समायोजनासाठी मेळ करणे चालू आहे. |
| (यु) | कंपनीला विशिष्ट प्रकल्पाच्या भांडवली मत्ता यासाठी शासकीय अनुदाने मिळाली आहेत. त्यांची दि. ३१ मार्च २०२४ रोजीची थकीत शिल्लक रु. २७,७२६.९४ लाख होती. या अनुदानांना महसूल अशी मान्यता देणे प्रलंबित आहे. मात्र या अनुदानांची तपशीलवार माहिती उपलब्ध नाही. त्यात मत्तांचे विनिर्देश, त्यासंबधीच्या पूर्ण अटी, करावयाच्या ही माहिती उपलब्ध नाही. परिणामी या स्थगित केलेल्या रकमांची परिपूर्णता व अचूकता यावर त्यांचे स्थगित ठेवणे या करारविशिष्ट्य योजना किंवा अटी या नुसार आहेत किंवा कसे यावर अणि त्यांच्या लेख्यांची प्रक्रिया भा.ले. मानक २० – शासकीय अनुदाने व शासकीय "साह्यांचे प्रकटन" यातील तरतुदीनुसार आहे काय या विषयी आम्हास मत देता येणे शक्य झालेले नाही. जर याचे काही संभाव्य परिणाम स्वायत्त वि.वि. पत्रकावर होणार असतील, तर त्यांचे अंदाज सध्या करता येणार नाही. | महाराष्ट्र शासनाच्या धोरणाप्रमाणे ग्रामीण भागात वीज उपकेंद्र उभारणे आणि वीज तारा टाकणे यासाठी शासकीय अनुदान मिळाले. अनुदानाच्या गरजेसाठी मत्ता निद्यया यादी महाराष्ट्र शासनाला सादर केली जाते. यासाठीचे अनुदान एकत्रितपणे (लम्पसम) स्वरुपात मिळते, ते मत्तां नुसार मिळत नाही. महापारेषण मत्तांच्या खर्चाप्रमाणे त्याचे विभाजन करते. |
| (व्ही) | कंपनीने वि.वि. पत्रकांच्या टिपा क्र. ४२ मध्ये आकस्मिक दायित्वे रु. ५,८७,६२६.३६ लाख एवढी नमूद केला आहेत. याशिवाय चालू दायित्वेची रक्कम रु.६६२.२४ लाख आणि इतर चालू वित्तीय मत्ता यामध्ये वरील प्रकरणांसाठी काही भरपाई /पैसे देणे याकरिता रु. ११,९४२.०७ लाख या कारणकरिता नोंदलेले आहेत. या प्रकरणांची तपशीलवार सुची, संबधित रकमा, आणि त्याची स्थिती यांची माहिती नसल्याने आकस्मिक दायित्वांची परिपूर्णता व अचूकता यावर आम्हास मत देता येत नाही. | यासाठी आवश्यक टेम्पेट सॅप/ इ आर पी प्रणालीमध्ये विकसित केले हे. तेथे पडताळणीसाठी आवश्यक तो सर्व तपशिल मिळू शकेल. |
| (डब्ल्यु) | खालील शिलकींसंबधीचा काही तपशील आम्हाला मिळाला नाही. | |

| अनु. क्र. | तपशील | रक्कम रु. (लाखात) | शेरा | |
|---|---|---|---|---|
| १. | कर्मचारी कल्याण निधीसाठी बोर्डासोबत (मंडळासोबत) दायित्व | ६०१.४४ | सूची व माहिती उपलबध नाही. याचा प्रभाव अचुकतेवर व परिपूर्णतेवर होऊ शकतो. | दायित्वांच्या सद्यस्थितीनुसार आवश्यक मेळ करणे चालू आहे. जुन्या शोध न लावलेल्या. शिलकी पूर्नलिखीत (राईट बॅक) करण्याची प्रक्रीया मंजुरीसाठी सक्षम प्राधिकारी यांना सादर करण्यात येईल. |
| २. | किरकोळ पतदारांना देय अंतर्गत (इतर) | २,३५७.१३ | व्यापारी देणी यातील स्पष्ट नसलेली खर्ची शिल्लक. अचूकतेवर प्रभाव होईल. | दायित्वांच्या सद्यस्थितीनुसार आवश्यक मेळ करणे चालू आहे. जुन्या शोध न लावलेल्या. शिलकी पूर्नलिखीत (राईट बॅक) करण्याची प्रक्रीया मंजुरीसाठी सक्षम प्राधिकारी यांना सादर करण्यात येईल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ३. | भ.नि.नि. विश्वस्त मंडळ व अंतिम तडजोड | २,२६८.९३ | सूची व माहिती उपलबध नाही. याचा प्रभाव अचुकतेवर व परिपूर्णतेवर होऊ शकतो. | क्षेत्रीय कार्यालयातील शिलकी आणि सी.पी.एफ. सेक्शन यांच्या माहितीचा मेळ करने चालू आहे. दायित्वांच्या सद्यस्थितीच्या आधारे आवश्यक पुनर्लेखन करण्यात येईल. |
| | ४. | कंत्राटदार / पुरवठादार यांना अग्रिमे (सं. वस्तू) | ३,५२०.२६ | अग्रिमांतर्गत पत शिल्लक अस्पष्ट. अचूकतेवर प्रभाव होईल. | आवश्यक मेळ करणे चालू आहे. जुन्या शोध न लागलेल्या शिलकीचे निर्लेखन करणे (राईट ऑफ) बाबत सक्षम प्राधिकारी यांना प्रस्ताव सादर करण्यात येईल. |
| | ५. | प्रकल्पांसाठी भांडवल अग्रिम | १,१०६.७६ | सूची व माहिती उपलबध नाही. याचा प्रभाव अचुकता, परिपूर्णता आणि मुल्य यावर होऊ शकतो. | आवश्यक मेळ करणे चालू आहे. जुन्या शोध न लागलेल्या शिलकीचे निर्लेखन करणे (राईट ऑफ) बाबत सक्षम प्राधिकारी यांना प्रस्ताव सादर करण्यात येईल. |
| (एक्स) | इतर चालू वित्ती दायित्वे यात समाविष्ट केलेली कर्मचारी संबंधित देणी याची रक्कम रु. ४,०६६.६२ लाख या विषयी आम्हाला लेखापरिक्षणाचे पुरेसे आणि योग्य पुरावे मिळालेले नाहीत. त्यामुळे या शिलकीचे अस्तित्व, परिपूर्णता आणि अचूकता यावर अभिप्राय आम्हाला देता येत नाही. तसेच स्वायत्त वि. वि. पत्रकावर जर याचे काही संभाव्य परिणाम होणार असतील तर त्याचे सध्या अंदाज करता येत नाहीत. | | | | आवश्यक मेळ करणे चालू आहे. जुन्या शोध न लागलेल्या शिलकीचे निर्लेखन करणे (राईट ऑफ) बाबत सक्षम प्राधिकारी यांना प्रस्ताव सादर करण्यात येईल. |
| (वाय) | कंपनीने लेखा नोद वह्यांच्या आधारे स्थगीत कर मत्ता / दायित्वे यांची मोजणी केली आहे. अशा प्रकारे मोजणी केलेल्या सदर रकमेवर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत कारण वरील ग्राह्यतेच्या आाधारावर परिच्छेद यातील मुद्दे ३(ए) ते ३ (एक्स) यांच्या परिणामांमुळे अशा प्रकारे मोजणी केलेल्या रक्कमे मधे बदल होऊ शकेल. | | | | स्थगीत कर मत्ता / दायित्वे यांचा हिशोब नफा – तोटा पत्रकातील घटकांवर केला जातो. आयकराच्या मोजणीतील वेळेच्या फरकांमुळे ते उद्भवतात. याच्या पात्रतेसाठी / ग्राह्यतेसाठी आवश्यक असे प्रतिसाद योग्य जागी दिले आहेत. |
| ४) | आम्ही आमचे लेखा परिक्षण अधिनियमाचे कलम, १४३(१०) यात विनिर्देशित केलेल्या "लेखापरिक्षणांची मानके" यानुसार केले आहे. या मानकांनुसार असलेली आमची जबाबदारी याचे वर्णन आमच्या अहवालातील स्वायत्त वि.वि. पत्रकांचे लेखापरिक्षणासंबधी लेखापरिक्षकांची जबाबदारी य परिच्छेदात केले आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्था (आय् सी ए आय) यानी प्रसारित केलेली नीती संहिता यानुसार आणि त्यासोबत अधिनियम व त्याखालील नियमावली यातील तरतुदी यासंबंधाने असलेल्या "नैतिक आवश्यकता" यानुसार आम्ही या कंपनीपासून स्वतंत्र आहोत. तसेच आयसीआय् यांची नीतीविषयक संहिता आणि वरील आवश्यकता यांना अनुसरुन आम्ही मिळविलेले लेखापरिक्षणासंबधीचे पुरावे पुरेसे व योग्ये असून ते आमच्या ग्राह्य मतांसाठी रास्त तात्विक आधार पुरवितात. | | | | वस्तुस्थिती |
| | **स्वायत्त वित्तीय वितरण पत्रके आणि लेखापरिक्षण अहवाल या व्यतिरिक्त अन्य माहिती.** | | | | |
| ५) | इतर माहितीसाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार असते. या इतर माहितीमध्ये संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट केलेली माहिती असते त्यांत संचालक अहवालास जोडलेला परिशिष्टे, समाविष्ट असतात. मात्र त्यामध्ये स्वायत्त वि.वि.पत्रके आणि त्याचे आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाचा अहवाल यांचा अंतर्भाव नसतो. | | | | वस्तुस्थिती |
| ६) | स्वायत्त वि.वि. पत्रकांवरचे आमचे मत यामध्ये इतर माहित समाविष्ट केलेली नसते. आणि त्याबाबत आम्ही कोणतीही हमी स्वरुपाचे निष्कर्ष व्यक्त करित नाही. | | | | वस्तुस्थिती |
| ७) | स्वायत्त वि.वि. पत्रकाच्या आमच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भात इतर माहितीचे वाचन करणे, ही आमची जबाबदारी आहे. इतर माहिती स्वायत्त वि.वि. पत्रकांसोबत मोठ्या प्रमाणात विसंगत आहे काय किंवा लेखा परिक्षणासाठी आही निरिक्षलेली माहिती, ज्ञान यात कोणतेही मोठ्या प्रकारे गैरविवरणे होत आहे. किंवा कसे याचा आम्ही विचार करतो. जर आम्ही केलेल्या कामाच्या आधारे, आम्ही असा निष्कर्ष काढला इतर माहितीचे गैर विवरण होत आहे. तर तशी वस्तूस्थिती दाखविणे हे आमचे कर्तव्य असते. तर तशी संचालक मंडळाच्या अहवालातील इतर माहितीचे आणि त्याचे प्रभाव यांचे समायोजन केलेले नाही. ही बाब वरील मतांच्या आधारे यात स्पष्ट केली आहे. या कारणामुळे इतर माहितीचे गैर विवरण झाले आहे किंवा कसे याचा निष्कर्ष आम्ही काढू शकत नाही. | | | | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | **स्वायत्त वि.वि. पत्रकांसंबधी व्यवस्थापनाची जबाबदारी** | |
| ८) | अधिनियमाचे कलम १३४ (५) नुसार, कंपनीचे वित्तीय बाजूचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी स्वायत्त वि.वि. पत्रके तयार करणे याची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापन मंडळाची असते. त्यात वित्तीय कामगिरी, समभाग धारणेतील बदल व रोकडता प्रवाह यांचेही सादरीकरण अंतर्गत असते. ते भारतात सर्व साधारणे स्वीकारलेल्या लेखांकन तत्वाशी आणि अधिनियमाचे कलम १३३ यात समाविष्ट केलेल्या लेखांकन मानकांशी ते सुसंगत असले पाहिजे. कंपनीच्या मत्तांचे सरंक्षण करणे, लबाडी व इतर गैरप्रकार शोधणे व तिळा आळा घालणे, योग्य लेखा धोरणे निवडून ती लागू करणे, प्रमाणशीर व सूज्ञ असे न्याय निर्णय घेणे व अंदाज करणे आणि कंपनीच्या लेखांच्या नोंदी परिपूर्ण व निर्दोष अचूक असल्याबद्दल हमी देण्यासाठी प्रभावीरित्या कार्यरत असतो. अशा अंतर्गत वित्तीय नियत्रंण पद्धतीची रचना ती अमलात आणणे व सतत कार्यरत ठेवणे ही सुद्धा व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. | वस्तुस्थिती |
| ९) | स्वायत्त वि.वि. पत्रके तयार करताना व्यवस्थापनाच्या जबाबदाऱ्यांमध्ये पुढील बाबींचा सुद्धा समावेश होतो. त्याप्रमाणे सतत चालू राहणारी संस्था म्हणून कंपनीच्या सामर्थांचे निर्धारण करणे, त्यासाठी लागणारी माहिती प्रकट करणे, त्यासाठीचे लेखांकनातून आधार दर्शविणे. मात्र जर कंपनीच्या संचालकांचे असे मत झाले की, कंपनीचे एकतर परिसमापन केले पाहिजे व तिचे कार्य थांबविले पाहिजे कारण त्याशिवाय अन्य काही करण्याशिवाय अन्य वास्तव्य पर्याय नाही असे असले तर तसे सांगणे. | वस्तुस्थिती |
| १०) | संचालक मंडळ कंपनीच्या वित्तीय अहवालाशिवाय मांडणी करण्याच्या कार्यपद्धतीवर लक्ष ठेवण्यासही जबाबदार असते. | वस्तुस्थिती |
| | **स्वायत्त वि.वि. पत्रकांचे लेखा परिक्षणसाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी** | |
| ११) | आमची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :- स्वायत्त वि.वि. पत्रके ही कोणत्याही लबाडी किंवा चूकीमुळे होणाऱ्या मोठ्या स्वरुपातील गैर प्रकारांपासून पूर्णपणे मुक्त आहेत याचे योग्य आश्वासन हे उच्च दर्जाचे आश्वासन आहे. मात्र लेखामानकांनुसार केलेले लेखा परिक्षण हे नेहमीच अस्तित्वात असलेली मोठ गैर विवरणे शोधून काढेल याची हमी नव्हे. लबाडी किंवा चुका यातून गैर विवरणे उद्भवतात आणि त्यातील एका प्रकारे किंवा एकत्रितपणे त्याचा प्रभाव स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या वापरकर्त्यांच्या आर्थिक निर्णयावर पडण्याची शक्यता / अपेक्षित असेल तर ती महत्वाची मानली जातात. | वस्तुस्थिती |
| | आमच्या अहवालाचे जोडपत्र 'अ' या मध्ये स्वायत्त वि.वि. पत्रकांचे लेखा परिक्षण करणाऱ्या लेखापरिक्षकांच्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत. | संबधित विषयांना योग्य असा प्रतिसाद देण्यात आला आहे. |
| | **इतर कायदेशीर व नियमन विषयीच्या तरतुदीवर अहवाल** | |
| १२) | प्रधान महालेखापाल -३ महाराष्ट्र यांनी अधिनियमाचे कलम १४३ (५) या अन्वये कांही निर्देश व उपनिर्देश दिले आहेत. त्याच्या आवश्यकतेनुसार, आम्ही जोडपत्र 'ब' यात सदर निर्देश व उपनिदेश यासंबधी एक निवेदन दिलेले आहे. | संबधित विषयांवर योग्य प्रतिसाद दिला आहे. |
| १३) | अधिनियमाचे कलम १४३ मधील उपकलम (११) यातील तरतुदीनुसार केंद्र शासनाने कंपन्यांचे (लेखा परिक्षण अहवाल) आदेश २०२० (दि ऑर्डर) जारी केली. त्यातील आवश्यकतांनुसार आणि उपरोक्त आदेशातील परिछेद क्र. ३ व ४ यात विनिर्देशन केलेल्या लागू होणाऱ्या विषयांना अनुसरुन आम्ही एक निवेदन, जोडपत्र 'क' मध्ये दिले आहे. | संबधित विषयांवर योग्य प्रतिसाद दिला आहे. |
| १४) | अधिनियमाचे कलम १४३ (३) यातील आवश्यकता बाबत. आम्ही खालीलप्रमाणे अहवाल देत आहोत :- | |
| ए) | उपरोक्त "ग्राह्यमतांचा आधार" यात वर्णन केलेल्या प्रकरणांचे संभाव्य परिणाम यांचा अपवाद वगळता, आम्ही, आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार आमच्या लेखा परिक्षणाया हेतू करिता आवश्यक असलेल्या माहितीची विचारणा केली व ती सर्व मिळविली. | वस्तुस्थिती |
| बी) | उपरोक्त "ग्राह्यमतांचा आधार" यात वर्णन केलेल्या प्रकरणांचे संभाव्य परिणाम यांचा अपवाद वगळता, प्रकरणांचे संभाव्य परिणाम यांचा अपवाद वगळता, आमच्या मते, या कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असलेल्या लेखांकनाच्या सर्व नोंद वह्यांचे कंपनीने योग्य रकाणे तयार करुन त्यांचे जतन केलेले आहे. असे आम्ही या नोंदवह्यांच्या पुस्तकांचे निरिक्षण केल्यावर आम्हास आढळून आले आहे. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| सी) | या अहवालाशी संबधित असलेली वि.वि. पत्रके म्हणजे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, (सर्वकष उत्पन्नासह), समभाग धारणेतील बदलाचे पत्रक व रोकडता प्रवाह पत्रक ही या कंपनीच्या लेखा वह्यांशी सहमती दर्शवितात. | वस्तुस्थिती |
| डी) | उपरोक्त "ग्राह्य मतांचा आधार" या विभागात वर्णन केलेल्या "प्रकरणांचे संभाव्य परिणाम" यांचा अपवाद वगळता, उपनिर्विष्ट स्वायत्त वि.वि. पत्रके, ही अधिनियमातील कलम १३३ यात विनर्देशीत केलेली 'भारतीय लेखा मानके' यांची पुर्तता करतात. असे आमचे मत आहे. | वस्तुस्थिती |
| इ) | आमच्या मते, कंपनीने कायद्यातील आवश्यकते प्रमाणे आतापर्यत लेखा नोंद वह्या योग्यप्रकारे जतन केलेल्या आहेत, असे आम्ही या वह्यांच्या परिक्षणातून दिसून आले. याला अपवाद फक्त निन्मलिखीत नियम ११ (जी) नुसार द्यावयाच्या अहवालातील खालील परिच्छेद (एच) (vi) यातील मजकुराचा आहे. कलम १४३ (३) (बी)नुसार अहवाल देणे आणि नियम ११ (जी) नुसार अहवाल देणे या बाबत खालील परिच्छेद २ (१) (६) यामधे लेखे जतन करणे आणि त्या संबधीत विषयाच्या राखीव बाबी नमुद केलेल्या आहेत. त्या परिच्छेद १४ (बी) येथे आहेत. | संबधित विषयांवर योग्य प्रतिसाद दिला आहे. |
| एफ) | कंपनी व्यवहार मंत्रालयाने अधिसुचना क्र. ४६३(ई) दि. ०५ जून २०१५ रोजी काढलेल्या अधिनियमाचे कलम २ (४५) याच्या अर्थाच्या प्रमाणे कंपनी ही शासकीय संस्था आहे. त्यामुळे संचालकांच्या अपात्रते विषयीचे अधिनियमातील कलम १६४ (२) यातील तरतुदी कंपनीला लागू नाहीत. | वस्तुस्थिती |
| जी) | कंपनी स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असण्याबद्दल अन्य त्याच्या प्रवर्तनाबद्दल आमचा स्वतंत्र अहवाल जोडपत्र 'ड' यामध्ये पहावा. | संबधित विषयांवर योग्य प्रतिसाद दिला आहे. |
| एच) | कंपन्याचे (लेखापरिक्षण व लेखापरिक्षक) नियमावली २०१४ तयातील नियम ११ नुसार लेखा परिक्षकांच्या अहवालात इतर विषय समाविष्ट केले जातात. आमच्या मते तसेच अमहास दिलेली सर्वोतपदी माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आम्ही खालील बाबींचे निवेदन करतो:- | संबधित विषयांवर योग्य प्रतिसाद दिला आहे. |
| i) | उपनिर्दिष्ट परिच्छेद ३(व्ही) वगळता, या कंपनीने तिच्या स्वायत्त वि. वि. पत्रकांमध्ये प्रलंबित कायदेशिर प्रकारणचे कंपनीच्या वित्तीय स्थितीवर पडू शकणारे परिणाम प्रकट केलेले, आहेत यासाठी स्वायत्ता वि.वि. पत्रकांची टिपा क्र. ४२ पहावी. | वस्तुस्थिती |
| ii) | कंपनीने डेरिव्हेटीव्ह कॉन्ट्रॅक्ट्स सह कोणतेही दिर्घ मुदतीचे केत्राट/करार केलेले नाहीत. त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर तोटा / हानी होईल असे दिसत नाही. | वस्तुस्थिती |
| iii) | गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी यामध्ये स्थानांतरित करण्याजोगी रक्कम कंपनीकडे नाही. | वस्तुस्थिती |
| iv) | १) व्यवस्थापनाने असे निवेदन केलेले आहे की त्यांचे सर्वोतपरी उत्तम ज्ञान व विश्वास यानुसार कंपनीने अन्य कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेला कोणताही अग्रिम निधी किंवा कर्जाऊ रक्कम किंवा गुंतवणूक (कर्जाच्या पैशातून किंवा शेअर अधिमुल्य किंवा अन्य कोणत्याही स्त्रोत - यामध्ये परकीय संस्था (मध्यस्थ) समाविष्ट यासाठी दिलेले नाहीत. असे कोणतेही नोंदलेले किंवा अन्यप्रकारे सामंजस्याचा व्यवहार केलेले नाहीत. ज्यात सदर 'मध्यस्थ' कोणत्याही प्रकारे थेट किंवा अप्रत्यक्षरित्या कंपनीच्या वतीने अंतिम लाभार्थी अन्य कुणा व्यक्तीला कर्ज देणे किंवा त्यात गुंतवणूक करणे असे व्यवहार करते किंवा अंतिम लाभार्थांच्या वतीने प्रतिभूती किंवा हमी देणे, असे किंवा तत्सम व्यवहार केलेले नाही.<br>२) व्यवस्थापनाने असे निवेदन दिलेले आहे की त्यांचे सर्वोतपरी उत्तम ज्ञान व विश्वास यानुसार कंपनीस कोणतीही व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून लेखापरित्रणाच्या काळात कोणताही निधी मिळालेला नाही. यामध्ये पश्चीम संस्थाचाही समावेश आहे. या परकीय संस्था (फंडीग पार्टीज) यांचेकडून असे लेखी किंवा अन्य प्रकारे असे सामंजस्याचे व्यवहार लेखा परिक्षणाच्या या अहवालाच्या तारखे पर्यंत झालेले नाही. या व्यवहारात फंडीग पार्टीज् (अंतिम लाभार्थी) यांच्यासाठी / त्यांच्या वतीने कंपनी कोणत्याही अन्य प्रकारे ओळख पात्र असलेल्या व्यक्ती / संस्था यांना थेट किंवा अप्रत्येक्ष प्रकारे थेट किंवा अप्रत्यक्षरित्या कर्ज देणे. किंवा गुंतवणूक करणे किंवा त्यांना हमी, प्रतिभूती किंवा तत्सम व्यवहार करते. मात्र प्रत्यक्ष असे कोणतेही व्यवहार कंपनीने केलेले नाहीत. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | ३) आम्ही योग्य वाटलेल्या लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीने काम केले आहे. त्यांच्या आधारे आणि आम्हास यासंबधी व्यवस्थापनाने दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तसेचे आमचे निरिक्षणे नियम ११ (इ) चे उपखंड(१) आणि (२)यात तरतूद केल्याप्रमाणे दिलेली प्रतिवेदने यामध्ये कोणतेही मोठ्याप्रकारचे गैर विवरण झालेले नाही असा आम्हाला विश्वास आहे. | |
| v) | यावर्षी कंपनीने कोणताही लाभांश दिलेला नाही किंवा जाहीर केलेला नाही. | वस्तुस्थिती |
| vi) | आमच्या परिक्षणाच्या आधारे, आम्हास असे आढळले की, कंपनीने तिच्या लेखा नोंद वह्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी, जे अकाउटींग सॉफ्टवेअर वापरले, त्यात लेखापरिक्षणाचा पाठपुरावा करण्याची एक सुविधा-ऑडीट ट्रेल (एडीट लॉग) उपलब्ध आहे. या ऑडीट ट्रेलचा वापर संपूर्ण वर्षभरात अकाउंटीग सॉफ्टवेअर मधे नोंदलेल्या सर्व व्यवाहारांसाठी करण्यात आलेला आहे. तसेच आमच्या लेखा परिक्षणाच्या कालावधीत सदर ऑडीट ट्रेल सुविधा बिघडल्याचा एकही प्रसंग आम्हाला दिसून आलेला नाही. | वस्तुस्थिती |
| १५) | कंपनी व्यवहार मंत्रालय यांची अधिसूचना क्र. ४६३ (ई) दिनांक. ०५ जून २०१५ यातील सवलतीनुसार आणि अधिनियमनाचे कलम २ (४५) याच्या अर्थाप्रमाणे कंपनी ही एक सरकारी कंपनी आहे. त्यामुळे तिच्या अधिनियमनाचे कलम १९७ यातील व्यवस्थापकीय परिश्रमिक या विषयीच्या तरतुदी लागू नाहीत. | वस्तुस्थिती |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड च्या स्वायत्त वि. वि. पत्रकाच्या स्वतंत्र लेखा परिक्षकांनी केलेल्या लेखा परिक्षणाच्या समान तारखेच्या अहवालाचे जोडपत्र अ

| लेखा परिक्षकाच्या अहवालातील अभिप्राय | महापारेषण कंपनीचे उत्तर |
|---|---|
| **स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी** | |
| लेखा परित्रणांच्या मानकांना (एस ए) अनुसरुन, लेखा परिक्षणांचा एक भाग म्हणून आम्ही व्यवसायिक न्यायबुद्धीचा व्यावसायिक संशयवाद बाळगतो. तसेच आम्ही खालील पद्धतीने कामे सुद्धा करतो:- | |
| • स्वायत्त वि. वि. पत्रकात लबाडी किंवा चुका यामुळे मोठ्या प्रमाणात गैर विवरण होण्येचे धोके असतात आम्ही अशा धोक्यांची ओळख निश्चिती व निर्धारण करण्याकरिता त्यासाठी प्रतिसाद योग्य लेखापरिक्षण पद्धतीची रचना करुन त्यानुसार कार्य करतो. त्यातून आमच्या मत्तांना आधार देण्यासाठी पुरेशा प्रमाणात व रास्त पुरावे मिळवितो. चुकांमुळे होऊ शकणाऱ्या गैर विवरणांचे लबाडीने मोठ्या प्रमाणात गैर विवरण होण्याचा धोका अधिक असतो. कारण लबाडीमध्ये संगनमत. बनावटी, हेतुपुरस्कार माहिती वगळणे, चुकीचे निवेदन देणे किंवा अंतर्गत नियंत्रणां चे उल्लंघन करणे अशा कारवाया होऊ शकतात. | वस्तुस्थिती |
| • लेखा परिक्षणासाठी सुसंगत अशी अंतर्गत नियंत्रणे आहेत. याचे हमी मिळविण्याच्या दृष्टिने परिस्थितीनुरुप योग्य ठरतील अशा लेखा परिक्षण कार्यपद्धतीची रचना आखणे आवश्यक असते. तसेच अधिनियमाचे कलम १४३ (३)(i) यानुसार स्वायत्त वि.वि. पत्रकांमध्ये कंपनी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशा प्रमाणात योग्य जागी आहेत किंवा नाहीत आणि असल्यास त्याची प्रभावी कार्यवाही होते काय या बाबत मत व्यक्त करणे ही सुद्धा आमची जबाबदारी आहे. | संबधित विषयांवर उचित प्रतिसाद दिला आहे. |
| • व्यवस्थापनाने ठरविलेल्या लेखांकनाच्या धोरणांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, लेखांकनासाठी केलेल्या अंदाजा योग्यता ठरविणे आणि व्यवस्थापनाने केलेली संबंधित प्रकटने तपासणे. | वस्तुस्थिती |
| • कंपनी ही लेखांकनाच्या आधारे सतत चालू राहणारी व्यवसाय संस्था आहे. व्यवस्थापनाचे मत्ताला योग्य आधार असण्याचा निष्कर्ष करणे. आणि सतत चालू राहणारी व्यावसायिक संस्था म्हणून भविष्यकाळातही कार्यरत राहील यासाठी कंपनीची पात्रता असल्याबद्दल मोठा संशय निर्माण करील अशा मोठया प्रकारच्या अनिश्चितता दर्शक घटना, प्रसंग किंवा स्थिती अस्थित्वात आहे किंवा नाही याबद्दल लेखा परिक्षणातून पुरावे मिळविणे. व योग्य असा निष्कर्ष काढणे. जर आम्ही अशा निष्कर्ष काढला की मोठ्या प्रमाणात अनिश्चितता अस्तित्वात आहे, तर आम्हास आमच्या स्वायत्ता वि.वि. पत्रकाचा लेखा परिक्षणाच्या संबंधित प्रकरणांकडे लक्ष वेधावे लागते. आणि जर अशी प्रकटने अपुरी असतील तर आमच्या अभिप्रायात सुधारणा करावी लागते. आमचे निष्कर्ष आमच्या लेखा परिक्षणाच्या तारखेपर्यंत लेखा परिक्षणाच्या आधारे मिळविलेल्या पुराव्यांवर आधारीत आहेत. मात्र भविष्यात सतत चालू राहणारी संस्था म्हणून कार्यरत खंड पडेल अशा घटना किंवा स्थिती निर्माण होऊ शकते. | वस्तुस्थिती |
| • स्वायत्त वि.वि. पत्रके आणि त्या सोबतची प्रकटने यातून केलेले सर्वंकष सादरीकरण, त्याची रचना व त्यातील माहिती याचे मुल्यांकन करणे आणि स्वायत्त वि.व. पत्रके आणि त्यातील व्यवहार व घटना प्रसंग यातून रास्त दर्शन घडते किंवा कसे याचे मूल्यांकन करणे. | वस्तुस्थिती |
| आम्ही प्रशासनाची सूत्रे सांभाळणाऱ्यांशी संवाद करतो आणि आमच्या लेखापरिक्षणांची नियोजित व्याप्ती व वेळ व लेखापरिक्षणात शोधलेल्या बाबी कळवितो. यामध्ये आम्ही लेखापरिक्षणांत शोधलेल्या अंतर्गत नियंत्रणातील मोठ्या उणिवा यांचा ही समावेश असतो. | वस्तुस्थिती |
| तसेच आम्ही प्रशासकांना एक निवेदनही देतो. त्यामध्ये आम्ही गोळा केलेले नैतीक गरजांविषयीचे व स्वतंत्रेविषयीचे पुरावे असतात. तसेच आमचे स्वतंत्र व लागू होणारे संरक्षक उपाय यासह सर्व इतर संबधित विषय त्यांना कळवितो. | वस्तुस्थिती |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्ता वित्तीय विवरण पत्रकावर स्वतंत्र लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालाचे जोडपत्र - ब

(आमच्या समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर आणि नियमनांच्या आवश्यकता या प्रकरणातील परिच्छेद १२ मधे संदर्भ)

| अ. क्र. | निर्देश आणि उप-निर्देश | लेखा परिक्षकांचा अभिप्राय | व्यवस्थापनाचा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| **कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १४३ चे उपकलम (५) नुसार दिलेले निर्देश**<br>भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या निर्देशावर आमचा अहवाल / निष्कर्ष / माहिती याचे वाचन आमचा कंपनीच्या ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या सांविधिक लेखापरिक्षण अहवालाच्या सोबत वाचावा. | | | |
| १ | **या कंपनीमध्ये तिचे लेखा - विषयक सर्व व्यवहार माहिती, तंत्रज्ञान (आय् टी) मार्फत करण्याची प्रणाली आहे किंवा कसे ? जर असल्यास, आय टी प्रणाली बाहेर झालेल्या लेखा व्यवहाराचे प्रक्रीयांचे लेखांच्या एकात्रिकतेवर आणि वित्तीय स्थितीवर परिणाम झाले असल्यस ते सांगितले.** | होय, कंपनीमध्ये सॅप प्रणालीद्वारे लेखांच्या व्यवहारांचे व्यवहारांची प्रक्रीया आय टी मार्फत केली जाते.<br>आमच्या लेखापरिक्षणात आम्हाला असे दिसून आले की, नफा केंद्रांनी निर्माण केलेली बीजके (इनव्हॉयसेस) राज्य पारेषण लोकोपयोगी संस्था (एस टी यु) यांनी दिली होती आणि ती प्रणाली मध्ये सामाविष्ट करण्यात आली. याशिवाय कंपनी अनियोजित घसाऱ्यासंबंधी तसेच वयानुसार समायोजने, कर्जाच्याव्याजाची मोजणी, अनुदान स्थगिती, याचे हिशेब व्यक्तितर्फे करते. | मासिक पारेषण आकाराची नोंदणी (एमटीसी) याचीबिजकेएसटीयूद्वारे वितरणाचा परवाना धारकांना दिली जातात त्यात त्यांच्या थकबाकीचाही हिशेबअसतो.<br>ज्या मत्तांच्या कार्यान्वयानी तारीख एप्रिल २०२२ पूर्वीची आहे, त्यांचा घसारा मानवी श्रमाने करणे आवश्यक आहे.तसेक<br>रुन तो सॅप/इ आर पी प्रणालीत नोंदली जाते. काम पूर्ण झाल्याचे अहवाल (डब्ल्यू सी आर) उसीरा मिळाल्याने असेकरावेलागते.<br>मात्रकामपूर्णझाल्याचेअनुभवसॅप/इ आर पी मध्ये तयार करण्याची प्रक्रीया निर्माण केली जात आहे. त्यामुळे व्यक्तीश: घसारा मोजणी भविष्यात होणारनाही. |
| २ | **कर्जाची परतफेड करण्यात कंपनीच्या अकार्यक्षमतेमुळे कंपनीच्या कर्जदाराने सध्या अस्तित्वात असलेल्या कर्जाची काही पुनर्रचना केली आहे का किंवा ऋण / कर्जे / व्याज यांना माफ करणे / निर्लेखित केल्याची काही प्रकरणे आहेत का ? याचे प्रतिवेदन करणे. जर असतील तर, वित्तीय परिणाम नमूद करावेत. अशी प्रकरणे उचित रित्या लेखांकित केली आहेत का ?** | लेखा परिक्षणाच्या आढावा वर्षात असा कोणताही प्रसंग उद्भवला नाही. | वस्तूस्थिती |
| ३ | **केंद्र / राज्यशासन किंवा त्यांच्या संस्था कडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला निधी (अनुदान / अर्थसहाय्य) यांचे योग्य प्रकारे लेखांकित केला आहे काय ? / अटी आणि शर्तीनुसार केला नाही ? त्यात विचलन झालेल्या प्रकारणांची यादीआली.** | कंपनीला विशिष्ट प्रकल्पासाठी भांडवली मत्ताकरीता शासकीय अनुदान मिळाले. त्याची थकीत रक्कम ३१ मार्च २०२४ रोजी रु. २७,७२६.९४ लाख आहे. त्यास महसूल म्हणून मान्यता देणे राहीले आहे अशी अनुदाने आणि संबंधित मत्तांचे विनिर्देश, त्याच्या पूर्ण करावयाच्या अटी इ. तपशील आम्हास उपलब्ध केलेले नाही. याशिवाय या स्थानास मान्यता देणे हे या योजनाच्या / स्थितीशी सुसंगत नाहीत. आमच्या समान तारखेचा लेखा परिक्षण अहवाल पहावा. | शासनाच्या धोरणांनुसार वि.वर्ष २००६-०७ ते २००८-०९ या काळात राज्यातील ग्रामीण भागात वीज उपकेंद्रे उभारणी व तारा टाकणे या सत्ता शासकीय अनुदान दिले. ते मत्ता निहाय नसते. महापारेषण त्याचे मत्तांच्या खर्चानुसार विभाजन करते. |

<table>
<tr><th colspan="4">कंपनी अधिनियम २०१३ चे कलमांतर्गत उप-कलम (५) नुसार क्षेत्र-निहाय उप-निर्देश व त्यांची उत्तरे</th></tr>
<tr><td>१</td><td>वस्तूमाल सूचीत मुल्यनिहाय योग्य प्रकारे वर्गीकरण केले आहे काय? जसे -भंगार, जुनाट माल इ. :-</td><td>वस्तूमालाचे कंपनीमध्ये खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.
<table>
<tr><th>वस्तूमालाचे घसारा</th><th>३१/०३/२०२४ रोजी रक्कम (रु. लाखत)</th><th>वित्तीय विवरण पत्रकातील टिपा क्र.</th></tr>
<tr><td>पोलाद</td><td>८०१.६७</td><td rowspan="10">वित्तीय विवरण पत्रकातील टिपा क्र. १० वस्तुमाल</td></tr>
<tr><td>ट्रान्सफॉर्मर्स</td><td>२१,१२१.०१</td></tr>
<tr><td>मिटरची साधने व उपकेंद्रांतील उपकरणे</td><td>१०,८२६.६९</td></tr>
<tr><td>केबल आणि कंडक्टर्स</td><td>८,८३७.२८</td></tr>
<tr><td>सुटे भाग</td><td>१,१४०.८७</td></tr>
<tr><td>इतर</td><td>३,९७४.६२</td></tr>
<tr><td>चौकशी प्रलंबित असल्यामुळे झालेली मालाची हानी</td><td>१६२.६५</td></tr>
<tr><td>एम ए एस ए साठा</td><td>(११४.३४)</td></tr>
<tr><td>जुना माल साठा (भंगारासह)</td><td>७२०.९०</td></tr>
<tr><td>चौकशीसाठी प्रलंबित हानीची तरतुद</td><td>(१,०८९.७८)</td></tr>
</table>
वस्तूमाल सूचीतील मूल्यांकना साठी समान तारखेच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद ३ (आय)पहावा.</td><td>वस्तूस्थिती</td></tr>
<tr><td>२</td><td>कंत्राटातील अग्रीमे अंतर्गत ऋणचिंन्हांकित शिलकीसाठी यांचे पृथाकरण करावे आणि कारणासहीत अभिप्राय व वि. वि. पत्राकांवरील परिणाम द्यावेत.</td><td>आम्ही कंपनीस्तरावर कंत्राटातील अग्रिमे यांच्या शिलकीचे सर्वकष पणे पडताळणी केली. आणि आम्हास आढळलेली, ३१ मार्च २०२४ पावेतो कोणत्याही ऋणचिन्हांकित शिलकी नव्हत्या. समान तारखेच्या अहवालातील परिच्छेद ३ (डब्ल्यु) पहावा.</td><td>वस्तूस्थिती</td></tr>
<tr><td>३</td><td>लेखा परिक्षण अहवालात नमूद नफा / तोटा हा कंपनी नफा/तोटा पत्रकांप्रमाणे आहे किंवा कसे?</td><td>होय, मात्र लेखा परिक्षकांच्या अहवालातील परिच्छेद ३ या मधील गाह्य मतांचा आधार यात म्हटल्याप्रमाणे जर काही परिणाम होणार असेल तर त्याचा विचार करण्यात यावा.</td><td>वस्तूस्थिती</td></tr>
<tr><td>४</td><td>वीज बाहेर काढण्याची प्रणाली ही वीज निर्मिती केंद्रातील उपलब्ध विजेशी सुसंगत आहे किंवा कसे? जर नसेल तर निर्मिती कंपनीने जर तोट्यासंबंधी काही दावा केला तर त्यावर अभिप्राय द्यावा.</td><td>आम्ही, या खंडानुसार (क्लॉज) मागितलेल्या माहितीबाबत तांत्रिक पडताळणी केलेली नाही. आम्हाला व्यवस्थापनाने दिलेली माहिती स्पष्टीकरणे आणि निवेदने यांच्या आधारे, कंपनीने पारेषणाचे वीजजाळे खालील तक्त्यात दशविलेले आहे.
<table>
<tr><th>व्होल्टेज लेव्हल</th><th>इएचव्ही उपकेंद्राची संख्या</th><th>ट्रान्सफॉर्मर्सची क्षमता (एमव्हीए)</th><th>इएचव्ही तारांची लांबी (सीकेटी के एम)</th><th>रिॲक्टीव्ह पॉवर कंपेनसेशन (एमव्हीएआर)</th></tr>
<tr><td>७६५ के व्ही</td><td>१</td><td>३,०००</td><td>०</td><td>७२०</td></tr>
<tr><td>५००केव्ही एचव्हीडीसी</td><td>२</td><td>३,५८२</td><td>१,५०४</td><td>०</td></tr>
<tr><td>४००के व्ही</td><td>३३</td><td>३४,०४८</td><td>८,४६४</td><td>३,७४०</td></tr>
<tr><td>२२०के व्ही</td><td>२५४</td><td>६०,८४०</td><td>१९,८८२</td><td>२५</td></tr>
<tr><td>१३२ के व्ही</td><td>३६५</td><td>३१,५३०</td><td>१८,५६९</td><td>३,३००</td></tr>
<tr><td>११० के व्ही</td><td>४१</td><td>२,६०५</td><td>१,७९८</td><td>१३०</td></tr>
<tr><td>१०० के व्ही</td><td>३९</td><td>२,८२३</td><td>७०६</td><td>०</td></tr>
<tr><td>६६ के व्ही</td><td>७</td><td>१७०</td><td>५९५</td><td>०</td></tr>
<tr><td>३३/२२/११ के व्ही</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>२,५९८</td></tr>
</table></td><td>वस्तूस्थिती</td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०१५ पूर्वी कार्यान्वित झालेल्या कॅपेसिटर बँक्स | | | | २,२७१ |
| **एकूण** | **७४२** | **१,३८,५९८** | **५१,५१८** | **१२,७८४** |

कंपनीच्या व्यवस्थापनाने दिलेल्या जादा माहितीनुसार पारेषण प्रणालीची विद्यमान उपलब्धता व हानी म.वि.नि आयोगाच्या मापदंडाच्या तुलनेत खालील प्रमाणे आहेत .

**एच. व्ही.ए. सी. प्रणाली (म. वि. नि. आयोग मानक ९८ टक्के)**

| वर्ष | २०२३-२४ | २०२२-२०२३ |
|---|---|---|
| उपलब्धता | ९९.६९ टक्के | ९९.६५ टक्के |

**एच व्ही डी सी प्रणाली (म. वि. नि. आयोग मानक ९५ टक्के)**

| वर्ष | २०२३-२४ | २०२२-२०२३ |
|---|---|---|
| उपलब्धता | ९५.२९ टक्के | ** ९५.३४ टक्के |

५ **या वर्षी विहित केलेल्या प्रमाणकांपेक्षा किती जास्त वीज हानी यावर्षा झाली ? आणि लेखापुस्तकात त्यांची योग्य प्रकारे नोंद केली आहे किंवा कसे ? :-**

या कलमाखाली आवश्यक असलेल्या माहितीची आम्ही तांत्रिक पडताळणी केलेली नाही. व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या माहिती, स्पष्टीकरण आणि वर्णनाच्या आधारे या संदर्भातील माहिती खाली सादर केली आहे.

म. वि. नि. आयोगाने पारेषण हानीसाठी निश्चित केलेले मानक ४.८५ टक्के असे आहे. महापारेषण कंपनीने वि. वर्ष २०२३-२४ मधील पारेषण हानीची मोजणी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) यांनी ती खालील तक्त्यात दिली आहे.

| इंनट्रास्टेट ट्रान्समिशन सिस्टम (एसटीएस) मध्ये वित्तीय वर्ष २०२३-२४ मधील ग्रीड लॉस वीज जाळ्यातील हानी | एनर्जी इनपूट इंनट्रास्टेट ट्रान्समिशन सिस्टम | एनर्जी आउटपूट इंनट्रास्टेट ट्रान्समिशन सिस्टम | पारेषण हानी |
|---|---|---|---|
| **महिना** | **दशलक्ष युनिट्स मध्ये** | **दशलक्ष युनिट्स मध्ये** | **टक्केवारी मध्ये** |
| एप्रिल-२३ | १७०३५.६४ | १६४०३.६८ | ३.७१% |
| मे-२३ | १७७३२.०८ | १७१०१.५२ | ३.५६% |
| जून-२३ | १७१०३.५७ | १६५१९.३ | ३.४२% |
| जुलै-२३ | १४७५२.३१ | १४२७३.८९ | ३.२४% |
| ऑगस्ट-२३ | १६१०५.७ | १५५८७.५१ | ३.२२% |
| सप्टेंबर-२३ | १५४०९.६२ | १४९०३.८९ | ३.२८% |
| ऑक्टोबर-२३ | १७६२५.०७ | १७००२.९६ | ३.५३% |
| नोव्हेंबर-२३ | १६२६१.७३ | १५७४५.६ | ३.१७% |
| डिसेंबर-२३ | १५६४३.९८ | १५१८४.५९ | २.९४% |
| जानेवारी-२४ | १६५१२.९२ | १६०४३.२८ | २.८४% |
| फेब्रुवारी-२०२४ | १६२०९.९५ | १५७१२.५८ | ३.०७% |
| मार्च-२०२४ | १७९२८.६२ | १७३५२.५३ | ३.२१% |
| एकूण | १९८३२१.१९ | १९१८३१.३३ | ३.२७% |

या तक्त्यातील आकडेवारीचे अवलोकन केल्यानंतर असे स्पष्ट दिसते की, महापारेषणाची वर्षभरात झालेली वीज हानी ही फक्त ३.२७ टक्के आहे आणि ती म. वि. नि. आयोगाने निश्चित केलेल मानक (Benchmark) यापेक्षा खूपच कमी आहे. दुसऱ्या शब्दात किंवा लेख्यांच्या परिभाषेत सांगावयाचे झाल्यास ही अल्प हानी ‘सामान्य हानी’आहे आणि त्यासाठी लेख्यांवह्यामध्ये वेगळी लेखा नोंद करणे आवश्यकता नाही.

६ **इतर संस्थाच्या वतीने उभारलेल्या आणि पूर्ण केलेल्या मत्ता किंवा त्यांच्याकडे सूपूर्द केलेल्या मत्ता यांचा वित्तीय विवरण पत्रात योग्य प्रकारे लेखानोंद केली आहे किंवा कसे?**

व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या माहिती, स्पष्टीकरण आणि वर्णनाच्या आधारे या संदर्भातील माहिती खाली सादर केली आहे.

आमच्या लेखापरीक्षणादरम्यान आम्हाला दिलेल्या माहितीनुसार,

कंपनीने तिचे महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रीय सेवांचे प्रवर्तन विविध सात (७) परिमंडळात केले आहे विजेचे पारेषण करणे हे कंपनीचे महत्वाचे कार्य आहे. याशिवाय कंपनी इतर संस्थांसाठी सुस्पष्ट आदेशाच्या तत्वावरकाही कामे करुन देते जसे छोटी उपकेंद्रे, मनोरे, प्रकल्प इ. उभारुन देणे. कंपनीच्या अशा कामांना ओ आर सी वर्क म्हणून ओळखले जाते. अशा कामांसाठी कंपनी त्यासाठी केलेल्या खर्चावर जादा पर्यवेक्षण शुल्क आकारते त्याला कंपनीचे उत्पन्न म्हणून मान्याता देण्यात येते.

कंपनीने दिलेल्या माहिती नुसार कंपनीच्या वेगवेगळया परिमंडळातर्फे करण्यात आलेल्या ओ आर सी वर्क या कामाची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे .

| अनु. क्र. | परिमंडळ | ०१/०४/२३ रोजीचे ओआरसी वर्क संख्या | या वर्षात ओ आर सी कामात पडलेले भर संख्या | या वर्षात पूर्ण केलेली ओ आर सी कामे संख्या | ३१/०३/२०२४ रोजी शिल्लक राहिलेली ओ आर सी कामे संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | १६ | ० | १० | ६ |
| २. | औरंगाबाद | १२ | ७ | ५ | १४ |
| ३. | कराड | ७ | २ | ४ | ५ |
| ४. | नागपूर | २४ | १८ | २ | ४० |
| ५. | नाशिक | १५ | ६ | २ | १९ |
| ६. | पुणे | १२३ | २३ | ७ | १३९ |
| ७. | वाशी | ७० | ८ | ३ | ७५ |
| | **एकूण** | २६७ | ६४ | ३३ | २९८ |

वस्तूस्थिती

या वर्षी अशा संस्थांकडून घेतलेल्या अनामत रकमांची शिल्लक रु. १,५९,९८७.७१ (लाख) (मागील वर्षी रु. १,२४,९८८.८५ होती). या पैकी रु. १४,९९९.५१ एवढ्या अनामत रकमेचा मेळ झालेला नाही आणि त्याविषयीची माहिती कंपनीकडे नाही. तसेच या मत्तांची अंतिम मालकी कंपनी कडेच असते. संस्थांकडून जमा केलेली अनामत रकमेचे समायोजन उभारलेल्या मत्तांसोबत केले जाते. आणि मत्तांच्या वहीत (मस्टरमध्ये) ओळखीच्या हेतुसाठी नाममात्र मूल्य रुपया एक (रु. १/-) असे ठेवले जाते.

कंपनी अपारंपरिक स्रोतांकडून उर्जा निर्मितीच्या प्रकरणात वीजेला बाहेर काढण्याचे प्रकल्पसुद्धा राबवते. लेखांकन धोरण २.१९ (ब) नुसार अशा वीज बाहेर काढण्याच्या प्रकल्पाचा ५० टक्के खर्च कंपनी करते आणि उर्वरित ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती मेडा संबंधित खाजगी विकासकाला देते. अशा प्रकरणांमध्ये सुद्धा इतर एजन्सीजना मत्तांचे हस्तांतरण केले जात नाही.

मेडा प्रकल्पांची अंमलबजावणी दोन प्रकारे केली जाते - १) जिथे विक्रेता प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आधीच संपूर्ण रक्कम कंपनीला ओआरसी ठेवी म्हणून देतो आणि कंपनी प्रकल्प पार पाडल्यानंतर विक्रेत्याला ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती करते आणि तितक्या मूल्याची मत्ता निर्माण करते आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मेडा विक्रेत्याला देते. २) जिथे विक्रेता स्वत: प्रकल्पाची अंमलबजावणी करतो आणि त्यानंतर कंपनी सदर विक्रेत्याला ५० टक्के रक्कम प्रदान करते आणि मेडा उर्वरित ५०टक्के रकमेची विक्रेत्याला प्रतिपूर्ती करते.

| | | | |
|---|---|---|---|
| | | कंपनीने विक्रेता / खाजगी विकासकाला द्यायची रक्कम जीएल कोड १३१०१० खाली लेखांकित केली जाते. असे दिसून आले आहे की दोन्ही जीएल कोडचा (१२३१०० आणि १३१०१०) वर्षाअखेरीस पुनर्मेळ घेणे अद्याप बाकी आहे. मेडा अनुदानाखाली येणाऱ्या अशा प्रकल्पांचे संपूर्ण तपशील कंपनीकडे तात्काळ उपलब्ध नाहीत. परिणामी अशा मेडा प्रकल्पाचे मत्ता भांडवलीकरण हे अचूक आहे किंवा नाही यावर भाष्य केले जाऊ शकत नाही. | |
| ७ | **कंपनी सामाजिक जबाबदारी कार्यांच्या प्रतिवेदन आणि प्रगटनांच्या संदर्भात कंपनी कायद्याच्या तरतुदी अनुसरण्यात आल्या होत्या का हे तपासा** | होय, यासंबंधीची प्रकटने वि.वि. पत्रकांची टिपा क्र. ४९ यामध्ये योग्य प्रकारे केलेली आहेत. | वस्तुस्थिती |
| ८ | **पीएसयू कार्यरत असो किंवा निष्क्रिय.** | होय, पीएसयू काम करत आहे | |
| ९ | **मागील वर्षाच्या महालेखापाल निरिक्षण अहवालातील काही मुद्दे जे या अहवालाच्या ताळेबंद तारखेस शिल्लक आहेत.** | या संदर्भात सदर अहवालाचे परिशिष्ट २ (ए) (बी) आणि (सी) पहावे | या विषयीची योग्य उत्तरे, प्रतिसाद जोडपत्रात देण्यात आलेले आहेत. |
| १० | **इतर विषय** | १) कंपनीला जोखीम नियंत्रण तालिका (रिस्क कंट्रोल मेट्रीक्स) महत्वाच्या क्षेत्रातील धोरणे आणि कार्यपद्धती तयार करावयाच्या आहेत. तसेच विद्यमान रिस्क कंट्रोल मेट्रीक्स अद्यावत करावा लागेल. | महापारेषणने अंतर्गत नियंत्रणाची कार्यपद्धती विकसीत करणे / विद्यमान पद्धती अद्यावत करणे यासाठी एक तज्ञ व्यावसायिकांची नियुक्ती करण्यासाठी कामास प्रारंभ केला आहे. त्यातून कंपनीच्या आकारमानाला व तिच्या व्यवसायाला अनुरुप नियंत्रण प्रक्रीया दर्शविली जाईल. |
| | | २) अंतर्गत लेखापरिक्षणाची व्याप्ती आणि त्यासाठी समावेशन वाढविणे आवश्यक आहे. | अंतर्गत लेखा परिक्षक यांच्या व्याप्तीची पूनर्रचना करण्यात येत आहे. त्यामुळे आत्तापर्यंत त्यांच्या व्याप्तीमध्ये न आलेले विषयावर निर्णय करता येईल. |
| | | ३) कंपनीने गुणवत्ता निराकरण करण्यासाठी सकारात्मक कृती करावी. | जुन्या शिलकीचा निपटारा करणे बाबत धोरण आखणी तयार करण्याचे काम चालू आहे. सक्षम प्राधिकारी त्याबाबत आणि इतर बाबीवर निर्णय करतील |
| | | ४) परिमंडळे आणि मुख्यालय यातील समन्वय अधिक प्रमाणात वाढला पाहिजे. | लेखा परिक्षणे दिलेल्या वेळापत्रका नुसार पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली स्पष्टीकरणे देण्यासाठी परिमंडळ स्तरावर दर सहामाही (अर्ध वार्षिक) बैठकांचे आयोजन करण्यात येईल. |

## परिशिष्ट - १

### व्यवस्थापनाचा प्रतिसाद

विक्रेत्याच्या (व्हेंडर्स) खात्यातील प्रतिकूल बाबी यात सुधारणा करण्यासाठी योग्य लेखा पध्दतीत धरुन कार्य करावे, यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

| व्हेंडर्स कोड | ३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक | व्हेंडर्स कोड | ३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक | व्हेंडर्स कोड | ३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| ४०००००१२६१ | −९,८७,४७,२४६.६१ | ४०००००२८५७ | −१५,४५,२५९.८४ | ४००००००२९४ | −३१,२६५.०० |
| ४००००१२३१७ | −२,४३,५६,५०९.०१ | ४०००००७८७६ | −१५,४०,६४१.०० | ४०००००२७७५ | −३०,५९०.०० |
| ४००००००११२ | −१,९२,५०,५०७.३१ | ४०००००२९५२ | −१०,३५,११०.०० | ४०००००४५०४ | −२९,१३७.०० |
| ४००००००३९९ | −१,८७,७७,४१५.०० | ४००००००१४० | −९,७४,४००.०० | ४००००००३३० | −२२,५०३.०७ |
| ४०००००४५११ | −१,००,७३,६१४.०० | ४०००००००८८ | −७,९५,४१३.९७ | ४०००००५३१६ | −१८,२००.०० |
| ४०००००१२६० | −६७,७७,४८९.३६ | ४०००००२४४६ | −४,०८,०००.०० | ४००००००७११ | −१७,७८७.९७ |
| ४०००००००११ | −६२,३४,९८१.०० | ४०००००००४३ | −३,९१,८१७.०० | ४०००००२८५१ | −१६,६८४.०० |
| ४०००००१८९५ | −५९,१५,९८०.०० | ४००००००२३४ | −३,६७,१६५.३५ | ४०००००२८४९ | −१६,३००.७० |
| ४०००००००५२ | −५५,७१,०८८.०० | ४०००००२३९० | −३,३३,१२५.०० | ४०००००९६५१ | −१४,६०७.०० |
| ४०००००१०६७ | −५४,९८,४४८.२० | ४०००००१२५९ | −३,०५,७५०.०० | ४००००१०११७ | −१४,५६८.०० |
| ४०००००२४८७ | −३७,६५,८९१.९१ | ४०००००१०८० | −२,९७,५६७.०० | ४००००१४८१४ | −१४,५००.१९ |
| ४०००००७५९९ | −३१,४१,५२४.२५ | ४०००००९२०९ | −२,६२,२००.०० | ४००००००७२७ | −१३,५०५.०० |
| ४००००००३९१ | −२८,३१,१०८.८४ | ४०००००१०४२ | −२,३२,२७०.०० | ४०००००२७८२ | −१२,५४३.०० |
| ४००००००६६७ | −२५,२८,००३.७६ | ४००००००००१ | −२,०४,७४७.०० | ४०००००७४२९ | −११,१००.०० |
| ४००००००४४१ | −२४,९६,७२५.२२ | ४०००००३१७३ | −१,९५,१४६.०० | ४०००००७५९६ | −१०,२५६.०० |
| ४०००००९७७५ | −२४,७७,६९१.८९ | ४००००१४१७१ | −१,७०,२३७.३७ | ४००००००२७९ | −८,५६५.२० |
| ४००००००१५४ | −२०,५९,२२४.०० | ४०००००४०२२ | −१,०६,८३३.८२ | ४०००००१७५५ | −७,९८१.०० |
| ४०००००००३१ | −१९,८५,८४०.०० | ७००००००४८१ | −४७,६१५.६३ | ४००००००३०५ | −६,४२५.०० |
| ४०००००७८६४ | −१८,९७,०४२.१३ | ४०००००५३४६ | −४५,२१९.०० | ४०००००८५८७ | −६,०००.०० |
| ४००००००२७६ | −१७,०१,१५८.०० | ४०००००२६६९ | −३४,९२६.०० | ४०००००१७७१ | −५,८००.०० |
| ४००००००२९८ | −१,४२५.०० | ४००००१००६२ | −२७३ | ४०००००६८९८ | −५,८००.०० |
| ४०००००५८६८ | −१,०२७.०० | ४००००१६३१३ | −१६० | ४०००००५६०२ | −३,९७१.०० |
| ४०००००७७६० | −८०८.८ | ४०००००७०१४ | −१५१.६८ | ४०००००८१३२ | −२,६७६.०० |
| ४०००००१५२२ | −५१४.४२ | ४०००००२६३३ | −१५०.७१ | ४००००१५७६८ | −२,१८४.२७ |
| ४००००१७०२८ | −४३१.०४ | ४००००१६१४१ | −११३.७६ | ४०००००६०७२ | −२,१०७.०० |
| ४०००००६८८४ | −३१३.२४ | ४०००००५३१७ | −१०५ | ४००००००८२९ | −१,६००.२५ |
| ४००००११४५० | −१०५ | ४०००००५७९७ | −१०५ | ४००००००२९४ | −३१,२६५.०० |
| ४०००००१२६१ | −९,८७,४७,२४६.६१ | ४०००००२८५७ | −१५,४५,२५९.८४ | ४०००००२७७५ | −३०,५९०.०० |
| ४००००१२३१७ | −२,४३,५६,५०९.०१ | ४०००००७८७६ | −१५,४०,६४१.०० | ४०००००४५०४ | −२९,१३७.०० |
| ४००००००११२ | −१,९२,५०,५०७.३१ | ४०००००२९५२ | −१०,३५,११०.०० | ४००००००३३० | −२२,५०३.०७ |
| ४००००००३९९ | −१,८७,७७,४१५.०० | ४००००००१४० | −९,७४,४००.०० | ४०००००५३१६ | −१८,२००.०० |
| ४०००००४५११ | −१,००,७३,६१४.०० | ४०००००००८८ | −७,९५,४१३.९७ | ४००००००७११ | −१७,७८७.९७ |
| ४०००००१२६० | −६७,७७,४८९.३६ | ४०००००२४४६ | −४,०८,०००.०० | ४०००००२८५१ | −१६,६८४.०० |
| ४०००००००११ | −६२,३४,९८१.०० | ४०००००००४३ | −३,९१,८१७.०० | ४०००००२८४९ | −१६,३००.७० |
| ४०००००१८९५ | −५९,१५,९८०.०० | ४००००००२३४ | −३,६७,१६५.३५ | ४०००००९६५१ | −१४,६०७.०० |
| ४०००००००५२ | −५५,७१,०८८.०० | ४०००००२३९० | −३,३३,१२५.०० | ४००००१०११७ | −१४,५६८.०० |
| ४०००००१०६७ | −५४,९८,४४८.२० | ४०००००१२५९ | −३,०५,७५०.०० | ४००००१४८१४ | −१४,५००.१९ |
| ४०००००२४८७ | −३७,६५,८९१.९१ | ४०००००१०८० | −२,९७,५६७.०० | ४००००००७२७ | −१३,५०५.०० |
| ४०००००७५९९ | −३१,४१,५२४.२५ | ४०००००९२०९ | −२,६२,२००.०० | ४०००००२७८२ | −१२,५४३.०० |
| ४००००००३९१ | −२८,३१,१०८.८४ | ४०००००१०४२ | −२,३२,२७०.०० | | |

## परिशिष्ट २(अ), (बी) आणि (सी)

## परिशिष्ट २(अ) - भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या वि. वर्ष २०२१-२२ च्या निरिक्षण अहवालात समाविष्ट आणि ३१ मार्च २०२४ पर्यंत खुले राहिलेले काही विषय :

| अनु क्र. | महालेखापालांचे भाष्य | महापारेषणचे उत्तर | लेखापरीक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| अ | **नफ्या तोट्या संबंधी अभिप्राय** | | |
| | **नाफा आणि तोटा विवरणपत्र** | | |
| | **महसूल** | | |
| | **प्रवर्तनातील महसूल (टिप्पणी २१) : रु.४,८६३.८० कोटी** | | |
| | **अतिरिक्त पारेषण व नियमन आकार रु. ११२.१२ कोटी** | | |
| १ | यामध्ये म.रा. वितरण कंपनी लि. (एम एस इ डी सी एल – महावितरण) कडून नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीतील जादा पारेषण आकाराचे ₹ ५५.३५ कोटी येणे समाविष्ट आहे.<br>याचा परिणाम ₹ ५५.३५ कोटींची एकूण सर्वंकष उत्पन्नाची अत्युक्ती आणि तितक्याच रक्कमेची प्रारंभिक राखून ठेवलेल्या मिळकतीची न्यूनोक्ती होण्यात झाला आहे. | वि. वर्ष २०२० -२१ साठी जादा पारेषण आकार यासाठी वि. वर्ष २०२१-२२ मध्ये उपलब्ध अशी नोंद केली होती.<br>वि. वर्ष २०२२-२३ मध्ये व्यवहाराचा प्रभाव नाही. | हा विषय लेखापरिक्षण वर्षाशी संबंधित नाही. |
| | **परिव्यय** | | |
| | **कर्मचारी लाभ खर्च (टिपा २४) रु. १,१६४.२६ कोटी** | | |
| | **कर्मचारी कल्याण खर्च रु. ४९.५५ कोटी** | | |
| २) अ | उपरोक्त बाबीत सन २०२१-२२ मध्ये मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांकडून कोविड साथरोगात मृत झालेल्या कुटुंबियांकडून सानुग्रह अनुदान आणि गट विमा योजनेसाठीच्या प्राप्त ₹ ४.६० कोटींच्या दाव्यांचा समावेश नाही. | वि. वर्ष २०२०-२१ मध्ये कोवीड मृत्यू कारणास्तव दावा याची परत फेड वि. वर्ष २०२१-२२ साठी खर्च अशी केली. वि. वर्ष २०२२-२३ मध्ये त्याचा परिणाम झालेला नाही | हा विषय लेखापरिक्षण वर्षाशी संबंधित नाही. |
| २) ब | उपरोक्त बाबीत मार्च २०२२ मध्ये कंपनीच्या २५० कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय आरोग्य तपासणीसाठी झालेल्या खर्चापोटीच्या ₹ ०.०९ कोटी रक्कमेचाही समावेश नाही.<br>याचा परिणाम एकूण सर्वंकष उत्पन्नात ₹ ४.६९ कोटींची अत्युक्ती आणि चालू दायित्वाखाली तरतुदीत (टिप्पणी २०) तितक्याच रक्कमेची न्यूनोक्ती होण्यात झाला. | वि. वर्ष २०२०-२१ मध्ये आरोग्य तपासणी याची पेमेंट वि. वर्ष २०२१-२२ साठी खर्च अशी केली. वि. वर्ष २०२२-२३ मध्ये त्याचा परिणाम झालेला नाही | हा विषय लेखापरिक्षण वर्षाशी संबंधित नाही. |
| | **इतर खर्च (टिपा २६) रु.४०३.१५ कोटी** | | |
| | **दर व कर – रु. १६.७२ कोटी** | | |
| ३ | यात सन २००९-२०१० ते २०२०-२१ या कालावधीकरिता मालमत्ता करापोटीची ₹ ०.९९ कोटींची रक्कम समाविष्ट आहे. आधीच्या वर्षांसाठीच्या मालमत्ता कराच्या लेखांकनाचा परिणाम एकूण सर्वंकष उत्पन्नात ₹ ०.९९ कोटींची न्यूनोक्ती आणि प्रारंभिक राखून ठेवलेल्या उत्पन्नात तितक्याच रक्कमेची अत्युक्ती होण्यात झाला. | वि. वर्ष २०२० -२१ पूर्वीचा मालमत्ता कर वि. वर्ष २०२१-२२ चा खर्च म्हणून नोंदला<br>वि.वर्ष २०२२-२३ मध्ये व्यवहाराचा परिणाम नव्हता. | हा विषय लेखापरिक्षण वर्षाशी संबंधित नाही. |
| ब) | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय** | | |
| | **ताळेबंद** | | |
| | **मत्ता** | | |
| | **चालू नसलेल्या मत्ता** | | |
| | **मालमत्ता, कारखाने व साधने (टिपा क्र. ४.१) रु. १५,८१२.०२ कोटी** | | |
| १ | कंपनीने ₹ ४.११ कोटी मूल्यांच्या मत्ता भांडवलीकृत केल्या नाहीत. टिप २.६ मध्ये प्रगट केलेल्या लेखांकन धोरणांनुसार कणकवली आणि कुडाळ येथे प्रत्येकी एक एण्ड बे सह १३२ केव्ही एससीडीसी कणकवली – कुडाळ लाईनच्या बांधकामाच्या संदर्भातील संख्या फरकाच्या खर्चासाठीचा हा दावा आहे. सदर बाब २९ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या १५२ व्या संचालक मंडळ बैठकीत प्रस्तावित व त्यावर चर्चा करण्यात आली आणि | सदर आदेश मेसर्स के पी टी एल यांना रु. ९७२५६०६३.४८ साठी दिला होता. पहावे -कार्य आदेश वक्रमांक एम एस इ टी सी एल / सी ओ / सी इ / टी आर. पी आर ओ | हा विषय जैसे थे स्थितीत आहे. आम्ही या प्रकरणी, आमच्या वि. वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखापरिक्षणाच्या वेळी विचारणा केली आणि व्यवस्थापनाचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि.०४/०८/२०२२ रोजी झालेल्या १५६व्या संचालक मंडळ बैठकीत मान्य करण्यात आली. (कंपनीच्या वार्षिक लेख्यांच्या मान्यतेच्या आधी)<br>याचा परिणाम मालमत्ता, कारखाना आणि उपकरण (टिप ४.१) या खाली ₹ ४.११ कोटींची अत्युक्ती आणि चालू दायित्वाखाली व्यापार प्राप्य (टिप १८.२) याची तितक्याच रकमेची न्यूनोक्ती होण्यात झाला. | जे. इ पी सी / एल एल-२ ए / १६९० दि. २७ / ०८ / २००९ येथे नमूद करण्यात येते की, अंतरिम संखेतील बदल याला २७.५४ टक्के या प्रमाणे मंजुरी देण्यात आली होती, त्यनुसार रककम रु. २६७८७०९४/- होती. पहावे - सी ओ मंजुरी एम एस इ टी सी एल / सी इ / सी ओ / पी टी / टी के सी आय आय / कणकवली - कुडाळ / नं. ८५६४ दि. ०१ / ०८ / २०१७ याची देयके, आय क्यू व्ही रककमे पर्यत नोंदण्यात आली. योजना दि. ०८ / ०३ / २०२२ रोजी कार्यान्वित झाली. येथे नमूद करण्यात येते की, भांडवली करणाच्या संखेत आय क्यू व्ही रु. ४.११ कोटी (यामधे आय क्यू व्ही चे रु. २.६७ कोटी समाविष्ट) याला मंजुरी दिली होती. पहावे - संदर्भ क्र. बी आर / नं. १५६ / ३५ दि. २६ / ०८ / २०२२ मात्र, अर्थसंकल्पिय (बजेट) वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर करणे आणि त्याचे सॅप प्रणाली मधे अद्यावती करण ही कामे ऑगस्ट २०२३ मधे झाली या शिवाय एम आय जी ओ क्र. ५०००७०३५७२ रक्कम रु. १३८८४१३८.१२/- आणि एम आय आर ओ नं. ५१०५६१०६७९ / ३१ / ०३ / २०२४ सिस्टिम मधे करण्यात आले. देयकांची नोंद अंतिम क्यू व्ही नंतर झाल्यामुळे, प्रगतीपथावरील कामे - डब्ल्यू आय पी याच्या रक्कमेचे भांडवलीकरण दि. ३१ / ०३ / २०२४ रोजी,रु. २२९६१०९.११ साठी असे केले (सी जे ८८८ क्र. १००२८३२८६ किंवा रु. १९४२८६२.१३ साठी आणि क्र. १००२५२३५६ रु. ३५३२४६.९८ साठी) यात अपवाद - ज्यांचा वापर केला नाही अशा सामानाची (मनोऱ्याचे साहित्य व नट बोल्ट) रक्कम रु. ११९२१२७६/- असून ती इतर प्रकल्पात हस्तांतरित केले जाईल (परंतु संशोधन आणि देखभाल कामांसाठी नाही) प्रत्यक्ष साहित्याच्या गरजेनुसार. | प्रतिसाद दिलेल्या माहितीशी सुसंगत होता. |

<table>
<tr><td>२</td><td colspan="4">मालमत्ता, कारखाना आणि उपकरणे यात ३१ मार्च २०२२ च्या आधीच्या ५६ विविध पूर्ण/वापरासाठी उपलब्ध/भारीत/कार्यान्वयीत कामांवरील[१] ₹ ५१.०२ कोटींचा समावेश नाही. पीपीई (टिप २ (२.६)) आणि घसारा (टिप २.९) याच्या बाबतीतील कंपनीच्या प्रगट केलेल्या लेखांकन धोरणाच्या अनुसार ही कामे भांडवलीकृत करायला हवी होती.</td><td></td><td>व्यवस्थापनाने आवश्यक नोंदी वि. वर्ष २०२२-२३ मध्ये केल्या आहेत. आम्ही ते पडताळून पाहिले आहे.</td></tr>
<tr><td></td><td colspan="4">वरील कामांना भांडवलीकृत न करण्याचा परिणाम मालमत्ता, कारखाना आणि उपकरण (टिप्पणी ४.१) याची ₹ ५१.०२ कोटींनी न्यूनोक्ती होण्यात आणि प्रगतीपथावरील भांडवली कामाची तितक्याच रक्कमेची अत्युक्ती होण्यात झाला आहे. याचा परिणाम सध्याच्या वर्षासाठी ₹ १.२८ कोटी रक्कमेची घसाऱ्याला भार न टाकणे आणि एकूण सर्वंकष उत्पन्नाची तदनरुप अत्युक्ती झाली आहे आणि मागील वर्षाशी संबंधित राखीव मिळकतीची प्रारंभिक शिल्लकेची ₹ १.०५ कोटींची अत्युक्ती झाली आहे.</td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="4">[१] यात एका कामाच्या संदर्भात ₹१.४८ कोटींची पिके भरपाई, सामान्य आस्थापना खर्च आणि बांधकामादरम्यान व्याज, एका कामाच्या संदर्भात ₹ १.२१ कोटींचा सा.आ.खर्च, एका उपकेंद्राच्या कामाचा खर्च असलेली ₹ २३.८० कोटींची रक्कम जी परिपत्रक क्र.८३१५ (कॅपेक्स परिपत्रक क्र.१) दिनांक ३१/०५/२०१२ - मत्तांचे भांडवलीकरण नवीन उपकेंद्राच्या बाबत जिथे ट्रान्स्फॉर्मर / आयसीटी भारीत केले जातात तिथे जरी सदर योजना पूर्ण झाली नसली तरी हे उपकेंद्र भांडवलीकृत करणे आवश्यक आहे. अन्वये भांडवलीकृत करणे आवश्यक होते आणि ५३ इतर विविध कामांवरील ₹ २४.५३ कोटींचा समावेश आहे.</td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="6">चालू मत्ता</td></tr>
<tr><td></td><td colspan="6">इतर चालू वित्तीय मत्ता (टिपा १०.५) रु. ५१.२९ कोटी</td></tr>
<tr><td></td><td colspan="6">इतर येणी रु ७.३१ कोटी</td></tr>
<tr><td>३</td><td colspan="4">वरील बाबीत महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉ लि ने केलेला रु.३.०३ कोटींचा कमी भरणा समाविष्ट नाही. सदर भरणा पाटणसावंगी येथे ट्रॅक्शन उपकेंद्रासाठी ईएचव्ही लेव्हलचा १३२ केव्ही वीज पुरवठा यासाठीचा आऊटराईट अंशदान काम म्हणजेच ओआरसी ठेव कामासाठी आहे. कंपनीने ३१ मार्च २०२२ पर्यंत केलेल्या ओआरसी ठेव कामाच्या ₹ १२.८० कोटींच्या एकूण खर्चासमोर (खर्चात प्रत्यक्ष झालेला खर्च आणि पर्यवेक्षण आकार व जीएसटी यांचा समावेश आहे) कंपनीला ओआरसी ग्राहकाकडून फक्त ₹ ९.७७ कोटींची ठेव प्राप्त झाली. कंपनी ओआरसी ग्राहकांकडून ठेव प्राप्त झाल्यानंतर चालू दायित्व निर्माण करते आणि काम सुरु असताना प्र.प.भां कामे खर्ची टाकण्यात येतात आणि काम पूर्ण झाल्यानंतर ठेव प्राप्त झाल्यावर आधी निर्माण केलेल्या चालू दायित्वाच्या समोर प्र.प.भां.कामे समायोजित केली जातात.</td><td>दस्तावेज क्र.१००१७९९३३ दि. ३० / ११ / २०२२ अन्वये वि.व.२०२२-२३ मध्ये रेल विकास निगम मर्यादितकडून प्राप्य म्हणून रु.३.०३ कोटींची रक्कम लेखांकित करण्यात आली आहे.</td><td>व्यवस्थापनाने वि. वर्ष २०२२-२३ मध्ये आवश्यक नोंदी मंजूर केल्या. आहेत. आम्ही त्या पडताळून घेतल्या आहेत.</td></tr>
<tr><td></td><td colspan="4">ओआरसी ग्राहकाकडून प्राप्य म्हणून ₹ ३.०३ कोटींची रक्कम लेखांकित न करण्यामुळे इतर चालू वित्तीय मत्तांखाली इतर प्राप्य रक्कमेची ₹ ३.०३ कोटींची न्यूनोक्ती आणि चालू दायित्वाची तितक्याच रक्कमेची न्यूनोक्ती झाली आहे.</td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="6">समभाग आणि दायित्वे</td></tr>
<tr><td></td><td colspan="6">दायित्वे</td></tr>
<tr><td></td><td colspan="6">चालू नसलेली दायित्वे</td></tr>
<tr><td></td><td colspan="6">वित्तीय दायित्वे</td></tr>
<tr><td></td><td colspan="6">इतर चालू नसलेली वित्तीय दायित्वे (टिपा क्र.१४.२) रु.२,४६४.२० कोटी</td></tr>
<tr><td></td><td colspan="6">ओ आर सी योजनांखाली ग्राहकांकडून प्राप्त अनामत रु. १,२३१.४६ कोटी</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="4">वरील बाबीत ओ आर सी कामासाठी मिळालेल्या अनामतींचा समावेश आहे ही कामे पूर्ण झाली. त्याचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे.</td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>अनु. क्र.</td><td>कामाचे नाव</td><td>पूर्ण केल्याची तारीख</td><td>रक्कम रु. कोटीत</td><td rowspan="3">या प्रकल्पाच्या संबंधीत खर्चाची नोंद करणे कार्यान्वयनानंतर चालू आहे. म्हणून भरपाई इ. या नंतर अंतिम खर्चाचे अनामती सोबत समायोजन योजना पूर्ण झाल्यानंतर केले जाईल.</td><td rowspan="3">या प्रकल्पाची स्थिती जैसे थे आहे. आम्ही व्यवस्थापनाकडे विचारणा केली असता आम्हास सांगण्यात आले की, या अनामतीचे समायोजन वि. वर्ष</td></tr>
<tr><td></td><td>१.</td><td>२२० केव्ही खारबाव टीएसएस २२० केव्ही कांबा खारबाव आणि कोलशेत खारबाव लाईन्सखाली समाविष्ट</td><td>०५/०२/२०२२</td><td>७.०२</td></tr>
<tr><td></td><td>२.</td><td>२२० केव्ही तारापूर बोईसर लाईन ठिकाण ३७</td><td>२८/०२/२०२२</td><td>०.८३</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td>
<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>कामाचे नाव</th><th>पूर्ण केल्याची तारीख</th><th>रक्कम रु. कोटीत</th></tr>
<tr><td>३.</td><td>२२० केव्ही वसई पीजीसीआयएल लाईन ठिकाण ५४-५८</td><td>२७/०१/२०२०</td><td>०.३७</td></tr>
<tr><td>४.</td><td>१३२ केव्ही डहाणू (MIDC) बोईसर लाईनचे ठिकाण ६२ ते ६४ दरम्यान रिराऊटिंग कामासह १३२ केव्ही डहाणू (MIDC) - बोईसर लाईनचे ठिकाण ६२ ते ६४ दरम्यान रिराऊटिंग</td><td>२६/०३/२०२१ आणि २७/०३/२०२१</td><td>१.६२</td></tr>
<tr><td>५.</td><td>२२०केव्ही डीसी खारघर टॉप वर्थ आणि खारघर पनवेल टीएसएस लाईन ठिकाण क्र. ६४६ ते ६४९ दरम्यान हलवणे आणि तिची उंची वाढवणे</td><td>१५/०२/२०१९</td><td>०.८७</td></tr>
<tr><td>६.</td><td>महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉ.लि. साठी केलेले २२० केव्ही एससी उमरेड-टॉपची ठिकाण क्र.१९ ते २३ येथे उर्जा फीडरसह उंची वाढवणे</td><td>१३/०२/२०२२</td><td>१.२६</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td></td><td>११.९७</td></tr>
</table>
</td>
<td></td>
<td>२०२२-२३ ऐवजी, जेव्हा काम पूर्ण होईल तेव्हा केले जाइल. हा विषय स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या लेखा परिक्षणाच्या आमच्या अहवालात ग्राह्य मतांचा आधार परिच्छेद ३ (जे) यात समाविष्ट केला आहे.</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>याप्रकारे, सध्या असलेल्या चालू दायित्वासमोर प्र.प.भां. कामातून वरील पूर्ण कामांचे समायोजन करण्याचा परिणाम चालू दायित्वाची ₹ ११.९७ कोटींची अत्युक्ती आणि प्र.भां.कामांची तितक्याच रक्कमेची अत्युक्ती होण्यात झाला आहे.</td>
<td></td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>[१] अनु.क्र. १ ते ५ खालील ₹१०.७१ कोटी रक्कमांची कामे ओआरसी ठेव कामांखाली डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉ. ऑफ इंडिया लि. साठी करण्यात आली आणि भारीत/पूर्ण करण्यात आली.</td>
<td></td>
<td></td>
</tr>
</table>

## परिशिष्ट २ (ब) वि. वर्ष २०२०-२१ महालेखापालाच्या / निरिक्षण अहवालातील ३१ मार्च २०२४ रोजी खुल्या असलेल्या बाबी.

| अनु क्र. | महालेखापाला अभिप्राय | महापारेषणचे उत्तर | लेखापरीक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| **अ)** | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय** | | |
| | **ताळेबंद** | | |
| **१** | **मालमत्ता कारखाने व साधने (टिपा ४.१) रु. १६,२२४.७१ कोटी** | | |
| अ) | कंपनीने सन १९८९ ते २०२१ दरम्यान मे.महावितरण यांना बहुतेक सर्व ६६ केव्ही उपकेंद्रे आणि लाईन्स हस्तांतरित केल्या आहेत. मात्र, ह्या मत्ता स्थिर मत्तांमधून वगळण्यात आलेल्या नाहीत जे भालेमा १६ खाली अनिवार्यपणे आवश्यक आहे. याचा परिणाम –<br>१) स्थिर मत्तांचा सकल गट, संचित घसारा आणि वहन खर्च यांची अनुक्रमे रु.१४०.२४ कोटी रु.१०२.७८ कोटी आणि रु.३७.४६ कोटी इतकी अत्युक्ती झाली.<br>२) महावितरण कडून व्यापार प्राप्य रक्कमेची रु.२४.७३ कोटींची न्यूनोक्ती झाली.<br>३) हानी तोटा प्रती रु.१२.७३१ कोटींच्या अपेक्षित तोट्यासाठीची तरतूद नफा आणि तोटा लेख्यात आकारण्यात आली नाही. परिणामी, वर्षाच्या नफ्यात तितक्या रक्कमेची अत्युक्ती झाली.<br>४) सुमारे १७४.२४ किमी लांबीच्या काढून टाकलेल्या तारांचा रु.०.८० कोटींचा वहन खर्च हा तोटा म्हणून मान्य करण्यात आला नाही. परिणामी वर्षासाठीच्या नफ्याची रु.०.८० कोटींची अत्युक्ती झाली. | कंपनीच्या वीज पारेषण जाळयात ६६ केव्ही ते ७६५ केव्ही स्तरांची क्षमता आहे. संपूर्ण महापारेषण ६६ केव्ही पारेषण स्तरांचे उच्चारण करण्याचे ठरले त्यानुसार ६६ केव्ही क्षमतेची उपकेंद्रे व वीजतारा अकार्यान्वित करुन त्या महावितरण कंपनीमध्ये हस्तांतरीत करण्यात आल्या. काही उर्वरित उपकेंद्रे नंतर महावितरण कडे येतील किंवा महापारेषण त्याचा उपयोग क्षमता वाढवण्यासाठी करु शकेल. त्यासाठी या विषयात विद्यमान ग्राहकांना तशी व्यवस्था हमी असल्याबद्दल खात्री केली जाईल.<br>उपनिर्विष्ट वास्तव कारणामुळे या ६६ केव्ही सामग्रीची मान्यता काढून घेणे, विल्हेवाट लावणे आणि या मत्ता हस्तांतरणाचा विचार करुन त्याचे सोपस्कार पूर्ण करणे या बाबत तांत्रिक मसलत करुन आवश्यक भा. ले. मानक क्र. १६ नुसार मजूरी होऊन लेखा नोंदी केल्या जातील.<br>६६ केव्ही मत्ता विषयी आवश्यक धोरण तयार करण्याची प्रक्रीया चालु आहे. | सदर विषय आमच्या स्वायत्त वि.वि. २०२३-२४पत्रकांच लेखा परिक्षण अहवालातील ग्राह्य मतांचा आधार यात परिच्छेद ३(जी) यात समाविष्ट आहे. नंतर असे निदर्शनास आले. की, ६६ केव्ही वीज जाळयाचे/ उपकेंद्राचे महावितरण हस्तांतरण केले. कंपनीस या विषयी लेखी कागदपत्र किंवा हस्तांतरण करारपत्राचा आधार नाही. |
| **ब)** | यात रु. १४४.६७ कोटींसह सकल गटासह न वापरलेल्या मत्ता, रु.१०९.१४ कोटींचा संचित घसारा व रु. ३५.५३ कोटींचा वहन खर्च समाविष्ट आहे. कंपनीने ह्या मत्तांची हानी दर्शवणे निश्चित केलेले नाही. तपशीलाअभावी ह्या बाबीमुळे तोटा आणि नफ्याची परिणामी अत्युक्ती निश्चित करता आली नाही | क्षेत्रीयकार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या माहिती नुसार जी एल २२२०१० वापरात नसलेल्या मत्ता नोंद वहीतून कार्यासाठी वापरात नसलेल्या ज्या मत्ता काढून टाकण्यात आल्या, त्यांचा समावेश आहे. या गटात दुरुस्तीसाठी पाठविलेल्या अल्प मत्ता जे सामान विल्हेवाटसाठी योग्य झाले असून सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी द्यायची आहे. अशा मत्तांचा समावेश आहे.<br>या मत्ता सक्रीय वापरात नसल्यातरी त्या कमी करण्याच्या परिक्षणासाठी वाढविण्यात येत नाहीत. कारण त्यामुळे त्या भंगारात विल्हेवाटीसाठी जाऊ शकतात. त्यातून त्यांचे वसुली योग्य मूल्य प्राप्त होत नाही. भंगारात काढण्याची प्रक्रीया झाल्या-बद्दलचे योग्य प्रक्रीयेची निश्चिती करता येते.<br>महापारेषण स्थिर मत्ताची प्रक्रीया पडताळणी करण्याची प्रक्रीया सुरु करणार आहे. त्यात वापरात नसलेल्या साहित्याचे वर्गीकरण भंगार साठी योग्य आणि पूनर्वापर योग्य अशा दोन गटात केले जाईल. या कामानंतर लेखा वहीत आवश्यक प्रक्रीया केली जाईल. | वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या स्वायत्त वि.वि. पत्रकाच्या आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालात ग्राह्य अभिप्रायांचा आधार यातील परिच्छेद ३ (एच) यात संबंधित विषयाचा समावेश केला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **प्रगतीपथावरील भांडवली कामे (टिपा क्र. ४.२) रु. ३,३४२.८१ कोटी** | | |
| | कंपनीने रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स साठीचे राष्ट्रीय केंद्राच्या (NCRA) जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (GMRT) क्षेत्रात रु.२५.१७ कोटी खर्च करुन बांधलेले ७९ टॉवर पाया आणि ६९ टॉवर काढून टाकण्याचा निर्णय घेतला. ह्या बाबीतून कोणतेही भविष्यकालीन अर्थिक फायदे प्राप्त करणे शक्य नसल्यामुळे भालेमा १६ आणि कंपनीच्या लेखांकन धोरणांच्या संदर्भात टॉवरची किंमत प्रगतीपथावरील कामातून काढून टाकणे आवश्यक होते जे करण्यात आलेले नाही.<br>ह्याचा परिणाम – | ४०० केव्ही बाभळेश्वर कुडूस लाईन संदर्भातील ७९पाया रचना व उभारणीची ६० कामे एजन्सीने केली वरील त्याची नोंद करुन त्यात प्रकल्पाचा प्रत्यक्ष खर्च असा समजण्यात आला. हा ओळख नसलेला जादा खर्च असल्याने बजेट वाढीचा प्रस्ताव केला त्यास सक्षम प्राधिकारी यांनी मजूरी दिली. याशिवाय हे मनोरे अनावश्यक ठरविल्यानंतर ते काढून टाकण्याचे काम असल्याने संख्यात्मक बदलाचा प्रस्ताव तयार करुन त्याला सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेण्यात आला<br>तज्ञ समितीच्या शिफारसीनुसार या तारेचा मार्ग तांत्रिक विनिर्देशांप्रमाणे बदलण्यात आला त्यासाठी लागणारी जादा सामग्रीचे प्रस्ताव तयार करुन त्याला संक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेण्यात आली अशाप्रकारे संक्षम प्राधिकाऱ्यांची एम बी आर ५६ /२० दि. २४/०८/२०१० यातील बाबींच्या सुधारणा करुन त्यास मान्यता दिली. लाईन मधील जादा बदलांसाठी जादा खर्च आवश्यक असल्याने नवा एम बी आर क्र. १४६/२१ दि. १६/०३/२०२१ मंजुरी देण्यात आली. . | संबंधित विषयाचा समावेश वि. वर्ष २०२३-२४ च्या स्वायत्त वि. वि. पत्रकांच्या लेखा परिक्षण अहवालातील ग्राह्य अभिप्रायाचा आधार यातील परिच्छेद ३ (के) मध्ये केलेला आहे. |
| | अ) प्रगतीपथावरील भांडवली कामांची रुपये २५.१७ कोटींची अत्युक्ती झाली. | काढून टाकलेल्या ६० मनोऱ्यांचा पुर्नवापर अन्य जागी केला जाईल. ( वाशी व नाशिक परिमंडळात) या मनोऱ्यांचा खर्च रु. २१.९४ कोटी आहे. काढून टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्याची नोंद सॅप प्रणालीमध्ये करण्याचे कामही चालू आहे. तसा प्रस्ताव नाशिक प्रकल्प मंडळाने तयार करुन तो मुख्य कार्यालय कडे मंजूरीसाठी सादर केला आहे. मात्र मुख्य कार्यालय यांनी अधिक विचारणा केल्याने त्यावर प्रक्रीया चालू आहे. | |
| | ब) टॉवरच्या मुलकी (सिव्हिल) पायाचा न वसूल होणारी किंमत असलेल्या रु.३.२३ कोटींच्या खर्चाची न्यूनोक्ती आणि परिणामी, वर्षासाठीच्या नफ्याची रु.३.२३ कोटींची अत्युक्ती झाली आहे. | | |
| | क) रु.२१.९४ कोटींपैकी वापरयोग्य टॉवरची किंमत स्टॉकमध्ये घेणे तसेच उर्वरित रक्कम नफ आणि तोटा विवरणपत्रात दाखवणे आवश्यक होते.तपशीलाअभावी ह्या लेख्याचा वित्तीय परिणाम निश्चित करणे शक्य नाही. | | |
| ब) | **प्रकटनावर अभिप्राय** | | |
| | वि.वर्ष २०१९-२० करिता स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांवर महानियंत्रक आणि महालेखापालांच्या भाष्यावरील प्रतिसादात कंपनीने वि.व.२०२०-२१ दरम्यान आवश्यक सुधारक नोंदी पारित करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, खालील आश्वासनांचे अनुपालन करण्यात आले नाही.<br>दुरुस्तीकार एजन्सीजने ट्रान्स्फॉर्मरमधील तांब्याची चोरी | मे. आदित्य विद्युत अप्लायन्सेस या संस्थेस दरुस्ती साठी दिलेल्या मत्तांची ओळखनिश्चिती करणे व मत्तांची मान्यता काढून टाकणे ही प्रक्रीया चालू आहे. | ही बाब जैसे थे स्थितीत आहे. आम्ही वि.वर्ष २०२३-२४ च्या लेखा परिक्षणात चौकशी केली येथे व्यवस्थापनाचे उत्तर मिळालेल्या माहितीशी सुसंगत होते. |

| | | | |
|---|---|---|---|
| | केल्यामुळे रु.८.३२ कोटी किंमतीच्या ट्रान्स्फॉर्मर्सना अक्रियान्वित करणे. | | |
| **क)** | **लेखा परिक्षकांच्या अहवालावर अभिप्राय** | | |
| | स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांवरील लेखापरीक्षकांच्या सुधारित मताच्या परिच्छेद २.१८ आणि २.२२ खाली लेखापरीक्षकांनी कंपनीद्वारा तपशील / डेटा (१९ सामान्य खातेवह्या) सादर न करणे आणि डेटा (११६ सामान्य खातेवह्या) जुळता न करणे आणि मेळ न घेणे यावर सशर्तता दर्शविली आहे. लेखापरीक्षकांचे सुधारित मत सर्वसाधारण स्वरुपात आणि विनिर्दिष्ट नसलेल्या संज्ञांमध्ये दिले आहे व त्यात वित्तीय विवरणपत्रांवर मोठा वित्तीय परिणाम करणाऱ्या बहुतेक सर्व महत्त्वाच्या सामान्य खातेवही शिलकींची सूची दिली आहे.<br>सुधारित मतात कंपनीच्या वित्तीय कार्यांवर आणि वित्तीय विवरणपत्रांवरील त्यांच्या परिणामांवर विनिर्दिष्ट निरीक्षणांचा समावेश नाही. अशा प्रकारे, कंपनीचे सदस्य आणि हितसंबंधधारक यांना स्वायत्त वित्तीय विवरणपत्राच्या अनेक वित्तीय पैलूंवरील सुधारित मताचे मूल्यमापन करता येत नाही. | लेखा परिक्षकांना पडताळणीसाठी सर्व उपलब्ध माहिती व त्याला पुष्टि देणारा तपशील सादर करण्यात आला होता. मात्र त्यातील बऱ्याच बाबी जुन्या स्वरुपाच्या होत्या त्याला आधार देऊ शकतील अशी माहिती लेखांकन करणाऱ्या कार्यालयात उपलब्ध नाहीत. अशा जुन्या रकमा निर्लेखित करणे / पूर्नलिखीत करणे याचा निर्णय सक्षम प्राधिकाऱ्याच्या योग्य सम्मतीनंतर घेण्यात येईल. | हा विषय आम्हाला लागू नाही कारण आमची नियुक्ती वि. वर्ष २०२२-२३चे सांविधिक लेखा परिक्षण म्हणून झाली आहे. |

## परिशिष्ट २) (क) - वि वर्ष २०२० -२१ च्या पूर्वीच्या महालेखापालाचा अहवालामध्ये ३१ मार्च २०२४ पर्यंत सुद्धा राहिलेल्या बाबी.

| अनु क्र. | महालेखापालाचा अभिप्राय | महापारेषणचे विद्यमान उत्तर / प्रतिसाद | लेखापरीक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| अ) | **नफाचा संकल्प अभिप्राय** | | |
| | **नफा व तोटा पत्रक** | | |
| १ | **इतर उत्पन्न (टीप क्र. २२)** | | |
| अ) | यात अद्याप जी कामे हाती घेण्यात आली नाहीत/पूर्ण झालेली नाहीत असा आऊटराईट ग्राहक कामाकरिता तीन मंडलांमध्ये तिसऱ्या पक्षांनी जमा केलेल्या पर्यवेक्षण आकाराच्या रुपातील रु. ३.८१ कोटी रकमेचा समावेश आहे. याचा परिणाम इतर उत्पन्न तसेच नपयामध्ये रु. ३.८१ कोटीची अत्युक्ती आणि इतर चालू नसलेल्या दायित्वात तितक्याच रकमेची न्यूनोक्ती होण्यात झाला आहे. | भा.ले मानक ११५ मधील परिच्छेद क्र. ११५ नुसार जर खालील पैकी एका निकषांची पूर्तता झाली. तर संबधित संस्था, तिचा माल किंवा सेवा यांचे वेळेनुरुप हस्तांतरण करते आणि कामाचे बंधने समाधानकारक रित्या पूर्ण झाल्याचे मानते आणि त्या वेळेतील महसुलाला मान्यता देते:-<br>अ)कंपनी कार्य करताना आणि तिच्या कामामुळे एकत्रवंत ग्राहकाला लाभ मिळवून ते ग्रहण केले जातात<br>ब) कंपनी कामातून एखादी मत्ता निर्माण होते किंवा वाढते. (उदाहणार्थ प्रगती पथावरील कामे) व नियंत्रक ग्राहकांच्या कंपनीने निर्माण केलेल्या किंवा वाढविलेल्या मत्ताचे नियंत्रण<br>क) कंपनीच्या कामातून जिचा कंपनीत सुद्धा पर्यायी वापर करता येईल अशा मत्तांची निर्मित्ती होत नाही. आणि कंपनीकडे अमलबजावणी करता येण्याजोगा पैसा देण्याची कार्यवाही करण्यास योग्य अधिकार पूर्ण होण्याच्या निकषाची पूर्ती करत नाही. म्हणून लेखांकन वह्यात प्राप्तमिळकतीस महसूल अशी मान्यता देते. | व. वर्ष २०२३ - २४ च्या स्वायत्ता वि.वि. पत्रकाच्या लेखापरिक्षण अहवालातील ग्राह्य अभिप्रायांचा आधार यातील परिच्छेद क्र. ३ (अ) या मध्ये संबधित विषय समाविष्ट आहे. |
| ब) | यात सुसज्जता व जमवाजमव अग्रिमावर वसूलयोग्य व्याज असलेल्या रु. ३०.४६ कोटी रमकेचा समावेश नाही, जी मान्य केली जाणे आवश्यक होते. कंपनीने स्वीकारलेल्या लेखांकन धोरणाशी सदर अमान्यता ही सुसंगत नाही. यामुळे इतर संकीर्ण उत्पन्नात आणि वर्षासाठीच्या नफ्यात रु. ३०.४६ कोटींची न्यूनोक्ती आणि व्यापार प्राप्य रकमेत तितक्याच रकमेची न्यूनोक्ती झाली आहे. यामुळे इतर संकीर्ण उत्पन्नात | कंपनीने स्वायत्ता वि.वि. पत्रकाच्या टिपा क्र. २.१५ यात लेखांकन धोरण प्रकट केले आहे. त्यानुसार व्याजाच्या उत्पन्नाचा लेखा उपार्जन तत्वावर आणि महसूलाच्या निश्चिततेचा विचारे करुन करण्यात येतो. तसेच कंपनीने ठेवून घेतलेल्या रकमा व बँक हमी याचा हेतू कंत्राटातील कार्यपालनाची खातरजमा करण्याचा हेतू असतो. त्यात व्याजाची वसुलीचा उद्देश नसतो. ते अद्याप संबधित संस्थानी स्विकारायचे आहे. कंत्राटदारांना दिलेल्या मोबिलायझेशन ॲडव्हान्सच्या व्याजासाठी, कंपनीने ते वसूल करण्याची आणि लेखा वह्यात त्यास व्याज म्हणून मान्यता देण्यासंबंधीची प्रक्रीया सुरु केली आहे. | या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती |
| २ | **इतर खर्च (टिपा २६) सुरक्षा खर्च** | | |
| | यात वर्षासाठीच्या सुरक्षा खर्चावरील रु.६.३९ कोटींचा लागू होणारा वस्तू सेवा कराचा समावेश नव्हता. वस्तू व सेवा करासाठी तरतूद न करण्याचा परिणाम खर्चाची रु.६.३९ कोटींची न्यूनोक्ती आणि नफ्याची रु.६.३९ कोटींची अत्युक्ती आणि इतर चालू वित्तीय दायित्वाची रु.१४.०८ कोटींची (मागील वर्षासाठीची रु.७.६९ कोटींच्या वस्तू व सेवा कराच्या दायित्वासह) न्यूनोक्ती झाली आहे. | परिपत्रक क्र. ८९/७/२००६-एस टी दि. १८ डिसेंबर २००६ नुसार सार्वभौम / सार्वजनिक प्राधिकरणे (म्हणजे शासनाने गठीत केलेल्या / स्थापित केलेल्या संस्था. या विशिष्ट कामे / कर्तव्ये पार पाडण्यासाठी तयार केलेल्या असतात त्यांचे सांविधिक स्वरुपाच्या असतात. त्यांना सोपवलेली कामे विशिष्ट जबाबदारी नुसार ठरवलेली असतात व ती अमलात असलेल्या कायद्यानुसार असतात. त्याच याकडून करण्यात येणारी कार्ये ही कायद्यातील तरतूदीनुसार रचना केलेल्या सर्वभौम / सार्वजनिक प्राधिकरणे यांनी सोपवलेली असतात. ती कायद्यातील तरतुदीनुसार असल्याने त्यांचे स्वरुप सांविधिकरित्या बंधनकारक असते. व ती पूर्ण करण्याची जबाबदारी असते. ही कृती संपूर्णपणे सार्वजनिक हितासाठी असते. ती कामे करणे बंधन कारक व सांविधिक कर्तव्य असते ही करणे म्हणजे कुणा एका विशिष्ट व्यक्तीौला कोणत्याही कारणास्तव द्यावयाची सेवा नव्हे. म्हणून सार्वभौम / सार्वजनिक प्राधिकरण यांनी कायदेशिर तरतुदीनुसार सोपवलेले काम असते. ती काही | या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कुणा व्यक्तीला दिलेली करपात्र सेवा कर आकारता येत नाही.<br>वरील वस्तूस्थिती विचारात घेतली पाहिजे. म्हणून महापारेषणवर आकारलेला एस जी बी हा जी एस टी वगळुन आकारलेला आहे. | |
| ३ | **इतर खर्च (टिपा - २६) संकिर्ण हानी व तरतूद** | | |
| | यात आधीच मान्य केलेल्या पण अपिलेट न्यायाधिकरणा समोर प्रलंबित असलेल्या रु. ४९.६८ कोटींच्या वादातल्या वीज पारेषण आकारावरील तरतुदीचा समावेश नाही. पारेषण अनुज्ञप्ती धारक (मे. साई वर्धा पॉवर जनरेशन लि.) ही कंपनी दिवाळखोरी ठरावाच्या प्रक्रियेखालीसुंद्धा आहे. वादात असलेल्या दाव्यावर तरतूद न करणे हे भालेमा १८ - उत्पन्नाशी सुसंगत नाही ज्यामुळे इतर खर्चात रु. ४९.६८ कोटींची न्यूनोक्ती झाली आहे. आणि व्यापार प्राप्य रकमेत व परिणामी वर्षासाठीच्या नफ्यात तितक्याच रकमेची अत्युक्ती झाली आहे. | मे. एस. डब्ल्यू पी एल सोबत वैध प्रकारे ठोक वीज पारेषणाचा वापर झाला आहे. त्यानुसार दिलेल्या १३०/१३५ मे.कै. क्षमतेच्या पारेषण आकाराची बिजके (इनव्हाईस)दिली होती. त्यासाठी म.वि.नि. आयोगाने तात्काळ अनुकूल निर्णय दिलेला आहे. मात्र ए पी टी इ एल कडे प्रकरण प्रलंबित असले तरी एन सी एल टी ने मे. एस डब्ल्यू पी एल साठी कंपनीच्या दिवाळखोरीची प्रक्रीया इनसॉल्व्हन्सी ॲंड बँकरप्टची कोड १०१६(आय् बी सी) नुसार सुरु केली. त्यामध्ये आय. आर. पी नियुक्त झाले. कंपनीने मागणी केलेला एकूण दावा रु. ११९.५१ कोटीचा असून त्या पैकी रु. ३४.०० कोटीचा दावा दाखल करण्यात आला. दाव्याची उर्वरित रक्कम आकस्मित दावा म्हणून वेगळी ठेवली आहे. येथे कंपनीने मागणी केलेली कोणतीही रक्कम आय आर पी यांनी नाकारलेली नाही, ही लक्षणीय बाब आहे.<br>आलिकडेच एन सी एल टी ते १७/१०/२०१९ रोजी मे. एस डब्ल्यू पी एल विरोधातील नादारी व दिवाळखोरी संहिता (आय् बी सी) कार्य प्रक्रीयेनुसार आदेश जारी केला आहे. त्यात देणाऱ्या अर्जदाराने सादर केलेला रिझोल्यशन प्लॅन - (ठराव योजना) मंजूर करुन कार्य करणाऱ्या पतदाराची आकस्मिक दावा रक्कम टप्याटप्याने २४ महिन्या भरावी आणि आदेशातील असलेल्या ठराव योजनेप्रमाणे कार्यवाही करण्यास सांगितले या कारणांमुळे लेखा वहीत संशयास्पद कर्जे (रु ८८५१.४१ लाख) यासाठी केलेली तरतूद पुरेशी वाटते. म्हणून वि. वर्ष २०२१-२२ मध्ये आणखी तरतूद केलेली नाही.<br>महापारेषणला एन. सी. एल. टी. यांचा आदेश क्र. २७५/७//एच डी बी/२०१९, दि. १७/१०/२०१९ नुसार रु. १५ लाख मिळाले. महापारेषण चा दावा रु. ११९.५१ कोटीचा होता. याशिवाय महापारेषणने दाखल केलेले अपील एन. सी. एल. टी. ने त्यांचा आदेश क्र.१४०१/२०१९ दि.०३/०२/२०२०नुसार फेटाळले. महापारेषणने सर्वोच्च नायालयात एन. सी. एल. टी. च्या आदेशाला आव्हान देण्यासाठी अपील सादर केले आहे | या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती |
| **ब)** | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय** | | |
| | **ताळेबंद** | | |
| १ | **प्रगती पथावरील भांडवली काम (टिपा-४.२)** | | |
| अ) | यात वर्षभरात वाटप केलेल्या बेच्या बांधकामाकरिता पक्षांकडून घेतलेल्या ठेवींच्या स्वरुपातील रु. २.७० कोटी रकमेचा समावेश आहे. मात्र सदर रक्कम ठेवींमधून | याचा मेळ करण्याची प्रक्रीया चालू असून वि. वर्ष (जमा) २०२२-२३ मध्ये या ठेवी (जमा) मता सोबत काढल्या जातील. (नॉक ऑफ केल्या जातील) | आमच्या स्वायत्त वि. वर्ष २०२३-२४ च्या स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या लेखा परिक्षण अहवालातील ग्राह्य मत्तांचा आधार यातील परिच्छेद ३ (जे) यात हा विषय समाविष्ट केला आहे. |

<table>
<tr><td></td><td>समायोजित करण्यात आलेली नाही. याचा परिणाम इतर चालू नसलेल्या वित्तीय दायित्वाची (इतर ठेवी) रु.२.७० कोटींची अत्युक्ती आणि इतर चालू नसलेल्या मत्तांची तितक्याच रक्कमेची अत्युक्ती होण्यात झाला आहे.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>ब)</td><td>ह्यात कामाच्या ठिकाणी कंपनीने प्रदान केलेल्या आणि कंत्राटदाराकडून प्राप्य अशा रु. २१७.०० लाख सुरक्षा आकाराचा समावेश आहे. यामुळे प्रगतीपथावरील भांडवली कामात रु. २१७.०० लाखाची अत्युक्ती आणि इतर प्राप्य रकमांमध्ये तितक्या रकमेची न्यूनोक्ती झाली आहे.</td><td>महापारेषणे २२० केव्ही नांदगाव पेठ या आणि २२० केव्ही अंजनगाव उपकेंद्राची कामे आणि त्यासोबत अमरावती जिल्ह्यातील वीजतारांचे काम, शिवाय २२० केव्ही मालेगाव, १३२ केव्ही - जळगाव जामोद या उपकेंद्राची व बुलढाणा जिल्ह्यातील सलग्न वीज तारांची कामे मे. इ सी आय् - शांघाय जेव्ही या कंपनीकडे सुपुर्द केली होती. मात्र या कंपनीची काम केले नाही. त्यामुळे महापारेषणने यांचा इ पी सी कंत्राट रद्द केला (प्रवाहे पत्रक क्र. एम एस इ सी टी एल / इ डी (पी) / इ पी सी / ६२४३ दि. ०८/०५/१२) वरील प्रकल्पाच्या उपनिर्दिष्ट कामाच्या जागा (साईट्स)येथे ठेवलेले साहित्य चोरीस जाण्याच्या शक्यतांना आळा घालणे या उद्दिष्टाने सक्षम प्राधिकाऱ्यांनी, तेथे महापारेषणाची सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे तेथे सुरक्षा रक्षकांची सेवा २०११-१२ ते मार्च २०१७ या काळात पुरविले. त्याचा लेखा प्रगतीपथावरील भांडवली कामे यात नोंदला.<br>महापारेषणने उपरोक्त योजनांचे काम मे. इ सी आय शांघाय ऐवजी इतर कंत्राटदारांकडे जोखीम व खर्च या तत्वावर सोपविले पुर्वीचे कंत्राटदार म्हणजे मे. इ. सी आय्. - शांघाय कडून या जादा खर्चाची वसुली करण्यासाठी उचित कारवाई. निश्चितपणे करण्यात येईल. इ. सी आय्.-शांघाय कडून भविष्यात दावे केले जाणे अपेक्षित नाही. म्हणून बँक गॅरंटी (बी जी) रोखीत रुपांतर करण्याच्या शक्यता पहात आहोत. मात्र हे काम न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयाच्या निर्णयावर अंतिम निर्णय अवलंबून आहे.</td><td>या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती</td></tr>
<tr><td>क)</td><td>ह्यात मालाच्या किंमतीत समाविष्ट कर घटकावर कंत्राटदारांना प्रदान करण्यात आलेल्या अपात्र कर फरकासाठीच्या रु. १५९.४२ लाख रकमेचा समावेश आहे. ज्यामुळे प्रगतीपथावरील भांडवली कामात रु. १५९.४२ लाखाची अत्युक्ती आणि इतर प्राप्य रकमांमध्ये तितक्या रकमेची न्यूनोक्ती झाली आहे चुकीच्या आधार किंमतीमुळे किंमत फरकाचे रु.३१.२० लाखांचे अतिरिक्त प्रदान.</td><td>जादा भरलेल्या पी व्ही ची रक्कम रु. १६९.७३ लाख याची वसुली खालील कंत्राटदारांडून करण्यात आली.<br>(रु. लाखात)<br><table><tr><th>संस्थेचे नांव</th><th>जादा पी व्ही ची वसुली</th></tr><tr><td>मे. इ. सी. आय</td><td>२३.५३</td></tr><tr><td>मे. के पी टी एल</td><td>४४.९०</td></tr><tr><td>मे. के. इ सी</td><td>७७.०९</td></tr><tr><td>मे. जे एस एल</td><td>०८.९०</td></tr><tr><td>मे. जी. इ (ॲलस्टॉम)</td><td>१५.३१</td></tr><tr><td>एकूण</td><td>१६९.७३</td></tr></table>१३२ केव्ही कारंजा उपकेंद्रासाठी मे. एबीबी यांना किंमत विचलनाचे जादा पैसे दिले होते. इ.अ. उदा. प्रकल्प विभाग, अकोल या कार्यालयाने रु १०.०४ लाख कापले. कागदपत्र क्र. १००१६१७५१ दि. १८ डिसेंबर २०२२</td><td>या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती</td></tr>
<tr><td>२</td><td colspan="3">व्यापारी येणी (टिपा क्र. १०.२)</td></tr>
<tr><td></td><td>यात महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड कडून प्राप्य आऊटराईट योगदानाच्या फरकाच्या रकमेचा समावेश नाही ज्यामुळे प्राप्य रकमेत रु. १८.६८ कोटी</td><td>डिमांड नोटीस व व्याजाची रक्कम रु. १२. ६३ कोटी या आधारानुसार लेखांकन करण्याच्या संदर्भात सांगण्यात येते की महापारेषण कंपनी डिमांड नोटीस देण्याच्या आधाराने कोणत्याही उत्पनाला मान्यता देत नाही. कंपनीने स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या टिपा क्र. २.१५ मध्ये कंपनीनेअंगिकारलेल्या लेखांक धोरणात ही बाब स्पष्ट केली आहे. डिमांड नोटीस देणे यामुळे डिमांड नोटीसवर आधारित संख्या मजकूरामध्ये</td><td>या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | रकमेची न्यूनोक्ती आणि ओआरसी-प्रगतीपथावरील कामे यात तितक्याच रकमेची अत्युक्ती झाली आहे | रु. १२.६३ कोटी व्याजाचे उत्पन्नाबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, महापारेषण कंपनी डिमांड नोटीस देणे या साठी कोणतेही अल्प मान्य करीत नाही. स्वायत्त वि.वि. पत्रकाचा टिपा क्र.२.१५ यात जे लेखा धोरण नमूद केलेले आहे. त्यात ही माहिती दिली आहे. डिमांड नोटीस देणे यामुळे उत्पन्न उपार्जित होत नाही.<br>ओ.आर.सी ठेवीच्या संदर्भात स्पष्ट करण्यात येते की ठेवी मिळाल्यावर त्यांचे लेख केले जातात.डिमांड नोटीस देण्यामुळे येण्यात वाढ होत नाही. ते दुसऱ्या पक्षाच्या संमती मिळण्याच्या अधीन असते. | |
| ३ | **इतर समभाग (टिपा - १३) राखीव व अधिक्य राखुन ठेवलेले उत्पन्न** | | |
| ब) | केंद्रिय विद्युत नियामक आयोगाने (सीईआरसी) नऊ पारेषण मत्तांचे वार्षिक आंतरराज्य पारेषण आकार हे रु.५.९९ कोटींना मर्यादित ठेवले (डिसेंबर २०१७) कंपनीने जरी २०१८-१९ आणि २०१९-२० मध्ये प्रत्येकी रु.५.९९ कोटींचे * हुकुमनामा झालेले पारेषण आकार मान्य केले तरी २०१४-१५ ते २०१७-१८ दरम्यान याआधीच मान्य केलेले रु.२५१.११ कोटींचे अतिरिक्त पारेषण आकार अमान्य करण्यात आले नव्हते. याचा परिणाम राखून ठेवलेल्या उत्पन्नची रु.२५१.११ कोटींची अत्युक्ती झाली आणि तितक्याच रक्कमेची चालू दायित्वाखाली ग्राहकांकडून अग्रिम याची तदनरुप न्यूनोक्ती झाली. रु.४३९.०७ कोटींवर (२०१४-१७ करिता रु.२५१.११ कोटी आणि २०१८-२० करिता रु.१८७.९६ कोटी) व्याजाची सुद्धा तरतूद करण्यात आली नाही याचा परिणाम राखून ठेवलेल्या उत्पन्नची अत्युक्ती आणि ग्राहककांकडून अग्रिमाची न्यूनोक्ती झाली. कंपनीकडून तपशीलाअभावी देय त्याज निश्चित करणे शक्य नाही | सी इ आर सी कडे विनंती अर्ज क्र. २५६/टी टी /२०१३दि. १८.०५. २०१५ यामध्ये वि. वर्ष २०१३ - १४ चा दर रु. ७७.१०कोटी (प्रती वर्ष) होता. यात सी इ आर सी ने त्यांचा आदेश क्र. १७३/टीटी/२०१६ दि. १९.१२.२०१७ यामध्ये २०१४-१५ साठीच्यादरात (प्रतीवर्ष) रु. ०५.९९ साठी च्या दरात (प्रतीवर्ष) रु. ०५.९९ कोटी वाढविले. मात्र च्या सुधारित अर्जानंतरही पी जी सी आय् एल ने सप्टेबर २०१९ पर्यंत मागील आदेशानुसार पैसे भरले त्यानंतर पी जी सी आय् एल कडून मिळाली नाही.<br>महापारेषणने पी जी सी आय् एल सोबत मेळ करणे सुरु केलेले आहे. तसेच महापारेषणने सी इ आर सी कडे विनंती अर्ज दाखल करीत आहे. त्यात प्राप्त उदा. पारेषण आकारणी च्या समायोजनासाठी पद्धती अनुसरावी पी जी सी आय एल कडील शिल्लकीचा मेळ करणेसुद्धा चालू आहे. | या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती |
| ४ | **इतर समभाग (टिपा-१३) राखीव आणि अधिक्य** | | |
| | ह्यात २०१४-१५मध्ये उत्पन्न म्हणून मानलेल्या ओआरसी कामांच्या खर्चाच्या रु. ४४९.०० लाख रकमेचा समावेश आहे. कंपनीने वर्ष २०१६-१७ मध्ये आवश्यक समायोजन करण्याचे आश्वासन | कंपनीने मागील वर्षापासून क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आवश्यक खर्च मेळ मोहिम आधीच सुरु केली आहे आणि खर्च मेळ प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. सदर मेळ घेतला गेल्यानंतर ह्या ओआरसी ठेवा संबंधित मत्तांशी समायोजित केल्या जातील. | हा विषय आमच्या वि .वर्ष २०२३-२४ च्या स्वातंत्र वि.वि. पत्रकांच्या लेखापरिक्षण अहवालातील ग्राह्य मतांचा आधार यातील परिच्छे ३(जे) यात सामाविष्ट केले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | दिले होते. ह्या आश्वासनाचे अनुपालन न केल्याचा परिणाम हा राखीव आणि आधिक्याची तसेच स्थित मत्तांची रु. ४४९.०० लाखांनी अत्युक्ती होण्यात आणि घसारा व वर्षाचा तोटा यावर त्यानुसार परिणाम होण्यात झाला आहे. | | |
| ५ | **इतर समभाग (टिपा-१३)विशेष राखीव निधी रु.१३९.३९कोटी** | | |
| | इतर समभाग (टिप्पणी १३) विशेष राखीव निधी - रु. १३९.३९ कोटी<br><br>यात मवीनिआ विनियम २००५ च्या तरतुदीनुसार २०१३-१४ आणि २०१४-१५ मध्ये नफ्यातून विनियोजन झालेल्या रु. ७६.५८ कोटी रक्कमेचा समावेश आहे. जरी मवीविआ (एमवायटी) विनियम २०११ ने विशेष राखीव निधीचे गठन करण्याचे निरसन करुनही कंपनीने सन २०१३-१४ आणि २०१४-१५ मध्ये विनियोजन (जरी त्या कालावधीत कंपनीला नवीन विनियम लागू होते तरी) करणे सुरुच ठेवले. परिणामी विशेष राखीव निधीत रु. ७६.५८ कोटी रकमेचे अनधिकृत विनियोजन झाले आणि राखून ठेवलेले उत्पन्न याखाली तितक्याच रकमेची न्यूनोक्ती झाली आहे.<br><br>एप्रिल २०१५ पासून रु. १३९.३९ कोटींचा संचित विशेष राखीव निधी विनावापर पडून आहे | म. वि. नि. आयोग नियमन २००५ नुसार. कार्यक्षमता प्राप्ती / हानी याच्या एकूण रकमेची वाटणी खालील प्रमाणे केली जाते. एक तृतीयांश (१/३) भाग ही एस यूचा अन्य एक तृतीयांश विशेष राखीव म्हणून भविष्यातील नियंत्रण योग्य घटक (जर काही असल्यास) त्यासाठी ठेवावेत आणि उर्वरित एक तृतीयांश महापारेषणने घ्यावा.<br><br>त्या प्रमाणे महापारेषणने कार्यक्षमता प्राप्ती मधील एक तृतीयांश रक्कम विशेष राखीव लागू होते त्या वर्षाच्या विशेष राखीव निधीत ती गेली.<br><br>याशिवाय, म.वि.वि. आयोग (बहू वर्षीय दर) नियामन २०११ (बहू वर्षीय दर)महापारेषणला वि.वर्ष २०११-१२ पासून २०१२-१३ काळासाठी लाभ होते. महापारेषणने त्याला स्थगिती मागितली होती. अशा प्रकारे म. वि. नि. आयोग नियमन २००५ हे वि वर्ष २०११ - १२ आणि वि वर्ष २०१२-१३ यांना लागू करण्यात आले. केस क्र. २०७ वर्ष २०१४ दि. २६ जून २०१५ याच्या दर आदेश यात आयोगाने निर्देश प्राप्ती/लाभ याचा एक तृतीयांश (१/३) वाटा वि.वर्ष २०१२-१३ च्या विशेष राखीव यात समोजित करावा. त्यानुसार विशेष राखीव मधील तुटीसाठी वि.वर्ष २०१४-१५ दरम्यान तरतूद करण्यात आली. अशा प्रकारे नियमनांचे उल्लंघन झालेले नाही. तसेच वि. वर्ष २०१३-१४ आणि २०१४-१५ मध्ये दिलेली रक्कम वि.वर्ष २०११-१२ व वि. वर्ष २०१२ -१३ मधील तुटीसाठी होती.<br><br>याशिवाय नियमन क्र. १९.१ (बी) नुसार, भविष्यातील तोटे जर काही नियंत्रण करण्याजोग्या घटकांमुळे झाली तर विशेष राखीव च्या मदतीने त्याची भरपाई (ऑफसेट) करावी. महापारेषणने सं व सू. खर्चाचे केलेले दावे प्रमाणांपेक्षा कमी आहेत. अशा प्रकारे मागील समायोजनाच्या (trulvp) आदेशा पर्यंत कोणतेही तोटे / हानी नव्हते. म्हणून महापारेषणने मागील काही वर्षात विशेष राखीव निधीचा वापर केलेला नव्हता जर भविष्यातकार्य क्षमता हानी उद्धवली तर ह्या वेळी विशेष राखीलचा उपयोग करता येईल. मात्र आयोगाच्या दि.३०/०३/२०२३ च्या आदेशानुसार विशेष राखीव मधील उपरोक्त रकमेचे समायोजन महापारेषणच्या वि.वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ यातून वार्षिक ए.आर.आर.च्या गणनेसाठी करण्यात आला. म्हणून विशेष राखीवचे एम टी सी रिसिव्हीएबल सोबत समायोजन वि.वर्ष २०२३-२४ मध्ये केले जाईल. | हे समायोजन विद्यमान लेखा परिक्षणाच्या वर्षाचे आहे. या संबधी आम्ही व्यवस्थापनाकडे विचारणा केली. आणि आम्हास माहिती देण्यात आली की, या व्यवहाराच्या त्यांच्या वर्षात प्रक्रीया करण्यात आली आहे. आम्ही त्यावर अभिप्राय देण्यास असमर्थ आहोत कारण आमच्या लेखा परिक्षण म्हणून नियुक्ती वि. वर्ष २०२३-२४ साठी झाली आहे. |
| ६ | **इतर चालू नसलेली वित्तीय - दायित्वे (टिपा - १४.०२)** | | |
| अ) | ह्यात ओआरसी कामांच्या खाली बे (Bay) चे बांधकाम करण्यासाठी ठेवी म्हणून रु. ४००.०० लाख रकमेचा समावेश आहे. ज्याच्यासमोर सध्या असलेल्या बे (Bay) चे सदर पक्षांना वाटप करण्यात आले होते. त्यामुळे रु. ४००.०० लाख ही ठेव रक्कम | 'ओ आर सी' कामाच्या कार्यवाहीसाठी, ज्या संस्थासाठी कंपनी ही कामे करते / अमलात आणते त्यांच्याकडून अनामत / ठेव स्वीकारते. औरंगाबाद इ.एच.व्ही/(अ.उ.दा) मंडळाने ०७ ओ आर सी कामे केलीत्यासाठी पर्यवेक्षण आकारासह रु. २२१ लाख लागले. नागपूर संवसू मंडळाने २३७ लाख मुल्याची ०८ कामे पूर्ण केली कामे पूर्ण झाल्याचा अहवाल (W.C.R.) नोव्हेंबर २०१७ या महिन्यात मिळाला. भा.ले. धोरणाच्या संदर्भातील मार्गदर्शक सुचनांनुसार या मत्ताची ओळखनिश्चिती करुन स्थिर मत्तांच्या वहीत नोंदी झाल्यावर लेखा नोंदी मंजूर केल्या जातील. | हे समायोजन विद्यमान लेखा परिक्षणाच्या वर्षाचे आहे. या संबधी आम्ही व्यवस्थापनाकडे विचारणा केली. आणि आम्हास माहिती देण्यात आली की, या व्यवहाराच्या त्यांच्या वर्षात प्रक्रीया करण्यात आली आहे. आम्ही त्यावर अभिप्राय देण्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| | इतर उत्पन्नाखाली हस्तांतरित करुन वेगळी दाखवायला हवी होती. ह्याचा परिणाम इतर उत्पन्नाची रु. ४००.०० लाख इतक्या रकमेची न्यूनोक्ती होण्यात आणि चालू नसलेली दायित्वे आणि तोटा याची तितक्याच रकमेची अत्युक्ती होण्यात झाला आहे. | महापारेषण मध्ये स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करणे चालू आहे. ते पूर्ण झाल्यावर योग्य मत्ता ओळखणे व त्याचे मूल्य ठरवून त्याचे समायोजन ओ आर सी सोबत केले जाईल. | असमर्थ आहोत कारण आमच्या लेखा परिक्षण म्हणून नियुक्ती वि. वर्ष २०२३-२४ साठी झाली आहे. |
| ब) | वर्ष २०१५-१६ साठीच्या लेखापरिक्षण अभिप्रायांना उत्तर देताना कंपनीने वर्ष २०१६-१७ मध्ये स्थिर मत्ता समोर पूर्ण झालेल्या ओआरसी कामांच्या रु. ९०२६.०० लाख रकमेच्या ठेवी समायोजित करण्याचे आश्वासन दिले होते. ह्या आश्वासनाचे अनुपालन न करण्याचा परिणाम चालू नसलेली दायित्वे आणि स्थिर मत्ता याची रु.९०२६.०० लाख रकमेची अत्युक्ती सुरुच राहाण्यात आणि घसारा व वर्षासाठीच्या तोटा यांच्यावर परिणाम होण्यात झाला आहे. | कंपनीने क्षेत्रीय कार्यालयात मागील काही वर्षात आवश्यक तेथे मेळ करणे करिता एक मोहीम यापूर्वीचे सुरु केली आहे. मेळ केल्यानंतर ओ आर ठेवी संबधित मत्तां्सोबत समायोजित केल्या जातील. | या संक्षिप्त मजकूराचा समावेश अंतिम वि.वि. वर्ष २०२३-२४ व स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या लेखा परिक्षण अहवालाची ग्राह्य मत्तांचा आदर यातील परिच्छेद ३ (आय) व (जे) यामध्ये केलेला आहे. |
| क) | यात २०१८-१९ मध्ये पूर्ण झालेल्या आणि कार्यान्वित झालेल्या ओआरसी कामांच्या संदर्भातील रु. ४५.०९ कोटींच्या ठेवींचा समावेश आहे. ठेवींचे समायोजन केले गेले नसल्यामुळे ठेवींमध्ये रु. ४५.०९ कोटींची अत्युक्ती झाली असून भांडवली प्रगतिपथावरील कामे याखाली ओआरसी.. प्रगतिपथावरील कामे. यात तितक्याच रकमेची न्यूनोक्ती झाली आहे | यातील ३ कामांचे कॅपेक्स खर्च रु. ४०.९७ कोटी यांचे भांडवलीकरण करुन ठेवी वि. वर्ष २०१८-१९ मध्ये समायोजीत केल्या. (नॉक ऑफ) अन्य ०५ ओ आर सी कामांचा कॅपेक्स खर्च रु. ०४.१२ कोटी असून त्याचे भांडवलीकरण क्यू व्ही (QV) देयकाचे अंतिमीकरण झाल्यावर करण्यात येईल. | या संक्षिप्त मजकूराचा समावेश अंतिम वि.वि. वर्ष २०२३-२४ व स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या लेखा परिक्षण अहवालाची ग्राह्य मत्तांचा आदर यातील परिच्छेद ३ (आय) व (जे) यामध्ये केलेला आहे. |
| ७) | **इतर चालू वित्तीय वित्तीये दायित्वे (टिपा १८.३)** | | |
| | यात कंत्राटदारांकडून वसूल करावयाच्या आणि महाराष्ट्र शासनाला देय असलेल्या विमा प्रिमियम आकाराची रु.११.२४ कोटींच्या रकमेचा समावेश करण्यात आला नव्हता. कंत्राटदारांकडून सदर रकमेची वसुली न केल्यामुळे इतर चालू वित्तीय दायित्वात रु.११.२४ कोटींची न्यूनोक्ती झाली असून इतर चालू मत्तांमध्ये तितक्याच रकमेची न्यूनोक्ती झाली आहे. | विमा प्रिमियम संबधित कंत्राटदार यांचे कडून वसुली त्यांना (डिमांड नोट्स) माहिती पत्रे सादर करावी असे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. याशिवाय संबधितांची आर. ए. देयकांची प्रक्रीया करतांना संबधित रकमांचे समायोजन करण्यात येईल. | या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | **इतर चालू दायित्वे (टिपा क्र. १९)** | | |
| अ) | यात जुलै २०१० ते मार्च २०१८ या कालावधीसाठी (नाशिक प्रकल्प मंडळ) बांधकाम उपकराचे निर्धारण न करणे आणि वसूल न करणे यापोटी रु. १३.०६ कोटी रकमेचा समावेश नाही. याचा परिणाम इतर प्राप्य रक्कमा आणि इतर चालू दायित्वे याखाली रु. १३.०६ कोटीची न्यूनोक्ती होण्यात झाला आहे. | कामगार उपकराची वसुली करुन त्याचा भरणा संबधित पप्राधिकाऱ्याकडे केला जातो. उर्वरित रक्कम संबधित विक्रेते यांच्या येणाऱ्या देयकातून वसुली करुण व त्याचा भरणा तात्काळ करण्यात येईल.<br><br>अहवालाच्या तारखेपर्यत रु. ७.७५ लाख वसुल करण्यात आली. त्याची माहिती पत्रक सोबत जोडले आहे. तसेच येथे निवेदन करण्यात येते की, मेसर्स ॲरेव्हा टी ॲड डी. लि. यांचेकडून कामगार उपकराचे रु. ०.९७ कोटी वसुल करता आलेले नाही. पहावे संबधित पत्र क्र. एम एस इ सी टी एल / ए ओ /एफ ॲण्ड ए / ९१५६ दि. ०३/१२/२०१९ त्याची प्रत जोडली आहे. | या संबधित मजकूरांचा समावेश आमचा वि. वि.पत्र २०२३-२४ च्या स्वायत्त वि. वि. पत्राचे लेखा परिक्षण अहवालात पात्र मत्तांचा आधार यातील परिच्छेद क्र. ३ (वाय) वर यात केलेला आहे. |
| ब) | सीजीएसटी कायदा २०१७च्या कलम २(३१) नुसार वस्तूचा मोबदला म्हणून सेवा देणे याकरिता मोबदला म्हणून प्राप्त झालेल्या ठेवींना वस्तू आणि सेवा कर (वसेक) लागू आहे. कंपनीने ओआरसी ठेवींवर वसेक गोळा केला नाही आणि भरला नाही. परिणामी वसेकराचे रु. ४३.१३ कोटींचे कमी मूल्यनिर्धारण आणि वसूली | महापारेषण कंपनी तिच्या थेट ग्राहकांची कामे सुरु करण्यापूर्वी ओ आर सी ठेवी स्वीकारते. अशा त्या ठेवी ती नोंद लेखा वहीत करते. ताळेबंद त्या दायित्वांच्या बाजूला दाखवत जातात. अशा कामासंबधिच्या सर्व कृती पूर्ण झाल्यानंतर बांधकाम/अन्यकामे यांच्या खर्चासोबत मेळ केला जाते. बांधकाम चालू असतांनाच्या पायरीवर या कामांचा खर्च प्रगतीपथावरील भांडवली कामे (कॅपीटल सीडब्ल्यू पी) असा दाखवण्यात येतो. आणि कामे पूर्ण झाल्यानंतर, ठेवीच्या रकमेचा मेळ कामाच्या एकूण खर्चासोबत केला जातो. अशा मत्तांचे भांडवलीकरण महापारेषणच्या लेखा वह्यात रु.१(एक) असे केले जाते. या मत्तांचे प्रवर्तन व देखभाल (ऑपरेशन ॲण्ड मेंटेनन्स) महापारेषण करते. अशा मत्ता ओ आर सी ग्राहकांकडे हस्तांतरित केल्या जात नाहीत. त्यामुळे ही पुरवठ्याची सेवा आहे की अन्य काही आहे. या विषयी अस्पष्टता होती. | या विषयाची स्थिती जैसे थे आहे. वि.वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखा परिक्षणात, आम्ही त्यावर विचारणा केली. आणि व्यवस्थापनाची उत्तरे येथे दिलेल्या माहितीशी सातत्य राखणारी होती |
| | | महापारेषणने ॲथारिटी ऑफ ॲडव्हान्स रुलींग एए आर), जी एस टी डिपार्टमेंट यांचे कडून ॲडव्हान्स रुलींगसाठी अर्ज केला (ए आर एन ए डी २७०४१९०१९७८२ एस दि. २५/०४/२०१९ त्यात, समर्पित वितरण सेवा (डी डी एफ) / समर्पित पारेषण प्रणाली (ओ आर सी) याला जी एस टी लागू असल्याबद्दल विचारले. हे प्रकरण उत्तराच्या तारखेपर्यंत आदेशासाठी प्रलंबित आहे. तरीही महापारेषण नेमस्त उपाय म्हणून मे- १९ मध्ये एक परिपत्रक ावतरीत केले, त्यात ओ आर सी कामाच्या अंदाजे खर्चात पर्यवेक्षणाचा आकार समाविष्ट करावा आणि जी एस टी प्राधिकारी यांचेकडे भरण्यासाठी जी एस टी आकारणी करुन ठेवावी. असे आदेश दिले.<br><br>जुलै १७ ते मार्च १९ या कालावधीतील ओ आर सी ठेवीवर जी एस टी गोळा करण्यासाठी याचा निर्णय एए आर यांचा आदेश / निकाल यानुसार घेण्यात येईल.<br><br>एए आर यांचा / आदेश यांची प्रतिक्षा करण्यात येत आहे. दरम्यान महापारेषण ने एए आर सोबत पत्रव्यवहार चालू ठेवला आहे पत्र क्र. ४४६ दि. १७/०१/२०२० आणि क्र. २६५० दि. ३१/०७/२०२० पहावे. | |
| क) | **इतर अभिप्राय महत्वाची** | | |
| १ | **लक्षणीय लेखांकन धोरणे** | | |
| अ) | वर्ष २०१४-१५ ते २०१६-१७ मध्ये आणि २०१९-२० मध्ये रु.९५.२० कोटींच्या कंपनी सामाजिक जबाबदारी तरतुदीसमोर कंपनी सीएसआर प्रकल्पांवर २०१६-१७ ते | कंपनीने ३० एप्रिल २०२१ पर्यंत खर्च न केलेल्या वर्ष २०२०-२१ मधील रकमा तरतुदीनुसर वेगळ्या बँक खात्यात जमा केल्या आहेत:-<br>१) रु. २,७१६.५३ लाख - ३० एप्रिल २०२१<br>२) रु. २,५००.०० लाख २५ मे २०२१<br>३) रु. २,८४८.०१ लाख - २८ मे २०२१ | या संबधित मजकुराचा समावेश आमच्या वि. वर्ष २०२३ -२४ च्या स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या अहवालाचे जोडपत्र क्र (सी) यातील परिच्छेद एक्स एक्स (अ) आणि (ब) येथे केला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | २०१९-२० या दरम्यानच्या कालावधीत फक्त रु.२०.३७ कोटी खर्च करु शकली आणि मार्च २०२० अखेर रु.७४.८३ कोटी (७८.६० टक्के) खर्च झाले नाहीत. मात्र, कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३४ च्या उपविभाग (३) च्या कलम ओ खाली तयार केलेल्या वार्ष २०१८-१९ या वर्षासाठीच्या आपल्या अहवालात संचालक मंडळाने रक्कम अखर्चित राहाण्याची कारणे विर्निदिष्ट केली नाहीत | या शिवाय कंपनीने वि. वर्ष २१-२२ मध्ये तरतूद केलेल्या परंतु खर्च न केलेली रक्कम रु. १,७४३.२६ लाख एका वेगळ्या बँक खात्यात दि. २९ एप्रिल २०२२ रोजी जमा केलेली आहे. ही वस्तूस्थिती वित्तीय वि. पत्रांत प्रकट केली आहे. | |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड च्या ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांवरील जोडपत्र 'क' स्वतंत्र लेखा परित्रकांच्या अहवालातील इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांवर अहवाल या प्रकरणातील परिच्छेद १२)

(समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर आणि नियामकांच्या आवश्यकता या प्रकरणातील परिच्छेद क्र. १२ याच्या संदर्भानुसारचे जोडपत्र 'क'

| अनु क्र. | लेखापरीक्षकांचा शेरा | महापारेषणचे उत्तर |
|---|---|---|
| १ | **स्वायत्त वि. वि. पत्रकांच्या लेखा परिक्षणासाठी लोखा परिक्षकांची जबाबदारी** | |
| | अ) ज्या मत्तांचा वापराचा हक्क मिळालेला आहे. त्यांचा संख्यात्कम माहितीसह संपूर्ण तपशील त्या मालमत्ता कारखाना व साधने यांची स्थिती व संबंधित वर्णन यांचे योग्य अधिलेख कंपनीने जतन केलेले नाहीत. त्यांचा तपशील येथे खालील तक्त्यात दिलेला आहे.<br><br>**मालमत्ता, कारखाने व साधने यांचे वर्णन** आणि वापराच्या हक्का संबंधीचा तपशील — **रक्कम (रु. लाखात)**<br>पी पी ई — १५,५२,३४०.९७<br>आर ओ यू — १५,२९४.४२ | महापारेषणने सॅप/इ आर पी कार्यवाही सुरु केली आणि स्थिर मत्तांची रजिस्टर्स अद्यावत करण्याचे काम केले. त्यात संख्यात्मक बदल समाविष्ट केले हे काम पूर्ण करण्याच्या सुचना तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना दिले. |
| | कंपनीने अमूर्त मत्तांची संपूर्ण माहिती देणारे अभिलेख (रेकॉर्ड) योग्य प्रकारे जतन केलेले नाहीत. तपशील खालील प्रमाणे आहे.<br><br>**अमूर्त मत्तांचे वर्णन** — **रक्कम (रु. लाखात)**<br>डेव्हिएशन सेटलमेंट मेकॅनिझम सॉफ्ट वेअर — ५.१४ | महापारेषणने सॅप/इ आर पी कार्यवाही सुरु केली आणि स्थिर मत्तांची रजिस्टर्स अद्यावत करण्याचे काम केले. त्यात संख्यात्मक बदल समाविष्ट केले हे काम पूर्ण करण्याच्या सुचना तात्काळ करण्याचे आदेश क्षेत्रीय कार्यालयांना दिले. |
| | ब) कंपनीच्या मालमत्ता, कारखाने, साधने यांची पडताळणी या वर्षी व्यवस्थापनाने केलेली नाही. त्यामुळे त्या मोठ्या प्रमाणात विसंगती असल्यास तिची निश्चिती करता येत नाही. आणि म्हणून जर अशी मोठी विसंगती असेल तर त्यांचे लेखा वह्यातील योग्य नोंदणी केली किंवा नाही यावर आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही. | पि. पि. इ. संबंधी ठरावीक कालावधी नंतर प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे धोरण तयार करण्याचे काम कंपनीने हाती घेतलेले आहे. |
| | क) स्वायत्ता वि.वि. पत्रकातील स्थावर / अचल मालमत्ता यांच्याशी निगडीत काही दस्तऐवज कंपनीकडे योग्य स्वरुपात नाहीत / त्यांचे अद्यावतीकरण केलेले नाही. किंवा त्याचा ३१ मार्च २०२४ रोजीच्या स्थापन वि.वि. पत्रकांसोबत मेळ केलेला नाही. त्यांचे योग्य व पूर्ण अभिलेख नसल्याने या सर्व स्थावर मालमत्तांची नोंदणी कंपनीच्या नांवे असल्याबद्दल आम्ही काही सांगू शकत नाही. | जमिनी / भाडे पट्टीच्या जमिनी यांच्या तयार मिळालेल्या कागदपत्रांची जुळवणी प्रगतीपथावर आहे. मात्र ही कागदपत्रे विविध जमिनीच्या प्राधिकाऱ्यांकडून मिळवायच्या असल्याने परिक्षेत्र कार्यालयांना त्यासाठी वेळ लागत आहे. |
| | ड) (जसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर मालकीचे नाव असणे, इ.) मालमत्ता, कारखाना व साधने / वापर हक्क असलेल्या मत्तांसह) यांचे किंवा अमूर्त मत्ता यांचे किंवा दोन्हीचे पूनर्मूल्यांकन या वर्षी केलेले नाही. त्यामुळे आदेशातील परिच्छेद ३ (आय्) (डी) यातील आवश्यकता कंपनीला लागू नाहीत. | वस्तूस्थिती |
| | इ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार वेळोवेळी दुरुस्ती केलेला बेनामी व्यवहार (मनाई) अधिनियम १९८८ आणि त्याची तयार केलेली नियमावली, यानुसार बेनामी मालमत्ता धारण करणे यासाठी कंपनी विरोधात कोणतीही कारवाई सुरु केलेली नाही किंवा प्रलंबित नाही, म्हणून आदेशातील परिच्छेद ३ (आय) (इ) कंपनीत लागू नाही. | वस्तूस्थिती |
| २ | अ) व्यवस्थापनाने या वर्षी वस्तूमाल सूचीची प्रत्यक्ष पडताळणी केली. आमच्या मते पडताळणी करण्याची मुदत, पडताळणीची व्याप्ती व कार्यपद्धती हा रास्त व योग्य आहे. ती कंपनीचा आकार व कायचे स्वरुप याच्याशी सुसंगत आहे. कंपनीने विसंगती शोधून त्यांचे समायोजन केले आहे. मात्र त्यांची विशेषकरुन ओळख निश्चिती केलेली नाही. म्हणून वस्तूमानातील प्रत्येक श्रेणीतील अशा विसंगत एकत्रितपणे १० टक्के पर्यंत आहेत की, त्यापेक्षा जास्त आहेत. यावर आम्हाला मत देता येत नाही. | संबधीत भांडवलातील लेखावह्यांतील नोंदी व प्रत्येक्षात त्यातील जास्त / कमी माल असल्यास त्याचा योग्य मेळ करावा अशा सुचना व्यवस्थापनाने दिल्या आहेत. |
| | बी) कंपनीने या वर्षात चालू मत्तांची सुरक्षा याच्या आधारे कोणतेही खेळते भांडवल मंजूर केलेले नाही. त्यामुळे आदेशातील खंड (क्लॉज) ३ (ii) (b) या कंपनीला लागू नाही. | वस्तूस्थिती |

| | | |
|---|---|---|
| ३ | आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार, कंपनीने कोणत्याही कंपनी, संस्था, मर्यादित दायित्वांच्या भागीदारी संस्था (एल एल पी) किंवा अन्य कोणत्याही व्यक्ती / संस्था यांच्याकडे कसलीही गुंतवणूकी केल्या नाहीत. कुणालाही कसली हमी, गहाणीवर किंवा गहाणीशिवाय कर्जे दिलेली नाहीत. म्हणून आदेशातील परिच्छेद (३)(iii) मधील आवश्यकता कंपनीला लागू नाहीत. | वस्तूस्थिती |
| | (ए) कंपनीने या वर्षात अस्तित्वात असलेल्या अन्य कोणत्याही संस्थेला कोणतेही कर्ज किंवा कर्जाच्या स्वरुपात अग्रिम दिलेला नाही किंवा कुणालाही कसलीही हमी दिलेली नाही यामुळे आदेशातील खंड ३(iii) (ए) कंपनीला लागू नाही. | |
| | (बी) आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे आणि आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या कार्यपध्दती यानुसार आमचे असे मत आहे की, कंपनीने केलेल्या गुंतवणूकी आणि केलेल्या गुंतवणूकी च्या अटी आणि शर्ती या कंपनीच्या हितसंबधांना बाधक नाहीत | वस्तूस्थिती |
| ४ | आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम क्र. १८५ व १८६ यातील तरतूदी लागू होतील अशी कोणतीही कर्जे, गुंतवणूकी, हमी आणि गहाणवटी नाहीत त्यामुळे आदेशाची कलमे ३(iv) कंपनीला लागू नाही. | वस्तूस्थिती |
| ५ | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, कंपनीकडे सुरक्षा अनामतीच्या सिलकी ३६५ दिवसांपेक्षा जास्त दिवसापासून जमा आहेत. त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७३ मधील तरतुदीनुसार त्यांना ठेवी मानण्यात येते. परिणामी कंपनीकडून कलम ७३ ते ७६ यातील तरतुदींचे उल्लंघन झालेले आहे. त्याचा तपशील.<br>**स्वीकारलेल्या अनामती** / **उल्लंघनाचे स्वरुप** / **रक्कम (रु. लाखात)**<br>सुरक्षा प्रतिभूती / ३६५ दिवसांपेक्षा जास्त दिवस / १४,७७६.९९ | कामाच्या आदेशाप्रमाणे सुरक्षा अनामती घेण्यात येतात आणि कंत्राटाची पूर्णता झाल्यावर त्या परत केल्या जातात मात्र त्यात कोणताही दंड किंवा वसुली नसते. असल्यास देय ठेवत त्याचे समायोजन केले जाते. मात्र या व्हेंडरच्या ठेवी कंत्राटातील बंधनाप्रमाणे असतात. त्या जनतेच्या ठेवी नव्हेत. |
| ६ | भारत सरकारने केलेल्या नियमानुसार कंपनीला, कंपनी अधिनीयम २०१३ च कलम १४८ (१) यात निर्देशीत केल्याप्रमाणे कंपनीची उत्पादने / सेवा या संबधीच्या खर्चाचे अभिलेख तयार करणे आवश्यक आहे. आम्ही त्याचा स्थूल आढावा घेतला आणि आमचे प्रथमदर्शनी असे मत झाले आहे की, कंपनीने तसे अभिलेख तयार केलेले असून ते जतन केले आहेत. मात्र ते अभिलेख अचूक आणि परिपूर्ण आहेत किंवा नाहीत हे ठरविण्यासाठी आम्ही त्यांचे तपशीलवार परिक्षण केलेले नाही. | खर्च लेखापरिक्षण पूर्ण झाले असून खर्च लेखा परिक्षकांनी त्यांचा अहवाल दिला आहे. |
| ७ | अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि आम्ही केलेले अभिलेखांचे परिक्षण यानुसार, आमचे मत असे आहे की, कंपनीने खालील सांविधिक देणी निश्चितपणे योग्य त्या प्राधिकाऱ्यांकडे जमा केलेली आहेत. काही ठिकाणी मात्र अल्पसा विलंब झालेला आहे. अशी वस्तूमाल व सेवा कर, भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर आहे.जमा केलेली देणी अशी :- वस्तूमाल व सेवा कर, भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर विक्री कर, सीमाशुल्क सेवा कर, उत्पादन शुल्क, मुल्यवर्धीत कर, उपकर आणि इतर सांविधिक देणी. | वस्तूस्थिती |
| | आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालातील "ग्राह्य मतांचा आधार" यातील परिच्छेद क्र. ३ (क्यू)याकडे लक्ष वेधण्यात येते. यामध्ये आम्ही नमुद केले आहे की, राज्य देणी याची रक्कम रु ३,५७८.७३ लाख यामध्ये जुनी दायित्वे असून ती मेळ करणाच्या अधीन आहेत. त्यांचा मेळ होणारी समायोजने / समेट यांच्यावर अभिप्राय करण्यास आम्ही असमर्थ आहोत. उपरोक्त सांविधिक देणी यांच्या अधीन राहून असे दिसते की, ३१ मार्च २०२४ रोजी देय तारीख ६ महिने पेक्षा जास्त आहे, अशी बाद नसलेली कोणतीही सांविधिक देणी शिल्लक नव्हती. | संबधित विषयावर योग्य प्रतीसाद दिला आहे. |

ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि कंपनीच्या अभिलेखांचे परिक्षण यानुसार उपखंड (ए) यात नमुद केल्याप्रमाणे ३१ मार्च २०२४ पर्यंत जी सांविधिक देणी काही वादांमुळे भरण्यात आलेली नाहीत. त्यांचा तपशील खालील तक्त्यात दिलेला आहे.

| सांविधीचे नांव | देण्याचे स्वरुप | मागणी केलेली रक्कम (रु. लाखात) | रकमेचा कालावधी | जेथे वाद प्रलंबित आहे, त्या मंचाचे नांव | |
|---|---|---|---|---|---|
| आयकर कायदा १९६१ | आयकर | १९,०००.८४ | २००९-१० | आयकर आयुक्त (अपील्स) | सुनावणीची प्रतिक्षा आहे |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | ३१०.३५ | २०१०-११ | आयकर आयुक्त (अपील्स) | सुनावणीची प्रतिक्षा आहे |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | ४,२१२.९८ | २०१३-१४ | आयकर आयुक्त (अपील्स) | सुनावणीची प्रतिक्षा आहे |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | ९३६.८७ | २०१३-१४ | आयकर आयुक्त (अपील्स) | सुनावणीची प्रतिक्षा आहे |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | १७,५२४.४७ | २०१४-१५ | आयकर आयुक्त (अपील्स) | अभिलेखाप्रमाणे २०१८ मध्ये प्रकरण सादर केले. सुनावणी झाली. अद्याप आदेश दिला नाही.नवी सूचना मिळाली नाही. |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | ७,१०७.६८ | २०१६-१७ | आयकर आयुक्त (अपील्स) | सुनावणीची प्रतिक्षा आहे |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | १४.२७ | २०१८-१९ | आयकर आयुक्त (अपील्स) | सुनावणीची प्रतिक्षा आहे |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | ८,२४५.५१ | २०२०-२१ | आयकर आयुक्त (अपील्स) | आयकर अभिनियम १९६१ चे कलम १४३ (३) नुसार २४ सप्टे. २०२२ रोजी मागणी केली. कंपनीनेसुद्धा सी आय टी (ए) यांचेमध्ये अपील केली.सुवणांची प्रतिक्षा आहे |
| आयकर कायदा १९६१ | आयकर | ९६.६० | २०२१-२२ | आयकर आयुक्त (अपील्स) | दि. १३ नोव्हें. २०२२ रोजी सुचना (ए - १५४) दाखल केली. लेखा / कायदेशीर निवेदन सादर केले. सी आय टी (ए) यांच्या आदेशाची प्रतिक्षा आहे. |

| | | |
|---|---|---|
| ८ | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीच्या कर निर्धारण वर्षात असा कोणताही व्यवहार नाही की, ज्या लेखा वहीत लेखा नोंद केलेली नाही. आणि जो उलट म्हणून परत केलेला नाही किंवा प्रकट केलेला नाही. याशिवाय, पूर्वी नोंद न झालेले उलट आता लेखा नोंद वहीत नोंद केलेले नाही. यामुळे आदेशातील परिच्छेद - ३ (viii) ची तरतुद कंपनीला लागू नाही. | वस्तूस्थिती |
| ९ | ए) आमच्या मते आणि आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार, कंपनीने कोणत्याही कर्जदारांकडून घेतलेले कर्ज, आनवारी आणि त्याचे व्याज यांची परफेड करण्यात कसूर केलेला नाही. | वस्तूस्थिती |
| | बी) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे तसेच आमच्या लेखा परिक्षणाच्या कार्यपद्धतीनुसार, आम्ही असा अहवाल नोंदतो की, कोणतीही बँक अथवा वित्तीय संस्था किंवा सरकार किंवा शासकीय प्राधिकरण यांनी ही कंपनी स्वेच्छेने कसूर करणारी कंपनी आहे असे कधीही घोषित केलेले नाही. | वस्तूस्थिती |
| | सी) आमच्या मते आणि आम्हास दिलेली स्पस्टीकरण यानुसार मुदतीची कर्जे या प्रकारे कोणताही पैसा दिलेला नाही. त्यामुळे आदेशातील खंड ३(ix)(सी) यातील तरतुदी कंपनीला लागू नाहीत. | वस्तूस्थिती |
| एफ) | सुत्रधारी कंपनी आणि तिच्या सहयोगी कंपन्या यांच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचा पुरेसेपणा आणि अशा नियंत्रणांचा कामकाजांवर प्रभाव याकरिता "जोडपत्र ब" यात समाविष्ट केलेला आमचा वेगळा अहवाल पहावा. | संबधित विषयांसह योग्य प्रतिसाद दिला आहे. |
| जी) | आमच्या मते आणि सुत्रधारी कंपनीने, कायद्यानुसार आवश्यक लेखा नोंद वह्याचे योग्य प्रकारे जतन केलेले आहे, असे आम्ही त्या लेखा नोंद वह्यांचे परिक्षण केले असता दिसून आले. मात्र यात खालील नियम ११ (जी) नुसार करावयाच्या अहवालाचा अपवाद आहे. खालील परिच्छेद (एच) (६) या मधे ११ (जी) नुसार करावयाच्या अहवाला बाबत मजकूर दिला आहे. तसेच अधिनियमनचे कलम १४३ (३)(बी) आणि नियम ११(जी) नुसार अहवाल देताना लेखा वह्यांचे व्यवस्थापन, जतन करणे व संबधित इतर विषय यातील राखीव बाबी वरील परिच्छेद १६ (बी) यामधे नमूद लेलेल्या आहेत. | वस्तुस्थिती |
| एच) | कंपनी (लेखापरिक्षण व लेखापरिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम ११ नुसार लेखापरिक्षकांच्या अहवालात समाविष्ट करावयाचे इतर विषय याबाबत आमच्या मते व आम्हास दिलेली सर्वतोपरी माहिती व स्पष्टीकरणे यानुसार खालील बाबी नोंदण्यात येतात. | वस्तुस्थिती |
| i) | वरील परिच्छेद ३ (v) यात नमूद केलेल्या बाबी वगळता, एकत्रित वि.वि. पत्रकामध्ये सूत्रधारी कंपनी व तिच्या सुत्रधारी यांच्या प्रलंबित कायदेविषयक प्रकरणांचा संभाव्य परिणाम प्रकट केला आहे. ए. वि.वि. पत्रांची टिपा ४२ पहावी. | वस्तुस्थिती |
| ii) | सुत्रधारी कंपनी व सहयोगी कंपन्या यांना दिर्घ मुदतीचा भविष्यात कोणताही मोठा तोटा होण्याची शक्यता नाही यात आर्थिक करारांचा समावेश आहे. | वस्तुस्थिती |
| iii) | सुत्रधारी कं. आणि सहयोगी कंपन्या यांना गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीत स्थानांतरीत करण्याजोग्या कोणत्याही रक्कमा नाहीत. | वस्तुस्थिती |
| iv) | १) भारतात समाविष्ठ असलेल्या होल्डिंग कंपनी आणि तिच्या संबंधित व्यवस्थापनांनी असे निवेदन केलेले आहे की त्यांचे सर्वोतपरी उत्तम ज्ञान व विश्वास यानुसार कंपनीने अन्य कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेला कोणताही अग्रिम निधी किंवा कर्जाऊ रक्कम किंवा गुंतवणूक (कर्जाच्या पैशातून किंवा शेअर अधिमुल्य किंवा अन्य कोणत्याही स्त्रोत - यामध्ये परकीय संस्था (मध्यस्थ) समाविष्ट यासाठी दिलेले नाहीत. असे कोणतेही नोंदलेले किंवा अन्यप्रकारे सामंजस्याचा व्यवहार केलेले नाहीत. ज्यात सदर 'मध्यस्थ' कोणत्याही प्रकारे थेट किंवा अप्रत्यक्षरित्या कंपनीच्या वतीने अंतिम लाभार्थी अन्य कुणा व्यक्तीला कर्ज देणे किंवा त्यात गुंतवणूक करणे असे व्यवहार करते किंवा अंतिम लाभार्थांच्या वतीने प्रतिभूती किंवा हमी देते, असे किंवा तत्सम व्यवहार केलेले नाही. | वस्तुस्थिती |
| | 2) भारतात समाविष्ठ असलेल्या होल्डिंग कंपनी आणि तिच्या संबंधित व्यवस्थापनांनी असे निवेदन दिलेले आहे की त्यांचे सर्वोतपरी उत्तम ज्ञान व विश्वास यानुसार कंपनीस कोणतीही व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून लेखापरिक्षणाच्या काळात कोणताही निधी मिळालेला नाही. यामध्ये परकीय संस्थाचाही समावेश आहे. या परकीय संस्था (फंडीग पार्टीज) यांचेकडून असे लेखी किंवा अन्य प्रकारे असे सामंजस्याचे व्यवहार लेखा परिक्षणाच्या या अहवालाच्या तारखेपर्यत झालेले नाही. या व्यवहारात फंडीग पार्टीज् (अंतिम लाभार्थी) यांच्यासाठी / त्यांच्या वतीने कंपनी कोणत्याही अन्य प्रकारे ओळख पात्र असलेल्या व्यक्ती / संस्था यांना थेट किंवा अप्रत्येक्ष प्रकारे थेट किंवा अप्रत्यक्षरित्या कर्ज देणे. किंवा गुंतवणूक करणे किंवा त्यांना हमी, प्रतिभूती किंवा तत्सम व्यवहार करते. मात्र तसे कोणतेही व्यवहार कंपनीने केलेले नाहीत. | वस्तुस्थिती |
| | iii) आम्ही आमचे लेखापरिक्षण आम्हास परिस्थितीनुसार वाटलेल्या प्रमाणशीर व योग्य कार्यपद्धतीने केले. तसेच भारतात गठीत झालेल्या सुत्रधारी कं. च्या उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्या ज्यांचे वि.वि. पत्रकाचा लेखापरिक्षण अधिनियमानुसार केले. त्याच्या आधारे आणि आम्हास सूत्रधारी कं. च्या व्यवस्थापनाने कामासंबधी दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आणि आमच्या किंवा अन्यलेखापरिक्षकांच्या निदर्शनास असे काहीही आलेले की ज्यामुळे नियमावलीतील नियम क्र. ११ (इ) यातील सबक्लॉज (i) व (ii) यानुसार वरील (१) व (२) नुसार ज्यात कोणतेही मोठया प्रकारचे चुकीचे विवरण झाले आहे. असा विश्वास आम्हाला किंवा अन्य लेखापरिक्षकांना वाटावा. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | | |
| v) | सूत्रधारी कंपनीने या वर्षी कोणतीही लाभांश दिलेला नाही. सहयोगी कंपन्यांची या वर्षी मागील वर्षा प्रमाणे समान लाभांश जाहीर केला होता कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १२३ हे लाभांशाचे पैसे देण्यासाठी ज्या मर्यादेत लागू होते. त्यानुसार तसे केले. | वस्तुस्थिती |
| vi) | आम्ही केलेले परिक्षण आणि भारतात गठीत झालेल्या सहयोगी कंपन्यांच्या वेगवेगळ्या वि. वि. पत्रकांचे अन्य लेखापरिक्षकांनी केलेले परिक्षण यांच्या आधारे असे दिसून आले की सुत्रधारी कंपनीने तिच्या लेखा नोंद वह्या जतन करण्यासाठी जे सॉप्टवेअर वापरले आहे, त्यामध्ये लेखापरिक्षणाचा पाठपुराव्याची नोंदणी करण्याची सुविधा (ऑडीट ट्रेल) आहे. या ऑडीट ट्रेल सुविधेचा वापर वर्षभरामधे लेखा सॉप्टवेअर मधील नोंदलेल्या सर्व व्यवहारात करण्यात आला. या शिवाय आमच्या लेखापरिक्षणाच्या कालावधीत सदर ऑडीट ट्रेल बिघडल्याचे आम्हाला आढळले नव्हते. फक्त भारतात गठीत झालेल्या दोन सहयोगी कंपन्यांचा याला अपवाद आहे. तेथे डेटा बेसच्या लेव्हलवर सॉप्टवेअर ॲप्लीकेशनमधे ऑडीट ट्रेल चा वापर सामर्थ्याने केले नव्हता. | वस्तुस्थिती |
| १७ | कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसुचना क्र. ४६३ (इ) दिनांक ०५ जून २०१५ यात या प्रमाणे अधिनियमाचे कलम २ (४५) यातील अर्थानुसार ही सहकारी असल्याने, तिला कलम १९७ च्या व्यवस्थापकीय तरतुदी सूत्रधारी कंपनीला लागू होत नाहीत.इतर लेखा परिक्षकांनी, भारतात गठीत झालेल्या सहयोगी कंपन्यांचे (ज्यांचे लेखापरित्रण आम्ही केलेले नाही) लेखापरिक्षणाच्या अहवालानुसार, सदर कलम एका कंपनीला लागू नाही. अन्य कंपनीच्या प्रकरणात निवेदी तिच्या संचालकांना कोणतेही परिश्रमीक दिलेल नव्हते. | वस्तुस्थिती |
| १८ | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे, यानुसार तसेच आमचा कंपनीज् ऑडीटर्स रिपोर्ट ऑर्डर्स (सी. ए आर ओ) अहवाल यनुसार आणि या एकत्रित वि. वि. पत्रकांमधे समाविष्ट केलेल्या इतर सहयोगी कंपन्यांच्या सांविधिक लेखा परिक्षकांनी दिलेले व लागू असलेले सी. ए आर ओ अहवाल यांचा विचार केल्यानंतर आम्ही असा अहवाल देतो की या विषयी कोणतेही ग्राह्यतेबाबत / प्रतिकूल अहवाल नाहीत. | वस्तुस्थिती |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या समान तारखेच्या अहवालाचे जोडपत्र अ

| लेखा परिक्षकाच्या अहवालातील अभिप्राय | महापारेषण कंपनीचे उत्तर |
|---|---|
| **एकत्रित वि.वि.पत्रकांच्या लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी** | |
| लेखा परिक्षणांच्या मानकांना (SAs) अनुसरुन, लेखा परिक्षणांचा एक भाग म्हणून आम्ही व्यवसायिक न्यायबुद्धीचा व्यावसायिक संशयवाद बाळगतो. तसेच आम्ही खालील पद्धतीने कामे सुद्धा करतो:- | |
| • एकत्रीत वि. वि. पत्रकात लबाडी किंवा चुका यामुळे मोठ्या प्रमाणात गैर विवरण होण्याचे धोके असतात आम्ही अशा धोक्यांची ओळख निश्चिती व निर्धारण करण्याकरिता त्यासाठी प्रतिसाद योग्य लेखापरिक्षण पद्धतीची रचना करुन त्यानुसार कार्य करतो. त्यातून आमच्या मत्तांना आधार देण्यासाठी पुरेशा प्रमाणात व रास्त पुरावे मिळवितो. चुकांमुळे होऊ शकणाऱ्या गैर विवरणांचे लबाडीने मोठ्या प्रमाणात गैर विवरण होण्याचा धोका अधिक असतो. कारण लबाडीमध्ये संगणमत. बनावटी, हेतुपुरस्कार माहिती वगळणे, चुकीचे निवेदन देणे किंवा अंतर्गत नियंत्रणां चे पायमल्ली करणे अशा कारवाया होऊ शकतात. | वस्तुस्थिती |
| • लेखा परिक्षणासाठी सुसंगत अशी अंतर्गत नियंत्रणे आहेत. याचे हमी मिळविण्याच्या दृष्टिने परिस्थितीनुरुप योग्य ठरतील अशा लेखा परिक्षण कार्यपद्धतीची रचना आखणे आवश्यक असते. तसेच अधिनियमाचे कलम १४३ (३)(i) यानुसार एकत्रीत वि.वि. पत्रकांमध्ये कंपनी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशा प्रमाणात योग्य जागी आहेत किंवा नाहीत आणि असल्यास त्याची प्रभावी कार्यवाही होते काय या बाबत मत व्यक्त करणे ही सुद्धा आमची जबाबदारी आहे. | संबधित विषयांवर उचित प्रतिसाद दिला आहे. |
| • व्यवस्थापनाने ठरविलेल्या लेखांकनाच्या धोरणांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, लेखांकनासाठी केलेल्या अंदाजा योग्यता ठरविणे आणि व्यवस्थापनाने केलेली संबंधित प्रकटने तपासणे. | वस्तुस्थिती |
| • कंपनी ही लेखांकनाच्या आधारे सतत चालू राहणारी व्यवसाय संस्था आहे. व्यवस्थापनाचे मत्ताला योग्य आधार असण्याचा निष्कर्ष करणे. आणि सतत चालू राहणारी व्यावसायिक संस्था म्हणून भविष्यकाळातही कार्यरत राहील यासाठी कंपनीची पात्रता असल्याबद्दल मोठा संशय निर्माण करील अशा मोठया प्रकारच्या अनिश्चितता दर्शक घटना, प्रसंग किंवा स्थिती अस्तित्वात आहे किंवा नाही याबद्दल लेखा परिक्षणातून पुरावे मिळविणे. व योग्य असा निष्कर्ष काढणे. जर आम्ही अशा निष्कर्ष काढला की मोठ्या प्रमाणात अनिश्चितता अस्तित्वात आहे, तर आम्हास आमच्या एकत्रीत वि.वि. पत्रकाचा लेखा परिक्षणाच्या संबंधित प्रकरणांकडे लक्ष वेधावे लागते. आणि जर अशी प्रकटने अपुरी असतील तर आमच्या अभिप्रायात सुधारणा करावी लागते. आमचे निष्कर्ष आमच्या लेखा परिक्षणाच्या तारखेपर्यंत लेखा परिक्षणाच्या आधारे मिळविलेल्या पुराव्यांवर आधारीत आहेत. मात्र भविष्यात सतत चालू राहणारी संस्था म्हणून कार्यरत खंड पडेल अशा घटना किंवा स्थिती निर्माण होऊ शकते. | वस्तुस्थिती |
| • एकत्रीत वि.वि. पत्रके आणि त्या सोबतची प्रकटने यातून केलेले सर्वंकष सादरीकरण, त्याची रचना व त्यातील माहिती याचे मुल्यांकन करणे आणि एकत्रित वि.व. पत्रके आणि त्यातील व्यवहार व घटना प्रसंग यातून रास्त दर्शन घडते किंवा कसे याचे मूल्यांकन करणे. | वस्तुस्थिती |
| • समूह आणि तिच्या सहयोगी कंपन्या आणि त्यातील इतर अस्तित्वातील संस्था यांच्या वित्तीय माहिती संबधी योग्य पुरेसे लेखापरित्रणाचे पुरावे मिळवितो आणि त्याद्वारे एकत्रित वि.वि.विषयी आमचे मत व्यक्त करतो. एकत्रित वि.वि. मधील समाविष्ट असलेल्या संस्थांच्या वित्तीय पत्रकांचा लेखा परिक्षणाला दिग्दर्शन, पर्यावेक्षण आणि कार्यवाहक याची जबाबदारी आमचची असते. कारण आम्ही स्वतंत्र लेखा परिक्षक आहोत. ए.वि.वि. पत्रकात इतर कंपन्यांची माहिती समाविष्ट असते. त्यांचे लेखा परिक्षक अन्य लेखा परिक्षकांनी केलेले असते. त्या कंपन्यांच्या वि.वि. पत्रकांच्या लेखापरिक्षणाचे दिग्दर्शन, पर्यावेक्षण आणि कार्यपालन याची जबाबदारी संबधित लेखा परिक्षकांची असते. आम्ही आमच्या लेखा परिक्षणातील अभिप्रायांसाठी जबाबदार असतो. | वस्तुस्थिती |
| • सुत्रधारी कंपनी आणि एकत्रित वि.वि. पत्रकातील समाविष्ट कंपन्या यांच्या प्रशासनाचा भार असणाऱ्यांशी आम्ही संपर्क करतो. त्यांच्यासाठी आम्ही स्वतंत्र लेखा परिक्षक आहोत. आमचा संपर्क इतर विषयांसोबत लेखापरिक्षणांची नियोजन बद्ध व्याप्ती, आणि वेळ आणि लेखापरिक्षणात सापडते त्या म्हत्वाच्या बाबी आम्हाला दिसलेल्या अंतर्गत नियंत्रणातील मोठ्या उणीवा यावर आम्ही चर्चा करतो. | वस्तुस्थिती |
| • तसेच आम्ही प्रशासकांना एक निवेदनही देतो. त्यामध्ये आम्ही गोळा केलेले नैतीक गरजांविषयीचे व स्वतंत्रेविषयीचे पुरावे असतात. तसेच आमचे स्वतंत्र व लागू होणारे संरक्षक उपाय यासह सर्व इतर संबधित विषय त्यांना कळवितो. | वस्तुस्थिती |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकावरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या समान तारखेच्या अहवालाचे जोडपत्र ब

(दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या एकत्रित वि.वि. पत्रकाच्या स्वतंत्र लेखा परिक्षकांची महापारेषण कंपनीच्या सभासदांना सादर केलेल्या समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर आणि नियामकांच्या आवश्यकता या प्रकरणातील परिच्छेद क्र. १६ (एफ) याच्या संदर्भानुसार)

| लेखापरिक्षकांचे मत | महापारेषणचा प्रतिसाद |
|---|---|
| **कंपनी अधिनियम २०१३ (अधिनियम) यातील कलम १४३ चे उप-कलम ३ चा खंड (१) नुसार अंतर्गत वित्तीय नियंत्रणे यावर अहवाल :-** | |
| म.रा.वि. पारेषण कंपनी लि च्या (यापुढे सुत्रधारी कंपनी असे संबोधले आहे) दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वि.वि.पत्रकांचे लेखा परिक्षण आम्ही केले हे याला जोडून आम्ही केले आहे. आम्ही सूत्रधारी कंपनी व तिच्या भारतातील सहयोगी कंपन्या यांच्या संदर्भातील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखापरिक्षण आम्ही त्या तारखांना केलेले आहे. | |
| **सशर्त मत** | |
| आमच्या मते आणि आमचे सर्वोपतपरी उत्कृष्ट आणि आम्हास दिलेली माहिती यानुसार तसेच तेथे खाली दिलेली ग्राह्यमतांचा आधार या विभागात वर्णन केलेले मोठया प्रमाणातील दुर्बलता यांचा अपवाद करुन इतर लेखापरिक्षकांचे अहवाल याच्या भारतात गठीत झालेल्या सहयोगी कंपन्यांनी ३१ मार्च २०२४ रोजीच्या एकत्रित वि.वि. पत्रकांच्या संदर्भात पुरेशा प्रमाणात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे प्रभावीपणे वापरली होती. यासाठी त्यांनी भारतीय सनदी लेखामधील संस्था (ICAI) यांच्या वित्तीय अहवाल देण्यांसाठी अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखा परिक्षण या विषयी मार्गदर्शक सूचना वितरीत केल्या आहेत. त्यात नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रनाच्या आवश्यक घटकांचचा विचार करुन संबंधित कंपन्यांनी अंतर्गत वित्तीय नियंत्रनासाठी निकष स्थापित केले आहेत. त्याच्या आधारे दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत सुत्रधारी कंपनी व तिच्या सहयोगी कंपन्या यांनी सर्व बाबींनुसार पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे कार्यवाहीत आणली आहेत. | |
| आम्ही सूत्रधारी कंपनीचे ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वि.वि. पत्रकांचे आमचे लेखापरिक्षणासाठी स्वरुप वेळ यांची निश्‍चिती केली. त्यानुसार आम्ही ए.वि.वि. पत्रकांबाबतचे आमचे ग्राह्य मत दिले आहे. | |
| **सशर्त मतांचा आधार :** | |
| आम्हास दिलेली माहिती आणि स्पष्टीकरणे तसेच आमचे लेखा परिक्षण याच्या आधारे ३१ मार्च २०२४ पर्यत खालील महत्वाच्या दुर्बल जागांची ओळख झाली | |
| अ) कंपनीकडे येणारा महसूल इतर खर्च, इतर उत्पन्न, वित्तीय निवेदन समाप्तीची प्रक्रिया या संबंधी योग्य, नपून्यातील कागदपत्रे आणि जोखीम नियंत्रणाचे मेट्रीक्स नाही. | महापारेषणने कंपनीसाठी तिचे आकारमान व उद्योगाचे स्वरुप विचार घेऊन अंतर्गत नियंत्रण प्रक्रीया स्थापित करण्यासाठी / अद्यावत करण्यासाठी एका व्यावसायिक तज्ञांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. |
| ब) कंपनी इतर सबंधित व्हेंडर्स तिसरा पक्ष यांना समान कर्ज स्वरुपात द्यावयाचे सामान / उपकरणे या विषयीचे धोरण व कार्यपद्धती कागदी स्वरुपात नाही. | महापारेषणच्या प्रकल्पाची कार्यालये - युनीट्स सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेऊन प्रकल्प स्थापित / कार्यान्वित करणे यासाठी अन्य संस्थांना परत करण्याच्या बोलीवर काही सुटे सामान/साहित्य देते. याचा तपशील मानवी हाताने अधिकृत नोंदवह्यात जतन केले जातात. क्षेत्रीय कार्यालय आवश्यक सुचना दिल्या आहेत की त्यांना अशा प्रकरणांचे सर्व अभिलेख लेखा परिक्षकांना उपलब्ध करुन आलेत. |
| क) जुन्या थकीत शिलकी / जुन्या बाकी मुनलिखित किंवा आणि निर्लेखित करणे यासाठीचे धोरण व कार्यपद्धती कंपनीकडे कागदोपत्री नाही. | जुन्या शिलकीचे पुनर्लेखन / व निर्लेखित करणे या विषयी धोरणांची व कार्यपद्धती तयार करण्यासाठी आवश्यक तो मेळ करण्यात येत आहे. त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी घेण्यात आली. |
| ड) सुत्रधारी कंपनीने निविदा प्रक्रीयेसंबंधीचे धोरण व कार्यपद्धती तयार केलेली नाही. | महापारेषणचे प्रकल्प कार्यालये प्रकल्प स्थापिक / कार्यान्वित करण्यासाठी सटे सामान परत करण्याच्या बोलीवर आणि सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर देतात. त्यांचा मंजुरीनंतर देतात. त्याचा तपशील व्यक्तीश: |
| इ) सुत्रधारी कंपनीने दुरुस्ती व देखभाल यांच्या निविदा प्रक्रीयेतील विचलन कागदोपत्री नोंदणे या विषयीचे लिखित स्वरुपात धोरण व कार्यपद्धती नाही. | |

| | |
|---|---|
| | कार्यामधील नोंदवहीत नोंदला जातो. सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सुचना देण्यात आल्या आहेत ते जतन करावे व लेखापरिक्षकांना पडताळणीसाठी उपलब्ध करावे. |
| फ) कंपनीमध्ये वेळेनुसार मालमत्ता, कारखाने व साधने (PPE) यांचे पाठपुरावा भांडवलीकरण व करण्यासाठी योग्य नियंत्रणे नाहीत. | महापारेषणने सॅप / इ आर पी प्रणालीत ऑटो डब्ल्यू सी आर मोड्यूल समाविष्ट केले आहे. त्यातून पी पी ई चे सत्य समय तत्वाने स्वयंचलित भांडवलीकरण केले जाण्याची हमी मिळेल. |
| उपरोक्त बाबी व्यतिरिक्त आम्ही २७ सप्टेंबर २०२४ रोजीच्या आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालातील ग्राह्य मतांचा आधार या प्रकरणाचा आम्ही संदर्भ देतो. त्याचे कंपनीच्या प्रक्रीया व अंतर्गत नियंत्रणे यांचे प्रभाव कसे पडू शकतील यावर आम्ही ३१ मार्च २०२४ दिलेल्या कंपनीच्या अंतर्गत नियंत्रणे यांचे कोणते परिणाम होतील यावर आम्हास अभिप्राय देता येत नाही. | संबंधीत विषयावर योग्य प्रकारे प्रतिसाद देण्यात आला आहे. |
| एकत्रीत वि.वि पत्रकाच्या संदर्भातील, अंतर्गत वित्तीय नियंत्रणामये मोठी दुर्बलता म्हणजे एक किंवा बऱ्याच उणीवांचे मिश्रण असते. त्यातून कंपनीच्या वार्षिक किंवा अंतरिम वित्तीय विवरण पत्रातील मोठी गैररिववरणे असण्याची शक्यता दिसते. ती वेळेवर शोधता येणार नाहीत. | वस्तुस्थिती |
| **अंतर्गत वित्तीय नियंत्रणाविषयी व्यवस्थापन आणि मंडळाचे संचालकांची जबाबदारी :-** | |
| कंपनीचे व्यवस्थापन आणि भारतात स्थापित तिच्या सहयोगी कंपन्यांचे व्यवस्थापन हे कंपनीने स्थापन केलेल्या वित्तीय प्रतिवेदन निकषांवर अंतर्गत नियंत्रणावर आधारलेले अंतर्गत वित्तीय नियंत्रण स्थापन करणे आणि टिकवणे याकरिता जबाबदार असते. हे करत असताना भारताच्या सनदी लेखापालांच्या संस्थेने जारी केलेले वित्तीय प्रतिवेदनांवरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणांचे लेखापरीक्षणावरील मार्गदर्शक टिपणीमध्ये नमूद केलेल्या अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक विचारात घेणे आवश्यक आहे. या जबाबदारींमध्ये कंपनी अधिनियम २०१३ खाली आवश्यक असलेल्या कंपनीच्या मत्तांचे संरक्षण, लबाडी आणि चुका यांना प्रतिबंध आणि शोध, लेखांकन अभिलेखांची अचूकता व संपूर्णता आणि विश्वासार्ह वित्तीय माहिती वेळेवर तयार करणे यांसह कंपनीच्या व्यवसायाचे शिस्तबद्ध आणि कार्यक्षम पालन करण्याकरिता प्रभावीपणे परिचालन करणाऱ्या पुरेशा अंतर्गत वित्तीय नियंत्रणांची संरचना, कार्यान्वितता आणि परिरक्षण यांचा समावेश आहे. | वस्तुस्थिती |
| **लेखा परिक्षकांची जबाबदारी** | |
| आमच्या लेखापरीक्षणावर आधारित वित्तीय प्रतिवेदनावरील कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणांवर आमचे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १४३(१०) खाली विहीत केलेल्या लेखापरीक्षणावरील ICAI ची मार्गदर्शक टिपणी आणि मानकानुसार, अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या लेखापरीक्षणाला लागू असलेल्या मर्यादेपर्यंत आम्ही लेखापरीक्षण केले आहे. ही मानके आणि ही मार्गदर्शक टिपणी मागणी करते की वित्तीय प्रतिवेदनावर पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापन करण्यात आली होती आणि टिकवली होती तसेच सर्व प्रत्यक्ष संदर्भामध्ये अशी नियंत्रणे प्रभावीपणे परिचालीत होत होती याविषयी योग्य आश्वासन प्राप्त करण्यासाठी लेखा परीक्षण योजण्यात आणि करण्यात आले आणि आम्ही याविषयीच्या नैतिक आवश्यकतांचे अनुपालन केले आहे. आमच्या लेखापरीक्षणात वित्तीय प्रतिवेदनावर अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीच्या पर्याप्ततेविषयी लेखापरीक्षण पुरावा मिळण्याकरिता आणि या प्रणालीच्या परिचालनीय प्रभावीपणा विषयी पुरावा मिळण्याकरिता कार्यपद्धती अवलंबण्याविषयी बाबी समाविष्ट आहेत. | |
| वित्तीय प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या आमच्या लेखापरीक्षणात वित्तीय प्रतिवेदनावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे आकलन प्राप्त करणे, प्रत्यक्ष कमजोरी अस्तित्वात आहे का याविषयी धोक्याचे निर्धारण करणे आणि निर्धारित धोक्यावर आधारलेल्या अंतर्गत नियंत्रणाची संरचना आणि परिचालनीय प्रभावीपणाचे निरीक्षण आणि निर्धारण करणे यांचा समावेश होता. निवडलेल्या कार्यपद्धती लेखापरीक्षकाच्या न्यायनिर्णयावर आधारित असतात आणि त्यात एकत्रित भा.ले.मा.वित्तीय विवरण पत्रांचे प्रत्यक्ष आत्मकथन, लबाडीने अथवा चुकीने केल्या जाणाऱ्या धोक्याचे मूल्यनिर्धारण समाविष्ट आहे. | वस्तुस्थिती |

| | |
|---|---|
| सहयोगींच्या बाबत इतर लेखापरीक्षकांच्या अहवालांच्या आधारे जे निर्दोष लेखापरीक्षण अहवाल देतात आणि कंपनीबाबत आमच्या अहवालाच्या आधारे आमचा विश्वास आहे की वित्तीय प्रतिवेदनांवरील कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रण प्रणालीवरील आमच्या लेखापरीक्षण मताकरिता एक आधार मिळण्याकरिता आम्ही गोळा केलेला लेखापरीक्षण पुरावा हा पुरेसा आणि उचित आहे. | वस्तुस्थिती |
| एकत्रीत वित्तीय विवरण पत्रकांच्या संदर्भात कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी व योग्य असल्याबद्दल लेखापरिक्षणाचे पुरावे आम्ही मिळविले आहेत,याचा आम्हाला विश्वास आहे. | वस्तुस्थिती |
| **एकत्रीत वि. वि. पत्रकांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ** | |
| एकत्रीत वि. वि. पत्रकांच्या संदर्भात, एखाद्या कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ही एक कार्यपद्धती असते. त्यातून वित्तीय माहितीची विश्वासार्हता मिळून एकत्रीत वि.वि. पत्रकाच्या बाह्य हेतूसाठी भारतातील सर्व सामान्यपणे स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार सिद्ध असावी असा उद्देश असतो. एकत्रीत ि़व.वि. पत्रकांच्या संदर्भात कंपनीच्या अंतर्गत नियंत्रणामध्ये पुढील कार्यपद्धती व धोरणे समाविष्ट असतात. (१) ती अभिलेखांची देखभाल व संभाळ याच्याशी निगडीत असतात.<br>हे अभिलेख पुरेशे तपशीलवार असावेत आणि ते कंपननिचा व्यवहार व मत्तांचे स्वरुप याचे अचूक व यांचे दर्शन घडविणारे असावेत. (२) व्यवहाराचे अणिलेखन भारतात सामान्यत: मान्य असलेल्या लेखापद्धतीशी सुसंगत असावे. ते एकत्रीत वि.वि, पत्रकाच्या तयारीसाठी आवश्यक हमी देणारे असवेत त्यातून कंपनीची येणी व देणी हे कंपणीच्या व्यवहाराच्या व संचालकाच्या मंजुरीनुसार केली आहेत याची खात्री मिळावी. आणि (३) एकत्रीत वि.वि. पत्रकास बाधक ठरील असे मत्तांचे अनाधिकृत संपादन, वापर व स्वरुप यास वेळेवर आळा घातला जातो याची हमी त्यातून मिळावी. | वस्तुस्थिती |
| **एकत्रीत वि.वि. पत्रकाच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या उपजत मर्यादा** | |
| एकत्रीत वि.वि. पत्रकाच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या उपजत मर्यादा आहेत. पुढील बाबी समाविष्ट आहेत. जसे व्यवस्थापाच्या नियंत्रण व आरोग्य उद्‌घाटन किंवा त्याच्याशी विपरीत व्यवहाराची शक्यता असणे, आणि अनवधानाने किंवा लबाडिच्या हेतूने केलेल्या मोठया प्रमाणातील गैर व्यवहार यांना आळा नसणे. तसेच एकत्रीत वि.वि.पत्रकांच्या संदर्भात भविष्याच्या दृष्टीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे मुल्यमापनाचे केलेले प्रक्षेप हे जोखीमचे असणे, कारण भविष्यात परिस्थिती बदण्यास हे अंदाज अपुरे पडू शकतात किंवा धोरण व कार्यपद्धतीची अपुरी पुर्तता करु शकतात. | वस्तुस्थिती |
| **इतर बाबी** | |
| भारतात संस्थापित असणाऱ्या दोन सहयोगी कंपन्यांशी संबंधित अशा वित्तीय प्रतिवेदनावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पर्याप्तता आणि परिचालनीय परिणामकारकता यावरील कायद्याच्या कलम १४३(३)(१) खालील आमचे पूर्वोल्लिखित अहवाल हे भारतात संस्थापित असा कंपन्यांच्या लेखापरीक्षकांच्या संबंधित अहवालांवर आधारित आहेत. | वस्तुस्थिती |
| वरील विषयातील आमच्या मतात सुधारणा केलेली नाही | |

**परिशिष्ट - ७**

## भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३च्या कलम १४३(६)(ब) यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वतंत्र विवरण पत्रावर दिलेले अभिप्राय :

कंपनी अधिनियम २०१३ यामध्ये विहित केलेल्या वित्तीय अहवाल देण्यासंबधीच्या आकृतीबंधानुसार, **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित** च्या **दि. ३१ मार्च २०२४** रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरण पत्रके तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांची अधिनियमाच्या कलम १३९ (५) नुसार नियुक्त केलेल्या सांविधिक लेखापरिक्षकांवर अधिनियमाचे कलम १४३ नुसार, त्यांनी केलेल्या लेखा परिक्षणाच्या आधारे, वित्तीय विवरण पत्रकांवर अधिनियमाच्या कलम १४३ (१०) यामध्ये विहित केलेल्या लेखा परिक्षणाच्या मानकांनुसार स्वतंत्र लेखापरिक्षण करण्याची जबाबदारी आहे. त्यांचा अहवाल **दि. २७ सप्टेंबर २०२४** मध्ये त्यांनी तसे केल्याचे नमूद केले आहे. .

मी, भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापाल यांच्या वतीने, **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित च्या ३१ मार्च २०२४** रोजी संपलेल्या वित्तीय विवरण पत्रकांचे पूरक लेखापरिक्षण, अधिनियमाचे कलम १४३ (६)(ए) नुसार केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखा परिक्षकांकडील कामकाजांची कागदपत्रे न मिळविता करण्यात आलेले असून ते प्रमुख्याने सांविधिक लेखापरिक्षक, यांचेकडे आणि कंपनीच्या कर्मचारी वृंदाकडे चौकशी करणे तसेच काही लेखांकनांच्या दस्तऐवजांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे.

माझ्या या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारे मी अधिनियमाचे कलम १४३ (६) (बी) नुसार खालील महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधू इच्छितो. या बाबी माझ्या निदर्शनास आल्या आणि माझ्या मते वित्तीय विवरणपत्रके आणि संबधित वार्षिक अहवाल अधिक चांगल्या प्रकारे समजवून घेण्यास, या बाबी सहाय्यभूत होतील.

**ए) नफ्यासंबधी अभिप्राय**

**नफा व तोटा पत्रक**

**महसूल**

**इतर उत्पन्न (टिप क्र. २५) रु. ६५४.६४ कोटी**

१. वरील प्रकरणात परिसमापनातील नुकसानाचे रु. २०.२७ कोटी (नागपूर परिमंडळासाठी रु. १९.६६ कोटी आणि नाशीक परिमंडळासाठी रु. १.०६ कोटी) समाविष्ट आहेत. त्यांची नोंद सक्षम प्राधिकारी यांनी प्रस्तावीत केलेल्या कालमर्यादा विस्तार (टी एल इ) यांच्या मंजुरीपूर्वीच उत्पन्न अशी करण्यात आलेली आहे. तसेच प्रकट केलेल्या लेखा धोरणां नुसार इतर उत्पन्न याला उपार्जन तत्वावर मंजुरी दिली जाते. यात फक्त अंतीम वसुली अनिश्चित असेल तरच अपवाद करण्यात येतो. दिवाळखोरिच्या खराबीमुळे मिळू शकणारे उत्पन्न हे फक्त त्यासाठीच्या विस्तारीत कालमर्यादेच्या (टी एल इ) अंतिम कारणानंतर निश्चित मानले जाते आणि त्या वेळेपर्यत ते वसूल करुन रिटेन्शन मनी अंतर्गत ठेवावे लागते यामुळे वर्षातील नफ्याचे रु. २०.७२ कोटी इतके जादा विवरण झालेले असून इतर चालू नसलेल्या मत्ता अंतर्गत ठेवून घेतलेला पैसा याचे तेवढेच कमी विवरण झालेले आहे (टिप क्र. १६.२)

**बी) वित्तीय स्थितीवर अभिप्राय**

**ताळेबंद**

**दायित्वे**

**इतर चालू नसलेली दायित्वे (टिप क्र. २०) रु. १,८७७.१५ कोटी**

**आउट राईट कॉट्रीब्यूशन (ओ आर सी) योजनांच्या अंतर्गत ग्राहकांकडून मिळालेल्या अनामती रु. १,५९९.८८ कोटी**

२. वरील बाबीमधे ओआर सी ग्राहकांकडून मिळालेल्या कामासाठींच्या अनामतीची रक्कम र. १२२.१९ कोटी समाविष्ट आहे (र. ८०.९६ कोटी (वाशी परिमंडळ) आणि रु. ४१.२३ कोटी (नागपूर परिमंडळ)) सदर कामे कार्यान्वित झाली असल्यामुळे कंपनीने सदर ओ आर सी ग्राहकांकडून मिळालेल्या अनामत रकमांचे त्यांच्या मर्यादेपर्यत समायोजन / सेट ऑफ करायला हवे होते.

त्यामुळे इतर चालू नसलेल्या दायित्वे यांचे जादा विवरण झालेले असून, चालू नसणाऱ्या मत्ता अंतर्गत प्रगतीपथावरील भांडवली कामे (टीप क्र. ४.२) यांचे रु. १२२.१९ कोटी ने जादा विवरण झालेले आहे.

भारताचे महानियंत्रक आणि महालेखापरीक्षक
यांच्याकरिता व त्यांच्या वतीने
**स्वाक्षरी**
**(दत्तप्रसाद एस. शिरसाट)**
महालेखापाल (लेखापरीक्षण) - २ महाराष्ट्र

ठिकाण - नागपूर
दिनांक - २३/१२/२०२४

**भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापाल यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (बी) नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकांवर दिलेल्या अभिप्रायांवर महापारेषण कंपनीच्या व्यवस्थापनाने दिलेली उत्तरे :-**

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | महापारेषणचे उत्तर | सांविधिक लेखापरिक्षकांचे उत्तर |
|---|---|---|---|
| अ | **नफा व तोटा पत्रक**<br>**महसूल**<br>**इतर उत्पन्न (टिपा - २५) रु. ६५४.६४ कोटी** | | |
| १ | वरील प्रकरणात परिसमापनातील नुकसानाचे रु. २०.२७ कोटी (नागपूर परिमंडळासाठी रु. १९.६६ कोटी आणि नाशीक परिमंडळासाठी रु. १.०६ कोटी) समाविष्ट आहेत. त्यांची नोंद सक्षम प्राधिकारी यांनी प्रस्तावीत केलेल्या कालमर्यादा विस्तार (टी एल इ) यांच्या मंजुरीपूर्वीच उत्पन्न अशी करण्यात आलेली आहे. तसेच प्रकट केलेल्या लेखा धोरणां नुसार इतर उत्पन्न याला उपार्जन तत्वावर मंजुरी दिली जाते. यात फक्त अंतीम वसुली अनिश्चित असेल तरच अपवाद करण्यात येतो. दिवाळखोरिच्या खराबीमुळे मिळू शकणारे उत्पन्न हे फक्त त्यासाठीच्या विस्तारीत कालमर्यादेच्या (टी एल इ) अंतिम कारणानंतर निश्चित मानले जाते आणि त्या वेळेपर्यत ते वसूल करुन रिटेन्शन मनी अंतर्गत ठेवावे लागते यामुळे वर्षातील नफ्याचे रु. २०.७२ कोटी इतके जादा विवरण झालेले असून इतर चालू नसलेल्या मत्ता अंतर्गत ठेवून घेतलेला पैसा याचे तेवढेच कमी विवरण झालेले आहे (टिप क्र. १६.२) | महापारेषणचे परिपत्रक क्र. एम एस इ टी सी एल / सी ओ / एफ ॲड ए / ५७८ दि. २३.०१.२०२०नुसार तेव्हा उत्पन्न हे कंत्राटातील तरतुदीसोबत जोडलेले असते, तेव्हा त्याच्या आधारे परिसमापनातील नुकसानाला मान्यता देण्यात येते. त्यामुळे जेव्हा विलंब झाल्याचे निश्चित केले जाते. आणि कामे पूर्ण झाले नसल्याचे स्पष्ट होऊन त्याचा वित्तीय परिणाम वेळापत्रकावर झालेला असतो, तेवहा परिसमापनातील नुकसान याला उत्पन्न अशी मान्यता देण्यात येते. | **पार्श्वभूमी -**<br>कंपनीचे धोरण असे आहे की, जेव्हा कंपनीच्या एवाद्या कंत्राटाच्या प्रकरणी संबंधीत कंत्राटदाराने जर दिलेले काम त्यासाठीच्या निर्देशित वेळापत्रकात (टाईम प्रेस) मध्ये किंवा त्यासाठी मंजूर केलेल्या (करारात इतर हक्क व उपाय असले तरी) परिसमापनातील नुकसान असे मानते. या परिसमापनाच्या नुकसानाची मोजणी विलंबाच्या प्रत्येक सप्ताहासाठी एकूण कंत्राटाच्या किमतीच्या ०.५ टक्के (%) या दराने करण्यात येते आणि ही कमाल मोजणी संपूर्ण कामाच्या व्याप्तीच्या कंत्राटाच्या किमतीच्या १० टक्के पर्यंत केली जाते. या शिवाय कंत्राट बंद (खंडित) करणे आणिण उर्वरित काम कंत्राटाचा जोखीम व सर्व याद्वारे पूर्ण करुन घेणे, यांचे हक्क कंपनी राखून ठेवते.<br>**कंपनीचे धोरण :**<br>कंपनीचे परिपत्रक क्र. एम एस इ टी सी एल / सी ओ / एफ ॲ. ए /००३/क्रमांक.००५७८दि.२३/०१/२०२० नुसार,परिसमापनातील नुकसान (एल डी) / आकारलेला दंड, (पेनल्टी) आणि मदत विस्तार (टी एल इ) यासाठी चालू मुदतीसाठी (एल डी / पेनल्टी मंजूर केलेली नाही. संबंधित कार्यालयांनी एल डी / दंड याचा वसुली जी एस टी सह उत्पन्न म्हणून करावी. त्यासाठी टी एल इ प्रस्तावाची मंजुरीची वाट पाहू नये.<br>**स्पष्टीकरण :**<br>ही बाब कंपनीच्या धोरणानुसार आहे. याशिवाय सुरवातीच्या प्रत्यक्ष सकमेपेक्षा त्याखालील रक्कम लेखा परिक्षणासाठी वापली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **बी** | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय**<br>**ताळेबंद**<br>**दायित्वे**<br>**इतर चालू नसलेली दायित्वे (टीप क्र. २०) रु. १,८७७.१५ कोटी**<br>**आउट राईट कॉंट्रीब्यूशन (ओ आर सी) योजनांच्या अंतर्गत ग्राहकांकडून मिळालेल्या अनामती : रु. १,५९९.८८ कोटी** | | |
| २ | वरील बाबीमधे ओ आर सी ग्राहककांकडून मिळालेल्या कामासाठीच्या अनामतीची रक्कम रु. १२२.१९ कोटी समाविष्ट आहेत (रु. ८०.९६ कोटी (वाशी परिमंडळ) आणि रु. ४१.२३ कोटी (नागपूर परिमंडळ) ) सदर कामे कार्यान्वित झाली असल्यामुळे कंपनीने सदर ओ आर सी ग्राहकांकडून मिळालेल्या अनामत रक्कमांचे त्यांच्या मर्यादेपर्यंत समायोजन / सेट ऑफ करायला हवे होते.<br><br>त्या मुळे इतर चालू नसलेल्या दायित्वे यांचे जादा विवरण झालेले असून चालू नसणाऱ्या मत्ता अंतर्गत प्रगतीपथावरील भांडवली कामे यांचे रु. १२२.१९ कोटी ने जादा विवरण झालेले आहे. | **(वाशी परिमंडळ)**<br>**नागोठणे ट्रॅक्शन सबस्टेशन**<br>**(९.९५ कोटी रुपये)**<br>भारतीय रेल्वेला नागोठणे येथून २२० केव्ही क्षमतेचा वीज पुरवठा करण्याची योजना ३०.०५.२०२३ रोजी पूर्ण झाली. सर्व कामाचे अंतिमीकरण झाले असले तरी संबंधीत संस्थेने (एजन्सी) अंतिम देयक सादर करण्यात विलंब केल्यामुळे योजनेतले वित्तीयदृष्ट्या अंतिमीकरण प्रलंबित आहे. संबंधित कार्यालय या संस्थेकडे अंतिम देयक लवकर पाठविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. ते प्राप्त<br><br>झाल्यावर प्रक्रीया पूर्ण करुन ओ आर सी अनामतीचे समायोजन केले जाईल.<br><br>पनवेल टी एस एस - डी एफ सी सी आय् साठी (वाशी परिमंडळ) रु. १.३७ कोटी) २२० केव्ही क्षमतेच्या पनवेल टी एस एस लाईनचे काम पूर्ण करुन ती दि. २३.०६.२०२२ रोजी भारीत करण्यात आली. संस्थेतील अंतिम विचलन, जादा साहित्य आणि मुदत वाढ यांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. या संस्थेच्या अंतिम देयकांची अंतिमी करणाऱ्यासाठी प्रतिक्षा करण्यात येत आहे. कार्यालयातर्फे संस्थाकडे सातत्याने देयक सादर करावे यासाठी पाढपुरावा चालू आहे.<br><br>देयकाच्या प्रक्रीया पूर्ण झाल्यावर ओ आर सी अनामतच्या रकमेचे समायोजन करण्यात येईल नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता खांडेश्वर येथे आणि वाधीवली येथे २२० केवी क्षमतेची उपकेंद्र<br><br>खंडेश्वर आणि वाघावली या उपकेंद्राची कामे, अनुक्रमे दि. २५.०२.२०२३ आणि ०१.०९.२०२३ रोजी पूर्ण झाली. या शिवाय २२० केव्ही उरण - खारघर या लाईन जमिनी खालून (यूजी) नेण्यासाठी आणि पाईल फाउंडेशन अनिक बळकट करण्याचे काम जून २०२४ मध्ये पूर्ण झाले. आवश्यक | **बी) पार्श्वभूमी -**<br>महापारेषण कंपनी इतर संस्थांना वीज पुरवठा करण्यासाठी निश्चित मागणी ऑर्डर्स नुसार कागदपत्रे तयार करणे आदि कामे हाती घेत असते. अशा कामांना कंपनीच्या अंतर्गत 'ओ आर सी' कामे असे संबोधण्यात येते. ही 'ओ आर सी' कामांची कार्यवाही करण्यासाठी केलेल्या खर्चाच्या व्यतिरिक्त त्यावर महापारेषण 'पर्यवेक्षणाचे आकार'लावते त्याला 'महसूली' अशी मान्यता दिली जाते. कंपनी ज्या संस्थासाठी अशी कामे करते, त्यांच्याकडून अनामत रकमा स्वीकारण्यात येतात. या शिवाय, या उद्योगाच्या अटी व शर्ती यानुसार या कामातील मत्तांची अंतिम मालकी कंपनीकडेच असते.या मत्ता अन्य संस्थांना दिल्या जात नाहीत प्रकल्प पूर्ण झाल्यावर कंपनी, तिने उभारलेल्या मत्ता (प्रगतीपथा वरील भांडवली कामे (WIP) यांच्या अनामत रकमांचे समायोजन करते आणि 'ॲसेट मास्टर आयडेंटीफिकेशन' यासाठी नाममात्र किमंत रुपया एकमात्र (रु१/-) ठेवला जातो. वरील कृतीनंतर जर काही शिल्लक उरती तर ती संबधित संस्थांना परत केली जाते.<br><br>**स्पष्टीकरण**<br>आमच्या क्षेत्राला दिलेल्या भेटीत आम्हास अशा काही जागा आढळल्या ज्यात 'ओ आर सी' प्रकल्प पूर्ण झाले पण त्यांचे मेळ उपलब्ध नव्हते. त्यामुळे 'ओ आर सी' चे समायोजन या सी डब्ल्यू आय पी कामासोबत झाले किंवा नाही याची पडताळणी करता आली नाही. याशिवाय काही प्रकरणी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ग्राहकांना शिल्लक अनामती परत केल्या नव्हत्या. या बाबत व्यवस्थापनाशी चर्चा केल्यानंतर, आम्हाला समजले की अशा बाबींचा मेळ करण्यासाठी व्यवस्थापनाने कृती योजना तयार केलेली आहे. व पुढील कार्यवाही व्यवस्थापनाने कृती योजना तयार केलेली |

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रस्ताव (अंतिम संख्या, बदल जादा सामान आणि मुदत वाढ) यावर प्रक्रीया चालू आहे किंवा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजूरीची प्रतिक्षा आहे. मंजुरी नंतर अंतिम देयकांसह सर्व प्रलंबित देयकांवर प्रक्रीया पूर्ण करुन ओ आर सी ग्राहकांच्या अनामर्तीचे समायोजन केले जाईल.<br>सानेखार - ट्रपम्बे पारेषण तारमार्ग (वाशी परिमंडळ) (रु. ०.६८ कोटी)<br>एम सी जी एम उड्डाण पूलाच्या बाधकामासाठी २२० केव्ही सानेखार - ट्रॉम्बे पारेषण लाईनचे स्थलांतर करण्याचे काम पूर्ण करुन ती लाईन ०७.०२.२०२४ रोजी भारीत केली. मुदत वाढीचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. सर्व मंजुऱ्या मिळाल्यावर अंतिम देयकांची प्रक्रीया करुन त्यानुसार ओ-आर-सी ग्राहकांच्या अनामतीचे समायोजन केले जाईल.<br>**नागपूर परिमंडळ**<br>(१) ओ आर सी ग्राहकांना दिलेल्या ३३ केव्ही बेज या क्षमतेसाठी अनामत रकमेचे समायोजन करणे, शिल्लक आहे.<br>(२) रु. ४.५० कोटी परत करण्याचा प्रस्ताव तयार केला असून सक्षम प्राधिकारी यांच्या मंजुरीसाठी प्रक्रीया चालू आहे.<br>३) रु. १२.५० कोटीची कामे पूर्ण झाली असून संबधित योजना बंद झाल्यावर तयाचे समायोजन केले जाईल. त्यासाठी संस्थेतील विवचलन, मुदत वाढ यांचे प्रस्तावावर प्रक्रीया चालू असून ते सक्षम प्राधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी सादर केले जातील. | आहे. व पुढील कार्यवाही चालू आहे. यामुळे या प्रकरणाला स्वायत्ता वि.वि. पत्रकांच्या 'ग्राह्य मतांचा आधार' अंतर्गत परिच्छेद ३ (जे) यामध्ये ग्राह्यता देण्यात आलेली आहे. |

संचालक मंडळाकरिता व त्यांच्यावतीने

**सही/-**

**डॉ. संजीव कुमार**

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण - मुंबई

दिनांक - १७/०१/२०२५

परिशिष्ट - ७

## भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपन्यांचा अधिनियम २०१३ यातील कलम १४३ (६) (बी) सह वाचलेले कलम १२९ (४) नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रीत वित्तीय विवरण पत्रकावर दिलेला अभिप्राय

कंपनी अधिनियम २०१३ यामध्ये विहितकेलेला वित्तिय अहवाल सादर करण्याबाबतच्या आकृतीबंधानुसार **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,** मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तिय विवरणपत्रे तयार करणे हीसदर कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या अधिनियमांच्या कलम १२९(४) सह वाचलेले कलम १३९(५) नुसार भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी नियुक्त केलेले सांविधिक लेखापरिक्षक यांचेवर या अधिनीयमाच्या कलम १२९(४) सह वाचलेले कलम १४३ नुसार हे सदर अधिनियमाच्या कलम १४३(१०) यामध्ये विहित केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांनुसार, या वित्तिय वितरणपत्राचे स्वतंत्र लेखापरिक्षण करुन त्यावरअभिप्राय व्यक्त करण्यांची जबाबदारी आहे. त्यांनी हे कार्य पूर्ण केले असल्याचे लेखापरिक्षण अहवाल **दि. २७ सप्टेंबर २०२४** यामध्ये नमूद केलेले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या वतीने, सदर अधिनियमाच्या कलम १२९(४) सह वाचलेले कलम १४३(६)(ए) यानुसार **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,** मुंबई या कंपनीच्या दि.३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तिय विवरणपत्राचे पूरक लेखापरिक्षणाचे संचालन केले.आम्ही **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,** मुंबई या कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रांचे पूरक लेखापरीक्षण केले.पण त्या दिनांकास संपलेल्या वर्षाकरिता **जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेड** आणि **महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** यांच्या वित्तीय विवरणपत्रांचे पूरक लेखापरीक्षण केलेले नाही. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले. त्यासाठी सांविधिक लेखापरिक्षकांच्या कामकाजाची कागदपत्रे मिळविलेली नाहीत. सदर सांविधिक लेखापरिक्षकांकडे आणि कंपनीचे कर्मचारी वृंद यांकडे प्राथमिक विचारणा करणे आणि लेख्यांचे निवडक अभिलेखांचे परिक्षण करणे या मर्यादेत हे पूरक लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे.

मी केलेल्य पूरक लेखापरिक्षणात आणि माझ्या ज्ञाण व माहीती नुसार सांविधिक लेखापरिक्षक यांनी अधिनियमाचे कलम १४३ (६) (बी) यानुसार दिलेल्या अहवालावर आणखी काही अभिप्राय किंकवा पूरक अहवाल द्यावा अशी काहीही महत्वाची बाब मला अढळलेली नाही.

**अ. इतर अभिप्राय**

**महत्वपूर्ण लेखा धोरण**

महत्वाची लेखा धोरणे यांच्या निवेदन पत्रकाच्या टिपा क्र. २.१५ प्रमाणे म.वि.नि. आयोग यांच्या आदेशांनुसार खुल्या प्रवेशातील महसूल याला मान्यता देण्यात येते. मात्र वित्तीय वर्षे २०१९-२० ते २०२२-२३ या कालावधीतील महाराष्ट्र विद्युत विवरण कंपनी लिमिटेड यांचेकडून अंशत: खुला प्रवेश यासाठी वार्षिक तत्वानुसार मिळू शकणाऱ्या रु. ११२१.५५ कोटी लेखाविषयक धोरणांचे उल्लंघन आहे.

भारताचे महानियंत्रक आणि महालेखापरीक्षक
यांच्याकरिता व त्यांच्या वतीने
**स्वाक्षरी**
**(दत्तप्रसाद एस. शिरसाट)**
महालेखापाल (लेखापरीक्षण) - २ महाराष्ट्र

ठिकाण - नागपूर
दिनांक - २७/१२/२०२४

**भारताचे लेखा नियंत्रक महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १४३ (६) (बी) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. च्या दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रकांवर दिलेला अभिप्राय आणि त्याला महापारेषणच्या कंपनीने दिलेला प्रतिसाद.**

| अनु. क्र. | कॅगचा अभिप्राय | महापारेषणचे उत्तर | सांविधिक लेखापरिक्षकांचे उत्तर |
|---|---|---|---|
| अ | **इतर अभिप्राय**<br>**महत्वाचे लेखा धोरण** | | |
| 1 | महत्वाची लेखा धोरणे यांच्या निवेदन पत्रकाच्या टिपा क्र. २.१५ प्रमाणे म.वि.नि. आयोग यांच्या आदेशांनुसार खुल्या प्रवेशातील महसूल याला मान्यता देण्यात येते. मात्र वित्तीय वर्षे २०१९-२० ते २०२२-२३ या कालावधीतील महाराष्ट्र विद्युत विवरण कंपनी लिमिटेड यांचेकडून अंशत: खुला प्रवेश यासाठी वार्षिक तत्वानुसार मिळू शकणाऱ्या रु. ११२१.५५ कोटी लेखाविषयक धोरणांचे उल्लंघन आहे. | निर्धारण वर्ष (एवाय्) २०२४-२५ (वि. वर्ष २०२३-२४) साठी भरावयाच्या अग्रिम कराच्या तिसऱ्या हप्त्याचा हिशेब करतांना एस टी यू सेक्शनने कळविले की, एम एस इ डी सी एल कडून (महावितरण) अंशत: खुल्या प्रवेशाचा मिळणारा आकार रु. ११२१.५५ कोटी महावितरणने गोळा केले आहेत. (महावितरणचा इ. मेळ जोडला आहे.)महापारेषणने 'इतर उत्पन्न' या विषयाच्या तिच्या लेखाधोरणानुसार महावितरणने गोळा केलेले अंशत खुल्या प्रवेशाचे आकारास 'उत्पन्न'अशी मान्यता देते. आणि महापारेषणला उपार्जन परत केले जातात. मात्र जेव्हा असे उत्पन्न अनिश्चित असेल तेंव्हा त्याचा अपवाद केला जातो. म्हणून त्याचा कराच्या दायित्वाच्या हिशेबासाठी विचार करण्यात आला. त्याचा समावेश केला नसता तर त्यावर वर्षाच्या अखेरीस अंतिम मोजणी करताना व्याज व दंड वसूल केला जाईल. मात्र अग्रिम कर भरण्याच्या चौथ्या हप्त्यासाठी मोजणी करतांना, उपरोक्त वस्तुस्थितीला एस टी यू सेक्शनने निश्चिती दिली. परंतु जरी या रकमेला महावितरण कंपनीने खात्री दिली असली तरी महापारेषणला आयत्यावेळी कोणतीही रक्कम मिळालेली नाही. महापारेषणने मार्च २०२३ मध्ये पाठविलेल्या इ. मेलाला प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून एस टी यू ने असा निर्णय घेतला की, या रकमेचा विचार प्राप्तीच्या तत्वावर करावा. उपार्जनाच्या तत्वावर विचार करु नये. जर अंशत: खुल्या प्रवेशाचा आकार उपार्जन तत्वावर समाविष्ट केला असता तर महावितरण कडून कोणतीही रक्कम मिळाली नसली तरीही प्रचंड कर दायित्व निर्माण झाले असते. यामुळे 'इतर उत्पन्न' म्हणून नोंदलेली सदर रक्कम एस टी यू ने मागे घेतली. | **लेखा धोरण**<br>महापारेषण कंपनीच्या महत्वाचे लेखा धोरण यातील टिपा २.१५ यात 'महसूल मान्यता' यात दिलेल्या माहितीनुसार, महापारेषण कंपनी 'इतर उत्पन्न' याला उपार्जन तत्वावर मान्यता देते. मात्र जेव्हा आकार करण्यात येतो. तसेच लेखा धोरणात असे नमूद करण्यात आले आहे की, खुल्या प्रवेशाचे आकार संबंधित उत्पन्नाला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एम इ आर सी)याच्या आदेशानुसार मान्यता मिळाली आहे.<br>**संविधी संदर्भ**<br>भा. ले. मानक ११५ मधील परिच्छेद ११५ - "ग्राहकांच्या कंत्राटाच महसूल" यात अशी माहिती दिली आहे की, सर्वोतपरी विचार करुन जेव्हा संस्थेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळण्याची खात्री असेल तर त्या महसूलला मान्यता देण्यात यावी. ही मार्गदर्शक सूचना जेव्हा उत्पन्न वसुलीची योग्य प्रकारे निश्चिती असेल तेव्हा त्याला मान्यता द्यावी हे तत्व अधोरेखीत करते. तेव्हा अनिश्चितता अस्तित्वात असेल तेंव्हा अंतिमत: विश्वासपूर्णतेने प्राप्त होईपर्यंत अशा उत्पन्नाला स्थगिती द्यावी.<br>**स्पष्टीकरण -**<br>अंशत: खुल्या प्रवेशाचा आकार याची रक्कम रु. १,१२१.५५ कोटी यास प्रारंभी उत्पन्न म्हणून मान्यता कराची मोजणीच्या हेतूसाठी दिली होती. तसा समावेश करुन तर संभाव्य व्याज व दंड टाळण्याचा उद्देश होता. मात्र प्रत्यक्ष प्राप्ती अनिश्चित आहे असे जानवल्याने त्या वगळण्यात आल्या. महावितरणने थकीत रकमां निश्चित केल्या असल्या तरी, प्रत्यक्ष पैसे दिले नव्हते आणि त्यासाठी प्रतिसादही नव्हता त्यामुळे ही रक्कम जमा होण्याबाबत अनिश्चितता कायम टिकून राहिली. या अनिश्चितीच्या परिस्थितीमुळे महापारेषणच्या एस टी यू सेक्शन ने निर्णय घेतला की या उत्पन्नाला अनुपार्जन तत्वाऐवजी रोखीच्या तत्वावर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मान्यता द्यावी. कारण लेखा धोरणानुसार अंतिम वसुली होणे संशयास्पद असते, तेव्हा असा निर्णय करणे गरजेचे असते. अशाप्रकारे निर्णय घेतल्याने महापारेषणचे लेखा धोरण आणि भा. ले. मानक ११५ नुसार वसुलीचा संभव नसल्यास महसूल मान्यतेस स्थगिती देणे या मार्गदर्शक तत्व या दोन्हीचे पालन झाले. म्हणून आपल्या आदरणीय कार्यालयास विनंती करतो की, उपरोक्त प्रतिसादाचा विचार करावा आणि हा मुद्दा वगयात यावा. |

संचालक मंडळाकरिता व त्यांच्यावतीने

**सही/-**

**डॉ. संजीव कुमार**

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

ठिकाण - मुंबई

दिनांक - १७/०१/२०२५

# स्वतंत्र लेखापरिक्षणाचा अहवाल
## मा. सदस्य महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## स्वतंत्र लेखापरिक्षकांनी केलेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल

### सशर्त मत

१. आम्ही महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या. या कंपनीच्या या सोबत जोडलेल्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रांचे लेखा परिक्षण केले आहे. यामध्ये दि. ३१ मार्च २०२४ रोजीचा कंपनीचा ताळेबंद तसेच या दिनांकास संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक (इतर सर्वसमावेशक उत्पन्नासह) रोकडता प्रवाह आणि ह्या दिनांकास संपलेल्या वर्षातील समभागातील बदल यांचे विवरणपत्रक तसेच महत्त्वाच्या लेखा धोरणांचा सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे.

२. आमच्या मते व आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हास दिलेल्या स्पष्टीकरनांनुसार, मात्र आमच्या अहवालातील सशर्त मतांचा आधार या विभागात वर्णन केलेल्या मजकुरांचा अपवाद करता, उपरिनिर्दिष्ट स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके ही कंपनी अधिनियम २०१३ ("कायदा") यातील आवश्यकतानुसार आणि आवश्यक पद्धतीनुसार कंपनीचे सत्य व रास्त दर्शन घडविते. ते अधिनियमाच्या कलम १३३ मध्ये विहित केलेल्या प्रकारे भारतीय लेखांकनांची मानके ज्यांचे वाचन भारत देशात सर्व साधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या आणि सुधारणा केलेल्या (भा. ले. मानके. Ind As) इतर लेखांकनाची तत्वे यानुसार दि. ३१ मार्च २०२४ रोजीची कंपनीची स्थिती, आणि त्या दिनांकास संपलेल्या वर्षातील तिचा नफा व सर्वसमावेश उत्पन्न, समभागातील बदल आणि तिचा रोकडता प्रवाह यांचे साथ व रास्त दर्शन घडवित आहे.

### सशर्त मत्तांचा आधार

३

(ए) इतर उत्पन्न यामध्ये पर्यवेक्षण शुल्क (सुपरव्हिजन फी) रु. १२,३८०.९२ लाख समाविष्ट आहे. कंपनी पर्यवक्षण शुल्क यास संपूर्ण कंत्राटाच्या मुदतीसाठी अग्रिम तत्वावर (अपफ्रंट) मान्यता देते. त्यामुळे वरील शुल्क भा. प्र. मानक ११५ ग्राहकांसोबतच्या कराराचा / कंत्राटाचा महसूल यातील तरतुदीनुसार आकारलेले नाही. परिणामी करपूर्व इतर उत्पन्न व नफा यांचे तेव्हढ्या रकमेने जादा विवरण झालेले असून इतर दायित्वे यांचे तेव्हढयाच रकमेने कमी विवरण झाले आहे.

(बी) इतर उत्पन्नात भंगार मत्ता व भंगार वस्तू मालसूची यांच्या विक्रीचा समावेश होतो ही रक्कम एकत्रितपणे रु. १,३५२.६६ लाख आहे. भंगार मत्ता / भंगार वस्तूमाल यांच्या विक्रीची संपूर्ण रक्कम संबंधित लेखांमध्ये जमा केली आहे. ती अशा विक्रीच्या नफा / तोटा या मध्ये मान्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे ही कृती भा.ले. मानक १६: मालमत्ता, कारखाना व साधने, आणि भा.ले. मानक ०२ : "वस्तूमाल सूची" (इन्व्हेंटरीज) यातील तरतुदीनुसार केलेली नाही.

(सी) चालू दायित्वात प्राप्त मालाच्या शिलकी/बिजके(इन्व्हॉईस)शिलकी रु.९,१७६.८३ लाख यांचा समावेश होतो. ही रक्कम प्रदीर्घ काळापासून येणे आहे. बिजकांची प्रक्रीया विलंबाने झाल्याने ३१ मार्च २०२४ रोजी तीन (०३) पेक्षा जास्त वर्षाचा विलंब झालेला आहे. या शिलकी हंगामी स्वरुपाच्या असल्याने त्यांच्या पूर्ण होण्याच्या व्यापारी देणी दायित्वे यावर भास्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

(डी) भा.ले. मानक १०१ : च्या "भारतीय लेखा मानकांचा प्रथम अंगिकार करणे" यातील तरतुदीनुसार कंपनीने तिच्या मालमत्ता, कारखाने व साधने (पी.पी.ई.) यांच्या लेखांकनासाठी खर्च/व्यय प्रारुप (मॉडेल) याचा पर्याय स्वीकारला आहे. त्यामुळे अशा पी.पी. इ यांचा परिचय / ठेवणावळ / धारण परिव्यय (कॅरींग कॉस्ट) संक्रमण तारखेच्या मुल्या नुसार धरण्यात आल्या आहेत. आणि त्यांच्या घसाऱ्याची मोजणी इलेक्ट्रॉनिक स्प्रेडशीट्स वर व्यक्तीश: हाताने करण्यात आली. त्यासाठी पी.पी इ च्या बाबींचा उपयुक्त शिल्लक आयुष्याचा विचार केला मात्र या करिता म.वि.नि. आयोगाचा विचार केला. मात्र या करिता म.वि.नि. आयोगाच्या नियमकांमध्ये दिलेला उर्वरित मूल्य मर्यादा विचारात घेतलेल्या नाहीत. परिणामी बऱ्याच प्रसंगी मत्तांची जादा घसारा आकारणी नोंदण्यात आली. याशिवाय बऱ्याच प्रकरणात परिमंडळ किंवा प्रदेशातील मत्तांची घसारा मुख्यालयात हाताने मोजण्यात आला. कारण भांडवलीकरणाच्या तारखा, महत्वाच्या सुट्या भागाचे भांडवलीकरण इ. बाबत विसंगती होती. या प्रकरणात संपूर्ण माहिती/तपशील नसल्याने, अशा सदोष घसाऱ्याच्या एकत्रित परिणामाचे निर्धारण करता येत नाही.वरिल कारणांमुळे पी पी इ च्या भंगार खर्च व निव्वळ धारणमुल्य यांच्या परिणामस्वरुप प्रभावावर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

(इ) दि. ३१ मार्च २०२४ रोजी पी पी इ रक्कम (ठोक गट) रु. २५,७६,८२५.०१ लाख आहे. कंपनीने या वर्षी किंवा त्यामागील वर्षी पी पी ई चे प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही, व त्यांच्या नोंदवहीत तपशील नाही. त्यामुळे या पी पी ई च्या अस्तित्वाबाबत भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

कंपनी पी पी ई च्या घसाऱ्याची मोजणी म.वि. नि. आयोगाच्या (एम इ आर सी) नियमकांनुसार करते. त्यासाठी पायरी नुसार / टप्यानुसार मोजणी करणे काररनिवित्त आहे. (तशी अट आहे). कंपनीच्या लेखांकन पद्धतीत पी पी ई ची स्थिती कोणत्या पायरीवर आहे याचा तपशील दिला जात नाही. त्यामुळे घसाऱ्याच्या रु. १,२८,९८६.७३ लाख या रकमेची परिपूर्णता किंवा अचूकता याविषयी पी पी ई चे निव्वळ धारणामूल्य यावर आम्हास मत देता येत नाही.

(एफ) पी पी ई मध्ये समाविष्ट असलेल्या कंपनीच्या पूर्ण मालकीच्या जमिनी (फ्री होल्ड लॅंड्स) यांचे मालकी हक्क विलेख कंपनीकडे उपलब्ध नाहीत. यात काही भाडेपट्टीच्या जमिनींचे वर्गीकरण मालकीच्या जमिनी मध्ये केले आहे. किंवा काही ठिकाणी त्याउलट वर्गीकरण केलेले आहे. त्यामुळे पूर्ण मालकी हक्काच्या जमिनी व भाडे पट्टीच्या जमिनी असे वर्गीकरण योग्य मानता येत नाही. त्यामुळे मत्ता वापरांचे हक्क व त्यांची परत फेडीची तरतूद यांच्या हिशेबावर परिणाम होतो. परिणामी या विषयीची लेखांकन प्रक्रीया भा. ले. मानक ११६ – "भाडेपट्टी" याच्याशी सुसंगत नाही. जर काही याचा प्रभाव स्वायत्ता वित्तीय विवरण पत्रकांवर होत असेल तर तो निर्धारीत करता येत नाही.

(जी) कंपनीच्या वीज पारषण जाळ्याचा स्तर ६६ केव्ही पासून ७६५ केव्ही पर्यंतच्या क्षमतेचा आहे. आम्हास दिलेल्या माहितीनुसार, कंपनीचे ६६ केव्ही क्षमतेचे वीज जाळे रद्द / काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला अशा प्रकारची ६६ केव्ही क्षमतेच्या वीजउपकेंद्राच्या तारांचे कार्यान्वयन थांबवून ती महावितरण कंपनीकडे हस्तातरित करण्यात आली. उर्वरीत वीज उपकेंद्रे व वीजतारा – वाहिन्या यांचे हस्तांतरण महावितरणकडे करण्यात येईल किंवा शक्य झाल्यास त्यांचा दर्जा उंचावून ती महापारेषण द्वारे वापरण्यात येतील.

या शिवाय आम्हास अधिक माहिती देण्यात आली की अशा मत्तांची मान्यता काढून घेणे, विल्हेवाट लावणे आणि मत्तांच्या हस्तातरणाचा विचार करणे याचे सोयस्कार पूर्ण करण्यासाठी तांत्रिक पथकासोबत चर्चा भा. ले. मानक – १६ नुसार चालू आहेत.

मात्र आमच्या लेखा परिक्षणाच्या कालावधीत यासंबधी अधिक माहिती / कागदपत्रे आम्हास दिली नाहीत. म्हणून स्थिर मत्तांच्या ठोक गट, संचित घसारा आणि निव्वळ घारणा मूल्य यांचे अनुक्रमे रु. १३,९७५.२३ लाख, रु. १०,७७०.३० लाख अणि रु. ३,२०४.९३ लाख इतके अधिक विवरण झाले आहे. तसेच कंपनीने महावितरण कडून येणे रु. २,४७३.०० लाख तसेच पी पी इ. हस्तांतरणाच्या पोटी होणाऱ्या तोट्याची रक्कम रु. ७३१.९३ लाख या रकमांना मान्यता दिलेली नाही.

(एच) "वापरात नसलेल्या मत्ता" "विक्रीसाठी काढलेल्या" या संबधीच्या यांचे निव्वळ धारण मूल्य रु. ५,००९.८७ लाख दि. ३१ मार्च २०२४ रोजी होते. त्याचा तपशील आम्हाला मिळू शकलेला नाही. या शिवाय अशा मत्ता "कमी झालेले धारण मूल्य किंवा निव्वळ वसुली योग्य मूल्य" यानुसार करण्याऐवजी त्यांचे धारण मूल्य यानुसार केलेले आहे. ही कृती भा.ले. मानक १०५ – चालू नसलेल्या मत्ता – "विक्रीसाठी काढणे व खंडीत केलेली प्रवर्तने" यातील आवश्यकते नुसार नाही. जर त्याचा काही प्रभाव या स्वायत्त वित्तीय वितरणपत्रावर आणि संबंधित प्रकरणांवर घेणार असला तर त्याची खात्री करता येत नाही.

(आय) पूर्ण झालेल्या कंत्राटाच्या ठेवींचे समायोजन प्रगतीपथावरील भांडवली कामे (CWIP) सोबत केले. त्यामुळे नकारात्मक (ऋण चिन्हांकित) भांडवली खर्च शिल्लक निर्माण झाली. त्याचा केलेला मेळ आम्हाला उपलब्ध झाली नाही. परिणामी ताळेबंदात उभारणी चालू असलेल्या मत्ता (AUC) / प्रगतीपथावरील भांडवली कामे (CWIP) यात तेव्हढा प्रमाणात कमी विवरण झाले. तसेच काही ए यू सी लाईन आयटेम्स बाबत गेल्या तीन वर्षात काहीच हालचाल नाही. भा. ले मानक ३६ – मत्ता कमी करत यातील आवश्यकतेप्प्रमाणे कंपनीच्या व्यवस्थापनाने मत्ता कमी करण्याविषयी निर्धारण केले नाही. यामुळे त्याचा स्वायता वि.वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर आम्हाला मत देता येत नाही.

(जे) कंपनी सरळ योगदान देणारी कंत्राटे स्वीकारते. त्यासाठी संबंधितांकडून ठेवी मिळतात. या ठेवी अनामत रक्कमा यांचे वार्षिक तत्वावर मुल्यांकन होत नाही आणि त्यांचा संबंधित प्रगतीपथावरील भांडवल कामाचे मुल्यांकन पूर्ण झालेल्या प्रकल्पाचे यांच्या शिलकी कमी करण्यासाठी होत नाही. दि. ३१ मार्च २०२४ रोजी ओ आर सी ठेवीची थकीत शिल्लक रक्कम रु. १,४९९.५१ लाख होती. काही प्रकरणात निव्वळ रक्कम इतर उत्पन्न यात करण्याऐवजी इतर संकीर्ण प्राप्ती मध्ये गटामध्ये (गृपमध्ये) करण्यात आली. (नॉन. जी एस टी) म्हणून सदर शिलकींची परिपूर्णता व अचूकता यावर आम्हास मत देता येत नाही.

(के) कंपनीने तिच्या काही मनोऱ्यांचे पायची रचना तसेच उभारलेले संपूर्ण मनोरे काढून टाकण्याचे ठरविले आहे. ते काम सध्या प्रगतीपथावरील भांडवली कामे(सी डब्ल्यू आय पी) यामध्ये असून त्याची रक्कम रु. २,५१७ लाख आहे. कंपनीने सदर रक्कम निर्लेखित करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी कृती केलेली नाही. किंवा मनोडतोड करण्याच्या खर्चासाठी तरतूद केलेली नाही हे भा.ले.मानक – १६ 'मालमत्ता कारखाना व साधने' या नुसार नाही.

(एल) कंपनी तिच्या वस्तूमालसूची (इन्व्हेटरी)च्या वसुली योग्य मूल्या संबधी तपशील ठेवीत नाही. वस्तूमालसूची मधील मूल्यांकन खर्चानुसार केले जाते. त्याऐवजी ते कमी झालेली किंमत आणि एन आर व्ही याप्रमाणे नमूद केले पाहिजे यामूळे टिपा क्र. २.१४ येथे निवेदन केलेल्या लेखा धोरणापासून आणि भा. ले. म़ानक २ वस्तूमान सूची यातील तरतुदी यापासून विचलन झालेले आहे. अशा विचलनाचा स्वायत्त वि.वि. पत्रकावर परिणाम होण्याची शक्यता असल्यास तो निश्चित करता येणार नाही.

(एम) परिमंडळ कार्यालयीन ट्रान्स्फार्मर्स व उपकेंद्रातील काही साधने दुरुस्तीसाठी अन्य दूकानदाराकडे पाठवितात काही थोड्या परिमंडळात अशाप्रकारे साधने दुरुस्तीसपाठविणे व परत आणणे यातील दुरुस्तीनंतरची गुणवत्ता या संबधीची लेखी नोंदणी अहवाल जतन केलेले नाहीत.

याशिवाय या मत्तांचे वर्गीकरण वापरात नसलेल्या मत्ता विक्रीसाठी काढलेल्या असे केलेले आहे. ही कृती भा. ले मानक १६ : पीपीई यास सुसंगत नाही. जर याचा काही परिणाम स्वायत वि.वि पत्रकांवर होणार असल्यास, त्यावर आम्हास, मत देता येत नाही.

(एन) व्यापारी येण्याची रक्कम दि. ३१ मार्च २०२४ रोजी रु. २,८६,७३०.७० लाख आहे. या व्यापारी येण्यास शिलकीचे अस्तित्व, अचूकता आणि मूल्यांकन यावर अभिप्राय देण्यास, आम्ही खालील कारणामुळे असमर्थ आहोत.

(१) व्यापारी येण्यांची संस्था (पार्टीनुसार) विभागणी आणि त्या येण्याचा कालावधी / वय याची माहिती सिस्टिम मधून तयार करण्यात आली. ती सदोष दिसते. स्वायत्त वि.वि. पत्रकांची टिपा क्र. ३७ ही व्यापारी येण्याच्या कालावधी / वयासंबधी आहे. त्यात प्रकट केलेल्या रकमेच्या अचूकतेवर आम्हास भाष्य करता येत नाही.

(२) कंपनी दीर्घकाळ थकीत शिलकी यासाठी अपेक्षित पत हानी (इ सी एल) यासाठी तरतूद केलेली नाही. ही बाब भा.ले. मानक १०९ वित्तीय साधने यातील आवश्यकते नुसार नाही.

(३) या शिवाय एक संस्था नादारी ठराव प्रक्रीया यामध्ये गेलेली आहे. या प्रकरणातील थकीत प्राप्तीच्या हानीची रक्कम रु. १०,२८२.९० लाख आहे. त्यासाठी तरतूद कंपनीने केली नाही

(४) व्यापारी येण्याच्या शिल्लकी संबधी स्वतंत्र खातरजमा मिळविण्याबाबत आम्ही असमर्थ ठरलो: तसेच त्या विषयी पर्यायी कार्यपद्धती आम्हाला करता आलेली नाही. यामुळे त्यांची अचुकता आणि मुल्यमापन यावर मत आम्हाला देता येत नाही. कारण या शिल्लकीचा मेळ व त्यांचे परिणाम याचे अधीन आहेत.

(ओ) सांविधिक देणी – यामध्ये स्त्रोतांपाशी झालेली कर कपात, भ.नि. निधी आणि व्यावसायिक कर यांचा समावेश असून त्यांची रक्कम रु. २,९२०.६० लाख आहे. त्यात जुनी दायित्वे समाविष्ट असून ती मेळ करण्याच्या अधीन आहेत. ह्या मेळ करतांना होणारी समायोजने / तडजोडी यावर आम्हास मत देता येत नाही.

(पी) झाडे / पीके यांसाठीचे खर्च व त्यांसाठी तरतूद या दोन्हींचा समावेश अल्प मुदतीसाठीच्या तरतुदीसाठीच्या तरतुदीमध्ये होतो. ती रक्कम एकूण रु. ५,३०९.५५ लाख आहे. मात्र त्याची तपशीलवार सुची व तरतुदीचा आधार उपलब्ध नाहीत. यामुळे या तरतुदींची परिपूर्णता व अचुकता यावर आम्हास अभिप्राय देता येत नाही. याचा जर काही संभाव्य परिणाम स्वायत्त वि.वि. पत्रकांवर होणार असेल, तर त्याची खात्री देता येत नाही.

(क्यु) दीर्घ मुदतीच्या तरतुदींमध्ये रु. १२,५७३.५७ लाख रकमेची भांडवली कामे आहेत. त्याची तपशीलवार सूची व तरतुदीचा आधार उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्याची परिपूर्णता व अचूकता यावर आम्हास मत देता येत नाही. या तुरतुदींच्या आधाराचा आढावा घेतांना त्यात जर काही मेळ केले गेले त्याचे स्वायत्त वि.वि. पत्रकांवरील परिणामाची खात्री देता येत नाही.

(आर) कंपनीने सुरक्षा अनामत (ठेव) रु. ३,९९१.२५ लाख जमा केले. ते तीन वर्षापेक्षा जास्त काळापासून थकीत आहे. कंपनीच्या धोरणांप्रमाणे ती संबंधितांना परत केली नाही किंवा 'इतर उपन्न' यात स्थानांतरित परत केलेली नाही. याशिवाय, सुरक्षा अनामतीचे चालू व 'चालू नसलेल्या' या गटात केलेले वर्गीकरण योग्य नाही. काही रकमा ३६५ दिवसांपेक्षा थकीत आहेत. यामुळे अधिनियमाची कलमे क ७३ ते ७६ यातील तरतुदीचे अनुपालन झालेले नाही.

(एस) परिसमापनातील नुकसान आणि कंपनीत मिळालेली इसार रक्कम ठेव (EMD) यांच्या रकमा अनुक्रमे रु. ३,४४०.८५ लाख आणि रु. २११.७१ लाख या तीन वर्षापेक्षा जास्त काळापासूनच्या आहेत. (कंपनी धोरणप्रमाणे) त्या संबंधितांना परत केल्या नाहीत किंवा इतर उत्पन्नात स्थानांतरित केलेल्या नाहीत. तसेच त्यांचे चालू व चालू नसलेल्या असे केलेले वर्गीकरण योग्य नाही. कंपनीचे धोरणाचे अनुसरण न करणे आणि त्यामुळे जर काही समायोजने उद्भवली तर त्यांचे स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांवरील होउ शकणाऱ्या परीणामांची खातरजमा करता येत नाही.

(टी) कंपनीला काही फरकांचा सामना करावा लागला. त्यात काही विक्रेत्यांचे काम कंत्राटाच्या मुदतीत खंडित करावे लागले. यामुळे किंमत वाढली. संबधित फरकांची ओळख निश्चिती करता आलेली नाही. ही समायोजने सध्या 'जोखीम व खर्च समायोजने' या लेजर मध्ये दिसतात. आता सलग्न समायोजन रकमा रिटेंशन मनी रिसीव्हेबल या सोबत आहेत. मात्र संबधितांची तपशीलवार माहिती आणि या खात्या संबधीच्या माहितीचा कालावधी / वय उपलब्ध नाही. तसेच एकूण थकीत शिल्लक आणि ठेवून घेतलेले पैसे यांचे वर्गीकरण चालू नसलेले असे केले आहे ते योग्य वाटत नाही. त्यामुळे शिल्लकीच्या असण्याबाबत आणि अचुकतेबाबत भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

(यु) कंपनीला विशिष्ट प्रकल्पाच्या भांडवली मत्ता यासाठी शासकीय अनुदाने मिळाली आहेत. त्यांची दि. ३१ मार्च २०२४ रोजीची थकीत शिल्लक रु. २७,७२६.९४ लाख होती. या अनुदानांना महसूल अशी मान्यता देणे प्रलंबित आहे. मात्र या अनुदानांची तपशीलवार माहिती उपलब्ध नाही. त्यात मत्तांचे विनिर्देश, त्यासंबधीच्या पूर्ण करावयाच्या अटी, ही माहिती उपलब्ध नाही. परिणामी या स्थगित केलेल्या रकमांची परिपूर्णता व अचूकता यावर आणि त्यांचे स्थगित ठेवणे या करारविशिष्ट योजना किंवा अटी या नुसार आहेत किंवा कसे यावर अणि त्यांच्या लेख्यांची प्रक्रिया भा.ले. मानक २० – शासकीय अनुदाने व शासकीय "साह्यांचे प्रकटन" यातील तरतुदीनुसार आहे की काय या विषयी आम्हास मत देता येणे शक्य झालेले नाही. जर याचे काही संभाव्य परिणाम स्वायत्त वि.वि. पत्रकावर होणार असतील, तर त्यांचे अंदाज सध्या करता येणार नाही.

(व्ही) कंपनीने वि.वि. पत्रकांच्या टिपा क्र. ४२ मध्ये आकस्मिक दायित्वे रु. ५,८७,६२६.३६ लाख एवढी नमूद केली आहेत. याशिवाय चालू दायित्वेची रक्कम रु.६६२.२४ लाख आणि इतर चालू वित्तीय मत्ता यामध्ये वरील प्रकरणांसाठी काही भरपाई /पैसे देणे याकरिता रु. ११,९४२.०७ लाख या कारणा करिता नोंदलेले आहेत. या प्रकरणांची तपशीलवार सुची, संबधित रकमा, आणि त्याची स्थिती यांची माहिती नसल्याने आकस्मिक दायित्वांची परिपूर्णता व अचूकता यावर आम्हास मत देता येत नाही.

(डब्ल्यु) खालील शिलकींसंबधीचा काही तपशील आम्हाला मिळाला नाही.

| अनु. क्र. | तपशील | रक्कम रु. (लाखात) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | कर्मचारी कल्याण निधीसाठी बोर्डासोबत (मंडळासोबत) दायित्व | ६०१.४४ | सूची व माहिती उपलबध नाही. याचा प्रभाव अचुकतेवर व परिपूर्णतेवर होऊ शकतो. |
| २. | किरकोळ पतदारांना देय अंतर्गत (इतर) | २,३५७.१३ | व्यापारी देणी यातील स्पष्ट नसलेली खर्ची शिल्लक. अचूकतेवर प्रभाव होईल. |
| ३. | भ.नि.नि. विश्वस्त मंडळ व अंतिम तडजोड | २,२६८.९३ | सूची व माहिती उपलबध नाही. याचा प्रभाव अचुकतेवर व परिपूर्णतेवर होऊ शकतो. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | कंत्राटदार / पुरवठादार यांना अग्रिमे (सं. वस्तू) | ३,५२०.२६ | अग्रिमांतर्गत पत शिल्लक अस्पष्ट. अचूकतेवर प्रभाव होईल. |
| ५. | प्रकल्पांसाठी भांडवल अग्रिम | १,१०६.७६ | सूची व माहिती उपलबध नाही. याचा प्रभाव अचुकता, परिपूर्णता आणि मुल्य यावर होऊ शकतो. |

(एक्स) इतर चालू वित्तिय दायित्वे यात समाविष्ट केलेली कर्मचाऱ्यांच्या देण्या संबंधीची रक्कम रु. ४,०६६.६२ लाख, या संबंधी लेखा परिक्षणाचा पुरेसा व योग्य पुरावा आम्हास मिळालेला नाही. त्यामुळे या शिलकीचे अस्तित्व, परिपूर्णता आणि अचुकता यावर मत देण्यास आम्ही असमर्थ आहोत. त्याचे एकत्रित वि. वि. पत्रकावर संभाव्य परिणाम होणार असेल तर त्याची निश्चिती सध्या करता येणार नाही.

(वाय)कंपनीने लेखा नोंद वहीच्या आधारे स्थगित कर मत्ता दायित्वे यांचा हिशेब केलेला आहे. यात हिशेबानुसार नमूद केलेल्या रकमा वरती दिलेल्या "ग्राह्यमतांचा आधार" या परिच्छेदातील मुद्दा क्र. ३ (ए) ते ३ (एक्स) याच्या परिणामकारक प्रभावामुळे बदलू शकतील त्यामुळे या रकमांवर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

(४) आम्ही आमचे लेखा परिक्षण अधिनियमाचे कलम, १४३(१०) यात विनिर्देशित केलेल्या "लेखापरिक्षणांची मानके" यानुसार केले आहे. या मानकांनुसार असलेली आमची जबाबदारी याचे वर्णन आमच्या अहवालातील स्वायत्त वि.वि. पत्रकांचे लेखापरिक्षणासंबधी लेखापरिक्षकांची जबाबदारी य परिच्छेदात केले आहे. भारतीय सनदी लेखापाल संस्था ("आय सी ए आय") यानी प्रसारित केलेली नीती संहिता यानुसार आणि त्यासोबत अधिनियम व त्याखालील नियमावली यातील तरतुदी यासंबंधाने असलेल्या "नैतिक आवश्यकता" यानुसार आम्ही या कंपनीपासून स्वतंत्र आहोत. तसेच आयसीएआय् यांची नीतीविषयक संहिता आणि वरील आवश्यकता यांना अनुसरुन आम्ही आमची जबाबदारी पार पाडली आहे. आमचा विश्वास आहे कीआम्ही मिळविलेले लेखापरिक्षणासंबधीचे पुरावे पुरेसे व योग्ये असून ते आमच्या ग्राह्य मतांसाठी रास्त तात्विक आधार पुरवितात.

**स्वायत्त वित्तीय वितरण पत्रके आणि लेखापरिक्षण अहवाल या व्यतिरिक्त अन्य माहिती.**

५) इतर माहितीसाठी कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार असते. या इतर माहितीमध्ये संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट केलेली माहिती असते त्यांत संचालक अहवालास जोडलेला परिशिष्टे, समाविष्ट असतात. मात्र त्यामध्ये स्वायत्त वि.वि.पत्रके आणि त्यांचा आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाचा अहवाल यांचा अंतर्भाव नसतो.

६) स्वायत्त वि.वि. पत्रकांवरचे आमचे मत यामध्ये इतर माहिती समाविष्ट केलेली नसते. आणि त्याबाबत आम्ही कोणतेही हमी स्वरुपाचे निष्कर्ष व्यक्त करित नाही.

७) स्वायत्त वि.वि. पत्रकाच्या आमच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भात इतर माहितीचे वाचन करणे, ही आमची जबाबदारी आहे. इतर माहिती स्वायत्त वि.वि. पत्रकांसोबत मोठ्या प्रमाणात विसंगत आहे काय किंवा लेखा परिक्षणासाठी आही मिळविलेली माहिती, ज्ञान यात कोणतेही मोठ्या प्रकारे गैरविवरण होत आहे. किंवा कसे याचा आम्ही विचार करतो. जर आम्ही केलेल्या कामाच्या आधारे, आम्ही असा निष्कर्ष काढला की इतर माहितीचे गैर विवरण होत आहे. तर तशी वस्तूस्थिती दाखविणे हे आमचे कर्तव्य असते. संचालक मंडळाच्या अहवालातील इतर माहितीचे आणि त्याचे प्रभाव यांचे समायोजन केलेले नाही. ही बाब वरील ग्राह्य मतांच्या आधारे यात स्पष्ट केली आहे. या कारणामुळे इतर माहितीचे गैर विवरण झाले आहे किंवा कसे याचा निष्कर्ष आम्ही काढू शकत नाही.

**स्वायत्त वि.वि. पत्रकांसंबधी व्यवस्थापनाची जबाबदारी**

८) अधिनियमाचे कलम १३४ (५) नुसार, कंपनीचे वित्तीय बाजूचे सत्य व रास्त दर्शन घडविणारी स्वायत्त वि.वि. पत्रके तयार करणे याची जबाबदारी कंपनीच्या व्यवस्थापन मंडळाची असते. त्यात वित्तीय कामगिरी, समभाग धारणेतील बदल व रोकडता प्रवाह यांचेही सादरीकरण अंतर्गत असते. ते भारतात सर्व साधारणे स्वीकारलेल्या लेखांकन तत्वाशी आणि अधिनियमाचे कलम १३३ यात समाविष्ट केलेल्या लेखांकन मानकांशी ते सुसंगत असले पाहिजे. कंपनीच्या मत्तांचे सरंक्षण करणे, लबाडी व इतर गैरप्रकार शोधणे व तिळा आळा घालणे, योग्य लेखा धोरणे निवडून ती लागू करणे, प्रमाणशीर व सूज्ञ असे न्याय निर्णय घेणे व अंदाज करणे आणि कंपनीच्या लेखांच्या नोंदी परिपूर्ण व निर्दोष अचूक असल्याबद्दल हमी देण्यासाठी प्रभावीरित्या कार्यरत असतो. अशा अंतर्गत वित्तीय नियत्रंण पद्धतीची रचना ती अमलात आणणे व सतत कार्यरत ठेवणे ही सुद्धा व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

९) स्वायत्त वि.वि. पत्रके तयार करताना व्यवस्थापनाच्या जबाबदाऱ्यांमध्ये पुढील बाबींचा सुद्धा समावेश होतो. त्याप्रमाणे सतत चालू राहणारी संस्था म्हणून कंपनीच्या सामर्थांचे निर्धारण करणे, त्यासाठी लागणारी माहिती प्रकट करणे, त्यासाठीचे लेखांकनातून आधार दर्शविणे. मात्र जर कंपनीच्या संचालकांचे असे मत झाले की, कंपनीचे एकतर परिसमापन केले पाहिजे व तिचे कार्य थांबविले पाहिजे कारण त्याशिवाय अन्य काही करण्याशिवाय अन्य वास्तव्य पर्याय नाही असे असले तर तसे सांगणे.

१०) संचालक मंडळ कंपनीच्या वित्तीय अहवालाची मांडणी करण्याच्या कार्यपद्धतीवर लक्ष ठेवण्यासही जबाबदार असते.

**स्वायत्त वि.वि. पत्रकांचे लेखा परिक्षणसाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी**

११) आमची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :- स्वायत्त वि.वि. पत्रके ही कोणत्याही लबाडी किंवा चूकीमुळे होणाऱ्या मोठ्या स्वरुपातील गैर प्रकारांपासून पूर्णपणे मुक्त आहेत याचे योग्य आश्वासन देणे आणि आमच्या मत्तांचा समावेश असलेला लेखा पपिरक्षकांचा अहवाला देणे. आमचे योग्य आश्वासन हे उच दर्जाचे आश्वासन आहे. मात्र लेखामानकांनुसार केलेले लेखा परिक्षण हे नेहमीच अस्तित्वात असलेली मोठी गैर विवरणे शोधून काढेल याची हमी नव्हे. लबाडी किंगा चुका यातून गैर विवरणे उद्भवतात आणि त्यातील एका प्रकारे किंवा एकत्रितपणे त्याचा प्रभाव स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या वापरकर्त्यांच्या आर्थिक निर्णयावर पडण्याची शक्यता / अपेक्षित असेल तर ती महत्वाची मानली जातात.

आमच्या अहवालाचे जोडपत्र 'अ' या मध्ये स्वायत्त वि.वि. पत्रकांचे लेखा परिक्षण करणाऱ्या लेखापपिरक्षकांच्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत.

**इतर कायदेशीर व नियमन विषयीच्या तरतुदीवर अहवाल**

१२) प्रधान महालेखापाल -३ महाराष्ट्र यांनी अधिनियमाचे कलम १४३ (५) या अन्वये कांही निर्देश व उपनिर्देश दिले आहेत. त्याच्या आवश्यकतेनुसार, आम्ही जोडपत्र 'ब' यात सदर निर्देश व उपनिदेश यासंबधी एक निवेदन दिलेले आहे.

१३) अधिनियमाचे कलम १४३ मधील उपकलम (११) यातील तरतुदीनुसार केंद्र शासनाने कंपन्यांचे (लेखा परिक्षण अहवाल) आदेश २०२० (दि ऑर्डर) जारी केली. त्यातील आवश्यकतांनुसार आणि उपरोक्त आदेशातील परिछेद क्र. ३ व ४ यात विनिर्देशन केलेल्या लागू होणाऱ्या विषयांना अनुसरुन आम्ही एक निवेदन, जोडपत्र 'क' मध्ये दिले आहे.

१४) अधिनियमाचे कलम १४३ (३) यातील आवश्यकता बाबत. आम्ही खालीलप्रमाणे अहवाल देत आहोत :-

ए) उपरोक्त "ग्राह्यमतांचा आधार" यात वर्णन केलेल्या प्रकरणांचे संभाव्य परिणाम यांचा अपवाद वगळता, आम्ही, आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार आमच्या लेखा परिक्षणाच्या हेतू करिता आवश्यक असलेल्या माहितीची विचारणा केली व ती सर्व मिळविली.

बी) उपरोक्त "ग्राह्यमतांचा आधार" यात वर्णन केलेल्या प्रकरणांचे संभाव्य परिणाम यांचा अपवाद वगळता,आमच्या मते, या कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असलेल्या लेखांकनाच्या सर्व नोंद वह्यांचे कंपनीने योग्य रकारे तयार करुन त्यांचे जतन केलेले आहे. असे आम्ही या नोंदवह्यांच्या पुस्तकांचे निरिक्षण केल्यावर आम्हास आढळून आले आहे.

सी) या अहवालाशी संबधित असलेली वि.वि. पत्रके म्हणजे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, (सर्वकष उत्पन्नासह), समभाग धारणेतील बदलाचे पत्रक व रोकडता प्रवाह पत्रक ही या कंपनीच्या लेखा वह्यांशी सहमती दर्शवितात.

डी) उपरोक्त "ग्राह्य मतांचा आधार" या विभागात वर्णन केलेल्या "प्रकरणांचे संभाव्य परिणाम" यांचा अपवाद वगळता, उपरिनिर्विष्ट स्वायत्त वि.वि. पत्रके, ही अधिनियमातील कलम १३३ यात विनर्देशीत केलेली 'भारतीय लेखा मानके' यांची पुर्तता करतात. असे आमचे मत आहे.

इ) आमच्या मते, कंपनीने कायद्यातील आवश्यकते प्रमाणे आतापर्यत लेखा नोंद वह्या योग्यप्रकारे जतन केलेल्या आहेत, असे आम्ही या वह्यांच्या परिक्षणातून दिसून आले. याला अपवाद फक्त निन्मलिखीत नियम ११ (जी) नुसार द्यावयाच्या अहवालातील खालील परिच्छेद (एच) (vi) यातील मजकुराचा आहे. कलम १४३ (३) (बी)नुसार अहवाल देणे आणि नियम ११ (जी) नुसार अहवाल देणे या बाबत खालील परिच्छेद २ (१) (६) यामधे लेखे जतन करणे आणि त्या संबधीत विषयाच्या राखीव बाबी नमुद केलेल्या आहेत. त्या परिच्छेद १४ (बी) येथे आहेत.

एफ) कंपनी व्यवहार मंत्रालयाने अधिसुचना क्र. ४६३(ई) दि. ०५ जून २०१५ रोजी काढलेल्या अधिसुचने नुसारअधिनियमाचे कलम २ (४५) याच्या अर्थाच्या प्रमाणे कंपनी ही शासकीय संस्था आहे. त्यामुळे संचालकांच्या अपात्रते विषयीचे अधिनियमातील कलम १६४ (२) यातील तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

जी) कंपनी स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी असण्याबद्दल अणि त्याच्या प्रवर्तनाबद्दल आमचा स्वतंत्र अहवाल जोडपत्र 'ड' यामध्ये पहावा.

एच) कंपन्याचे (लेखापरिक्षण व लेखापरिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम ११ नुसार लेखा परिक्षकांच्या अहवालात इतर विषय समाविष्ट केले जातात. आमच्या मते तसेच अम्हास दिलेली सर्वोतपदी माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आम्ही खालील बाबींचे निवेदन करतो:-

I) उपरिनिर्दिष्ट परिच्छेद ३(व्ही) वगळता, या कंपनीने तिच्या स्वायत्त वि. वि. पत्रकांमध्ये प्रलंबित कायदेशिर प्रकारणचे कंपनीच्या वित्तय स्थितीवर पडू शकणारे परिणाम प्रकट केलेले आहेत यासाठी स्वायत्ता वि.वि. पत्रकांची टिपा क्र. ४२ पहावी.

ii) कंपनीने डेरिव्हेटीव्ह कॉन्ट्रक्ट्स सह कोणतेही दिर्घ मुदतीचे कंत्राट/करार केलेले नाहीत. त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर तोटा / हानी होईल असे दिसत नाही.

iii) गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी यामध्ये स्थानांतरित करण्याजोगी रक्कम कंपनीकडे नाही.

iv)

१) व्यवस्थापनाने असे निवेदन केलेले आहे की त्यांचे सर्वोतपरी उत्तम ज्ञान व विश्वास यानुसार कंपनीने अन्य कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेला कोणताही अग्रिम निधी किंवा कर्जाऊ रक्कम किंवा गुंतवणूक (कर्जाच्या पैशातून किंवा शेअर अधिमुल्य किंवा अन्य कोणत्याही स्त्रोत - यामध्ये

परकीय संस्था (मध्यस्थ) समाविष्ट यासाठी दिलेले नाहीत. असे कोणतेही नोंदलेले किंवा अन्यप्रकारे सामंजस्याचा व्यवहार केलेले नाहीत. ज्यात सदर 'मध्यस्थ' कोणत्याही प्रकारे थेट किंवा अप्रत्यक्षरित्या कंपनीच्या वतीने अंतिम लाभार्थी अन्य कुणा व्यक्तीला कर्ज देणे किंवा त्यात गुंतवणूक करणे असे

व्यवहार करते किंवा अंतिम लाभार्थांच्या वतीने प्रतिभूती किंवा हमी देते, असे किंवा तत्सम व्यवहार केलेले नाही.

२) व्यवस्थापनाने असे निवेदन दिलेले आहे की त्यांचे सर्वोतपरी उत्तम ज्ञान व विश्वास यानुसार कंपनीस कोणतीही व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून लेखापरिक्षणाच्या काळात कोणताही निधी मिळालेला नाही. यामध्ये परकीय संस्थाचाही समावेश आहे. या परकीय संस्था (फंडीग पार्टीज) यांचेकडून असे लेखी किंवा अन्य प्रकारे असे सामंजस्याचे व्यवहार लेखा परिक्षणाच्या या अहवालाच्या तारखेपर्यत झालेले नाही. या व्यवहारात फंडीग पार्टीज् (अंतिम लाभार्थी) यांच्यासाठी / त्यांच्या वतीने कंपनी कोणत्याही अन्य प्रकारे ओळख पात्र असलेल्या व्यक्ती / संस्था यांना थेट किंवा अप्रत्येक्ष प्रकारे थेट किंवा अप्रत्यक्षरित्या कर्ज देणे. किंवा गुंतवणूक करणे किंवा त्यांना हमी, प्रतिभूती किंवा तत्सम व्यवहार करते. मात्र तसे कोणतेही व्यवहार कंपनीने केलेले नाहीत.

३) आम्ही योग्य व प्रमाणशीर वाटलेल्या लेखापरिक्षणाच्या कार्यपद्धतीने काम केले आहे. त्यांच्या आधारे आणि आम्हास यासंबधी व्यवस्थापनाने दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार तसेच आमचे निरिक्षणे आणि नियम ११ (इ) चे उपखंड(१) आणि (२)यात तरतूद केल्याप्रमाणे दिलेली प्रतिवेदने यामध्ये कोणतेही मोठ्याप्रकारचे गैर विवरण झालेले नाही असा आम्हाला विश्वास आहे.

v) यावर्षी कंपनीने कोणताही लाभांश दिलेला नाही किंवा जाहीर केलेला नाही.

vi) आमचे परिक्षण आधारे असे दिसून आले की, सुत्रधारी कंपनीने तिच्या लेखा नोंदींच्या वह्या जतन करण्यासाठी वापर केलेल्या सॉप्टवेअर मधे लेखा परिक्षणांचा मागोवा घेण्याची सुविधा (एडीट लॉग) उपलब्ध आहे. लेखापरिक्षणाचा मागोवा घेण्याच्या या सुविधेचा वापर या वर्षात लेखांकन सॉप्टवेअर मधे अभिलिखित (रेकॉर्डीग) केलेल्या सर्व व्यवहारांसाठी करण्यात आलेला आहे. या शिवाय आमच्या लेखापरिक्षणात असे आढळून आले की या लेखा परिक्षणाचा मागोवा घेण्याच्या सॉप्टवेअरच्या सुविधेत खराबी किंवा अनाधिकृत अडथळा आणण्याचा प्रकार झालेला नाही.

१५) कंपनी व्यवहार मंत्रालय यांची अधिसूचना क्र. ४६३(इ) दिनांक. ०५ जून २०१५ यातील सवलतीनुसार आणि अधिनियमनाचे कलम २ (४५) याच्या अर्थाप्रमाणे कंपनी ही एक सरकारी कंपनी आहे. त्यामुळे तिच्या अधिनियमनाचे कलम १९७ यातील व्यवस्थापकीय परिश्रमिक या विषयीच्या तरतुदी लागू नाहीत.

**एम एस के ए ॲण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
आय सी ए आय फर्म नोंदणी क्र. १०५०४७ डब्ल्यू

सही/-

**अमरीश वैद्य**
भागीदार
सदस्य क्र. १०१७३९
यु डी आय एन : २४१०१७३९ बी के इ झेड यु क्यू ७३५६

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ सप्टेबर २०२४

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रकावरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या समान तारखेच्या अहवालाचे जोडपत्र अ

## लेखा परिक्षकाच्या अहवालातील अभिप्राय

### स्वतंत्र वि.वि.पत्रकांच्या लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांची जबाबदारी

लेखा परिक्षणांच्या मानकांना (एस ए) अनुसरुन, लेखा परिक्षणांचा एक भाग म्हणून आम्ही व्यवसायिक न्यायबुद्धीचा व्यावसायिक संशयवाद बाळगतो. तसेच आम्ही खालील पद्धतीने कामे सुद्धा करतो:-

- स्वतंत्र वि. वि. पत्रकात लबाडी किंवा चुका यामुळे मोठ्या प्रमाणात गैर विवरण होण्येचे धोके असतात आम्ही अशा धोक्यांची ओळख निश्चिती व निर्धारण करण्याकरिता त्यासाठी प्रतिसाद योग्य लेखापरिक्षण पद्धतीची रचना करुन त्यानुसार कार्य करतो. त्यातून आमच्या मत्तांना आधार देण्यासाठी पुरेशा प्रमाणात व रास्त पुरावे मिळवितो. चुकांमुळे होऊ शकणाऱ्या गैर विवरणांचे लबाडीने मोठ्या प्रमाणात गैर विवरण होण्याचा धोका अधिक असतो. कारण लबाडीमध्ये संगणमत. बनावटी, हेतुपुरस्कार माहिती वगळणे, चुकीचे निवेदन देणे किंवा अंतर्गत नियंत्रणां चे उद्धंन करणे अशा कारवाया होऊ शकतात.
- लेखा परिक्षणासाठी सुसंगत अशी अंतर्गत नियंत्रणे आहेत. याचे हमी मिळविण्याच्या दृष्टिने परिस्थितीनुरुप योग्य ठरतील अशा लेखा परिक्षण कार्यपद्धतीची रचना आखणे आवश्यक असते. तसेच अधिनियमाचे कलम १४३ (३)(i) यानुसार स्वायत्त वि.वि. पत्रकांमध्ये कंपनी अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशा प्रमाणात योग्य जागी आहेत किंवा नाहीत आणि असल्यास त्याची प्रभावी कार्यवाही होते काय या बाबत मत व्यक्त करणे ही सुद्धा आमची जबाबदारी आहे.
- व्यवस्थापनाने ठरविलेल्या लेखांकनाच्या धोरणांच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे, लेखांकनासाठी केलेल्या अंदाजा योग्यता ठरविणे आणि व्यवस्थापनाने केलेली संबंधित प्रकटने तपासणे.
- कंपनी ही लेखांकनाच्या आधारे सतत चालू राहणारी व्यवसाय संस्था आहे. व्यवस्थापनाचे मत्ताला योग्य आधार असण्याचा निष्कर्ष करणे. आणि सतत चालू राहणारी व्यावसायिक संस्था म्हणून भविष्यकाळातही कार्यरत राहील यासाठी कंपनीची पात्रता असल्याबद्दल मोठा संशय निर्माण करील अशा मोठया प्रकारच्या अनिश्चितता दर्शक घटना, प्रसंग किंवा स्थिती अस्थित्वात आहे किंवा नाही याबद्दल लेखा परिक्षणातून पुरावे मिळविणे. व योग्य असा निष्कर्ष काढणे. जर आम्ही अशा निष्कर्ष काढला की मोठ्या प्रमाणात अनिश्चितता अस्तित्वात आहे, तर आम्हास आमच्या एकत्रीत वि.वि. पत्रकाचा लेखा परिक्षणाच्या संबंधित प्रकरणांकडे लक्ष वेधावे लागते. आणि जर अशी प्रकटने अपुरी असतील तर आमच्या अभिप्रायात सुधारणा करावी लागते. आमचे निष्कर्ष आमच्या लेखा परिक्षणाच्या तारखेपर्यंत लेखा परिक्षणाच्या आधारे मिळविलेल्या पुराव्यांवर आधारीत आहेत. मात्र भविष्यात सतत चालू राहणारी संस्था म्हणून कार्यरत खंड पडेल अशा घटना किंवा स्थिती निर्माण होऊ शकते.
- स्वतंत्र वि.वि. पत्रके आणि त्या सोबतची प्रकटने यातून केलेले सर्वंकष सादरीकरण, त्याची रचना व त्यातील माहिती याचे मुल्यांकन करणे आणि स्वायत्त वि.व. पत्रके आणि त्यातील व्यवहार व घटना प्रसंग यातून रास्त दर्शन घडते किंवा कसे याचे मूल्यांकन करणे.
- आम्ही प्रशासनाची सूत्रे सांभाळणाऱ्यांशी संवाद करतो आणि आमच्या लेखापरिक्षणांची नियोजित व्याप्ती व वेळ व लेखापरिक्षणात शोधलेल्या बाबी कळवितो. यामध्ये आम्ही लेखापरिक्षणांत शोधलेल्या अंतर्गत नियंत्रणातील मोठ्या उणिवा यांचा ही समावेश असतो.
- तसेच आम्ही प्रशासकांना एक निवेदनही देतो. त्यामध्ये आम्ही गोळा केलेले नैतीक गरजांविषयीचे व स्वतंत्रेविषयीचे पुरावे असतात. तसेच आमचे स्वतंत्र व लागू होणारे संरक्षक उपाय यासह सर्व इतर संबधित विषय त्यांना कळवितो.

**एम एस के ए ॲण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
आय सी ए आय फर्म नोंदणी क्र. १०५०४७ डब्ल्यू

सही/-

**अमरीश वैद्य**
भागीदार
सदस्य क्र. १०१७३९
यु डी आय एन : २४१०१७३९ बी के इ झेड यु क्यू ७३५६

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ सप्टेबर २०२४

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडच्या दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकावर स्वतंत्र लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालाचे जोडपत्र - ब

(आमच्या समान तारखेच्या अहवालातील इतर कायदेशीर आणि नियमनांच्या आवश्यकता या प्रकरणातील परिच्छेद १२ मधे संदर्भ)

**कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १४३ चे उपकलम (५) नुसार दिलेले निर्देश**

भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी दिलेल्या निर्देशावर आमचा अहवाल / निष्कर्ष / माहिती याचे वाचन आमचा कंपनीच्या ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या सांविधिक लेखापरिक्षण अहवालाच्या सोबत वाचावा.

१ **या कंपनीमध्ये तिचे लेखा -विषयक सर्व व्यवहार माहिती, तंत्रज्ञान (आय् टी) मार्फत करण्याची प्रणाली आहे किंवा कसे ? जर असल्यास, आय टी प्रणाली बाहेर झालेल्या लेखा व्यवहाराचे प्रक्रीयांचे लेखांच्या एकात्रिकतेवर आणि वित्तीय स्थितीवर परिणाम झाले असल्यस ते सांगितले.**

**एम एस के ए चा अभिप्राय**

होय, कंपनीमध्ये सॅप प्रणालीद्वारे लेखांच्या व्यवहारांचे व्यवहारांची प्रक्रीया आय टी मार्फत केली जाते.

आमच्या लेखापरिक्षणात आम्हाला असे दिसून आले की, नफा केंद्रांनी निर्माण केलेली बीजके (इनव्हॉयसेस) राज्य पारेषण लोकोपयोगी संस्था (एस टी युटीलीटी) यांनी दिली होती आणि ती प्रणाली मध्ये सामाविष्ट करण्यात आली. याशिवाय कंपनी अनियोजित घसाऱ्यासंबंधी तसेच वयानुसार समायोजने, कर्जाच्याव्याजाची मोजणी, अनुदान स्थगिती, याचे हिशेब व्यक्तितर्फे करते.

२ **कर्जाची परतफेड करण्यात कंपनीच्या अकार्यक्षमतेमुळे कंपनीच्या कर्जदाराने सध्या अस्तित्वात असलेल्या कर्जाची काही पुनर्रचना केली आहे का किंवा ऋण / कर्जे / व्याज यांना माफ करणे / निर्लेखित केल्याची काही प्रकरणे आहेत का ? याचे प्रतिवेदन करणे. जर असतील तर, वित्तीय परिणाम नमूद करावेत. अशी प्रकरणे उचित रित्या लेखांकित केली आहेत का ?**

**एम एस के ए चा अभिप्राय**

लेखा परिक्षणाच्या आढावा वर्षात असा कोणताही प्रसंग उद्भवला नाही.

३ **केंद्र / राज्यशासन किंवा त्यांच्या संस्था कडून विशिष्ट योजनांसाठी मिळालेला निधी (अनुदान / अर्थसहाय्य) यांचे योग्य प्रकारे लेखांकित केला आहेकाय ? / अटी आणि शर्तीनुसार केला नाही ? त्यात विचलन झालेल्या प्रकारणांची यादी आली.**

**एम एस के ए चा अभिप्राय**

कंपनीला विशिष्ट प्रकल्पासाठी भांडवली मत्ताकरीता शासकीय अनुदान मिळाले. त्याची थकीत रक्कम ३१ मार्च २०२४ रोजी रु. २७,७२६.९४ लाख आहे. त्यास महसूल म्हणून मान्यता देणे राहीले आहे अशी अनुदाने आणि संबंधित मत्तांचे विनिर्देश, त्याच्या पूर्ण करावयाच्या अटी इ. तपशील आम्हास उपलब्ध केलेले नाही. याशिवाय या स्थानास मान्यता देणे हे या योजनाच्या / स्थितीशी सुसंगत नाहीत. आमच्या समान तारखेचा लेखा परिक्षण अहवाल पहावा.

**कंपनी अधिनियम २०१३ चे कलमांतर्गत उप-कलम (५) नुसार क्षेत्र-निहाय उप-निर्देश व त्यांची उत्तरे**

(i) **वस्तूमाल सूचीत मुल्यनिहाय योग्य प्रकारे वर्गीकरण केले आहे काय ? जसे -भंगार, जुनाट माल इ. :-**

**एम एस के ए चा अभिप्राय**

वस्तूमालाचे कंपनीमध्ये खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले आहे.

| वस्तूमालाचे घसारा | ३१/०३/२०२४ रोजी रक्कम (रु. लाखत) | वित्तीय विवरण पत्रकातील टिपा क्र. |
|---|---|---|
| पोलाद | ८०१.६७ | वित्तीय विवरण पत्रकातील टिपा क्र. १० वस्तुमाल |
| ट्रान्सफॉर्मर्स | २१,१२१.०१ | |
| मिटरची साधने व उपकेंद्रांतील उपकरणे | १०,८२६.६९ | |
| केबल आणि कंडक्टर्स | ८,८३७.२८ | |
| सुटे भाग | १,१४०.८७ | |
| इतर | ३,९७४.६२ | |
| चौकशी प्रलंबित असल्यामुळे झालेली मालाची हानी | १६२.६५ | |
| एम ए एस ए साठा | (११४.३४) | |
| जुना माल साठा (भंगारासह) | ७२०.९० | |
| चौकशीसाठी प्रलंबित हानीची तरतुद | (१,०८९.७८) | |

वस्तूमाल सूचीतील मूल्यांकना साठी समान तारखेच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद ३ (आय)पहावा.

(ii) **कंत्राटातील अग्रीमे अंतर्गत ऋणचिंन्हांकित शिल्लकीसाठी यांचे पृथाकरण करावे आणि कारणासहीत अभिप्राय व वि. वि. पत्राकांवरील परिणाम द्यावेत.**

**एम एस के ए चा अभिप्राय**

आम्ही कंपनीस्तरावर कंत्राटातील अग्रिमे यांच्या शिल्लकीचे सर्वकष पणे पडताळणी केली. आणि आम्हास आढळलेली, ३१ मार्च २०२४ पावेतो कोणत्याही ऋणचिन्हांकित शिल्लकी नव्हत्या. समान तारखेच्या अहवालातील परिच्छेद ३ (डब्ल्यु) पहावा.

(iii) **लेखा परिक्षण अहवालात नमूद नफा / तोटा हा कंपनी नफा/ तोटा पत्रकांप्रमाणे आहे किंवा कसे ?**

**एम एस के ए चा अभिप्राय**

होय, मात्र लेखा परिक्षकांच्या अहवालातील परिच्छेद ३ या मधील गाह्य मतांचा आधार यात म्हटल्याप्रमाणे जर काही परिणाम होणार असेल तर त्याचा विचा र करण्यात यावा.

(iv) **वीज बाहेर काढण्याची प्रणाली ही वीज निर्मिती केंद्रातील उपलब्ध विजेशी सुसंगत आहे किंवा कसे ? जर नसेल तर निर्मिती कंपनीने जर तोट्यासंबंधी काही दावा केला तर त्यावर अभिप्राय द्यावा.**

**एम एस के ए चा अभिप्राय**

आम्ही, या खंडानुसार (क्लॉज) मागितलेल्या माहितीबाबत तांत्रिक पडताळणी केलेली नाही. आम्हाला व्यवस्थापनाने दिलेली माहिती स्पष्टीकरणे आणि निवेदने यांच्या आधारे, कंपनीने पारेषणाचे वीजजाळे खालील तक्त्यात दशविलेले आहे.

| व्होल्टेज लेव्हल | इएचव्ही उपकेंद्राची संख्या | ट्रान्सफॉर्मर्सची क्षमता (एमव्हीए) | इएचव्ही तारांची लांबी (सीकेटी के एम ) | रिॲक्टीव्ह पॉवर कंपेनसेशन (एममव्हीएआर) |
|---|---|---|---|---|
| ७६५ के व्ही | १ | ३,००० | ० | ७२० |
| ५००केव्ही एचव्हीडीसी | २ | ३,५८२ | १,५०४ | ० |
| ४००के व्ही | ३३ | ३४,०४८ | ८,४६४ | ३,७४० |
| २२०के व्ही | २५४ | ६०,८४० | १९,८८२ | २५ |
| १३२ के व्ही | ३६५ | ३१,५३० | १८,५६९ | ३,३०० |
| ११० के व्ही | ४१ | २,६०५ | १,७९८ | १३० |
| १०० के व्ही | ३९ | २,८२३ | ७०६ | ० |
| ६६ के व्ही | ७ | १७० | ५९५ | ० |
| ३३/२२/११ के व्ही | ० | ० | ० | २,५९८ |
| २०१५ पूर्वी कार्यान्वित झालेल्या कॅपेसिटर बँक्स | | | | २,२७१ |
| **एकूण** | **७४२** | **१,३८,५९८** | **५१,५१८** | **१२,७८४** |

कंपनीच्या व्यवस्थापनाने दिलेल्या जादा माहितीनुसार पारेषण प्रणालीची विद्यमान उपलब्धता व हानी म.वि.नि आयोगाच्या मापदंडाच्या तुलनेत खालील प्रमाणे आहेत .

**एच. व्ही.ए. सी. प्रणाली (म. वि. नि. आयोग मानक ९८ टक्के)**

| वर्ष | २०२३-२४ | २०२२-२०२३ |
|---|---|---|
| उपलब्धता | ९९.६९ टक्के | ९९.६५ टक्के |

**एच व्ही डी सी प्रणाली (म. वि. नि. आयोग मानक ९५ टक्के)**

| वर्ष | २०२३-२४ | २०२२-२०२३ |
|---|---|---|
| उपलब्धता | ९५.२९ टक्के | ९५.३४ टक्के |

(v) **या वर्षी विहित केलेल्या प्रमाणकांपेक्षा किती जास्त वीज हानी यावर्षा झाली ? आणि लेखापुस्तकात त्यांची योग्य प्रकारे नोंद केली आहे किंवा कसे ? :-**

**एम एस के ए चा अभिप्राय**

या कलमाखाली आवश्यक असलेल्या माहितीची आम्ही तांत्रिक पडताळणी केलेली नाही. व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या माहिती, स्पष्टीकरण आणि वर्णनाच्या आधारे या संदर्भातील माहिती खाली सादर केली आहे.

म. वि. नि. आयोगाने पारेषण हानीसाठी निश्चित केलेले मानक ४.८५ टक्के असे आहे. महापारेषण कंपनीने वि. वर्ष २०२३-२४ मधील पारेषण हानीची मोजणी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) यांनी ती खालील तक्त्यात दिली आहे.

| इंट्रास्टेट ट्रान्समिशन सिस्टम (एसटीएस) मध्ये वित्तीय वर्ष २०२३-२४ मधील ग्रीड लॉस वीज जाळ्यातील हानी | एनर्जी इनपूट इंट्रास्टेट ट्रान्समिशन सिस्टम | एनर्जी आउटपूट इंट्रास्टेट ट्रान्समिशन सिस्टम | पारेषण हानी |
|---|---|---|---|
| **महिना** | **दशलक्ष युनिट्स मध्ये** | **दशलक्ष युनिट्स मध्ये** | **टक्केवारी मध्ये** |
| एप्रिल-२३ | १७०३५.६४ | १६४०३.६८ | ३.७१% |
| मे-२३ | १७७३२.०८ | १७१०१.५२ | ३.५६% |
| जून-२३ | १७१०३.५७ | १६५१९.३ | ३.४२% |
| जुलै-२३ | १४७५२.३१ | १४२७३.८९ | ३.२४% |
| ऑगस्ट-२३ | १६१०५.७ | १५५८७.५१ | ३.२२% |
| सप्टेंबर-२३ | १५४०९.६२ | १४९०३.८९ | ३.२८% |
| ऑक्टोबर-२३ | १७६२५.०७ | १७००२.९६ | ३.५३% |
| नोव्हेंबर-२३ | १६२६१.७३ | १५७४५.६ | ३.१७% |
| डिसेंबर-२३ | १५६४३.९८ | १५१८४.५९ | २.९४% |
| जानेवारी-२४ | १६५१२.९२ | १६०४३.२८ | २.८४% |
| फेब्रूवारी-२४ | १६२०९.९५ | १५७१२.५८ | ३.०७% |
| मार्च-२४ | १७९२८.६२ | १७३५२.५३ | ३.२१% |
| **एकूण** | **१९८३२१.१९** | **१९१८३१.३३** | **३.२७%** |

या तक्त्यातील आकडेवारीचे अवलोकन केल्यानंतर असे स्पष्ट दिसते की, महापारेषणाची वर्षभरात झालेली वीज हानी ही फक्त ३.२७ टक्के आहे आणि ती म. वि. नि. आयोगाने निश्चित केलेली मानक (Benchmark) यापेक्षा खूपच कमी आहे. दुसऱ्या शब्दात किंवा लेख्यांच्या परिभाषेत सांगावयाचे झाल्यास ही अल्प हानी 'सामान्य हानी' आहे आणि त्यासाठी लेखावह्यामध्ये वेगळी लेखा नोंद करणे आवश्यकता नाही.

(vi) **इतर संस्थाच्या वतीने उभारलेल्या आणि पूर्ण केलेल्या मत्ता किंवा त्यांच्याकडे सूपूर्द केलेल्या मत्ता यांचा वित्तीय विवरण पत्रात योग्य प्रकारे लेखानोंद केली आहे किंवा कसे ?**

**एम एस के ए चा अभिप्राय**

व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेल्या माहिती, स्पष्टीकरण आणि वर्णनाच्या आधारे या संदर्भातील माहिती खाली सादर केली आहे.

आमच्या लेखापरीक्षणादरम्यान आम्हाला दिलेल्या माहितीनुसार,

कंपनीने तिचे महाराष्ट्र राज्यातील क्षेत्रीय सेवांचे प्रवर्तन विविध सात (७) परिमंडळात केले आहे विजेचे पारेषण करणे हे कंपनीचे महत्वाचे कार्य आहे. याशिवाय कंपनी इतर संस्थांसाठी सुस्पष्ट आदेशाच्या तत्वावरकाही कामे करुन देते जसे छोटी उपकेंद्रे, मनोरे, प्रकल्प इ. उभारुन देणे. कंपनीच्या अशा कामांना ओ आर सी वर्क म्हणून ओळखले जाते. अशा कामांसाठी कंपनी त्यासाठी केलेल्या खर्चावर जादा पर्यवेक्षण शुल्क आकारते त्याला कंपनीचे उत्पन्न म्हणून मान्याता देण्यात येते.

कंपनीने दिलेल्या माहिती नुसार कंपनीच्या वेगवेगळया परिमंडळातर्फे करण्यात आलेल्या ओ आर सी वर्क या कामाची माहिती खालील तक्त्यात दिलेली आहे

| अनु. क्र. | परिमंडळ | ०१/०४/२३ रोजीचे ओआरसी वर्क संख्या | या वर्षात ओ आर सी कामात पडलेले भर संख्या | या वर्षात पूर्ण केलेली ओ आर सी कामे संख्या | ३१/०३/२०२४ रोजी शिल्लक राहिलेली ओ आर सी कामे संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | १६ | ० | १० | ६ |
| २. | औरंगाबाद | १२ | ७ | ५ | १४ |
| ३. | कराड | ७ | २ | ४ | ५ |
| ४. | नागपूर | २४ | १८ | २ | ४० |
| ५. | नाशिक | १५ | ६ | २ | १९ |
| ६. | पुणे | १२३ | २३ | ७ | १३९ |
| ७. | वाशी | ७० | ८ | ३ | ७५ |
| | **एकूण** | **२६७** | **६४** | **३३** | **२९८** |

या वर्षी अशा संस्थांकडून घेतलेल्या अनामत रकमांची शिल्लक रु. १,५९,९८७.७१ (लाख) (मागील वर्षी रु. १,२४,९८८.८५ होती). या पैकी रु. १४,९९९.५१ एवढ्या अनामत रकमेचा मेळ झालेला नाही आणि त्याविषयीची माहिती कंपनीकडे नाही. तसेच या मत्तांची अंतिम मालकी कंपनी कडेच असते. संस्थांकडून जमा केलेली अनामत रकमेचे समायोजन उभारलेल्या मत्तांसोबत केले जाते. आणि मत्तांच्या वहीत (मस्टरमध्ये) ओळखीच्या हेतुसाठी नाममात्र मूल्य रुपया एक (रु. १/-) असे ठेवले जाते.

कंपनी अपारंपरिक स्रोतांकडून उर्जा निर्मितीच्या प्रकरणात वीजेला बाहेर काढण्याचे प्रकल्पसुद्धा राबवते. लेखांकन धोरण २.१९ (ब) नुसार अशा वीज बाहेर काढण्याच्या प्रकल्पाचा ५० टक्के खर्च कंपनी करते आणि उर्वरित ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती मेडा संबंधित खाजगी विकासकाला देते. अशा प्रकरणांमध्ये सुद्धा इतर एजन्सीजना मत्तांचे हस्तांतरण केले जात नाही.

मेडा प्रकल्पांची अंमलबजावणी दोन प्रकारे केली जाते - १) जिथे विक्रेता प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आधीच संपूर्ण रक्कम कंपनीला ओआरसी ठेवी म्हणून देतो आणि कंपनी प्रकल्प पार पाडल्यानंतर विक्रेत्याला ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती करते आणि तितक्या मूल्याची मत्ता निर्माण करते आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मेडा विक्रेत्याला देते. २) जिथे विक्रेता स्वत: प्रकल्पाची अंमलबजावणी करतो आणि त्यानंतर कंपनी सदर विक्रेत्याला ५० टक्के रक्कम  प्रदान करते आणि मेडा उर्वरित ५०टक्के रकमेची विक्रेत्याला प्रतिपूर्ती करते कंपनीने विक्रेता / खाजगी विकासकाला द्यायची रक्कम जीएल कोड १३१०१० खाली लेखांकित केली जाते. असे दिसून आले आहे की दोन्ही जीएल कोडचा (१२३१०० आणि १३१०१०) वर्षाअखेरीस पुनर्मेळ घेणे अद्याप बाकी आहे. मेडा अनुदानाखाली येणाऱ्या अशा प्रकल्पांचे संपूर्ण तपशील कंपनीकडे तात्काळ उपलब्ध नाहीत. परिणामी अशा मेडा प्रकल्पाचे मत्ता भांडवलीकरण हे अचूक आहे किंवा नाही यावर भाष्य केले जाऊ शकत नाही.

(vii) **कंपनी सामाजिक जबाबदारी कार्यांच्या प्रतिवेदन आणि प्रगटनांच्या संदर्भात कंपनी कायद्याच्या तरतुदी अनुसरण्यात आल्या होत्या का हे तपासा**

**एम एस के ए चा अभिप्राय**

होय, यासंबंधीची प्रकटने वि.वि. पत्रकांची टिपा क्र. ४९ यामध्ये योग्य प्रकारे केलेली आहेत.

(viii) **पीएसयू कार्यरत आहे किंवा निष्क्रिय.**

**एम एस के ए चा अभिप्राय**

होय, पीएसयू काम करत आहे

(ix) **मागील वर्षाच्या महालेखापाल निरिक्षण अहवालातील काही मुद्दे जे या अहवालाच्या ताळेबंद तारखेस शिल्लक आहेत.**

**एम एस के ए चा अभिप्राय**

या संदर्भात सदर अहवालाचे परिशिष्ट २ (ए) (बी) आणि (सी) पहावे

(x) **इतर विषय**

**एम एस के ए चा अभिप्राय**

१) कंपनीला जोखीम नियंत्रण तालिका (रिस्क कंट्रोल मेट्रीक्स) महत्वाच्या क्षेत्रातील धोरणे आणि कार्यपद्धती तयार करावयाच्या आहेत. तसेच विद्यमान रिस्क कंट्रोल मेट्रीक्स अद्यावत करावा लागेल.

२) अंतर्गत लेखापरिक्षणाची व्याप्ती आणि त्यासाठी समावेशन वाढविणे आवश्यक आहे.

३) ग्राह्यता निश्चित करण्यासाठी कंपनीने सकारात्मक कृती करावी.

४) परिमंडळे आणि मुख्यालय यातील समन्वय अधिक प्रमाणात वाढला पाहिजे.

**एम एस के ए ॲण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
आय सी ए आय फर्म नोंदणी क्र. १०५०४७ डब्ल्यू

सही/-

**अमरीश वैद्य**
भागीदार
सदस्य क्र. १०१७३९
यु डी आय एन : २४१०१७३९ बी के इ झेड यु एस ५६७०

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ सप्टेंबर २०२४

## परिशिष्ट - १

| व्हेंडर्स कोड | ३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक | व्हेंडर्स कोड | ३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक | व्हेंडर्स कोड | ३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| ४०००००१२६१ | -९,८७,४७,२४६.६१ | ४०००००२८५७ | -१५,४५,२५९.८४ | ४००००००२९४ | -३१,२६५.०० |
| ४००००१२३१७ | -२,४३,५६,५०९.०१ | ४०००००७८७६ | -१५,४०,६४१.०० | ४०००००२७७५ | -३०,५९०.०० |
| ४००००००११२ | -१,९२,५०,५०७.३१ | ४०००००२९५२ | -१०,३५,११०.०० | ४०००००४५०४ | -२९,१३७.०० |
| ४००००००३९९ | -१,८७,७७,४१५.०० | ४००००००१४० | -९,७४,४००.०० | ४००००००३३० | -२२,५०३.०७ |
| ४०००००४५११ | -१,००,७३,६१४.०० | ४०००००००८८ | -७,९५,४१३.९७ | ४०००००५३१६ | -१८,२००.०० |
| ४०००००१२६० | -६७,७७,४८९.३६ | ४०००००२४४६ | -४,०८,०००.०० | ४००००००७११ | -१७,७८७.९७ |
| ४०००००००११ | -६२,३४,९८१.०० | ४०००००००४३ | -३,९१,८१७.०० | ४०००००२८५१ | -१६,६८४.०० |
| ४०००००१८९५ | -५९,१५,९८०.०० | ४००००००२३४ | -३,६७,१६५.३५ | ४०००००२८४९ | -१६,३००.७० |
| ४०००००००५२ | -५५,७१,०८८.०० | ४०००००२३९० | -३,३३,१२५.०० | ४०००००९६५१ | -१४,६०७.०० |
| ४०००००१०६७ | -५४,९८,४४८.२० | ४०००००१२५९ | -३,०५,७५०.०० | ४००००१०११७ | -१४,५६८.०० |
| ४०००००२४८७ | -३७,६५,८९१.९१ | ४०००००१०८० | -२,९७,५६७.०० | ४००००१४८१४ | -१४,५००.१९ |
| ४०००००७५९९ | -३१,४१,५२४.२५ | ४०००००९२०९ | -२,६२,२००.०० | ४००००००७२७ | -१३,५०५.०० |
| ४००००००३९१ | -२८,३१,१०८.८४ | ४०००००१०४२ | -२,३२,२७०.०० | ४०००००२७८२ | -१२,५४३.०० |
| ४००००००६६७ | -२५,२८,००३.७६ | ४००००००००१ | -२,०४,७४७.०० | ४०००००७४२९ | -११,१००.०० |
| ४००००००४४१ | -२४,९६,७२५.२२ | ४०००००३१७३ | -१,९५,१४६.०० | ४०००००७५९६ | -१०,२५६.०० |
| ४०००००९७७५ | -२४,७७,६९१.८९ | ४००००१४१७१ | -१,७०,२३७.३७ | ४००००००२७९ | -८,५६५.२० |
| ४००००००१५४ | -२०,५९,२२४.०० | ४०००००४०२२ | -१,०६,८३३.८२ | ४०००००१७५५ | -७,९८१.०० |
| ४०००००००३१ | -१९,८५,८४०.०० | ७००००००४८१ | -४७,६१५.६३ | ४००००००३०५ | -६,४२५.०० |
| ४०००००७८६४ | -१८,९७,०४२.१३ | ४०००००५३४६ | -४५,२१९.०० | ४०००००८५८७ | -६,०००.०० |
| ४००००००२७६ | -१७,०१,१५८.०० | ४०००००२६६९ | -३४,९२६.०० | ४०००००१७७१ | -५,८००.०० |
| ४००००००२९८ | -१,४२५.०० | ४००००१००६२ | -२७३ | ४०००००६८९८ | -५,८००.०० |
| ४०००००५८६८ | -१,०२७.०० | ४००००१६३१३ | -१६० | ४०००००५६०२ | -३,९७१.०० |
| ४०००००७७६० | -८०८.८ | ४०००००७०१४ | -१५१.६८ | ४०००००८१३२ | -२,६७६.०० |
| ४०००००१५२२ | -५१४.४२ | ४०००००२६३३ | -१५०.७१ | ४००००१५७६८ | -२,१८४.२७ |
| ४००००१७०२८ | -४३१.०४ | ४००००१६१४१ | -११३.७६ | ४०००००६०७२ | -२,१०७.०० |
| ४०००००६८८४ | -३१३.२४ | ४०००००५३१७ | -१०५ | ४००००००८२९ | -१,६००.२५ |
| ४००००११४५० | -१०५ | ४०००००५७९७ | -१०५ | ४००००००२९४ | -३१,२६५.०० |
| ४०००००१२६१ | -९,८७,४७,२४६.६१ | ४०००००२८५७ | -१५,४५,२५९.८४ | ४०००००२७७५ | -३०,५९०.०० |
| ४००००१२३१७ | -२,४३,५६,५०९.०१ | ४०००००७८७६ | -१५,४०,६४१.०० | ४०००००४५०४ | -२९,१३७.०० |
| ४००००००११२ | -१,९२,५०,५०७.३१ | ४०००००२९५२ | -१०,३५,११०.०० | ४००००००३३० | -२२,५०३.०७ |
| ४००००००३९९ | -१,८७,७७,४१५.०० | ४००००००१४० | -९,७४,४००.०० | ४०००००५३१६ | -१८,२००.०० |
| ४०००००४५११ | -१,००,७३,६१४.०० | ४०००००००८८ | -७,९५,४१३.९७ | ४००००००७११ | -१७,७८७.९७ |
| ४०००००१२६० | -६७,७७,४८९.३६ | ४०००००२४४६ | -४,०८,०००.०० | ४०००००२८५१ | -१६,६८४.०० |
| ४०००००००११ | -६२,३४,९८१.०० | ४०००००००४३ | -३,९१,८१७.०० | ४०००००२८४९ | -१६,३००.७० |
| ४०००००१८९५ | -५९,१५,९८०.०० | ४००००००२३४ | -३,६७,१६५.३५ | ४०००००९६५१ | -१४,६०७.०० |
| ४०००००००५२ | -५५,७१,०८८.०० | ४०००००२३९० | -३,३३,१२५.०० | ४००००१०११७ | -१४,५६८.०० |
| ४०००००१०६७ | -५४,९८,४४८.२० | ४०००००१२५९ | -३,०५,७५०.०० | ४००००१४८१४ | -१४,५००.१९ |
| ४०००००२४८७ | -३७,६५,८९१.९१ | ४०००००१०८० | -२,९७,५६७.०० | ४००००००७२७ | -१३,५०५.०० |
| ४०००००७५९९ | -३१,४१,५२४.२५ | ४०००००९२०९ | -२,६२,२००.०० | ४०००००२७८२ | -१२,५४३.०० |
| ४००००००३९१ | -२८,३१,१०८.८४ | ४०००००१०४२ | -२,३२,२७०.०० | | |

## परिशिष्ट २(अ), (बी) आणि (सी)

## परिशिष्ट २(अ) - भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या वि. वर्ष २०२१-२२ च्या निरिक्षण अहवालात समाविष्ट आणि ३१ मार्च २०२४ पर्यंत खुले राहिलेले काही विषय :

| अनु क्र. | महालेखापालांचे भाष्य | महापारेषणचे उत्तर | लेखापरीक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| अ | **नफ्या तोट्या संबंधी अभिप्राय** | | |
| | **नाफा आणि तोटा विवरणपत्र** | | |
| | **महसूल** | | |
| | **प्रवर्तनातील महसूल (टिप्पणी २१) : रु.४,८६३.८० कोटी** | | |
| | **अतिरिक्त पारेषण व नियमन आकार रु. ११२.१२ कोटी** | | |
| १ | यामध्ये म.रा. वितरण कंपनी लि. (एम एस इ डी सी एल - महावितरण) कडून नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीतील जादा पारेषण आकाराचे रु. ५५.३५ कोटी येणे समाविष्ट आहे.<br>याचा परिणाम रु. ५५.३५ कोटींची एकूण सर्वंकष उत्पन्नाची अत्युक्ती आणि तितक्याच रक्कमेची प्रारंभिक राखून ठेवलेल्या मिळकतीची न्यूनोक्ती होण्यात झाला आहे. | वि. वर्ष २०२० -२१ साठी जादा पारेषण आकार यासाठी वि. वर्ष २०२१-२२ मध्ये उपलब्ध अशी नोंद केली होती.<br>वि. वर्ष २०२२-२३ मध्ये व्यवहाराचा प्रभाव नाही. | |
| | **परिव्यय** | | |
| | **कर्मचारी लाभ खर्च (टिपा २४) रु. १,१६४.२६ कोटी** | | |
| | **कर्मचारी कल्याण खर्च रु. ४९.५५ कोटी** | | |
| २) अ | उपरोक्त बाबीत सन २०२१-२२ मध्ये मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांकडून कोविड साथरोगात मृत झालेल्या कुटुंबियांकडून सानुग्रह अनुदान आणि गट विमा योजनेसाठीच्या प्राप्त रु. ४.६० कोटींच्या दाव्यांचा समावेश नाही. | वि. वर्ष २०२०-२१ मध्ये कोवीड मृत्यू कारणास्तव दावा याची परत फेड वि. वर्ष २०२१-२२ साठी खर्च अशी केली. वि. वर्ष २०२२-२३ मध्ये त्याचा परिणाम झालेला नाही | हा विषय लेखापरिक्षण वर्षाशी संबंधित नाही. |
| २) ब | उपरोक्त बाबीत मार्च २०२२ मध्ये कंपनीच्या २५० कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय आरोग्य तपासणीसाठी झालेल्या खर्चापोटीच्या रु. ०.०९ कोटी रक्कमेचाही समावेश नाही.<br>याचा परिणाम एकूण सर्वंकष उत्पन्नात रु. ४.६९ कोटींची अत्युक्ती आणि चालू दायित्वाखाली तरतुदीत (टिप्पणी २०) तितक्याच रक्कमेची न्यूनोक्ती होण्यात झाला. | वि. वर्ष २०२०-२१ मध्ये आरोग्य तपासणी याची पेमेंट वि. वर्ष २०२१-२२ साठी खर्च अशी केली. वि. वर्ष २०२२-२३ मध्ये त्याचा परिणाम झालेला नाही | हा विषय लेखापरिक्षण वर्षाशी संबंधित नाही. |
| | **इतर खर्च (टिपा २६) रु.४०३.१५ कोटी** | | |
| | **दर व कर - रु. १६.७२ कोटी** | | |
| ३ | यात सन २००९-२०१० ते २०२०-२१ या कालावधीकरिता मालमत्ता करापोटीची रु. ०.९९ कोटींची रक्कम समाविष्ट आहे. आधीच्या वर्षांसाठीच्या मालमत्ता कराच्या लेखांकनाचा परिणाम एकूण सर्वंकष उत्पन्नात रु. ०.९९ कोटींची न्यूनोक्ती आणि प्रारंभिक राखून ठेवलेल्या उत्पन्नात तितक्याच रक्कमेची अत्युक्ती होण्यात झाला. | वि. वर्ष २०२० -२१ पूर्वीचा मालमत्ता कर वि. वर्ष २०२१-२२ चा खर्च म्हणून नोंदला<br>वि.वर्ष २०२२-२३ मध्ये व्यवहाराचा परिणाम नव्हता. | हा विषय लेखापरिक्षण वर्षाशी संबंधित नाही. |
| ब) | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय** | | |
| | **ताळेबंद** | | |
| | **मत्ता** | | |
| | **चालू नसलेल्या मत्ता** | | |
| | **मालमत्ता, कारखाने व साधने (टिपा क्र. ४.१) रु. १५,८१२.०२ कोटी** | | |
| १ | कंपनीने रु. ४.११ कोटी मूल्यांच्या मत्ता भांडवलीकृत केल्या नाहीत. टिप २.६ मध्ये प्रगट केलेल्या लेखांकन धोरणांनुसार कणकवली आणि कुडाळ येथे प्रत्येकी एक एण्ड बे सह १३२ केव्ही एससीडीसी कणकवली - कुडाळ लाईनच्या बांधकामाच्या संदर्भातील संख्या फरकाच्या खर्चासाठीचा हा दावा आहे. सदर बाब २९ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या १५२ व्या संचालक | सदर आदेश मेसर्स के पी टी एल यांना रु. ९७२५६०६३.४८ साठी दिला होता. पहावे -कार्य आदेश वक्रमांक एम एस इ टी सी एल / सी ओ / सी इ / टी आर पी | हा विषय जैसे थे स्थितीत आहे. आम्ही या प्रकरणी, आमच्या वि. वर्ष २०२३-२४ च्या आमच्या लेखापरिक्षणाच्या वेळी विचारणा केली आणि व्यवस्थापनाचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | मंडळ बैठकीत प्रस्तावित व त्यावर चर्चा करण्यात आली आणि दि.०४/०८/२०२२ रोजी झालेल्या १५६व्या संचालक मंडळ बैठकीत मान्य करण्यात आली. (कंपनीच्या वार्षिक लेख्यांच्या मान्यतेच्या आधी)<br>याचा परिणाम मालमत्ता, कारखाना आणि उपकरण (टिप ४.१) या खाली रु. ४.११ कोटींची अत्युक्ती आणि चालू दायित्वाखाली व्यापार प्राप्य (टिप १८.२) याची तितक्याच रकमेची न्यूनोक्ती होण्यात झाला. | आर ओ जे. इ पी सी / एल एल- २ ए / ११६९० दि. २७ / ०८ / २००९ येथे नमूद करण्यात येते की, अंतरिम संखेतील बदल याला २७.५४ टक्के या प्रमाणे मंजुरी देण्यात आली होती, त्यनुसार रक्कम रु. २,६७,८७,०९४/- होती. पहावे - सी ओ मंजुरी एम एस इ टी सी एल / सी इ / सी ओ / पी टी / टी के सी आय आय / कणकवली - कुडाळ / नं. ८५६४ दि. ०१ / ०८ / २०१७ याची देयके, आय क्यू व्ही रक्कमे पर्यत नोंदण्यात आली. योजना दि. ०८ / ०३ / २०२२ रोजी कार्यान्वित झाली. | प्रतिसाद दिलेल्या माहितीशी सुसंगत होता. |
| २ | मालमत्ता, कारखाना आणि उपकरणे यात ३१ मार्च २०२२ च्या आधीच्या ५६ विविध पूर्ण/वापरासाठी उपलब्ध/भारीत/कार्यान्वयीत कामांवरील[१] रु. ५१.०२ कोटींचा समावेश नाही. पीपीई (टिप २ (२.६)) आणि घसारा (टिप २.९) याच्या बाबतीतील कंपनीच्या प्रगट केलेल्या लेखांकन धोरणाच्या अनुसार ही कामे भांडवलीकृत करायला हवी होती.<br>वरील कामांना भांडवलीकृत न करण्याचा परिणाम मालमत्ता, कारखाना आणि उपकरण (टिप्पणी ४.१) याची रु. ५१.०२ कोटींनी न्यूनोक्ती होण्यात आणि प्रगतीपथावरील भांडवली कामाची तितक्याच रक्कमेची अत्युक्ती होण्यात झाला आहे. याचा परिणाम सध्याच्या वर्षासाठी रु. १.२८ कोटी रक्कमेची घसाऱ्याला भार न टाकणे आणि एकूण सर्वंकष उत्पन्नाची तदनरुप अत्युक्ती झाली आहे आणि मागील वर्षाशी संबंधित राखीव मिळकतीची प्रारंभिक शिल्लकेची रु. १.०५ कोटींची अत्युक्ती झाली आहे.<br>*[१] यात एका कामाच्या संदर्भात रु.१.४८ कोटींची पिके भरपाई, सामान्य आस्थापना खर्च आणि बांधकामादरम्यान व्याज, एका कामाच्या संदर्भात रु. १.२१ कोटींचा सा.आ.खर्च, एका उपकेंद्राच्या कामाचा खर्च असलेली रु. २३.८० कोटींची रक्कम जी परिपत्रक क्र.८३१५ (कॅपेक्स परिपत्रक क्र.१) दिनांक ३१/०५/२०१२ - मत्तांचे भांडवलीकरण नवीन उपकेंद्राच्या बाबत जिथे ट्रान्स्फॉर्मर / आयसीटी भारीत केले जातात तिथे जरी सदर योजना पूर्ण झाली नसली तरी हे उपकेंद्र भांडवलीकृत करणे आवश्यक आहे. अन्वये भांडवलीकृत करणे आवश्यक होते आणि ५३ इतर विविध कामांवरील रु. २४.५३ कोटींचा समावेश आहे.* | येथे नमूद करण्यात येते की, भांडवली करणाच्या संखेत आय क्यू व्ही रु. ४.११ कोटी (यामधे आय क्यू व्ही चे रु. २.६७ कोटी समाविष्ट) याला मंजुरी दिली होती. पहावे - संदर्भ क्र. बी आर / नं. १५६ / ३५ दि. २६ / ०८ / २०२२ मात्र, अर्थसंकल्पिय (बजेट) वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर करणे आणि त्याचे सॅप प्रणाली मधे अद्यावती करण ही कामे ऑगस्ट २०२३ मधे झाली या शिवाय एम आय जी ओ क्र. ५०००७०३५७२ रक्कम रु. १,३८,८४,१३८.१२/- आणि एम आय आर ओ नं. ५१०५६१०६७९ / ३१ / ०३ / २०२४ सिस्टिम मधे करण्यात आले. देयकांची नोंद अंतिम क्यू व्ही नंतर झाल्यामुळे, प्रगतीपथावरील कामे - डब्ल्यू आय पी याच्या रक्कमेचे भांडवलीकरण दि. ३१ / ०३ / २०२४ रोजी, रु. २२,९६,१०९.११ साठी असे केले (सी जे ८८८ क्र. १००२८३२८६ किंवा रु. १९,४२,८६२.१३ साठी आणि क्र. १००२५२३५६ रु. ३,५३,२४६.९८ साठी) यात अपवाद - ज्यांचा वापर केला नाही अशा सामानाची (मनोऱ्याचे साहित्य व नट बोल्ट) रक्कम रु. १,१९,२१,२७३/- असून ती इतर प्रकल्पात हस्तांतरित केले जाईल (परंतु संशोधन आणि देखभाल कामांसाठी नाही) प्रत्यक्ष साहित्याच्या गरजेनुसार. | व्यवस्थापनाने आवश्यक नोंदी वि. वर्ष २०२२-२३ मध्ये केल्या आहेत. आम्ही ते पडताळून पाहिले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | **चालू मत्ता** | | |
| | **इतर चालू वित्तीय मत्ता (टिपा १०.५) रु. ५१.२९ कोटी** | | |
| | **इतर येणी रु ७.३१ कोटी** | | |
| ३ | वरील बाबीत महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉ लि ने केलेला रु.३.०३ कोटींचा कमी भरणा समाविष्ट नाही. सदर भरणा पाटणसावंगी येथे ट्रॅक्शन उपकेंद्रासाठी ईएचव्ही लेव्हलचा १३२ केव्ही वीज पुरवठा यासाठीचा आऊटराईट अंशदान काम म्हणजेच ओआरसी ठेव कामासाठी आहे. कंपनीने ३१ मार्च २०२२ पर्यंत केलेल्या ओआरसी ठेव कामाच्या रु. १२.८० कोटींच्या एकूण खर्चासमोर (खर्चात प्रत्यक्ष झालेला खर्च आणि पर्यवेक्षण आकार व जीएसटी यांचा समावेश आहे) कंपनीला ओआरसी ग्राहकाकडून फक्त रु. ९.७७ कोटींची ठेव प्राप्त झाली. कंपनी ओआरसी ग्राहकांकडून ठेव प्राप्त झाल्यानंतर चालू दायित्व निर्माण करते आणि काम सुरु असताना प्र.प.भां कामे खर्ची टाकण्यात येतात आणि काम पूर्ण झाल्यानंतर ठेव प्राप्त झाल्यावर आधी निर्माण केलेल्या चालू दायित्वाच्या समोर प्र.प.भां.कामे समायोजित केली जातात. | दस्तावेज क्र.१००१७९९३३ दि. ३० / ११ / २०२२ अन्वये वि.व.२०२२-२३ मध्ये रेल विकास निगम मर्यादितकडून प्राप्य म्हणून रु.३.०३ कोटींची रक्कम लेखांकित करण्यात आली आहे. | व्यवस्थापनाने वि. वर्ष २०२२-२३ मध्ये आवश्यक नोंदी मंजूर केल्या. आहेत. आम्ही त्या पडताळून घेतल्या आहेत. |
| | ओआरसी ग्राहकाकडून प्राप्य म्हणून रु. ३.०३ कोटींची रक्कम लेखांकित न करण्यामुळे इतर चालू वित्तीय मत्तांखाली इतर प्राप्य रक्कमेची रु. ३.०३ कोटींची न्यूनोक्ती आणि चालू दायित्वाची तितक्याच रक्कमेची न्यूनोक्ती झाली आहे. | | |
| | **समभाग आणि दायित्वे** | | |
| | **दायित्वे** | | |
| | **चालू नसलेली दायित्वे** | | |
| | **वित्तीय दायित्वे** | | |
| | **इतर चालू नसलेली वित्तीय दायित्वे (टिपा क्र.१४.२) रु.२,४६४.२० कोटी** | | |
| | **ओ आर सी योजनांखाली ग्राहकांकडून प्राप्त अनामत रु. १,२३१.४६ कोटी** | | |
| ४ | वरील बाबीत ओ आर सी कामासाठी मिळालेल्या अनामतींचा समावेश आहे ही कामे पूर्ण झाली. त्याचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे. | | |

| अनु.[२] क्र. | कामाचे नाव | पूर्ण केल्याची तारीख | रक्कम रु. कोटीत |
|---|---|---|---|
| १. | २२० केव्ही खारबाव टीएसएस २२० केव्ही कांबा खारबाव आणि कोलशेत खारबाव लाईन्सखाली समाविष्ट | ०५/०२/२०२२ | ७.०२ |
| २. | २२० केव्ही तारापूर बोईसर लाईन ठिकाण ३७ | २८/०२/२०२२ | ०.८३ |
| ३. | २२० केव्ही वसई पीजीसीआयएल लाईन ठिकाण ५४-५८ | २७/०१/२०२० | ०.३७ |
| ४. | १३२ केव्ही डहाणू (MIDC) बोईसर लाईनचे ठिकाण ६२ ते ६४ दरम्यान रिराऊटिंग कामासह १३२ केव्ही डहाणू (MIDC) - बोईसर लाईनचे ठिकाण ६२ ते ६४ दरम्यान रिराऊटिंग | २६/०३/२०२१ आणि २७/०३/२०२१ | १.६२ |
| ५. | २२० केव्ही डीसी खारघर टॉप वर्थ आणि खारघर पनवेल टीएसएस लाईन ठिकाण क्र.६४६ ते ६४९ दरम्यान हलवणे आणि तिची उंची वाढवणे | १५/०२/२०१९ | ०.८७ |
| ६. | महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉ.लि. साठी केलेले २२० केव्ही एससी उमरेड-टॉपची ठिकाण क्र.१९ ते २३ येथे उर्जा फीडरसह उंची वाढवणे | १३/०२/२०२२ | १.२६ |
| | **एकूण** | | **११.९७** |

| | | | |
|---|---|---|---|
| | यापरकारे, सध्या असलेल्या चालू दायित्वासमोर प्र.प.भां. कामातून वरील पूर्ण कामांचे समायोजन करण्याचा परिणाम चालू दायित्वाची रु. ११.९७ कोटींची अत्युक्ती आणि प्र.भां.कामांची तितक्याच रक्कमेची अत्युक्ती होण्यात झाला आहे. | या प्रकल्पाच्या संबंधीत खर्चाची नोंद करणे कार्यान्वयनानंतर चालू आहे. म्हणून भरपाई इ. या नंतर अंतिम खर्चाचे अनामती सोबत समायोजन योजना पूर्ण झाल्यानंतर केले जाईल. | या प्रकल्पाची स्थिती जैसे थे आहे. आम्ही व्यवस्थापनाकडे विचारणा केली असता आम्हास सांगण्यात आले की, या अनामतीचे समायोजन वि. वर्ष २०२२-२३ ऐवजी, जेव्हा काम पूर्ण होईल तेव्हा केले जाइल. हा विषय स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या लेखा परिक्षणाच्या आमच्या अहवालात ग्राह्य मतांचा आधार परिच्छेद ३ (जे) यात समाविष्ट केला आहे. |
| | *[२] अनु.क्र. १ ते ५ खालील रु.१०.७१ कोटी रक्कमांची कामे ओआरसी ठेव कामांखाली डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉ. ऑफ इंडिया लि. साठी करण्यात आली आणि भारीत/पूर्ण करण्यात आली.* | | |

## परिशिष्ट २ (ब) वि. वर्ष २०२०-२१ महालेखापालाच्या / निरिक्षण अहवालातील ३१ मार्च २०२४ रोजी खुल्या असलेल्या बाबी.

| अनु क्र. | महालेखापाला अभिप्राय | महापारेषणचे उत्तर | लेखापरीक्षकांचा शेरा |
|---|---|---|---|
| अ) | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय** | | |
| | **ताळेबंद** | | |
| १ | **मालमत्ता कारखाने व साधने (टिपा ४.१) रु. १६,२२४.७१ कोटी** | | |
| अ) | कंपनीने सन १९८९ ते २०२१ दरम्यान मे.महावितरण यांना बहुतेक सर्व ६६ केव्ही उपकेंद्रे आणि लाईन्स हस्तांतरित केल्या आहेत. मात्र, ह्या मत्ता स्थिर मत्तांमधून वगळण्यात आलेल्या नाहीत जे भालेमा १६ खाली अनिवार्यपणे आवश्यक आहे. याचा परिणाम –<br>१) स्थिर मत्तांचा सकल गट, संचित घसारा आणि वहन खर्च यांची अनुक्रमे रु.१४०.२४ कोटी रु.१०२.७८ कोटी आणि रु.३७.४६ कोटी इतकी अत्युक्ती झाली.<br>२) महावितरण कडून व्यापार प्राप्य रक्कमेची रु.२४.७३ कोटींची न्यूनोक्ती झाली.<br>३) हानी तोटा प्रती रु.१२.७३१ कोटींच्या अपेक्षित तोट्यासाठीची तरतूद नफा आणि तोटा लेख्यात आकारण्यात आली नाही. परिणामी, वर्षाच्या नफ्यात तितक्या रक्कमेची अत्युक्ती झाली.<br>४) सुमारे १७४.२४ किमी लांबीच्या काढून टाकलेल्या तारांचा रु.०.८० कोटींचा वहन खर्च हा तोटा म्हणून मान्य करण्यात आला नाही. परिणामी वर्षासाठीच्या नफ्याची रु.०.८० कोटींची अत्युक्ती झाली. | कंपनीच्या वीज पारेषण जाळयात ६६ केव्ही ते ७६५ केव्ही स्तरांची क्षमता आहे. संपूर्ण महापारेषण ६६ केव्ही पारेषण स्तरांचे उच्चारण करण्याचे ठरले त्यानुसार ६६ केव्ही क्षमतेची उपकेंद्रे व वीजतारा अकार्यान्वित करुन त्या महावितरण कंपनीमध्ये हस्तांतरीत करण्यात आल्या. काही उर्वरित उपकेंद्रे नंतर महावितरण कडे येतील किंवा महापारेषण त्याचा उपयोग क्षमता वाढवण्यासाठी करु शकेल. त्यासाठी या विषयात विद्यमान ग्राहकांना तशी व्यवस्था हमी असल्याबद्दल खात्री केली जाईल.<br>उपनिर्विष्ट वास्तव कारणामुळे या ६६ केव्ही सामग्रीची मान्यता काढून घेणे, विल्हेवाट लावणे आणि या मत्ता हस्तांतरणाचा विचार करुन त्याचे सोपस्कार पूर्ण करणे या बाबत तांत्रिक मसलत करुन आवश्यक भा. ले. मानक क्र. १६ नुसार मजूरी होऊन लेखा नोंदी केल्या जातील.<br>६६ केव्ही मत्ता विषयी आवश्यक धोरण तयार करण्याची प्रक्रीया चालु आहे. | सदर विषय आमच्या स्वायत्त वि.वि. २०२३-२४पत्रकांच लेखा परिक्षण अहवालातील ग्राह्य मतांचा आधार यात परिच्छेद ३(जी) यात समाविष्ट आहे. नंतर असे निर्दशनास आले. की, ६६ केव्ही वीज जाळयाचे/ उपकेंद्राचे महावितरण हस्तांतरण केले. कंपनीस या विषयी लेखी कागदपत्र किंवा हस्तांतरण करारपत्राचा आधार नाही. |
| ब) | यात रु. १४४.६७ कोटींसह सकल गटासह न वापरलेल्या मत्ता, रु.१०९.१४ कोटींचा संचित घसारा व रु. ३५.५३ कोटींचा वहन खर्च समाविष्ट आहे. कंपनीने ह्या मत्तांची हानी दर्शवणे निश्चित केलेले नाही. तपशीलाअभावी ह्या बाबीमुळे तोटा आणि नफ्याची परिणामी अत्युक्ती निश्चित करता आली नाही | क्षेत्रीयकार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या माहिती नुसार जी एल २२२०१० वापरात नसलेल्या मत्ता नोंद वहीतून कार्यासाठी वापरात नसलेल्या ज्या मत्ता काढून टाकण्यात आल्या, त्यांचा समावेश आहे. या गटात दुरुस्तीसाठी पाठविलेल्या अल्प मत्ता जे सामान विल्हेवाटसाठी योग्य झाले असून सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी द्यायची आहे. अशा मत्तांचा समावेश आहे.<br>या मत्ता सक्रीय वापरात नसल्यातरी त्या कमी करण्याच्या परिक्षणासाठी वाढविण्यात येत नाहीत. कारण त्यामुळे त्या भंगारात विल्हेवाटीसाठी जाऊ शकतात. त्यातून त्यांचे वसुली योग्य मूल्य प्राप्त होत नाही. भंगारात काढण्याची प्रक्रीया झाल्या-बद्दलचे योग्य प्रक्रीयेची निश्चिती करता येते.<br>महापारेषण स्थिर मत्ताची प्रक्रीया पडताळणी करण्याची प्रक्रीया सुरु करणार आहे. त्यात वापरात नसलेल्या साहित्याचे वर्गीकरण भंगार साठी योग्य आणि पूनर्वापर योग्य अशा दोन गटात केले जाईल. या कामानंतर लेखा वहीत आवश्यक प्रक्रीया केली जाईल. | वित्तीय वर्ष २०२३-२४ च्या स्वायत्त वि.वि. पत्रकाच्या आमच्या लेखा परिक्षणाच्या अहवालात ग्राह्य अभिप्रायांचा आधार यातील परिच्छेद ३ (एच) यात संबंधित विषयाचा समावेश केला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **प्रगतीपथावरील भांडवली कामे (टिपा क्र. ४.२) रु. ३,३४२.८१ कोटी** | | |
वित्तीय विवरणपत्रकांच्या आम्ही केलेल्या लेखापरिक्षणांच्या आधारे कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर मत व्यक्त करणे ही आम्ही लेखा परिक्षकांची जबाबदारी आहे. आम्ही आय् सी ए आय् यांनी दिलेल्या मानकानुसार आणि अधिनियमाच्या कलम १४३ (१०) अंतर्गत वित्तीय नियंत्रणांना लागू असायचे मानलेल्या विहित पद्धतीने लेखापरिक्षणाचे आयोजन केलेले आहे.ही मानके व मार्गदर्शक टिपणी यानुसार नैतिक आवश्यकतांची पूर्तता करणे. तसेच स्वायत्त वि.वि.पत्रकांचा संदर्भात पुरेशा प्रमाणात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे स्थापित केली असल्याची व जतन केल्याची रास्त हमी मिळविणे यासाठी लेखा परिक्षणाचे नियोजन करुन त्याचे कार्य पार पाडणे आणि सर्व महत्वाच्या दृष्टिने ती स्थापित व कार्यरत असायची हमी मिळविण्यासाठी लेखापरिक्षण केले आहे.

स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी व प्रभावीरित्या कार्यरत असायची हमी मिळविणे या हेतूने आमचे लेखा परिक्षणाची कार्यपद्धती असते स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या बाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे सामंजस्य असल्याची खात्री मिळावी यासाठी आम्ही लेखापरिक्षण करितो. मोठया धोक्यात दुर्बल जागा असू शकण्याच्या शक्यतांची तपासणी परिक्षण व मुल्यांकन करावे या हेतूने अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे लेखापरिक्षण आम्ही करतो. निर्धारित जोखीमांच्या आधारे अंतर्गग नियंत्रणाच्या लेखापरिक्षणाची रचना व कार्यपद्धती तयार केली जाते. लेखा परिक्षकांची न्याय निर्णय यानुसार निवडेली कार्यपद्धती अवलंबून असते. यामध्ये स्वायत्त वि.वि. पत्रकात लबाडी किंवा चुकीने मोठ्या प्रमाणात गैर विवरण होण्याच्या जोखीमांचे निर्धारणाचाही यात समावेश आहे.

स्वायत्त वित्तीय विवरण पत्रकांच्या संदर्भात कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे पुरेशी व योग्य असल्याबद्दल लेखापरिक्षणाचे पुरावे आम्ही मिळविले आहेत,याचा आम्हाला विश्वास आहे.

**स्वायत्त वि. वि. पत्रकांच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ**

स्वायत्त वि. वि. पत्रकांच्या संदर्भात, एखाद्या कंपनीची अंतर्गत वित्तीय नियंत्रणे ही एक कार्यपद्धती असते. त्यातून वित्तीय माहितीची विश्वासार्हता मिळून स्वायत्ता वि.वि. पत्रकाच्या बाह्य हेतूसाठी भारतातील सर्व सामान्यपणे स्वीकारलेल्या लेखा तत्वानुसार सिद्ध असावी असा उद्देश असतो. स्वायत्त वि.वि. पत्रकांच्या संदर्भात कंपनीच्या अंतर्गत नियंत्रणामध्ये पुढील कार्यपद्धती व धोरणे समाविष्ट असतात. (१) ती अभिलेखांची देखभाल व संभाळ याच्याशी निगडीत असतात. हे अभिलेख पुरेशे तपशीलवार असावेत आणि ते कंपनीचा व्यवहार व मत्तांचे स्वरुप याचे अचूक व यांचे दर्शन घडविणारे असावेत. (२) व्यवहाराचे अभिलेखन भारतात सामान्यत: मान्य असलेल्या लेखापद्धतीशी सुसंगत असावे. ते स्वायत्त वि.वि, पत्रकाच्या तयारीसाठी आवश्यक हमी देणारे असावेत त्यातून कंपनीची येणी व देणी हे कंपणीच्या व्यवहाराच्या व संचालकाच्या मंजुरीनुसार केली आहेत याची खात्री मिळावी. आणि (३) स्वायत्त वि.वि. पत्रकास बाधक ठरेल असे मत्तांचे अनाधिकृत संपादन, वापर व स्वरुप यास वेळेवर आळा घातला जातो याची हमी त्यातून मिळावी.

**स्वायत्त वि.वि. पत्रकाच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या उपजत मर्यादा**

स्वायत्त वि.वि. पत्रकाच्या संदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रणांच्या उपजत मर्यादा आहेत. पुढील बाबी समाविष्ट आहेत. जसे व्यवस्थापाच्या नियंत्रण व आरोग्य उद्घाटन किंवा त्याच्याशी विपरीत व्यवहाराची शक्यता असणे, आणि अनवधानाने किंवा लबाडिच्या हेतूने केलेल्या मोठया प्रमाणातील गैर व्यवहार यांना आळा नसणे. तसेच स्वायत्त वि.वि.पत्रकांच्या संदर्भात भविष्याच्या दृष्टीने अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे मुल्यमापनाचे केलेले प्रक्षेप हे जोखीमचे असणे, कारण भविष्यात परिस्थिती बदण्यास हे अंदाज अपुरे पडू शकतात किंवा धोरण व कार्यपद्धतीची अपुरी पुर्तता करु शकतात.

**एम एस के ए ॲण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
आय सी ए आय फर्म नोंदणी क्र. १०५०४७ डब्ल्यू

सही/-

**अमरीश वैद्य**
भागीदार
सदस्य क्र. १०१७३९
यु डी आय एन : २४१०१७३९ बी के इ झेड यु क्यू ७३५६

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ सप्टेबर २०२४

# स्वतंत्र वित्तीय विवरण पत्रक

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी आय एन:यु ४०१०९एमएच २००५एसजीसी१५३६४६

### दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा स्वतंत्र ताळेबंद

(रू. लाखात)

| अनु. क्र. | तपशील | टिप क्र. | ३१ मार्च २०२४ रोजी | ३१ मार्च २०२३ रोजी |
|---|---|---|---|---|
| १ | **मत्ता** | | | |
| (१) | **चालू नसलेल्या मत्ता** | | | |
| | मालमत्ता, कारखाना आणि उपकरणे | ४.१ | १५,५२,३४०.९९ | १५,७०,३२२.९५ |
| | प्रगतीपथावरील भांडवली कामे | ४.२ | ३,८४,९१३.५४ | ३,७८,३७७.१४ |
| | वापराचा हक्क असलेल्या मत्ता | ४.३ | १५,२९४.४३ | ८,९३२.५७ |
| | इतर अमूर्त मत्ता | ४.४ | ५.१४ | ६१.९८ |
| | – इक्विटी मेथड वापरण्यासाठी गुंतवणूकीचा लेखा | ५ | ५,३३५.९२ | ५,३३५.९२ |
| | – वित्तीय मत्ता | | | |
| | १) गुंतवणूकी | ६ | १,४४,५४७.६६ | १,२६,६८०.८६ |
| | २) कर्जे | ७ | १३६.९३ | १३७.३५ |
| | चालू नसलेल्या कर मत्ता (नक्त) | ८ | ७८,२२९.०८ | ७७,८५६.५५ |
| | इतर चालू नसलेल्या मत्ता | ९ | ९,१८६.४७ | ९,११९.०७ |
| | **एकूण चालू नसलेल्या मत्ता** | | **२१,८९,९९०.१६** | **२१,७६,८२४.३९** |
| (२) | **चालू मत्ता** | | | |
| | वस्तुसूची | १० | ४६,३८१.८७ | ३७,३९६.६२ |
| | वित्तीय मत्ता | | | |
| | १) गुंतवणूकी | ११.१ | १२,२१९.१० | २,७३९.२४ |
| | २) व्यापारातील येणी | ११.२ | २,८६,७३०.७० | ३,७६,७६३.५४ |
| | ३) रोकड आणि रोकड समतुल्य | ११.३ | २०,८५६.३२ | ६२,९७३.३० |
| | ४) रोख रोखी समतुल्य व्यापारातील बँक शिल्लक | ११.४ | २,८९,०३१.०९ | २३,८६१.७८ |
| | ५) कर्जे | ११.५ | ३१३.०५ | २६५.३५ |
| | ६) इतर चालू वित्तीय मत्ता | ११.६ | २२,१७८.३६ | १२,७४१.४३ |
| | इतर चालू मत्ता | १२ | ७५४.८० | ६४९.३९ |
| | **एकूण चालू मत्ता** | | **६,७८,४६५.२९** | **५,१७,३९०.६५** |
| | विक्रीसाठी धरुन ठेवलेल्या ह्या स्वरुपातील मत्ता | १३ | ५,००९.९२ | ५,११९.०९ |
| | **एकूण मत्ता** | | **२८,७३,४६५.३७** | **२६,९९,३३४.१४** |
| २ | **समभाग आणि दायित्वे** | | | |
| (१) | **समभाग** | | | |
| | समभाग भाग भांडवल | १४ | ८,९८,४९७.४७ | ८,९८,४९७.४७ |
| | इतर समभाग | १५ | ६,९४,१४६.८४ | ५,२७,५४०.३८ |
| | **एकूण समभाग** | | **१५,९२,६४४.३१** | **१४,२६,०३७.८५** |
| (२) | **दायित्वे** | | | |
| | **चालू नसलेली दायित्वे** | | | |
| | वित्तीय दायित्वे | | | |
| | १) कर्जे | १६.१ | ३,१७,९७८.७२ | ३,९६,२९७.२४ |
| | २) भाडेपट्टा दायित्वे | ३१ | ५,६८९.१८ | ४१.२४ |
| | ३) इतर चालू नसलेली वित्तीय दायित्वे | १६.२ | १,३३,८२१.६१ | १,४०,११८.७० |
| | तरतुदी | १७ | १,५३,९४५.३२ | १,१४,३७७.५७ |
| | स्थगित कर्जे दायित्वे (नक्त) | १८ | २,३६,६५७.७४ | २,४५,११०.१२ |
| | चालू नसलेली आयकर दायित्वे (नक्त) | १९ | ४२,४०८.०२ | ४२,४०८.०२ |
| | इतर चालू नसलेली दायित्वे | २० | १,८७,७१४.६५ | १,५४,५१६.५० |
| | **एकूण चालू नसलेली दायित्वे** | | **१०,७८,२१५.२४** | **१०,९२,८६९.३९** |
| | **चालू दायित्वे** | | | |
| | वित्तीय दायित्वे | | | |
| | १) कर्जे | २१.१ | ८५,५५७.६८ | ८७,३५४.५३ |
| | २)भाडेपट्टा दायित्वे | ३१ | १,४३८.३६ | ३५.९० |
| | ३) व्यापारातील देय | २१.२ | – | – |
| | सूक्ष्म आणि छोटे उद्योगांची एकूण थकित देणी | | २,५५९.३५ | ४३०.१३ |
| | सूक्ष्म आणि छोटे उद्योगांव्यतिरिक्त धनकोंची एकूण थकित देणी | | २९,८१५.६५ | २४,१०३.०३ |
| | ४) इतर चालू वित्तीय दायित्वे | २१.३ | ११,९२६.२५ | १२,६६२.५९ |
| | तरतुदी | २२ | ५३,१२२.१८ | २९,९१२.९८ |
| | इतर चालू दायित्वे | २३ | १८,१८६.३५ | २५,९२७.७४ |
| | **एकूण चालू दायित्वे** | | **२,०२,६०५.८२** | **१,८०,४२६.९०** |
| | **एकूण दायित्वे** | | **१२,८०,८२१.०६** | **१२,७३,२९६.२९** |
| | **एकूण समभाग आणि दायित्वे** | | **२८,७३,४६५.३७** | **२६,९९,३३४.१४** |
| | महत्त्वाची लेखा धोरणे | १ ते ३ | | |

येथे जोडलेल्या समान तारखेच्या आमच्या अहवालासोबत असलेल्या टिपा क्र. १ ते ५७ या कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकांचा एकात्मिक भाग आहेत.

**आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार**
**एम एस के ए ॲण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक १०५०४७ डब्ल्यु
**सही**
**अमरिश वैद्य**
भागीदार
आयसीएआय सदस्य क्र १०१७३९

ठिकाण मुंबई
दि. सप्टेंबर २७, २०२४

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**स्वाक्षरी**
**अंजु गुप्ता**
**मुख्य महाव्यवस्थापिका (वित्त व लेखा)**

**स्वाक्षरी**
**तृप्ती मुधोळकर**
**संचालक (वित्त)**
(डी. आय. एन. क्र .:०९०३३२४०)

**स्वाक्षरी**
**डॉ. संजीव कुमार**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
(डी. आय. एन. क्र . ०८३५२२९५)

**स्वाक्षरी**
**विनिता श्रीवाणी**
**कंपनी सचिव**
(सदस्यत्व क्र.ऐ २१८१४)

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी आय एन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४६

## दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचे स्वतंत्र नफा आणि तोटा विवरणपत्र

(रू. लाखात)

| अनु. क्र. | तपशील | टिप क्र. | ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता |
|---|---|---|---|---|
| | **महसूल** | | | |
| १ | प्रवर्तनापासून महसूल | २४ | ६,५५,५४२.३७ | ४,८९,५६३.४६ |
| २ | इतर उत्पन्न | २५ | ६५,४६३.५३ | ७८,६२२.२० |
| ३ | **एकूण उत्पन्न (१ + २)** | | **७,२१,००५.९०** | **५,६८,१८५.६६** |
| ४ | **खर्च** | | | |
| | दुरुस्ती व देखभालीचे खर्च | २६ | ५५,५८२.८० | ५५,०७५.३५ |
| | कर्मचारी लाभ खर्च | २७ | १,७७,१३०.५३ | १,३५,०९२.७९ |
| | वित्त खर्च | २८ | ३५,०३४.५७ | ३८,६९५.६२ |
| | घसारा व कर्जफेडीची तरतूद खर्च | २९ | १,२८,९८६.७३ | १,३४,१९०.३० |
| | इतर खर्च | ३० | ५०,४००.०० | ४८,७३५.३६ |
| | **एकूण खर्च (४)** | | **४,४७,१३४.६३** | **४,११,७८९.४२** |
| ५ | **करपूर्व नफा (३-४)** | | **२,७३,८७१.२७** | **१,५६,३९६.२४** |
| ६ | **कर खर्च** | | | |
| | १) चालू कर | | (९८,८७२.९७) | (५३,८३४.७३) |
| | २) स्थगित कर | | २,६४७.७२ | १,१०६.६६ |
| | **एकूण कर खर्च (६)** | | **(९६,२२५.२५)** | **(५२,७२८.०७)** |
| ७ | **ह्या वर्षासाठी नफा (५-६)** | | **१,७७,६४६.०२** | **१,०३,६६८.१७** |
| ८ | **इतर सर्वसमावेशक उत्पन्न** | | | |
| | १) नफा किंवा तोटा इथे पुनर्वर्गीकृत केल्या न जाणाऱ्या बाबी – व्याख्या केलेल्या फायदा योजनांची पुनर्मोजणी | | (१६,६११.३५) | (१,३०८.९०) |
| | २) नफा किंवा तोटा इथे पुनर्वर्गीकृत केल्या न जाणाऱ्या बाबींशी संबंधित आयकर | | ५,८०४.६७ | ४५७.३८ |
| | **वर्षासाठी एकूण इतर सर्वसमावेशक उत्पन्न, इतर उत्पन्न (८)** | | **(१०,८०६.६८)** | **(८५१.५२)** |
| ९ | **ह्या कालावधीकरिता सर्वसमावेशक उत्पन्न (७ + ८)** | | **१,६६,८३९.३४** | **१,०२,८१६.६५** |
| १० | प्रति समभाग मूळ आणि विरल उत्पन्न (दर्शनी मूल्य रु. १०) | ३५ | १.८६ | १.१५ |
| | महत्त्वाची लेखा धोरणे | १ ते ३ | | |

येथे जोडलेल्या समान तारखेच्या आमच्या अहवालासोबत असलेल्या टिपा क्र. १ ते ५७ या कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकांचा एकात्मिक भाग आहेत.

**आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार**

**एम एस के ए अँण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक १०५०४७ डब्ल्यु
**सही**
**अमरिश वैद्य**
भागीदार
आयसीएआय सदस्य क्र १०१७३९

ठिकाण मुंबई
दि. सप्टेंबर २७, २०२४

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**स्वाक्षरी**
**अंजु गुप्ता**
**मुख्य महाव्यवस्थापिका (वित्त व लेखा)**

**स्वाक्षरी**
**तृप्ती मुधोळकर**
**संचालक (वित्त)**
(डी. आय. एन. क्र :०९०३३२४०)

**स्वाक्षरी**
**डॉ. संजीव कुमार**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
(डी. आय. एन. क्र . ०८३५२२९५)

**स्वाक्षरी**
**विनिता श्रीवाणी**
**कंपनी सचिव**
(सदस्यत्व क्र.ऐ २१८१४)

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी आय एन:यु ४०१०९एमएच २००५एसजीसी१५३६४६

## ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता स्वतंत्र रोकडता प्रवाह विवरणपत्र

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता |
|---|---|---|
| **अ) प्रवर्तन कार्यातून रोकडता प्रवाह** | | |
| करपूर्व निव्वळ नफा | २,७३,८७१.२७ | १,५६,३९६.२४ |
| **समायोजन :-** | | |
| घसारा आणि कर्जफेडीची तरतुद | १,२८,९८६.७३ | १,३४,१९०.३० |
| शासकीय अनुदानाच्या कर्जफेडीची तरतुद | (२,००७.८०) | |
| मालमत्ता, कारखाना आणि उपकरणांच्या विल्हेवाटीतून फायदा | (१,०५८.२३) | (१,६०३.७५) |
| गुंतवणुकीच्या विक्रीवर नफा | - | - |
| भंगार मत्तांच्या विक्रीतून उत्पन्न | ४९.५९ | (२.६६) |
| प्राप्त लाभांश | (१,८३१.५६) | (१३२.०७) |
| प्राप्त झालेले व्याज | (२२,९१२.९०) | (१०,६९२.८८) |
| वित्त खर्च | ४१,७९३.१७ | ४५,१३५.८५ |
| परकीय चलन दर बदलामुळे नुकसान | (६८.०२) | ५४७.२० |
| किरकोळ शिल्लक निर्लेखन | - | ३७९.९७ |
| **खेळते भांडवल बदलाआधी प्रवर्तनीय नफा** | **४,१६,८२२.२५** | **३,२४,२१८.२०** |
| **खेळत्या भांडवलातील हालचाली** | | |
| वस्तुसूचीतील (वाढ) | (८,९८५.२५) | (९,२७९.८३) |
| गुंतवणुकीतील (वाढ)/घट | | |
| व्यापार प्राप्यातील (वाढ) | ९०,०३२.८४ | (५७,९४५.७१) |
| अल्प मुदतीचे कर्ज आणि अग्रीमे यातील (वाढ)/घट | (४७.७०) | (१४.४६) |
| इतर चालू मत्ता या मधील (वाढ) | (२,७४,७११.६५) | (४,४४५.९५) |
| दीर्घ मुदतीचे कर्ज आणि अग्रीमे यातील (वाढ)/घट | | |
| दीर्घ मुदतीच्या तरतुदीतील (वाढ) | ३९,५६७.७५ | ११,०००.४५ |
| दीर्घ मुदतीच्या तरतुदीतील (वाढ)/ घट | २३,२०९.२० | २,५१४.७३ |
| इतर चालू नसलेली मत्तातील (वाढ)/ घट | (६७.४०) | (१५३.२२) |
| इतर चालू नसलेली वित्तीय मत्तातील (वाढ)/ घट | (६,२९७.०९) | १६,८४४.७३ |
| भांडवली अग्रीमें | ७,८४१.८४ | (५११.९५) |
| इतर चालू दायित्वातील घट | ६७,७४४.३६ | (१५,८७६.०३) |
| इतर दीर्घ मुदतीच्या चालू दायित्वातील (वाढ)/घट | - | - |
| **प्रवर्तनातून निर्माण झालेली रोकड** | **३,५५,१०९.१५** | **२,६६,३५०.९६** |
| कर प्रदान | (८५,०४७.००) | (४७,५७६.६१) |
| **प्रवर्तन कार्यातून निव्वळ रोकड/ प्रवर्तन कार्यात वापरलेली रोकड** | **२,७०,०६२.१५** | **२,१८,७७४.३५** |
| **ब) गुंतवणूक कार्यातून रोकडता प्रवाह** | | |
| CWIP आणि भांडवली अग्रिमासह मालमत्ता, कारखाना आणि उपकरणांची खरेदी (विक्रीतून उत्पन्नाची नक्त) | (१,२२,७२८.३७) | (१,४९,५१५.४३) |
| घसारा | - | - |
| शासकीय अनुदानाची परतफेडीची तरतुद | २,००७.८० | - |
| गुंतवणुक विक्रीतून प्राप्ती | - | - |
| शासकीय अनुदानाची जमा | ३३,१९८.१५ | (१,७७२.२८) |
| दीर्घ मुदतीची कर्जे आणि ॲडव्हान्स | ०.४२ | (१२.८६) |
| इतर चालू नसलेल्या मत्ता | - | - |

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता |
|---|---|---|
| ओआरसी ठेवींच्या जमा | | १,८४३.०० |
| सहयोगी कंपन्या / संयुक्त साहसातील गुंतवणूक | - | - |
| गुंतवणुकीची (खरेदी) / विक्री | (२७,३४६.६६) | (१८,१६०.५५) |
| प्राप्त व्याज | - | - |
| प्राप्त लाभांश | १,८३१.५६ | १३२.०७ |
| प्राप्त व्याज | २२,९१२.९० | १०,६९२.८८ |
| **गुंतवणूक कार्यातून निव्वळ रोकड/ कार्यात वापरलेली रोकड** | **(९०,१२४.२०)** | **(१,५६,७९३.१७)** |
| **क) वित्तीय कार्यातून रोकडता प्रवाह** | | |
| समभाग (इक्विटी) देणे | - | - |
| इतर समभाग | (१,०७,२६४.८१) | |
| शेअर ॲप्लीकेशन मनी पासुन प्राप्ती | | |
| उसनवारी पासुन मिळकत / (परत फेड) | (८०,०४७.३५) | (१८,६०७.००) |
| अल्प मुदतीच्या उसनवारीची परत फेड | | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जातून मिळणारे उत्पन्न / (परत फेड) | | |
| भाडेपट्टीचे दायित्व | ७,०५०.४० | (१,९०१.४१) |
| दीर्घ मुदतीच्या उसनवारीची परत फेड | | |
| व्याज / वित्तीय खर्च यांचा केलेला भरणा | (४१,७९३.१७) | (४५,१३५.८५) |
| कर्ज प्रक्रिया आकाराचा वेळेवर भरणा | - | - |
| **वित्तीय कार्यात वापरलेली निव्वळ रोकड** | **(२,२२,०५४.९३)** | **(६५,६४४.२६)** |
| **रोकड आणि रोकड समतुल्यात निव्वळ घट (अ + ब + क)** | **(४२,११६.९८)** | **(३,६६३.०८)** |
| रोकड आणि रोकड समतुल्याची प्रारंभीची शिल्लक | ६२,९७३.३० | ६६,६३६.३८ |
| **रोकड आणि रोकड समतुल्याची अखेरची शिल्लक** | **२०,८५६.३२** | **६२,९७३.३०** |

| खालील बाबीतील रोकड आणि रोकड समतुल्य | ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता |
|---|---|---|
| **बँकेतील शिल्लक** | | |
| चालू खात्यात | ३,८५०.७४ | ७,७०६.९३ |
| मुदत ठेवी लेख्यांमध्ये (तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधी असलेला मूळ मुदतसमाप्ती) | ८,४४१.१२ | ३३,९८७.७० |
| रोख आणि हातातील स्टॅम्प | ११.६३ | १२.५७ |
| म.वि.नि.आ. च्या विनियमाच्या संज्ञेत परिचालित आणि परीरक्षित निर्दिष्ट चालू खात्यात | ८,५५२.८३ | २१,२६६.१० |
| **वर्षाच्या शेवटी रोकड आणि रोकड समतुल्य** | **२०,८५६.३२** | **६२,९७३.३०** |

भारतीय लेखांकन मानक ७ - रोकडता प्रवाहाचे विवरणपत्र मध्ये निर्देशित केल्यानुसार ''अप्रत्यक्ष पद्धत'' याखाली रोकडता प्रवाहाचे प्रवाहाचे विवरणपत्र तयार केले आहे.

**आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार**

**एम एस के ए ॲण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक १०५०४७ डब्ल्यु
**सही**
**अमरिश वैद्य**
भागीदार
आयसीएआय सदस्य क्र १०१७३९

ठिकाण मुंबई
दि. सप्टेंबर २७, २०२४

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**स्वाक्षरी**
**अंजु गुप्ता**
**मुख्य महाव्यवस्थापिका (वित्त व लेखा)**

**स्वाक्षरी**
**तृप्ती मुधोळकर**
**संचालक (वित्त)**
(डी. आय. एन. क्र .:०९०३३२४०)

**स्वाक्षरी**
**डॉ. संजीव कुमार**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
(डी. आय. एन. क्र . ०८३५२२९५)

**स्वाक्षरी**
**विनिता श्रीवाणी**
**कंपनी सचिव**
(सदस्यत्व क्र.ऐ २१८१४)

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी आय एन : यु ४०१०९ एमएच २००५ एसजीसी १५३६४६

## ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता एकूण समभागातील बदलाचे स्वतंत्र विवरणपत्र

### अ) समभाग भांडवल

**३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता** (रू. लाखात)

| १ एप्रिल २०२३ रोजी शिल्लक | वर्षभरात समभाग भांडवलातील बदल | ३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक |
|---|---|---|
| ८,९८,४९७.४७ | - | ८,९८,४९७.४७ |

**३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता** (रू. लाखात)

| १ एप्रिल २०२२ रोजी शिल्लक | वर्षभरात समभाग भांडवलातील बदल | ३१ मार्च २०२३ रोजी शिल्लक |
|---|---|---|
| ८,९८,४९७.४७ | - | ८,९८,४९७.४७ |

### ब) इतर समभाग

**३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता** (रू. लाखात)

| तपशील | राखीव आणि आधिक्य | | | | एकूण समभाग |
|---|---|---|---|---|---|
| | आकस्मिक राखीव निधी | विशेष राखीव निधी | भार प्रेषण केंद्र सबलीकरण राखीव निधी (LDCD) | राखून ठेवलेले उत्पन्न | |
| **१ एप्रिल २०२३ रोजी शिल्लक** | **८५,३०१.००** | **१३,९३९.००** | **३,७५४.०८** | **४,२४,५४६.३०** | **५,२७,५४०.३८** |
| वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | | | | १,७७,६४६.०२ | १,७७,६४६.०२ |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नाला हस्तांतरित | | | | (१०,८०६.६८) | (१०,८०६.६८) |
| **वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न** | **-** | **-** | **-** | **१,६६,८३९.३४** | **१,६६,८३९.३४** |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नाला हस्तांतरित | - | - | २,४६७.०० | (२,४६७.००) | - |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नातून हस्तांतरित | ७,७०७.०० | - | - | (७,७०७.००) | - |
| कॅपेक्स करिता वापर (म वि न आ ने परवानगी दिलेला) | - | - | (२३२.८८) | - | (२३२.८८) |
| **३१मार्च २०२४ रोजी शिल्लक** | **९३,००८.००** | **१३,९३९.००** | **५,९८८.२०** | **५,८१,२११.६४** | **६,९४,१४६.८४** |

**३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता** (रू. लाखात)

| तपशील | राखीव आणि आधिक्य | | | | एकूण समभाग |
|---|---|---|---|---|---|
| | आकस्मिक राखीव निधी | विशेष राखीव निधी | भार प्रेषण केंद्र सबलीकरण राखीव निधी (LDCD) | राखून ठेवलेले उत्पन्न | |
| **१ एप्रिल २०२२ रोजी शिल्लक** | **७७,९७८.००** | **१३,९३९.००** | **४,२८३.७६** | **३,२९,०५१.७६** | **४,२५,२५२.५२** |
| वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न | | | | १,०३,६६८.१७ | १,०३,६६८.१७ |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नाला हस्तांतरित | | | | (८५१.५२) | (८५१.५२) |
| **वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न** | **-** | **-** | **-** | **१,०२,८१६.६५** | **१,०२,८१६.६५** |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नाला हस्तांतरित | ७,३२३.०० | - | - | (७,३२२.११) | ०.८९ |
| कॅपेक्स करिता वापर (म वि न आ ने परवानगी दिलेला) | - | - | (५२९.६८) | - | (५२९.६८) |
| **३१ मार्च २०२३ रोजी शिल्लक** | **८५,३०१.००** | **१३,९३९.००** | **३,७५४.०८** | **४,२४,५४६.३०** | **५,२७,५४०.३८** |

येथे जोडलेल्या समान तारखेच्या आमच्या अहवालासोबत असलेल्या टिपा क्र. १ ते ५७ या कंपनीच्या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रकांचा एकात्मिक भाग आहेत.

**आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार**

**एम एस के ए ॲण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक १०५०४७ डब्ल्यु
**सही**
**अमरिश वैद्य**
भागीदार
आयसीएआय सदस्य क्र १०१७३९

ठिकाण मुंबई
दि. सप्टेंबर २७, २०२४

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

स्वाक्षरी
**अंजु गुप्ता**
**मुख्य महाव्यवस्थापिका (वित्त व लेखा)**

स्वाक्षरी
**तृप्ती मुधोळकर**
**संचालक (वित्त)**
(डी. आय. एन. क्र :०९०३३२४०)

स्वाक्षरी
**डॉ. संजीव कुमार**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**
(डी. आय. एन. क्र . ०८३५२२९५)

स्वाक्षरी
**विनिता श्रीवाणी**
**कंपनी सचिव**
(सदस्यत्व क्र.ऐ २१८१४)

## ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता स्वतंत्र वित्तीय विवरणपत्राच्या टीपा

### १. कंपनीची आणि सामान्य माहिती

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) ही कंपनी अधिनियम १९५६ खाली ३१ मे २००५ रोजी विधी संस्थापित झाली. कंपनी रजिस्ट्रारकडून १५ सप्टेंबर २००५ रोजी व्यवसाय सुरु करण्यासाठीचे प्रमाणपत्र प्राप्त झाले. ही कंपनी ४ जून २००५ रोजी जारी केलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ (हस्तांतरण योजना असा यापुढे उल्लेख असलेली) च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार संस्थापित करण्यात आली. या आधी उल्लेखित अधिसूचनेनुसार, या आधीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पारेषण उपक्रमाचा भाग असलेल्या मत्ता आणि दायित्वांना (उक्त अधिसूचनेच्या अनुसूची अ मध्ये दिल्यानुसार) दि. ६ जून २००५ पासून कंपनीकडे हस्तांतरित आणि निहित करण्यात आले. सदर हस्तांतरण योजनेला महाराष्ट्र शासनाने दि. ३१.०३.२०१६ रोजी मान्यता दिली. उपरोक्त हस्तांतरण योजनेखाली महाराष्ट्र शासनाने मत्ता आणि दायित्वांचे हस्तांतरण केले. निर्णयानुसार, उपक्रमाच्या हस्तांतरणाकरिता मोबदला जो दायित्वावर मत्ता आधिक्य असल्यामुळे मराविमं सुत्रधारी कंपनी मर्यादित (धारक कंपनी) ला रु. ८,९८,४९७.४७ लाखांचे समभाग जारी करुन चुकता करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण किंवा कंपनी) ही देशातील आघाडीची राज्य पारेषण संस्था आहे. महापारेषण ही महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व विद्युत पारेषण यंत्रणेची मालक आणि परिचालक आहे. कंपनी ही महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी संस्था असून ती विद्युत निर्मितीच्या ठिकाणाहून विद्युत वितरणाच्या ठिकाणापर्यंत विद्युत पारेषण करण्यासाठी या आधीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना केल्यानंतर ३१ मे २००५ रोजी विधी संस्थापित आणि अधिवासी करण्यात आली.

कंपनीला विद्युत अधिनियम २००३ खाली राज्य पारेषण संस्था म्हणून अधिनियमित केले गेले आहे. त्यांचे नोंदणीकृत व्यवसायाचे कार्यालय प्रकाशगंगा, सी-१९, इ-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१, आणि ती मुख्यत्वे राज्यांतर्गत पारेषण प्रणालीचे नियोजन, कार्यान्वयन, परिचालन आणि परीक्षण यात गुंतलेली आहे.

### २. लक्षणीय लेखांकन धोरणांचे विवरणपत्र

#### २.१ अनुपालन विवरणपत्र

ही वित्तीय विवरणपत्रे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३३, कंपन्या भारतीय लेखाकंन मानक नियम २०१५ आणि कंपनी अधिनियम २०१३ च्या संबंधित तरतुदी (अधिसूचित केलेल्या मर्यादेपर्यंत) आणि लागू असलेल्या

मर्यादेपर्यंत आणि त्यानंतर सुधारणा केल्यानुसार वीज अधिनियम २००३ च्या तरतुदी यानुसार तयार करण्यात आली आहेत.

#### २.२ तयारी आणि सादरीकरणाचा पाया

वित्तीय विवरणपत्रे ही उपार्जित तत्वावर आणि ऐतिहासिक मूल्य रुढीखाली तयार करण्यात आली आहेत. अपवाद योग्य मूल्याना मोजणी करण्यात आलेल्या खालील बाबींचा आहे.

- योग्य मूल्यांना मोजण्यात आलेल्या विशिष्ट वित्तीय मत्ताआणि दायित्वे
- विक्रीसाठी धरुन ठेवलेल्या मत्ता- वहन रक्कमेपेक्षा कमी रकमेस किंवा योग्य मूल्यास मोजणी वजा विक्रीचा खर्च
- व्याख्यांकित लाभ योजना -योग्य मूल्यास मोजणी केलेल्या योजना मत्ता.

कंपनीने चालू चिंता म्हणून काम करत राहील या आधारावर आर्थिक विवरण तयार केले आहे.

#### २.३ चालू आणि चालू नसलेले वर्गीकरण

कंपनी चालू/चालू नसलेले वर्गीकरणावर आधारित अशा मत्ता आणि दायित्व बाबी ताळेबंदात सादर करते.

मत्तेला तेव्हा चालू मानले जाते जेव्हा

- ती विकून किंमत वसूल करणे अपेक्षित असते किंवा तिच्या विक्रीचा हेतू असो किंवा सामान्य परिचलनीय चक्रात तिचा वापर करायचा असतो.
- मुख्यत: व्यापाराकरिता ठेवलेली असेल
- प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर बारा महिन्यांच्या आत ती विकून किंमत वसूल करायची असेल किंवा
- रोख किंवा रोख समतुल्य फक्त अपवाद चलन म्हणून वापरण्यास प्रतिबंध असेल किंवा प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर किमान बारा महिन्यांकरिता दायित्व चुकवण्यासाठी वापरलेले असेल.
- अन्य सर्व मत्ता चालू नसलेल्या म्हणून वर्गीकृत केलेल्या आहेत.
- दायित्वाला तेव्हा चालू मानले जाते जेव्हा
- जेव्हा ते सामान्य परिचलनीय चक्रात चुकवले जाणे अपेक्षित असते
- मुख्यत: व्यापाराकरिता ठेवलेली असेल
- प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर बारा महिन्यांच्या आत ती विकून किंमत वसूल करायची असेल किंवा
- प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर किमान बारा महिन्यांकरिता दायित्वाचे चुकवणे मान्य असणे हा विनाअट हक्क नसेल

कंपनी इतर सर्व दायित्वांना चालू नसलेल्या म्हणून वर्गीकृत करते.

स्थगित कर मत्ता आणि दायित्वांना चालू नसलेल्या मत्ता आणि दायित्वे म्हणून वर्गीकृत केले आहे.

परिचलनीय चक्र हा प्रक्रियांसाठी मत्ता संपादन करणे आणि त्यांची रोख आणि रोख समतुल्य या रुपात वसुली करणे यामधील कालावधी असतो.

कंपनीच्या सर्वसाधारण परिचालन ( १२ महिने ) चक्रानुसार १२ महिने असे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**२.४. रक्कमा पूर्णांकीत करणे**

जर अन्यथा नमूद केले नसेल तर अनुसूची तीनच्या आवश्यकतानुसार वित्तीय विवरण पत्रे आणि टिपामध्ये दर्शवण्यात आलेल्या सर्व रक्कमा जवळच्या लाखात पूर्णांकीत करण्यात आल्या आहेत.

**२.५ अंदाज आणि निर्णयाचा उपयोग :**

महामंडळाच्या वित्तीय विवरणपत्रांच्या तयारीसाठी महसूल, खर्च, मत्ता, दायित्वे यांच्या प्रतिवेदित रक्कमा आणि आकस्मिक दायित्वांसह जोडलेली प्रकटने यावर परिणाम करणारे निर्णय, अंदाज आणि गृहितके करण्याच्या व्यवस्थापनाची आवश्यकता असते. ह्या गृहितके आणि अंदाजाविषयीच्या अनिश्चिततेचा परिणाम निष्पत्तीवर होऊ शकतो ज्यासाठी भविष्यातील कालावधीत प्रभावित होणाऱ्या मत्ता किंवा दायित्वांच्या वहन रकमांमध्ये प्रत्यक्ष समायोजन आवश्यक होईल. महामंडळ हे अगदी अलिकडे उपलब्ध माहितीच्या आधारे ह्या अंदाजांचे आणि गृहितकांचे सातत्याने मूल्यमापन करत असते.

विशेषत्वाने नमूद करायचे तर, वित्तिीय विवरण–पत्रांमध्ये मान्य केलेल्या रक्कमावर ज्यांचा सर्वांत लक्षणीय प्रभाव असेल अशा लेखांकन धोरणांना लागू करण्यासाठी अंदाज आणि निर्णयांच्या लक्षणीय क्षेत्रांविषयीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

– मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आयुर्मान, हानी आणि अवशिष्ट मूल्यांचे अंदाज

– वस्तु साठ्याचे मूल्यांकन

– व्याख्याकिंत लाभ बंधने आणि विभागणितीय गृहितकांची मोजणी

– तरतुदी

– स्थगिती कर मत्तांच्या वसूली योग्यतेचे मूल्यनिर्धारण आणि

– आकस्मिकता

ज्या कालावधीत अंदाज सुधारित करण्यात आले त्यात आणि परिणाम होणाऱ्या भविष्यातील कोणत्याही कालावधीत नफा आणि तोटा विवरणपत्रात लेखांकन अंदाजातील सुधारणा संभवनीय स्वरुपात मान्य करण्यात आले आहेत.

**२.६ मालमत्ता, यंत्र आणि उपकरण ( भालेमा १६ )**

मालमत्ता, यंत्र आणि उपकरणांची सुरुवातीला मोजणी ही संपादन /बांधकाम खर्चानुसार केली जात आहे. आणि त्यात सदर मालमत्ता कामाच्या ठिकाणी आणण्यासाठी थेट लागू  होऊ शकणारे कोणतेही खर्च आणि व्यवस्थापनाच्या उद्देशानुसार परिचालनासाठी सक्षम असण्यासाठी आवश्यक स्थिती यांचा त्या खर्चात  समावेश असतो. प्रारंभीच्या मोजणीनंतर मालमत्ता यंत्र आणि उपकरण यांचे  संचित घसारा, कर्जफेड तरतुद आणि असतील तर संचित हानी नुकसान वजा करुन  त्या किंमतीला वहन केले जाते.

जेव्हा खर्चाशी निगडीत भविष्यातील आर्थिक लाभ हे कंपनीत प्रवाहित होतील अशी शक्यता असेल तेव्हाच फक्त पाठोपाठ येणाऱ्या खर्चाचे भांडवलीकरण केले जात आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या मत्तांच्या बदली संपादित केलेल्या मालमत्ता, यंत्र आणि उपकरणाचे भांडवलीकरण केले गेले आहे. आणि क्रियाशील वापरातून काढून घेतलेल्या निवृत्त केलेल्या त्यांच्या संबंधित बदली मत्तांना अमान्य केले आहे. बदली केलेल्या भागाची जिथे किंमत किंवा आधिचेपरीक्षण उपलब्ध नाही तिथे त्यासारख्या नव्या भागाची अंदाजित किंमत/ निरीक्षण यांचा निदर्शक वापर केला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या भागाची / तपासणी केलेल्या भागाची जेव्हा ती बाब संपदित केली किंवा निरीक्षण करण्यात आले होते.तेव्हा त्या भागाची किंमत काय होती याचे निदर्शक म्हणून हा वापर करण्यात आला आहे.

जिथे कंत्राटदाराशी देयकांचे अतिंम प्रदाने होणे बाकी आहे. अशा कार्यान्वित मत्ता, उपकेंद्रे आणि पारेषण लाईन्सचे बांधकाम अशा प्रकरणांमध्ये अंतिम प्रदानाच्या वर्षात केल्या जाणाऱ्या आवश्यक समायोजनांच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात भांडवलीकरण करण्यात आले आहे.

जमिनीच्या किंमती भरपाईसाठी प्रदाने/दायित्वे आणि जेव्हा जमिनीचा ताबा घेण्यात आला तेव्हा झालेले इतर खर्च यांचा समावेश आहे.

जमीन समतल करणे, साफ करणे आणि तिचे श्रेणीकरण करणे यावर होणारा खर्च हा जमिन विकासाचा खर्च म्हणून भांडवलीकरण केला आहे.

रु. १० लाखांपेक्षा जास्त किंमतीचे सुटे भाग तसेच मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यांचे मान्यता निकष गाठणारी बदली उपकरणे आणि सेवा उपकरणे यांचे भांडवलीकरण करण्यात आले आहे. मात्र, मवीनिआ कपेक्स विनियम २०२२ अंमलात आल्यामुळे ज्यात कोणतीही बदली योजना आणि राखीव सुटे भाग हे केपेक्स योजना म्हणून अनुज्ञेय होणार नाहीत आणि ते आर एण्ड एम योजनेखाली पार पाडावे लागणार आहेत. त्यामुळे, वि. व. २०२१-२२ पासून कंपनी मवीनिआ विनियम अनुसरत आहे आणि एक विनियामक व्यवसाय असल्यामुळे एआरआर हे मवीनिआद्वारा मान्य केले जात आहे.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यातील बाबींच्या उपयोगानंतर किंवा, विल्हेवाटीनंतर भविष्यकालीन आर्थिक लाभ अपेक्षित नाहीत अशा बाबी अमान्य करण्यात आल्या आहेत.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यातील बाबींच्या उपयोगानंतर किंवा, विल्हेवाटीनंतर भविष्यकालीन आर्थिक लाभ अपेक्षित नाहीत अशा बाबी अमान्य करण्यात आल्या आहेत.

बांधकाम केलेल्या ओआरसी मत्तांचा खर्च हा ग्राहकांकडून प्राप्त संबंधित ओआरसी ठेवींमधून कमी करण्यात आला आहे आणि अशा मत्ता ओळखीसाठी त्यांच्या बांधकामाच्या खर्चाला नव्हे तर रु.१ या नाममात्र मूल्याला मान्य करण्यात आल्या आहेत.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरणाच्या बाबींची विल्हेवाट किंवा निवृत्तीनंतर उद्भावणाऱ्या लाभ किंवा नुकसानीला निव्वळ विल्हेवाट रक्कम आणि मत्त्याची वहन रक्कम यातील फरक मानण्यात येतो आणि विल्हेवाट किंवा निवृत्तीच्या दिनांकास नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य करण्यात येतो.

**२.७ प्रगती पथावरील भांडवली कामे (भालेमा १६)**

मालाची किमंत, उभारणी आकार आणि मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यांच्या बांधकामासाठी झालेला खर्च हा भांडवलीकरणाच्या दिनांकापर्यंतच्या उभारणी कामाच्या प्रगती आधारे प्रगती पथावरील भांडवली कामेम्हणून दाखवण्यात आला आहे.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे यांच्या बांधकामास बहाल करता येण्याजोगा प्रकल्प कार्यालय आणि कंपनी कार्यालय यावरील खर्च ओळखण्यात आला आहे. आणि संबंधित मत्त्याच्या किंमतीला शास्त्रोक्त पध्दतीने नेमून दिला आहे.

कंत्राटाच्या बाबत किंमत कमी जास्त होणे चलन दर कमी जास्त होणे यासाठी पूर्ण फेड न झालेली दायित्वे ही कंत्राटाच्या शर्तीनुसार अंदांजित पायावर लेखांकीत करण्यात आली आहेत.

योजनेखाली मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या निश्चितीकरण, सर्वेक्षण आणि संभाव्यता अभ्यासावर झालेल्या खर्चाला त्याच्या अस्विकाराच्या कालावधी पर्यंत किंवा तीन वर्षांपर्यंत जे लवकर असेल ते प्रगती पथावरील भांडवली कामाखाली वेगळी बाब म्हणून दर्शवण्यात आले आहे. अस्वीकार केल्यास, अस्वीकाराच्या वर्षात सदर खर्च, नफा, आणि तोटा विवरण पत्रात खर्ची टाकण्यात आले आहेत.

**२.८ अमूर्त मत्ता (भालेमा ३८)**

अमूर्त मत्ताच्या किंमतीच्या प्रारंभीच्या मान्यतेला मोजण्यात आल्या आहेत. प्रारंभिक मान्यतेनंतर अमूर्त मत्ता ह्या किंमत वजा कोणत्याही संचित कर्जपरतफेड रक्कम आणि संचित हानी नुकसान या मूल्यास वहन केल्या आहेत.

आधीच भांडवलीकृत अमूर्त मत्त्यावर नंतर करण्यात आलेला खर्च हा तो जेव्हा सध्याच्या मत्त्यात समाविष्ट केलेले भविष्यकालीन आर्थिक लाभ वाढवतो. तेव्हा भांडवलीकृत केला आहे. आणि संभाव्य स्वरुपात परत फेड खर्च म्हणून ठेवला आहे.

अंतर्गत वापरासाठी संपादित केलेल्या आणि लक्षणीय भविष्यकालीन आर्थिक फायद्यांमध्ये परिणत होणाऱ्या सॉफ्टवेअर ( जे संबंधित हार्डवेअरचा एकात्मिक भाग नाही.) किंमतीला ज्यावेळी ते वापरासाठी तयार होईल त्यावेळी अमूर्त मत्ता म्हणून मान्य करण्यात आले आहे.

अमुर्त मत्त्याची कोणतीही बाब ही विल्हेवाटीनंतर किंवा त्यांच्या वापरातून किंवा विल्हेवाटीतून कोणतेही भविष्यकालीन आर्थिक लाभ अपेक्षित नाहीत.अशा वेळी त्याबाबीची मान्यता काढून घेण्यात येते ( मान्यता काढून घेण्यातून उद्‌भवणाऱ्या प्राप्ती किंवा नुकसानीना निव्वळ विल्हेवाट रक्कम आणि मत्याची वहन अमूर्त बाबींच्या रक्कम यातील फरक म्हणून मोजण्यात येत आहे. आणि जेव्हा मत्ता अमान्य केली जाते तेव्हा फायदा आणि तोटा विवरण पत्रात मान्य करण्यात येत आहे.

**२.९ घसारा / कर्जाची परतफेड तरतुद (भालेमा १६)**

पारेषण व्यवसायाशी संबंधित मत्त्यावर घसारा / कर्जाची परतफेड तरतुद ही वीज आकार वसूल करण्याच्या हेतूसाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने अधिसूचित केलेले दर आणि कार्यपध्दती अनुसरुन सरळ रेषा पध्दतीने पुरवण्यात आली आहे.

अमूर्त मत्तेच्या रुपात भांडवलीकरण केलेल्या सॉफ्टवेअरची किंमत ही निरंक नष्ट शेष मूल्यासह कायदेशीर हक्क वापर कालावधी किंवा चार वर्षे यापैकी जो आधी असेल त्यावर परतफेड तरतुद करण्यात आली आहे.

मोबाईल फोन्सला खरेदीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत खर्ची टाकण्यात येत आहे.

वर्षभरात मालमत्ता यंत्र आणि उपकरण यातील वाढ/वजा यावरील घसारा/परतफेड ही ज्या दिनांकापासून मत्ता वापरण्यासाठी उपलब्ध आहे. किंवा विल्हेवाटीच्या दिनांकापासून प्रमाणशीर पध्दतीने खर्ची टाकण्यात येत आहे.

जिथे किंमत समायोजन, आकारातील बदल किंवा समान घटक यातील वाढ / घट यामुळे घसारायोग्य मालमत्ता, यंत्र आणि उपकरणाच्या किंमतीस बदल झाला आहे. तसेच अशा मत्तेचा परतफेड तरतुदी न केलेला शिल्लक भाग यांच मवीनीआ आकार विनियमन द्वारे अधिसूचित केलेल्या दर आणि कार्यपध्दती अनुसरुन पूर्वलक्षी प्रभावाने घसारा काढण्यात आला आहे. भांडवलीकरण झालेला सुटे भाग राखीव उपकरण आणि सर्विसिंग उपकरणांवर सरळ रेषा पध्दतीने घसारा काढण्यात आला आहे.

हा घसारा म वी नि आयोगाने अधिसूचित केलेले दर आणि कार्यापध्दती अनुसरुन, पारेषण व्यवसायाचा संबंधित मत्तेच्या उर्वरित उपयुक्त जीवनावर ज्या दिनांकापासून ह्या बाबी वापरासाठी उपलब्ध झाल्या त्या दिनांकापासून हा घसारा काढण्यात आला आहे.

पारेषण व्यवसायाशी संबंधित नसलेल्या मत्ता व्यतिरिक्त इतर मत्तांची शेष मूल्ये, उपयुक्त आयुर्मान आणि घसारा काढण्यासाठी पध्दत यांचे प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी पुनर्विलोकन करण्यात येते आणि जिथे आवश्यकता असेल तिथे त्यांना संभाव्य स्वरुपात समायोजित करण्यात येते.

रु.५००० किंवा कमी मूल्यांच्या मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे यांच्या मत्तांचा संपादनाच्या वर्षात पूर्ण घसारा काढण्यात येतो.

मविनिआ आकार विनियमात विनिर्देशित केलेल्या दर आणि कार्यपद्धतीनुसार भाडेपट्ट्यावरील जमीन (परिच्छेद २.१२ मध्ये संदर्भित केल्यानुसार भालेमा११६ खाली आरओयु म्हणून मानलेल्या जमिनीव्यतिरिक्त) ही भाडेपट्टा कालावधीकरिता पूर्णपणे कर्जफेड तरतूद म्हणून केलेली असते.

विविध वर्गातील मत्तेसाठी वापरण्यात येणारे घसाऱ्याचे दर

| तपशील | दर |
|---|---|
| मूर्त मत्ता | |
| जलविषयक (हायड्रॉलिक) कामे | ५.२८ % |
| इमारत व इतर स्थापत्य कामे | ३.३४ % |
| कारखाने व यंत्रसामुग्री | ५.२८ % |
| पारेषण तारा. केबलचे नेटवर्क इ. | ५.२८ % |
| फर्निचर, जोडणी व कार्यालयीन साहित्य | ५.२८ % ते १५ % |
| वाहने | ६.३३ % |

### २.१० कर्जाचा खर्च (भालेमा २३)

कर्जाच्या खर्चात निधीचे कर्ज काढण्याशी संबंधित व्याज आणि इतर खर्च यांचा समावेश आहे. कर्जाच्या खर्चात चलन फरक सुद्धा समाविष्ट असतो आणि तो कर्जाच्या खर्चाचे समायोजन ह्या मर्यादेपर्यंत मानला जातो.

वर दर्शविलेल्या २.७ येथे संदर्भित धोरणानुसार बांधकामा दरम्यानचे व्याज (IDC) आणि बांधकामासाठी वाटप केलेला खर्च (निव्वळ) हे CWIP खाली स्वतंत्र बाब म्हणून ठेवले आहेत आणि CWIP च्या शेवटच्या शिलकेच्या प्रमाणात भांडवलीकरण केल्या जात असलेल्या मत्तांना विभागण्यात आले आहे. जिथे शक्य आहे तिथे योजनांकरिता प्रत्यक्ष IDC परिगणित केले आहेत. उर्वरित योजनांकरिता कर्ज समभागाचे ७५:२५ गुणोत्तर हे सुरुवातीच्या कॅपेक्सच्या तसेच वर्षभरात खर्ची पडलेल्या कॅपेक्सकरिता IDC परिगणित करण्याकरिता विचारात घेतली आहे. भांडवलीकरण विचारात घेताना FIFO पद्धत म्हणजेच मत्तांचे पहिले भांडवलीकरण हे कॅपेक्सच्या सुरुवातीच्या शिलकीतून आकारता येईल ही पद्धत अनुसरण्यात आली आहे.

IDC परिगणित करण्याकरिता प्रत्येक वित्तीय संस्था आणि बँकांचे व्याजाचे भारीत सरासरी दर वापरण्यात आले आहेत.

सशर्त मत्तांच्या संपादणूक किंवा बांधकामाला बहाल केल्या जाऊ शकणाऱ्या कर्जाच्या खर्चांना (म्हणजेच ज्या मत्ताच्या उद्देशित उपयोगाकरिता तयार होण्याकरीता ज्या भरपूर कालावधी घेतात.) अशा मत्तांच्या खर्चाचा भाग म्हणून भांडवलीकृत करण्यात येत आहे. इतर सर्व कर्जाचे खर्च हे नफा आणि तोटा विवरणपत्रात खर्ची टाकण्यात आले आहेत.

जेव्हा अर्हता प्राप्त मत्ता ह्या त्यांच्या उद्दिष्टानुसार उपयोगाकरिता तयार करण्यासाठी भरीवपणे आवश्यक सर्व कृती पूर्ण केल्या जातात तेव्हा कर्जाच्या रकमेचे भांडवलीकरण समाप्त होते.

सशर्त मत्तांवरील विशिष्ट कर्जांचा खर्च प्रलंबित आहे. अशा कर्जाच्या निधींच्या तात्पुरत्या गुंतवणुकीवर अर्जित केलेले गुंतवणूक उत्पन्न हे भांडवली करण्यासाठी पात्र कर्जाच्या खर्चातुन वजा करण्यात येत आहेत.

### २.११ विक्रीकरीता धरुन ठेवलेल्या चालू नसलेल्या मत्ता (भालेमा १०५)

जर चालू नसलेल्या मत्तांची वहन रक्कम त्यांच्या सातत्यपूर्ण उपयोगाऐवजी विक्री व्यवहाराद्वारा वसूल केली जाणार असेल तर अशा मत्तांना विक्रीकरिता धरुन ठेवलेले म्हणून वर्गीकृत केले जात आहे. जेव्हा विक्री ही खूपच शक्य असेल आणि अशा मत्तांच्या विक्रीकरीता सामान्य आणि रुढ अशा शर्तींच्या अधीन व सध्याच्या स्थितीत सदर मत्ता तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर ही अट पाळली गेली आहे असे मानण्यात येत आहे.

विक्रीकरिता धरुन ठेवलेल्या म्हणून वर्गीकृत केलेल्या चालू नसलेल्या मत्ता ह्या वहन रक्कमेपेक्षा खालच्या रकमेला आणि योग्य मूल्य वजा विक्रीसाठीचा खर्च ह्या मूल्यास मोजल्या जातात.

विक्रीकरीता धरुन ठेवलेल्या या रुपात वर्गीकृत केलेल्या मालमत्ता यंत्र आणि उपकरण आणि अमूर्त मत्तांचा घसारा काढला जात नाही. किंवा त्याच्या कर्जफेडीची तरतुद केली जात नाही.

### २.१२ भाडेपट्टा (भालेमा ११६)

जर मोबदल्याच्या देवाणघेवाणीत ठरावीक कालावधी करिता निश्चित मत्त्याच्या वापराच्या नियंत्रणाचा हक्क एखादे कंत्राट बहाल करत असेल तर ते कंत्राट किंवा त्यात अंतर्भाव आहे ते भाडेपट्टा असेल.

**भाडेपट्टादाराच्या रुपात कंपनी**

कंपनी कंत्राटाच्या भाडेपट्टा नसलेल्या घटकांपासून वेगळे असे भाडेपट्टा म्हणून कंत्राटाच्या अंतर्गत असलेला प्रत्येक भाडेपट्टा घटक लेखांकित करते आणि भाडेपट्टा घटकांच्या संबंधित स्वतंत्र किंमतीच्या आणि भाडेपट्टा नसलेल्या घटकांच्या एकत्रित स्वतंत्र किंमतीच्या आधारे प्रत्येक भाडेपट्टा घटकाला कंत्राटात मोबदल्याचे वाटप करते.

कंपनी भाडेपट्टा प्रारंभ दिनांकास भाडेपट्टा कालावधी करिता अंतर्निहित मत्त्याच्या वापराच्या तिच्या हक्काचे प्रतिनिधित्व करणारा मत्त्याच्या वापराचा हक्क मान्य करते. प्रारंभाच्या वेळी मोजलेल्या मत्त्याच्या वापराच्या हक्काची किंमत ही प्रारंभ दिनांकास किंवा त्याआधी केलेल्या कोणत्याही भाडेपट्टा प्रदानाकरिता कोणत्याही प्राप्त प्रोत्साहन रक्कम वजा करुन समायोजित केली जाते तसेच त्यात ज्या ठिकाणी अंतर्निहित मत्ता स्थित असेल ते ठिकाण

किंवा अंतर्निहित मत्ता पुनर्स्थापित करण्यासाठी किंवा अंतर्निहित मत्ता सुटे करणे आणि ती तिथून हलवणे यासाठी भाडेपट्टा धारकाने कोणताही प्रारंभिक खर्च किंवा होणाऱ्या खर्चाचा अंदाज यांची भर घातली जाईल. वापराचा हक्क असलेली मत्ता ही कोणताही साठलेला संचयित घसारा आणि असेल तर संचयित हानी नुकसान वजा करुन किंमतीस नंतर मोजली जाते आणि भाडेपट्टा दायित्वाच्या कोणत्याही मोजणीसाठी समायोजित केली जाते. वापराचा

हक्क असलेल्या मत्त्याचा घसारा हा कमी भाडेपट्टा कालावधी किंवा वापराच्या हक्काच्या मत्त्याच्या उपयुक्त आयुष्याकरिता प्रारंभाच्या दिनांकापासून सरळ रेषा पध्दत वापरुन काढला जातो. वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची अंदाजित उपयुक्त आयुर्मयादा ही मालमत्ता, कारखाना आणि उपकरण यांच्या अदाजित उपयुक्त आयुमर्यादेच्या धर्तीवरच निश्चित केली जाते. वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची वहन रक्कम वसूल होऊ शकत नाही असेकोणतेही लक्षण आढळले तर त्या मत्त्याच्या हानीची चाचणी घेतली जाते आणि हानीची नुकसान रक्कम, जर असेल तर, नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केली जाते.

कंपनी भाडेपट्टा दायित्वाची मोजणी ही भाडेपट्टा प्रारंभ दिनांकाच्या वेळी प्रदान न केलेल्या भाडेपट्टा प्रदानाच्या सध्याच्या मूल्यास करते. भाडेपट्टा प्रदाने ही भाडेपट्टयात निर्विवाद असलेल्या आणि लगेचच निश्चित केल्या जाऊ शकत असलेल्या व्याजदराचा वापर करून डिस्काउंट केली जातात. जर हा दर लगेचच निश्चित केला जाऊ शकत नसेल तर कंपनी तिच्या एआरआर आदेशात मानक कर्जांवर व्याज खर्चाच्या मान्यतेदरम्यान म.वी.नि.आ. ने मान्य केलेला १०.०४ टक्क्यांचा कर्जाचा दर वापरते. जवळपास अशीच वैशिष्ट्ये असलेल्या भाडेपट्टयांसाठी कंपनी प्रत्येक भाडेपट्टा निहाय त्या त्या भाडेपटट्यांसाठी म्हणून विनिर्दिष्ट असा वाढता कर्जाचा दर स्वीकारेल किंवा सूचीतील सर्व भाडेपटट्यांसाठी एक असा वाढता कर्जाचा दर स्वीकारेल

किंवा सूचीतील सर्व भाडेपटट्यांसाठी एक असा वाढता कर्जाचा दर स्वीकारेल. भाडेपट्टा दायित्व हे नंतरच्या काळात पुन्हा मोजले जाईल. त्याकरिता भाडेपट्टा दायित्वावरील व्याज प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कम वाढवून, भाडेपट्टा दायित्वावरील व्याज प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कम कमी करून, केलेली भाडेपट्टा प्रदाने प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कम कमी करून आणि कोणतेही पुनर्मूल्यनिर्धारण किंवा भाडेपट्टा सुधारणा प्रतिबिंबित करण्यासाठी किंवा सुधारित निश्चित भाडेपट्टा प्रदाने प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कमेची पुन्हा मोजणी करून भाडेपट्टा दायित्व पुन्हा मोजले जाईल.

सुधारणेच्या स्वरुपावर आधारित मत्त्याच्या वापराच्या हक्काच्या समायोजनाच्या रुपात आणि नफा व तोटा विवरणपत्रात समायोजनाच्या रुपात सुधारणीमुळे भाडेपट्टा दायित्वाच्या पुनर्मोजणीची रक्कम कंपनी मान्य करते. जिथे वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची वहन रक्कम ही कमी होऊन शून्य होते आणि भाडेपट्टा दायित्वाच्या मोजणीत आणखी घट झालेली असते तिथे कंपनी नफा व तोटा विवरणपत्रात पुनर्मोजणीची कोणतीही उर्वरित रक्कम मान्य करते.

कंपनीने १२ महिने किंवा कमी भाडेपट्टा मुदत असलेल्या सर्व मत्तांना आणि कमी मूल्य असलेली अंतर्निहित मत्ता ज्यांची आहे अशा भाडेपटट्यांकरिता भालेमा ११६ ची आवश्यकता लागू न करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या भाडेपटट्यांशी निगडित भाडेपट्टा प्रदानास भाडेपट्टा मुदतीकरिता सरळ रेषा धर्तीवर खर्च म्हणून मान्य केले आहे.

स्थित्यंतराच्या वेळी, कंपनी उर्वरित भाडेपट्टा प्रदानाच्या सध्याच्या मूल्यास मोजलेले भाडेपट्टा दायित्व मान्य करते. वापराचा हक्क असलेल्या मालमत्ता ह्या जसे काही भाडेपट्टा प्रारंभापासून मानक लागू केले आहे पण १ एप्रिल २०१९ ला असलेल्या पट्टेदाराचा वाढीव कर्जाचा दर वापरुन सूट दिलेला अशा रितीने सदर मालमत्तांच्या वहन रक्कमेस मान्य केलेल्या आहेत. कंपनीकडे अशा भाडेपट्या आहेत त्या भालेमा १७ लागू करुन वित्तीय भाडेपट्टा म्हणून वर्गीकृत केलेल्या होत्या. अशा भाडेपटट्यांकरिता वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची वहन रक्कम आणि भालेमा ११६ च्या प्रारंभिक लागू दिनांकास असलेले भाडेपट्टा दायित्व हे स्थित्यंतराच्या दिनांकास भालेमा १७ लागू करुन भाडेपट्टा मत्त्याची वहन रक्कम आणि मोजलेले भाडेपट्टा दायित्व असते.

**पट्टाकार म्हणून कंपनी**

भाडेपटट्यांच्या प्रारंभी कंपनी तिच्या प्रत्येक भाडेपटट्यांस एकतर परिचालनीय भाडेपट्टा किंवा वित्तीय भाडेपट्टा म्हणून वर्गीकृत करते. कंपनी परिचालनीय भाडेपटट्यांखालील प्राप्त झालेल्या भाडेपट्टा प्रदानास भाडेपट्टा कालावधीत सरळ रेषा धर्तीवर उत्पन्न म्हणून मान्य करते. वित्तीय भाडेपटट्यांच्या बाबत भाडेपटट्यांत पट्टाकाराच्या नक्त गुंतवणुकीवर परताव्याचा सातत्यपूर्ण नियतकालिक दर प्रतिबिंबित करणाऱ्या आकृतीबंधावर आधारित भाडेपट्टा कालावधीसाठीचे वित्तिय उत्पन्न म्हणून मान्य करते.

जर सदर व्यवस्थेत भाडेपट्टा आणि भाडेपट्टा नसलेले घटक समाविष्ट असतील तर कंत्राटातील मोबदल्याचे वाटप करण्यासाठी कंपनी भालेमा ११५ ग्राहकांशी कंत्राटातून उत्पन्न लागू करते.

कंपनीने भालेमा ११६ स्वीकृत केले आहे व १ एप्रिल २०१९ ला सुरु होणाऱ्या वार्षिक प्रतिवेदन

कालावधीपासून ते प्रभावी असेल आणि आपल्या भाडेपटट्यांना सुधारित भूतलक्षी पध्दतीने सदर मानक लागू केले आहे. त्यानुसार, कंपनीने तुलनात्मक माहिती पुनर्कथित केलेला नाही. कंपनीने केलेली भाडेपट्टा कंत्राटे ही मुख्यत्वे सामान्य स्वरुपात आपला व्यवसाय संचालित करण्यासाठी भाडेपटट्यांवर घेतलेल्या जमीन आणि इमारतींशी संबंधित आहेत. कंत्राटानुसार कंपनीची बदलत्या भाडेदराप्रती कोणतीही भाडेपट्टा बंधने आणि बांधिलकी नाही.

कंपनी ज्यात भाडेपट्टादार म्हणून वागते त्यात भालेमा ११६ भाडेपट्टाकरिता यास स्थित्यंतर करताना कोणतीही समायोजने करण्याची तिला आवश्यकता नाही. कंपनीने तिचे भाडेपट्टे हे प्रारंभिक लागू होण्याच्या दिनांकापासून भालेमा ११६ च्या अनुसार हिशोबात घेतले आहेत

**२.१३ वस्तुसुच्यां व्यतिरिक्त अवित्तीय मत्तां कमी करणे (भालेमा ३६)**

भा ले मा ३६ 'मत्तां कपात' मध्ये रोकड निर्मिती एककांना ताळेबंदाच्या दिनांकास ओळखले जाते. ताळेबंदाच्या दिनांकास जर हानीचे काही संकेत असतील आणि जर रोकड निर्मीती एककाची वहन रक्कम ही तिच्या वसूलयोग्य रक्कमेपेक्षा जास्त होत असेल (म्हणजेच योग्य मूल्यापेक्षा जास्त वजा विल्हेवाटीचा खर्च आणि वापरात असतानाचे मूल्य) तर हानी नुकसान मान्य केले जाते. वहन रक्कम ही वसूलयोग्य रक्कमेपर्यंत कमी केली जाते. आणि ही घट नफा आणि तोटा विवरणपत्रात हानी नुकसान म्हणून मान्य केली जाते. आधीच्या लेखांकन कालावधीत मान्य केलेल्या हानी नुकसान हे वसूलयोग्य रक्कमेच्या अंदाजात वाढ करण्याच्या मर्यादेपर्यंत उलट केले जाते. हानी मोजदादीनंतर हानी झालेल्या मत्तांच्या उर्वरित उपयुक्त आयुर्मानावर अशा मत्ताच्या सुधारित वहन मूल्यावर घसारा काढण्यात येतो.

**२.१४ वस्तुसुच्या (भालेमा २)**

वस्तूसुच्या ह्या खर्चापेक्षा कमी आणि नक्त वसूलयोग्य मूल्यास मूल्यांकित केल्या जातात. ज्या भारीत सरासरी पायावर आणि निव्वळ वसूल होणाऱ्या मूल्यावर निश्चित केल्या जातात.

वस्तुसुच्यांच्या खर्चात खरेदीचा खर्च आणि सदर वस्तूसूच्या सध्यांच्या ठिकाणी आणि स्थितीत आणण्यासाठी झालेला इतर खर्च समाविष्ठ असतात.

वस्तूसुच्या ह्या प्रथम आगमन प्रथम निर्गमन पध्दतीवर दिल्या जातात. टाकाऊ, कमी वापर होणारे आणि कामासाठी उपयुक्त नसणारे साठे हे साठयांच्या प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळी ओळखले जातात. आणि जिथे आवश्यक असेल तिथे अशा साठयांसाठी तरतूद करण्यात येते.

**२.१५ महसूल मान्यता (भालेमा ११५)**

महसूल हा प्राप्त झालेल्या किंवा वसूल होऊ शकणाऱ्या मोबदल्याच्या योग्य मूल्याला मोजण्यात येतो. महसूल म्हणून प्रकट केलेल्या रक्कमा ह्या प्राप्ती, व्यापार सूट , सवलती यांचा निव्वळ रक्कम असतात.

**पारेषण उत्पन्न**

वितरण अनुज्ञप्ती धारकांकडून प्राप्त झालेल्या वीजेच्या पारेषणातून मिळालेले उत्पन्न हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या मासिक राज्यांतर्गत पारेषण आदेशाच्या आधारे लेखांकित केले जाते.

खुला प्रवेश आकार एसएसडीसी आकार, पुन्हा वेळापत्रक आखण्याचे आकार यासारख्या परिचालनातून मिळणारा महसूल हा म वी नि आ आदेशानुसार मान्य केला जातो.

**लाभांश उत्पन्न**

जेव्हा प्रदान स्वीकार करण्याचा हक्क प्रस्थापित होतो. तेव्हा लाभांश उत्पन्न मान्य केले जाते.

**व्याज उत्पन्न**

व्याजाचे उत्पन्न हे उपार्जित तत्वावर लेखांकित केले जाते.

**भंगाराची विक्री**

भंगाराच्या विक्रीतून उत्पन्न हे प्रत्यक्ष वसूलीनंतर लेखांकित केले जाते.

**पर्यवेक्षण आकार**

थेट ग्राहक अशंदानातून प्राप्त झालेले पर्यवेक्षण आकार हे उत्पन्न जमा होण्याच्या वर्षात मान्य केले जाते.

**इतर उत्पन्न**

यास उपार्जन तत्वावर मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा असे उत्पन्न अनिश्चित असते तेव्हा अपवाद केला जातो.

**२.१६ कर्मचारी लाभ (भालेमा १९)**

**अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ :-**

अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ हे ज्या वर्षात संबंधित सेवा देण्यात आल्या त्या वर्षात नफा आणि तोटा विवरणपत्रात सूट न दिलेल्या रक्कमेला मान्य करण्यात येतात.

**इतर दीर्घकालीन कर्मचारी लाभ बंधने :-**

अर्जित रजा आणि आजारपणाच्या रजांची दायित्वे जी १२ महिन्यांच्या आत संपूर्णपणे चुकती करणे अपेक्षीत नसतात त्यांची अपेक्षित भविष्यकालीन प्रदानांचे सध्यांचे मूल्य या रुपात मोजणी करण्यात येते जी विमा गणिती शास्त्र मूल्यांकनावर आधारलेल्या प्रक्षेपित एकक क्रेडिट पध्दतीचा वापर करुन प्रतिवेदनाच्या कालावधीच्या शेवटी कर्मचाऱ्यांनी पुरवलेल्या सेवांच्या संदर्भात करावयाची आहेत.

हे लाभ प्रतिवेदन कालावधीच्या शेवटी कॉर्पोरेट बंधपत्रांचे उत्पन्न वापरुन कमी किंमतीला नोंदवले जातात. ह्या बंधपत्रांचा कालावधी हा संबंधित बंधनाच्या कालावधीच्या जवळ पास समान असतो. अनुभव समायोजन आणि विमागणित गृहीतकांतील बदलाचा परिणाम म्हणून पुर्नमोजणी ही नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य करण्यात येते.

**नोकरीनंतरचे लाभ :**

कंपनी खालील नोकरीनंतरचे लाभ योजना परिचालित करते.

१) उपदानासारख्या व्याख्यांकित लाभ योजना आणि

२) भविष्य निर्वाह निधीसारख्या व्याख्यांकित अशंदान योजना

**व्याख्यांकित लाभ योजना :-**

उपदानासारख्या व्याख्यांकित कर्मचारी लाभांप्रति दायित्वे ही प्रक्षेपित एकक क्रेडिट पध्दत वापरुन वर्षाच्या शेवटी स्वतंत्र विमा गणितीदवारे विमागणितीय मूल्याकनांवर निश्चित केली जातात.

व्याख्यांकित लाभ बंधनांचे सध्याचे मूल्य हे संबंधित बंधनांच्या कालावधीच्या समान कालावधी असणाऱ्या शासकीय बंधपत्रांच्या प्रतिवेदनाच्या कालावधीच्या शेवटी बाजार उत्पन्नाचा संदर्भ घेऊन अंदाजित भविष्यातील रोख बाह्यप्रवाहास सवलत देऊ निश्चित करण्यात येते अनुभव समायोजन आणि विमागणितीय गृहितकांतील बदलातून उद्भवणारे पुर्नमोजदाद लाभ आणि हानी हे इतर सर्वसमावेशक उत्पन्नात थेटपणे, ज्या कालावधीत घडतात त्याच कालावधीत मान्य केले जातात. ते समभागातील बदलाचे विवरणपत्रात आणि ताळेबंदात राखून ठेवलेले उत्पन्न याखाली समाविष्ट आहेत.

**व्याख्यांकित अंशदान योजना –**

भविष्य निर्वाह निधीसारख्या व्याख्यांकित अंशदान योजना ह्या जशा ओढवतील तशा नफा आणि तोटा विवरणपत्रात खर्ची टाकल्या जातात. तसेच विशिष्ट कर्मचाऱ्याकरिता भविष्य निर्वाह निधीसाठीचे मासिक अशंदान हे स्वतंत्र ट्रस्टला केले जाते. जे गटातील इतर कंपन्याचा निधी सुध्दा व्यावस्थापित करते. ट्रस्टद्वारे देय व्याजाचा किमान दर हा शासनाने अधिसूचित केलेल्या दराशी सुसंगत असतो. काही तूट उद्भावली तर ती भरुन काढण्याचे कंपनीवर बंधन आहे.

**२.१७ परकीय चलन व्यवहार (भालेमा २१)**

**१) कार्यात्मक आणि सादरीकरण चलन**

वित्तीय विवरणपत्रे भारतीय रुपयांमध्ये सादर करण्यात आली आहेत जे कंपनीचे कार्यात्मक आणि सादरीकरण चलन आहे.

**२) व्यवहार आणि शिल्लक**

परकीय चलनातील व्यवहार हे व्यवहाराच्या दिनांकास प्रचलित विनिमय दरास मान्य करण्यात येतात. परकीय चलन व्यवहार पूर्ण झाल्यानंतर मिळालेल्या नफा किंवा झालेले नुकसान हे नफा आणि तोटा विवरण पत्रात मान्य केले जातात.

आर्थिक परकीय चलन मत्ता आणि दायित्वे ही वर्षाच्या शेवटीच्या चलन दरांना रुपांतरित केली जातात आणि परिणाम स्वरुपी चलन फरक हे नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केले जातात.

**२.१८ सहयोगी आणि संयुक्त साहसात गुंतवणूक (भालेमा २७)**

ही भालेमा २७ नुसार किमतीला ओढून घेतली आहे. ह्या किंमतीत गुंतवणूक संपादित करण्यासाठी प्रदान केलेली किंमत आणि थेट बहाल करण्यात योग्य खर्च यांचा समावेश आहे.

**२.१९ अ) शासकीय अनुदान (भालेमा २०)**

शासनाकडून प्राप्त अनुदाने ही त्यांच्या योग्य मूल्यास मान्य केली आहेत. व इथे अनुदान प्राप्त होईल आणि कंपनी सर्वजोडलेल्या अटीची पूर्तता करेल असे उचित आश्वासन आहे.

जेव्हा एखादे अनुदान खर्चाच्या एखाद्या बाबीशी संबंधीत असेल जेव्हा संबंधित खर्च ज्या कालावधीसाठी भरपाई देण्याच्या हेतूने खर्ची टाकला जातो.

त्या कालावधीवर सदर बाब ही शास्त्रोक्त पध्दतीने नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केली जाते. मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यांच्या खरेदीशी संबंधित शासकीय अनुदाने ही स्थगित उत्पन्न या रुपात चालू नसलेलया दायित्वात समाविष्ट केली जातात. आणि संबंधित मत्तेच्या अपेक्षित आयुर्मानावर सरळ रेषा पध्दतीने नफा आणि तोटा विवरणपत्रात जमा केली जातात.

**ब) महाराष्ट्र विद्युत विभाग अभिकरण (मेडा) प्रकल्पांचे लेखाकंन:-**

अपारंपरिक स्त्रोताकडून विद्युत निर्मितीला प्रोत्साहन देण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार खाजगी विकासकांनी विकास केलेल्या अशा विद्युत निष्कासन प्रकल्पांचा ५० टक्के खर्च कंपनी करेल आणि उर्वरित ५० टक्के खर्चाचा मेडा विकासकांना परतावा येईल.

**क) ओआरसी कामांसमोर (ओआरसी योजना) ग्राहकांकडून प्राप्त अंशदानांचे लेखांकन**

प्राप्त झालेल्या आऊटराईट ग्राहक अंशदानांना खालीलप्रमाणे वागवण्यात येत आहे.

१) स्थिर मत्तांच्या निर्मिती करिता करावयाच्या खर्चाकरिता जर खर्चाच्याआधीचअग्रीम प्राप्त झाला असेल तर त्या स्थिर मत्तांची निर्मिती पूर्ण होईपर्यंत त्यास चालू नसलेले दायित्व म्हणून मानण्यात येत आहे.

२) जर फक्त पर्यवेक्षण आकार म्हणून अंशदान प्राप्त झाले असेल तर प्राप्त झालेल्या वर्षात त्यास इतर उत्पन्न म्हणून मान्य करण्यात येत आहे.

३) जर आधीच निर्माण केलेल्या मत्त्याकरिता अंशदान प्राप्त झाले असेल तर त्यास प्राप्त झालेल्या वर्षात सदर मत्ता नुसार कमी करण्यात येते.

**२.२० तरतुदी आणि आकस्मिक दायित्वे (भालेमा ३७)**

**बी) तरतुदी –**

कंपनीला जेव्हा भूतकाळातील घटनेचा परिणाम म्हणून चालू बंधन कायदेशीर किंवा संरचनात्मक असते. तेव्हा हे बंधन भागवण्यासाठी आर्थिक लाभ समाविष्ट करणारे संसाधनाचे बाह्य प्रवाह आवश्यक असतील आणि बंधनाच्या रक्कमेतून एक विश्वासाई अंदाज काढला जाऊ शकतो अशा वेळी तरतुदी मान्य केल्या जातात. जर रक्कमेच्या समय मूल्याचा परिणाम प्रत्यक्ष असेल तर तरतुदीना सवलत दिली जाते. सवलत प्रगट करणे हे नफा आणि तोटा विवरणपत्रात वित्तीय खर्च म्हणून मान्य केला आहे. ताळेबंदाच्या प्रत्येक दिनांकास तरतुदींचे पुनर्विलोकन केले जाते. आणि सध्यांचे सर्वोत्तम अंदाज प्रतिबिबिंत करण्यासाठी समायोजित केले जातात.

**सी) आकस्मिकता :**

| महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. (MTCIL) | भारत | भाडेपट्टावर ऑप्टिकल फायबर क्षमता उपलब्ध करणे | मुंबई | ४९.००% | ३५.०२% |

अस्तीत्वात असलेल्या वरील संस्था (सहयोगी कंपन्या)यांचे भाग भांडवल संपूर्णपणे समभाग (इक्वीटी शेअर्स) याद्वारे खरेदिकेले आहे त्याच्या मालकीच्या हित संबंधाचे प्रमाण हे धारण केलेल्या मतदानाच्या हक्काच्या प्रमाणा इतके समान आहे. कंपनीने वरील सहयोगी कंपन्यासोबत करार केलेला आहे. त्यानुसार कंपनीने सहमती दिल्याशिवाय या सहयोगी कंपन्याना नफ्याचे वाटप करता येणार नाही. कंपनीला अहवालाच्या तारखेला अशी समंत्ती पूर्व दृष्टीने देण्याची आवश्यकता वाटली नाही.

**प्राधान्य समभाग**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. (MTCIL) | भाडेपट्टावर ऑप्टिकल फायबर क्षमता उपलब्ध करणे | मुंबई | ०.००% | १००.००% |

या वर्षी कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (MSETCL) संबंधित प्राधान्याचे शेअर्स यांची रोख रकमेच्या साठी विचारा प्रतिपूर्ती केली आहे. कंपनीने एक हक्काचा (राईट्स) इशू वितरीत केला त्यामुळे महापारेषण /(MSETCL) मधे कंपनीची भागधारणा वाढली.

## टीप ३८ ब. सहयोगी कंपन्यांचा समुर्दियन / एकत्रित वित्तीय माहितीचा सारांश खाली दिला असून तो व्यक्तिगत रित्या महत्वाचा नाही.

(रू. लाखात)

| सहयोगी | जयगड पॉवर ट्रान्सको लिमिटेड | | महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. | |
|---|---|---|---|---|
| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता |
| समभागांमध्ये गुंतवणूकीची वहन रक्कम | ३,५७५.०० | ३,५७५.०० | १,७६०.९२ | ८८०.४६ |
| प्राधान्य समभागातील गुंतवणूकीची वहन रक्कम | | | - | ८८०.४६ |
| परिचालनाचा चालू ठेवण्यातून नफा किंवा तोट्यात कंपनीचा हिस्सा | ८३८.६६ | ८५२.९५ | १,५४८.१२ | ७५६.५७ |
| इतर सर्वसमावेशन उत्पन्नात कंपनीचा हिस्सा | (०.३१) | ०.२२ | - | - |
| **एकूण सर्वसमावेशन उत्पन्नात कंपनीचा हिस्सा** | ८३८.३५ | ८५३.१७ | १,५४८.१२ | ७५६.५७ |

(रू. लाखात)

| तपशील | ३१.०३.२०२४ रोजी | ३१.०३.२०२३ रोजी |
|---|---|---|
| ह्या सहयोगींमध्ये कंपनीच्या हिश्याची एकत्रीत वहन रक्कम | ५,३३५.९२ | ५,३३५.९२ |
| ह्या सहयोगींमध्ये कंपनीच्या हिश्शाची वहन रक्कम | ५,३३५.९२ | ५,३३५.९२ |

## टीप ३९

## सुरक्षा ठेवीच्या रुपात गहाण टाकलेल्या / तारण ठेवलेल्या मत्ता

चालू तसेच चालू नसलेल्या कर्जे-उसनवारी यासाठी गहाण / तारण म्हणून ठेवलेल्या मत्ताचे वहन मुल्य. (Carrying Value) **(रू. लाखात)**

| तपशील | ३१.०३.२०२४ रोजी | ३१.०३.२०२३ रोजी |
|---|---|---|
| **चालू नसलेल्या कर्जासाठी निर्माण केलेल्य प्रतिभुती**<br>मालमत्ता, कारखाना व साधने (भाडेपट्टाच्या जमीन वगळून) | १५,३१,७८२ | १५,३१,७८२ |
| **चालू कर्जासाठी निर्माण केलेल्य प्रतिभुती**<br>१) स्थिर मुदतीच्या पावत्या<br>२) पूढील तारीख असलेले धनादेश | २०,०००<br>- | २०,७३०<br>- |
| **सुरक्षा एकूण मत्ता** | १५,५१,७८२ | १५,५२,५१२ |

## टीप ४० भांडवल व्यवस्थापन

कंपनीच्या भांडवल व्यवस्थापनाच्या हेतूसाठी, भांडवल मध्ये भांडवलीकरण करुनटाकलेले व दिलेले समभाग, आणि समभाग धारकांश्री संबंधित समभाग राखीव यांचा समावेश होतो. कंपनीच्या भांडवल व्यवस्थापनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे भाग धारकाचे यासाठीची पात्रता वृध्दिंगत करणे हे असते.

कंपनीने तिच्या भागधारकांना कोणताही लाभांश वितरीत केलेला नाही. कंपनी तिच्या गिअरींग रिडिओ यांचे संनियंत्रण करते. गिअरींग रेडिओ म्हणजे कंपनीचे एकून कर्ज आणि कंपनीच्या एकूण वित्तीय रचना म्हणजे समभाग आणि कर्जे यांचे गुणोत्तर लक्ष ठेवते. एकूण कर्जाची व्याख्या म्हणजे दीर्घ मुदतीची कर्जे अल्प मुदतीच्या उसनवारी आणि दीर्घ मुदतीची कर्जाची सध्यस्थितीत होणारी परिपक्वता याचे एकत्रीकरण करणे. कंपनी तिची भांडवली रचनेचे व्यवस्थापन करते आणि आर्थिक स्थितीतील बदलाचे संदर्भात तसेच मत्तांचा जोखीमा विचारात घेऊन भांडवली रचनेत समायोजन करते. **(रू. लाखात)**

| तपशील | ३१.०३.२०२४ रोजी | ३१.०३.२०२३ रोजी |
|---|---|---|
| समभाग | १५,९२,६४४.३१ | १४,२६,०३७.८५ |
| एकूण समभाग | १५,९२,६४४.३१ | १४,२६,०३७.८५ |
| कर्जे-उसनवारी | ४,०३,५३६.४० | ४,८३,६५१.७७ |
| वजा रोख व रोख समतुल्य | (१२,३०३.४९) | (४१,७०७.२०) |
| एकूण कर्जे | ३,९१,२३२.९१ | ४,४१,९४४.५७ |
| एकंदर वित्त पुरवठा (ओवरॉल फायनान्सींग) | १९,८३,८७७.२२ | १८,६७,९८२.४२ |
| निव्वळ - कर्ज व समभाग यांचे गुणेत्तर | ०.२५ | ०.३१ |

उपरोक्त सर्व उद्दिष्टांसाठी कंपनीचे वित्तीय व्यवस्थापन इतर बाबीं समवेत, तिचा विीय करारांतील गंभीर घटक सिध्य करण्याकडे लक्ष देते. याकरिता भांडवल रचनेची व्याख्या पूर्तीसाठी आवश्यक असणारी भांडवल रचनेतील व्याज देय असलेली कर्जे उसनवारी संलग्न असतात. वित्तीय करारातील गंभीर अटींचा भंग झाला तर त्यामुळे बँकांना त्यांची कर्जे व उसनवारी तात्काळ परत मागण्याची परवानगी मिळते. विद्यमान काळात वंपनीने कोणत्याही व्याज असलेल्या वित्तीय करारातील कर्जे व उसनवारी यांचा गंभीर अटींचा भंग केला नाही.

दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षात भांडवल व्यवस्थापनाची उद्दिष्टे धोरणे किंवा प्रक्रीया यामध्ये कोणतेही बदल केलेले नव्हते.

## टीप ४१ इतर नोट्स

### ४१.१ आकस्मिक राखीव निधी, विशेष राखीव निधी आणि भार प्रेषण केंद्र सबलीकरण राखीव निधी (LDCD Fund)

एमईआरसीच्या निर्देशानुसार ३१ मार्च २०२३ आदेश क्रमांक २३२ नुसार कंपनीने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी आकस्मिक राखीव निधीसाठी ७,७०७.०० लाख रुपये (मागील वर्षी ७,३२३.०० लाख रुपये ) ची रक्कम विनियोजीत केली आहे.

विशेष राखीव निधिसाठी शून्य रुपये (मागील वर्ष शून्य रुपये) ची तरतूद करण्यात आली आहे.

लोड डिस्पॅच सेंटर एम्पॉवरमेंट रिझर्व्ह (एलडीसीडी) फंडातून शून्य रुपये (मागील वर्ष शून्य रुपये) रक्कम काढण्यात आली आहे.

## टीप ४१.२ सुरक्षित कर्ज

(रू. लाखात)

| सुरक्षित कर्ज | | | | |
|---|---|---|---|---|
| संस्थेचे नाव | राज्य सरकार पासून हमी | भविष्यातील मत्तांचे तारण | गहाण विद्यमान मालमत्ता | एकुण |
| रुरल इलेकट्रीक कॉरपोरेशन लिमीटेड (REC) | निरंक | २,२७,३७६.११ | | २,२७,३७६.११ |
| पॉवर फायनांस कॉरपोरेशन लिमीटेड (PFC) | निरंक | ४१,३६५.०० | | ४१,३६५.०० |
| आय सी आय सी आय बँक | निरंक | १०,८६२.५७ | | १०,८६२.५७ |
| कॅनरा बँक | निरंक | १०,१९१.४८ | | १०,१९१.४८ |
| बँक ऑफ इंडीया -१ | निरंक | १,९६१.८९ | | १,९६१.८९ |
| बँक ऑफ इंडीया -२ | निरंक | २४,३६२.५६ | | २४,३६२.५६ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | निरंक | ५०,०१६.७९ | | ५०,०१६.७९ |
| बँक ऑफ इंडीया -३ | निरंक | १९,४७४.५४ | | १९,४७४.५४ |
| व्याज मुक्त GoM कर्ज | १२,०००.०० | - | - | - |

## दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या दायित्वाच्या परतफेडीची अनुसुची

| तपशील | ग्रामीण विद्युती करण महामंडळ | वीज वित्त महामंडळ | बँक ऑफ इंडिया-१ | बँक ऑफ इंडिया-२ | बँक ऑफ इंडिया-३ | कॅनरा बँक | व्यजमुक्त GoM कर्ज | केएफडब्ल्यू | बँक ऑफ महाराष्ट्र | ICICI बँक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्जाचे स्वरुप | मुदतीचे कर्जे | मुदतीचे कर्जे | मुदतीचे कर्जे | मुदतीचे कर्जे | मुदतीचे कर्जे | मुदतीचे कर्जे | विशेष सहाय्य | मुदतीचे कर्जे | मुदतीचे कर्जे | मुदतीचे कर्जे |
| कर्जाचे रक्कम | उसनवारीच्या मर्यादेपर्यत रु. ५,६९,४०० लाख | उसनवारीच्या मर्यादेपर्यत रु.३,९७,६०० लाख | रु.३०,००० लाख | रु.७५,००० लाख | रु.५०,००० लाख | रु.५०,००० लाख | रु १२,००० लाख | रु. १०,२५० लाख (१२.०० दशलक्ष युरो) | रु.१,२०,००० लाख | रु.५०,००० लाख |
| कालावधी (मुदत) | १३ वर्षे (३+१०) | १८ वर्षे (३+१५) | १३ वर्षे (३+१०) | १३ वर्षे (३+१०) | १३ वर्षे (३+१०) | १३ वर्षे (३+१०) | ५० वर्षे | १५ वर्षे (५+१०) | १३ वर्षे (३+१०) | ६.५ वर्षे |
| विलंबावधी | ३ वर्षे | ३ वर्षे | ३ वर्षे | ३ वर्षे | ३ वर्षे | ३ वर्षे | – | ५ वर्षे | ३ वर्षे | Nill |
| परत फेड | परत फेड चालू आहे. | परत फेड चालू आहे. | परत फेड चालू आहे. | परत फेड चालू आहे. | परत फेड चालू आहे. | परत फेड चालू आहे. | – | परत फेड चालू आहे. | परत फेड चालू आहे. | परत फेड चालू आहे. |
| वापराचा हेतू | भांडवली खर्च निधी | भांडवली खर्च निधी | भांडवली खर्च निधी | भांडवली खर्च निधी | भांडवली खर्च निधी | भांडवली खर्च निधी | भांडवली खर्च निधी | भांडवली खर्च निधी | कर्जाची पुर्नरचना | कर्जाची पुर्नरचना |
| वर्षाच्या शेवटी व्याजाचा दर (तरंगता) | १०.०० टक्के | १०.०० टक्के | ८.२८ टक्के | ८.८० टक्के | ८.४० टक्के | ८.७० टक्के | – | १.२७ टक्के | ८.४० टक्के | ९.५० टक्के |
| | | | वार्षिक रिसेट सह | मासिक रिसेट सह | मासिक रिसेट सह | वार्षिक रिसेट सह | – | | वार्षिक रिसेट सह | त्रैमासिक रिसेट सह |
| भरणा करण्याची पध्दत | वार्षिक | त्रैमासिक | २० सहामाही | ४० त्रैमासिक हप्ते | ४० त्रैमासिक हप्ते | ४० त्रैमासिक हप्ते | – | अर्ध वार्षिक | मासिक | मासिक, त्रैमासिक, वार्षिक |
| अग्रिम शुल्क | ५०० कोटी पर्यंत निरंक रुपये ५०० कोटीच्या वर कर्जाच्या रक्कमेवर ०.०१ टक्के | ५०० कोटी पर्यंत निरंक ५०० कोटी चे वर कर्जाच्या रक्कमेवर ०.०१ टक्के | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| बांधिलकी शुल्क | ५०० कोटी पर्यंत निरंक रुपये ५०० कोटीच्यावर ०.२५ टक्के दसादशे दराने त्या त्रैमासिकातील न उचललेली रक्कम ते सदरची रक्कम उचलण्याच्या दिनांकापर्यंत | ५०० कोटी पर्यंत निरंक रुपये ५०० कोटीच्यावर ०.२५ टक्के दसादशे दराने त्या त्रैमासिकातील न उचललेली रक्कमेवर ते त्यानंतरच्या त्रैमासिकाच्या पहिल्या दिनांकापासून ते सदरची रक्कम उचलण्याच्या दिनांकापर्यंत | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | ०.२०% वितरीत नकेलेली रक्कम | निरंक | निरंक |
| कमीत कमी आवश्यक रक्कम (समभाग) ०१.०४.२०१७ पासून | २५.०० % | २५.००% | २५.०० % | २५.०० % | २५.०० % | २५.०० % | निरंक | २० % | निरंक | निरंक |

### परकीय चलनातील कर्जे

| प्रतिभूत केलेले कर्जे | के एफ डब्ल्यु ( रु. लाखात ) | (युरो दशलक्ष मध्ये) |
|---|---|---|
| केंद्र शासनाची हमी | ५,९२२.४० | ६.५५ |

## टिप्पणी क्र ४२ - आकस्मिक दायित्वे आणि आकस्मिक मत्ता

**१) कंपनीच्या विरुद्ध दावे जे खालील बाबींच्या संदर्भात ऋण म्हणून अभिस्वीकृत केलेले नाहीत.**

**अ) भांडवली कामे**

आमच्या प्रकल्पांकरिता उपकरणांचा पुरवठा आणि प्रतिष्ठापना तसेच कामांची अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदारांपैकी काहींनी श्एर्ई व अन्य कायद्यांखाली कंत्राट किंमतीमध्ये वाढ, किंमत वाढीसोबत कामाच्या वेळापत्रकात सुधारणा कामाच्या वाढीव कालावधीकरिता नुकसानभरपाई, निष्क्रीय कालावधी आकार, उशीरा केलेल्या प्रदानावर व्याज या बाबींकरिता कंपनीवर दावे लावले आहेत. सदर दावे संबंधित कंत्राटांच्या तरतुदींच्या संदर्भात स्वीकाराई नसल्यामुळे ते कंपनी लढवत आहेत. सदर दाव्यांचे निराकरण करण्यासाठी कंत्राटात उपलब्ध असलेल्या विवाद निराकरण यंत्रणेखालील विविध पर्यायांचा कंपनी पाठपुरावा करत आहे. सदर प्रकरणांमध्ये रु.१७,५३७.८२ लाखांचे (मागील वर्षी ४०,८२४.७४ लाख) आकस्मिक दायित्व अंदाजित करण्यात आले आहे.

**२) जमीन / पीक नुकसानभरपाई आणि नुकसानभरपाई प्रकरणांमध्ये वाढ**

प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनींच्या बाबत, संबंधित जमीन धारकांनी विविध प्राधिकारी / न्यायालयांमध्ये उच्च नुकसानभरपाईचे दावे दाखल केले आहेत ज्यांचा अद्याप निकाल लागायचा आहे. अशा प्रकरणांमध्ये रु.११,६७१.५१ लाखांचे ( मागील वर्षी २२,०५१.१५ लाख) आकस्मिक दायित्व अंदाजित करण्यात आले आहे.

**३) इतर दावे :-**

इमारत बांधकाम परवानगी शुल्क, कृषिक जमिनीचे अकृषिक वापरासाठी बदल करण्यासाठी शास्ती नाला कर, पाणी वापर मोबदला इत्यादीसाठी विविध राज्य / केंद्र शासकीय विभाग / प्राधिकारी आणि अन्य यांनी केलेल्या दाव्यांच्या संदर्भात रु.११,२२३.६६ लाखांचे (मागील वर्षी ११,२२८.३६ लाख) आकस्मिक दायित्व अंदाजित करण्यात आले आहे.

**४) विवादातील आयकर / विक्रीकर / अबकारी कर / नगरपालिका कर प्रकरणे**

विवादातील आयकर / विक्रीकर / अबकारी कर / नगरपालिका कर प्रकरणे रु.२,२९,८८९.०७ लाख (मागील वर्षी ७५,९४३.९३ लाख) इतक्या रक्कमेची विवादातील आयकर / विक्रीकर / अबकारी कर / नगरपालिका कर प्रकरणे ही विविध अपिलेट प्राधिकाऱ्यांसमोर लढवली जात आहेत.

**५) वित्तीय हमी**

महापारेषणने पारेषण उपकेंद्रे आणि पारेषण लाईन्सच्या बांधकामाकरिता विविध प्राधिकरणांना रु.३२.९५ लाख (मागील वर्षी ३२.९५ लाख) इतक्या रक्कमेच्या बँक हमीच्या रुपात वित्तीय हमी पुरवली आहे.

**६) इतर -**

अ) कर्मचाऱ्यांच्या दाव्यांशी निगडित इतर आकास्मिक दायित्व हे रु.२११.४७ लाख (मागील वर्षी रु.३०५.११ लाख) इतक्या रक्कमेचे आहे.

ब)काही लाभार्थ्यांनी म वी नि आ च्या वीज दर आदेशांविरुद्ध अपिले दाखल केली आहेत. या संदर्भातील आकस्मिक दायित्वाची रक्कम रु.३,१७,०९२.८३ लाख (मागील वर्षी रु.३,२६,६९९.९१ लाख) इतक्या रक्कमेचे आहे.

## टीप - ४३ - भांडवली बांधिलकी

प्रतिवेदन कालावधीच्या शेवटी कंत्राटासाठी घेतलेली परंतु दायित्व म्हणून मान्य न केलेला भांडवली खर्च खालीलप्रमाणे आहे.

(रू. लाखात)

| अ | भांडवली बांधिलकी दायित्वे म्हणुन ओळखली जात नाही | ३१/०३/२०२४ | ३१/०३/२०२३ |
|---|---|---|---|
| | मालमत्ता, यंत्र आणि उपकरण | ६,५७,१७०.८९ | ५,१९,९५९.०१ |
| | वजा-भांडवली अग्रिमे | (१,१०७) | (६०२) |
| | **निव्वळ भांडवली बांधिलकी** | **६,५६,०६४.१३** | **५,१९,३५६.८८** |

(रू. लाखात)

| ब | कंपनीची सामाजिक बांधिलकी | ३१/०३/२०२४ | ३१/०३/२०२३ |
|---|---|---|---|
| | **खर्च न झालेले सीएसआर दायित्वे** | ८,७८०.०० | ८,३१२.१९ |

## टीप ४४

व्यापार प्राप्य रक्कमा, वित्तीयमत्ता - कर्जे आणि आग्रिमे यांच्या शिलकी ह्या पुष्टी आणि मेळ घेणे, जर असतील तर, त्यांच्या अधीन असतील. कंपनी ह्या शिलकींची पुष्टी आणि मेळ घेण्यासाठी आवश्यक पावले उचलत आहे.

## टीप ४५

कंपनी तिच्या धनकोंना सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग कायदा २००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सामान्यत: ४५ दिवसांच्या कालावधीत प्रदाने करते. कंपनी उपरोल्लिखित कायद्यात व्याख्या केल्यानुसार सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना निश्चित करण्याच्या प्रक्रियेत आहे. त्यामुळे संबंधित प्रगटन करण्यात आलेले नाही. कंपनीने सदर माहितीच्या अभावी अपरोक्त कायद्याने आवश्यक असल्यानुसार सूक्ष्म आणि लघु उद्योगांना कोणतेही व्याज दिलेले नाही.

**टीप ४६**

या कंपनी समुहाची येणी आणि देणी निश्चित होण्याच्या तसेच मेळ करण्याच्या अधीन आहेत. या बाबीमधे त्यांचे इतर गोष्टींसोबत केलेले समायोजन समाविष्ट आहे. त्यात अंतर-कंपनी (इंटर युनीट) व्यवहाराची बाकी रु. २२,६९७.२६ लाख दीर्घ काळापासून प्रलंबित आहे. वि. वर्ष २०१७-१८ पर्यंतचे रु. १९,६७९.५३ लाख आणि २०१९-२० पर्यंतचे रु. ३२४.२९ लाख एवढी येणी (रिसिव्हेबल्स) आहेत. तर २०१७-१८ पर्यंतची रु. ४०,८६३.०३ लाख आणि वि. वर्ष २०१९-२० पर्यंतची रु. १,८३८.०५ लाख अशी देणी (पेयेबल्स) आहेत. म्हणजे निव्वळ देणे रु २२,६९७.२६ लाख आहेत. ही बाब महावितरण (एम एस डी सी एल) कंपनीकडील आहे तिचे पारेषण आकाराचे वि. वर्ष २०१७-१८ चे येणे रु. २१,१८३.५० आणि वि. वर्ष २०१९-२० येणे रु. १,५१३.७६ लाख आहेत

**टीप ४७**

भालेमा ३६ नुसार मतांची हानी- कंपनीच्या रोकड निर्मिती एककांच्या मूल्यांकनाद्वारा कंपनीच्या पारेषण कार्यासाठीच्या मत्तांचे हानी विश्लेषण हे सन २००६-०७ मध्ये बाह्य एजन्सीद्वारे करण्यात आले आणि वहन रकमेपेक्षा प्राप्य रक्कम जास्त असल्यामुळे कोणतेही हानी, नुकसान मान्य केले गेले नव्हते. चालू वर्षी हानीचे कोणतेही चिन्ह नाही ज्यासाठी मतांच्या वसूल होणाऱ्या रकमेचा पुर्नअंदाज आवश्यक आहे.

**टीप ४८**

महापारेषण इतर उत्पन्नाला उपार्जित तत्वावर मान्य करण्याविषयी आपले लेखांकन धोरण सातत्याने अनुसरत आहे. अपवाद टिप्पणी क्र. २.१५ मध्ये दर्शविल्यानुसार जिथे अशा उत्पन्नाची अंतिम वसुली अनिश्चित असते अशा बाबी आहेत व हे लागू असलेल्या लेखांकन मानकांशी सुसंगत आहे. तसेही इतर उत्पन्नाचा भाग असलेले विलंब प्रदान शुल्क (डीपीसी) हे फक्त वसूल होऊ शकणाऱ्या रकमेच्या मर्यादेपर्यंतच मान्य केले जाते. याप्रकारे हे धोरण अंगीकारुन प्रत्येक वित्तीय वर्षाचे लेखे अंतिम करण्यात आले आहेत जे एमवायटी विनियम २०१९ (वि.व. २०२४-२५ पर्यंत लागू) च्या कलम ३७.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मवीनिमंने केलेल्या वास्तविक (तात्पुरते/अंतिम) लेखा तत्त्वावर आधारलेले आहे.

मवीनिमंने प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता लेख्यांवर आधारलेले वास्तविक लेखे केले आहेत आणि विलंब प्रदान शुल्काची रक्कम वि.व. २०१४-१५ च्या वास्तविक लेखापर्यंत समायोजित केलेली नाही कारण त्या रक्कमा लेख्यांमध्ये लेखांकित केलेल्या नव्हत्या. मात्र, मवीनिमंने वि. व. २०१५-१६ करिता तात्पुरते वास्तविक लेखा करत असताना वि.व. २०१५-१६ सह आधीच्या वित्तीय वर्षांशी संबंधित विलंब प्रदान शुल्काप्रती असलेली रु. ८५,४९९.०० लाख इतक्या रकमेने A.R.R.कमी केले जी लेखांकन धोरणानुसार लेख्यांमध्ये लेखांकित करण्यात आली नव्हती. या समायोजनाशिवाय महापारेषण हे आपल्या रु. ३,९४,४३७.०० लाखाच्या वैध A.R.R.करिता हक्कदार आहे जे मराविमंच्या प्रकरण ३१/२०१६ च्या दि. ७ जुलै २०१६ च्या आदेशातून स्पष्ट होत आहे. वि.व. २०१६-१७ मध्ये उपार्जित झालेल्या ह्या हक्कदार A.R.R.ला अनुरुप लेखांकनासाठी महापारेषणने A.R.R.मध्ये तूट या रुपात इतर उत्पन्न म्हणून रु. ७५,४७६.११ लाख रक्कम लेखांकित केली आहे जे वि.व. २०१६-१७ मध्ये विलंब प्रदान शुल्कापोटी समायोजन म्हणून परिणामित झाले आहे. याचबरोबर महापारेषणने अपील क्र. ६७/२०१७ नुसार प्रकरण क्र. ३१/२०१६ मध्ये मवीनिमंच्या आदेशाविरुद्ध APTEL समोर अपील दाखल केले आहे.

वरील समायोजन विचारात घेऊन ३१ मार्च २०२४ रोजी संचित झालेली रु. २,६१,५२४ लाख इतकी विलंब प्रदान शुल्काची रक्कम ही अनुसरलेल्या सातत्यपूर्ण लेखांकन धोरणानुसार लेखांकित करण्यात आलेली नाही.

**टिपा क्र. ४९**

कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १३५ नुसार जेव्हा कंपनी सी एम आर ला पात्र होणाऱ्या पायरीवर येते, तेव्हा तिला तिच्या अगदी मागील तीन वित्तीय वर्षातील सरासरी नफ्याच्या निव्वळ दोन टक्के (२%) रक्कम कंपनीच्या सामाजिक जबाबदारीच्या कामांवर खर्च करणे आवश्यक असते. सी एस आर च्या कार्याची क्षेत्रे येथे खाली तक्त्यात दिलेली आहेत. अधिनियमातील तरतुदीनुसार कंपनीने एफ सी एस आर समिती स्थापन केलेली आहे. त्यासाठीचा निधी वर्षभरात या कार्यावर खर्च केला असून ही कामे कंपनी अधिनियम २०१३ ची अनुसूची ७ (VII) आमचे विनिर्देशित केलेली आहेत.

यानुसार महापारेषण कंपनीने सी. वाय् मध्ये (चालू वर्षी २,९६०.५४) कंपनी अधिनियम २०१३ चे लकम १३५ (कंपनीची सामाजिक जबाबदारी - सी एस आर) यासाठी रु. २,२४७.३९ लाखाची तरतूद केली ती कंपनी

व्यवहार मंत्रालयाचे सी एस आर संबंधीत कार्याविषयीचे परिपत्रक क्र. १४, दि. २४ ऑगस्ट २०२१ नुसार आहे. कंपनीने एप्रिल २०२४ पर्यंत 'सी एस आर संबधी खर्च न केलेल्या रकमेचे खाते' या मध्ये रु. ८,७८०.०० स्थालांतरित केले.

| तपशील | २०२३-२४ | २०२२-२३ |
|---|---|---|
| कंपनी अधिनियम २०१३ चे कलम नुसार खर्च करावयाची आवश्यक रक्कम | ८,३१२.१९ | ६,७६५.०६ |
| अधिक - या वर्षातील तरतुद | २,९६०.५४ | २,२४७.३९ |
| या वर्षी खर्च केलेली रक्कम | - | - |
| शिक्षण, क्रीडा व अरोग्य | ५७०.२१ | २५६.३६ |
| सामाजिक क्षेत्रे, साह्य निधी व शेती यात योगदान | २३२.०९ | - |
| पायाभूत सुविधा व विद्दुतीकरण | १,६९०.४३ | ४४३.९० |
| खर्च करावयाचे थकीत दायित्व | ८,७८०.०० | ८,३१२.१९ |

(रू. लाखात)

| तपशील | २०२३-२४ | २०२२-२३ |
|---|---|---|
| कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १३५ नुसार खर्च करावयाची आवश्यक ठोक रक्कम | २,९६०.५४ | २,२४७.३९ |
| अधिक - मागील खर्च न केलेली रक्कम | ८,३१२.१९ | ६,७६५.०६ |
| या वर्षी खर्च करावयाची एकूण ठोक रक्कम | ११,२७२.७३ | ९,०१२.४५ |
| या वर्षी खर्च करण्यास मंडळाने मंजूर केलेली रक्कम | ११,२७२.७३ | ९,०१२.४५ |

**या वर्षात खर्च केलेली रक्कम** (रू. लाखात)

| तपशील | २०२३-२४ | २०२२-२३ |
|---|---|---|
| १) मत्ता बांधणे / संपादन करणे | २४९२.७३ | ७००.२६ |
| २) वरील (१) व्यतिरिक्त अन्य हेतूसाठी | - | - |

**खर्च केलेली / न केलेली रक्कम संबंधी तपशील** (रू. लाखात)

| तपशील | २०२३-२४ | २०२२-२३ |
|---|---|---|
| या वर्षात खर्च केलेल्या रक्कम | - | - |
| शिक्षण, क्रीडा व अरोग्य | ५७०.२१ | २५६.३६ |
| सामाजिक क्षेत्रे, मदत निधीत योगदान व शेती | २३२.०९ | - |
| पायाभूत सुविधा व विद्युतीकरण | १,६९०.४३ | ४४३.९० |
| खर्च न केलेल्या रक्कमे संबंधी उपार्जन | - | - |
| चालू प्रकल्प | ८,७८०.०० | ८,३१२.१९ |
| चालू प्रकल्पा व्यतिरिक्त | - | - |
| **एकुण** | **११,२७२.७३** | **९,०१२.४५** |

**टिपा क्र. ५०**

मोठया आकाराच्या नवीकरण योग्य ऊर्जा निर्मिती (सौर / पवन) भविष्यातील नवीकरण योग्य ऊर्जा समृद्ध राज्यात येण्याची शक्यता असल्याने त्यांचे एकत्रिकीकरण व निष्कासनाच्या सोयीसाठी भारत सरकार व त्यांचे संबधित मंत्रालय (एम एन आर ई) यांनी हरित ऊर्जा कॅरिडॉर उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यातून १२ व्या पंचवार्षिक योजनेत हरित ऊर्जेचे सुलभ निष्कासन होईल. मंजुरीत २७ डी पी आर पारेषण एलीमेंट्स (२२० केव्ही / १३२ केव्ही पारेषण लाईन व एंड बेज) विविध परिमंडळासाठी मान्य केले आहे. या योजनेचा मूळ खर्च रु. ३६७ कोटी आहे.

दि. १/१२/२०१७ रोजी १२,०००,००० योरोचा करार के एफ डब्ल्यू फ्रँक फर्ट एम मेन(के एफ डब्ल्यू) सोबत झाला.
या योजने साठी पुढील प्प्रमाणे वित्त पुरवठा करावयाचा आहे.
महापारेषण समभाग - २०%
राष्ट्रीय स्वच्छ उर्जा निधी - ४०%
के एफ डब्ल्यु (जर्मन डेव्हलपमेंट बँक) कर्ज - ४०% (१२ मिलीयन युरोज)

जी इ सी - १ मधील १९ मूलभूत बाबीसाठी (वीजतारा व १६ बे वगळून) रु. १६ ८.७२ कोटी रकमेचे निवेदीकरण केले. मूळ डी पी आर योजनेचा खर्च रु. ३६७ कोटी होता. यानुसार, कर्ज व समभाग यासाठी खालील प्रमाणे निधी असेल.

२० टक्के - महापारेषणचे समभाग रु. ३३.७४ कोटी

४० टक्के - राष्ट्रीय स्वच्छ ऊर्जा निधी (अनुदान) रु. ६७.४९ कोटी

४० टक्के - के एफ डब्ल्यु ने (जर्मन विकास बँक) कर्ज रु. ६७.४९ कोटी

संवितरणाची पहिल्या टप्याची मागणी केंद्रिय वित्त मंत्रालयातील मदतलेखा व लेखापरिक्षण विभागाचे नियंत्रक यांचे कार्यालय (CAAA) यांचेकडे करते हे कार्यालय त्या संबधी के एफ डब्ल्यू जर्मनी जर्मनी यांचेकडे पाठवतात. सी एएए कडून ती मिळाल्यानंतर के एफ डब्ल्यू त्यांचेकडे रकमेचे सादरीकरण केले जाते व सी एएए मार्गे ते राज्यशासनाकडे जमा होते. त्यानंतर राज्य शासन अर्थ संकल्प मंजुरीचा शासन निर्णय करतील व कर्जाची रक्कम महापारेषणच्या बँक खात्यात जमा होते. त्यानंतर राज्य शासन अर्थ संकल्प मंजुरीचा शासन निर्णय करतील व कर्जाची रक्कम महापारेषण च्या बँक खात्यात जमा होते

के एफ डब्ल्यू चे पहिले संवितरण १९ मे २०१९ रोजी केले. त्यापूर्वी कशाचीही विनंती करता आली नव्हती कारण पुरवठादार यांनी या बाबत देयके सादर केली नव्हती. प्रकल्पाच्या कामातील प्रगतीपथावर कर्ज वितरण अवलंबून असते. दि. ३१ मार्च २०२४पर्यंत महापारेषण रु. ८२,६३,२२० युरोज् एवढी कर्ज रक्कम मिळाली. (मागील वर्षी रु. ६७,६९,२०,७७६ युरो) म्हणजे रु. १७,१३,००० (मागील वर्षी रु. १५,४२,७४,७२२).

कर्जाच्या समतीपत्रातील कलॉज - ३ नुसारकर्ज घेणाऱ्या म्हणकोला वितरण न केलेल्या कर्ज रकमेच्या ०.२० टक्के एवढी बांधिलकी शुल्क (परत न केले जाणारे) भरावे लागते.

के एफ डब्ल्यू ने रु. ५.७६ लाख (मा. वर्षी रु. ८.९५ लाख) एवढ्या बांधिलकी शुल्काची आकारणी केली. ती नफा – तोटा पत्रकात आहे.

तसेच या वर्षाच्या अखेरीस परकीय चलनातील रुपांतरणामुळे झालेल्या तोट्याची रक्कम रु. ६८ लाख याची (मागील वर्षी रु. ५४७ लाख) नफा व तोटा पत्रकात वजावट केली आहे कारण विनिमयाची जोखीम महापारेषण वर असते

**टीप ५१**

तिसऱ्या पक्षाशी संबंधित असलेले व मवीनिआ निनियमाच्या संज्ञेत परिचालित आणि परीरक्षित निर्देशित चालू खाते.

मवीनिआयोगाने विविध विनियमांद्वारे म.रा.भा.प्रे. केंद्राला MSPC UI सेटलमेंट ऑप. लेखा (FBSM Pool Account), MSPC भरपाई लेखा, MSLDC RE-DSM ऑप. लेखा (RE-SDM Pool Account) आणि MSL DC DSM Pool Op Account(DSM Pool Account) हे लेखे परिचालित आणि परीरक्षित करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक १७ मे २००७ रोजी प्रकरण क्र.४२/२००६ मध्ये स्वाधिकारे एक आदेश जारी केला ज्याद्वारे आयोगाने भारीत सरासरी प्रणाली किरकोळ किंमत ठरवणे (WASMP) आधारित शिल्लक काढणे आणि फेड करणे कार्यपद्धती अंमलात आणली. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र यांनी ०४/०७/२००९ रोजी शिल्लक काढणे आणि फेड करणे संहिता (BSC) तयार केली ज्यास म वी नि आयोगाने २६/०८/२००९ रोजी त्यांच्या पत्राद्वारे मान्यता दिली. दि.०१/०८/२०११ पासून परिचालिता करण्यात आली.

मवीनिआयोगाने विविध विनियमांद्वारे म.रा.भा.प्रे. केंद्राला MSPC UI सेटलमेंट ऑप. लेखा (FBSM पूल लेखा), श्एझ्र भरपाई लेखा, MSLDC RE-DSM ऑप. लेखा (RE-SDM पूल लेखा) आणि MSL DC DSM पूल ऑप. लेखा (DSM पूल लेखा) हे लेखे परिचालित आणि परीरक्षित करण्याचे निर्देश दिले आहेत. म.रा.भा.प्रे. केंद्राकडे म.वि.नि. आयोगाने जारी केलेल्या संबंधित विनियमांखाली ही विविध विनियामक निधी खाती ठेवण्याचे कार्य सोपवण्यात आले आहे. म वि नि आयोगाद्वारा अन्य कोणती तरी संस्था निश्चित करेपर्यंत म.रा.भा.प्रे केंद्राने नोडल एजन्सी म्हणून ह्या निधींचे परिरक्षक ह्या रुपात हे निधी व्यवस्थापित करावयाचे आहेत.

एकूण MERC प्रकरण क्र.४२/२००६ मधील म वि नि आयोगाच्या दि.१७/०५/२००७ च्या आदेशाच्या कलम क्र.५.१ (जी) नुसार म.रा.भा.प्रे. केंद्र हे राज्य संकोष सहभागीदारांच्या वतीने दर आठवड्यास आकार संग्रहित करेल आणि अनुसूचित नसलेले आंतरबदल आकाराची फेड या प्रति प्रदान करेल. त्यानुसार, दि.११/११/२००८ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, ऐरोली शाखा येथे खाते क्र.२०१३०४०२९०७ या क्रमांकाचे MSPC UI सेटलमेंट ऑपरेटिव्ह बँक खाते उघडण्यात आले आहे. कलम ५.१ (जी) नुसार म.रा.वि. समिती ही राज्य संकोष सहभागीदारामधील फेडीच्या संदर्भात प्रदाने स्वीकारणे /मुक्त करणे यासाठीएक बँक खाते उघडेल आणि ठेवेल. याचबरोबर राज्यांतर्गत सर्व वितरण कंपन्या म्हणजेच राज्य संकोष सहभागीदारांनी वाटून घेतलेले मरावी समितीचे खर्च भागवण्यासाठी म.रा.भा.प्रे केंद्राने दिनांक ११/११/२००८ रोजी बँक ऑफ महाराष्ट्र, ऐरोली शाखा येथे खाते क्र.६००२९४३४२०२ या क्रमांकाचे एक चालू बँक खाते (नवीन) उघडले आहे.

म.वी.नि.आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (सौर आणि पवन वीज निर्मितीसाठी पूर्वानुमान, योजना वेळापत्रक आणि विचलन फेड) विनियम, २०१८ हे पूर्वानुमान आणि योजना वेळापत्रक विनियम तयार केले आहेत. हे विनियम विद्युत निर्मात्यांद्वारा पूर्वानुमान, योजना वेळापत्रक आखणे आणि विचलनाच्या फेडीकरिता कार्यतंत्र याद्वारे राज्य ग्रीड संहिता आणि अधिनियम खाली कल्पित केल्यानुसार ग्रीड स्थैर्य आणि सुरक्षा परीरक्षित करत असताना महाराष्ट्रात निर्मित पवन आणि सौर उर्जेचे ग्रीड एकात्मिकरण सुलभ करण्यासाठी उद्दिष्टित आहेत. म.वि.नि. आयोगान RE-DSM विनियम दि.२०/०७/२०१८ रोजी अधिसूचित केले जे ०१/०७/२०१९ पासून कार्यान्वयित करायचे होते. ह्याकरिता विचलन आकारासाठी एक चालू बँक खाते (नवीन) उघडणे आवश्यक होते. RE-DSM साठी म.वि.नि. आयोगाने मान्य केलेल्या कार्यपद्धतीखाली म.रा.भा.प्रे. केंद्राच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांनुसार कलम ५-५ अन्वये सदर केंद्राने 'पवन आणि सौर विद्युत निर्मितीकरिता एक राज्य विचलन फेड खाते ठेवायचे आहे." ह्या खात्यात विचलन आकार रक्कम जमा करायची आहे तसेच ह्या खात्यातून रक्कमेचेवाटप करायचे आहे. सदर बँक खाते म.रा.भा.प्रे. केंद्राच्या नावे उघडणे आवश्यक आहे आणि महापारेषणचे PAN आणि GST क्रमांक वापरण्यात येईल. त्यानुसार दि.३०/०५/२०१९ रोजी म.रा.भा.प्रे. केंद्राने बँक ऑफ महाराष्ट्र, ऐरोली शाखेत खाते क्र.६०३३१८३५८७८ क्रमांकाचे दुसरे तिसरा पक्ष बँक खाते उघडले आहे.

म.वि.नि.आयोगाने १७ मे २००७ रोजी प्र.क्र. ४२/२००६ मध्ये स्वाधिकारे आदेश जारी केला ज्याद्वारे त्यांनी महाराष्ट्रातWASMP आधारित संतुलन आणि फेड कार्यतंत्र स्थापित केले. म.वि.नि.आयोगाने सध्याच्या संतुलन आणि फेड कार्यतंत्राचे पुनर्विलोकन करण्याचा आणि महाराष्ट्रात विचलन फेड कार्यतंत्र स्थापित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार म.वि.नि.आयोगाने दि.०१/०३/२०१९ रोजी DSM विनियम अधिसूचित केले जे दिनांक ०१/०४/२०२० पासून कार्यान्वित करायचे होते. याकरिता विचलन आकारासाठी एक स्वतंत्र चालू बँक खाते आवश्यक होते. DSM विनियमाच्या कलम १५(ब) नुसार ह्याविनियमाखाली आकारलेले विचलनासाठीचे अतिरिक्त आकारांसह विचलनाचे आकार आणि उशीरा प्रदानासाठीचे व्याज, असेल तर, ह्या खालील सर्व प्रदाने ही राज्य विचलन संकोष लेखा या नावाच्या निधीत जमा केली जातील. हा निधी ह्या अधिनियमांच्या तरतुदीनुसार म.रा.भा.प्रे.केंद्राने ठेवायचा आणि परिचलित करायचा आहे. ह्या खात्यात विचलन आकार रक्कम जमा करायची आहे तसेच ह्या खात्यातून रक्कमेचे वाटप करायचे आहे. सदर बँक खाते म.रा.भा.प्रे. केंद्राच्या नावे उघडणे आवश्यक आहे आणि महापारेषणचे PAN आणि GST क्रमांक वापरण्यात येईल. त्यानुसार दि.३१/१२/२०१९ रोजी म.रा.भा.प्रे. केंद्राने बँक ऑफ महाराष्ट्र, ऐरोली शाखेत खाते क्र. ६०३४९८६५३१५ क्रमांकाचे दुसरे तिसरा पक्ष बँक खाते उघडले आहे. डीएसएम सॉफ्टवेअरद्वारा डीएसएम देयके देणे प्रत्यक्षात दि.११/१०/२०२१ रोजी सुरु झाले. या कारणासाठी, दि.२८/०९/२०२१ च्या मान्यता प्राप्त कार्यालय टिप्पणीनुसार ऑनलाईन बिल डेस्क पेमेंट गेटवे शी जोडण्याकरिता चौथे तिसरा पक्ष खाते ज्याचा खाते क्र.६०३९६२२४१५९ MSLDC DSM POOL OPERATIVE A/C या नावाचे उघडण्यात आले. पुढे, महाराष्ट्रात MERC नियमन ७० (बहु-वर्षीय दर) २०१९ लागू होत असल्याने, SLDC च्या निर्देशांनुसार, जनरेटिंग स्टेशन मशीन क्षमतेच्या आधारावर ग्रिडमध्ये प्रतिक्रियाशील ऊर्जा इंजेक्ट / शोषून घेईल. राज्य प्रतिक्रियाशील ऊर्जा पूल खाते राखणे ही SLDC ची जबाबदारी आहे. म्हणून मंजूर केलेल्या नोंदीनुसार, MSLDC प्रतिक्रियाशील पूल खाते क्र. ६०४०६३०५८८० उघडण्यात येत आहे.

वित्तीय वर्षाच्या शेवटी राज्य विचलन संकोष लेख्यातील शिल्लक निधीची रक्कम ही विद्युत प्रणाली परिचालनातील सुधारणा, ग्रीड परिचालनाची विश्वासार्हता, सुरक्षा आणि सुरक्षितता यात सुधारणांसाठी उपाय आणि अभ्यास हाती घेणे, प्रणाली परिचालने आण बाजार परिचालने यांच्याशी निगडित क्षमता संवर्धन आणि प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेणे यांसाठी तसेच मवीनिआने निर्देशित केल्यानुसार अशाच इतर हेतूंकरिता किंवा मवीनिआच्या पूर्व परवानगीने राष्ट्रीय भार प्रेषण केंद्र यांच्या सल्ल्याने निश्चित केल्यानुसार इतर योजनांकरिता वापरली जाईल.

मात्र, आठवडा फेड कालावधीच्या शेवटी राज्य विचलन संकोष लेख्यातील निधीतील तूट, जर लागू असेल तर, ही पुरवणी देयकांद्वारा लागू असलेल्या साप्ताहिक फेड कालावधीकरिता संबंधित राज्य संस्थेद्वारा देय नक्त विचलन आकाराच्या प्रमाणात राज्य संस्थांकडून अतिरिक्त आकार आकारुन वसूल केली जाईल. तसेच म.रा.भा.प्रे. केंद्र हे म वी नि आयोगाच्या मान्यतेनंतरच शिल्लक निधी वापराकरिता योजना तयार करेल आणि वार्षिक योजना सादर करेल आणि सदर योजना क्रियान्वित करेल.

कलम १(२) नुसार वाणिज्यिक व्यवस्था, विचलन आकार, विचलनाकरिता अतिरिक्त आकार आणि दंडात्मक कार्यवाही वगळता हे डीएसएम विनियम अधिकृत राजपत्रात ह्या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून अंमलात येतील. मात्र, ह्या डीएसएम निनियमांच्या कलम (९) आणि (१०) खाली विनिर्दिष्ट केलेल्या वाणिज्यिक व्यवस्था, आणि विचलन आकार, विचलनाकरिता अतिरिक्त आकार आणि दंडात्मक कार्यवाही, जर असेल तर, ही आदेशाद्वारे स्वतंत्रपणे अधिसूचित केलेल्या दिनांकापासून अंमलात येईल जी १ एप्रिल २०२० च्या नंतर नसेल. तसेच, मात्र वरील परिल्या परंतुकात संदर्भित केल्यानुसार अशा दिनांकाच्या अधिसूचनेपर्यंत प्रकरण ४२/२००६ मधील आदेशात आयोगाने मान्य केलेले अंतिम समतोलित आणि फेड कार्यतंत्र आणि त्याबरोबर वेळोवेळी केलेल्या वीज लेखांकन आणि विचलन फेड यासाठीच्या संबंधित सुधारणा परिचालनात राहातील.

ह्या निधी चालू खात्यातील तिसरा पक्ष बँक लेख्यातील निधी शिलकीशी समान स्वरुपात जुळवल्या आहेत. दि.३१/०३/२०२४ रोजी ह्या तिसरा पक्ष बँक लेख्यातील एकूण शिल्लक ही रु.८,५५२.८३ लाख (मागील वर्षी रु.२१,२६६.१० लाख) इतकी होती तर ह्या निधीतील तिसरा पक्ष दायित्व हे रु.२१,२६६.०९ लाख (मागील वर्षी रु.२१,२६६.०९लाख) इतके होते.सदर रु.२२,२०९.१० लाखांची एकूण रक्कम (तिसरा पक्ष लेख्याची प्रारंभीची शिल्लक) ही दि.०१/०४/२०२२ रोजी REDSM चालू खाते, DSM चालू खाते, योजलेले चालू खाते आणि MSPC नुकसान भरपाई चालू खाते यात विभागण्यात आली आहे. तसेच DSM चालू खात्याचे DSM कॉर्पस खाते असे नामांतर केले असून MSLDC DSM POOL परिचालनीय लेखा या नावाचा एक अतिरिक्त चालू लेखा उघडण्यात आला आहे.दिनांक ३१/०३/२०२४ रोजी पाच चालू खात्यांची अखेरची शिल्लक रु.८,५५२.८३ लाख होती.

आयोगाने स्वाधिकाराने एक आदेस दि. ०२.०८.२०२२ रोजी काढला आणि वर्कींग गृपच्या शिफारसी व एम एस पी सी चं दृष्टीकोन स्वीकारल्या प्रमाणे डी एस एम च्या कार्पस मधील रक्कम शासकीय प्रतिभूती किंवा राष्ट्रीकृत बँकांच्यता मुदतीच्या ठेवी मध्ये गुंतवणुकीस (रोकड सुलभतेच्या गरजांचा विचार करुन) व त्यास महापारेहणचा पॅन चा उपयोग करण्यास तसेच महापारेषण पॅन सोबत एक वेगळे बचत खाते उघडावे आनि त्याद्वारे डी एस एम पूल खात्याच्या लाभासाठी कराचे (लागू होणाऱ्या) निव्वळ उपार्जित व्याज उत्पन्नास जमा करण्याची तरतूद करावी असे ठरले. या निर्णयामुळे कॉर्पस रकमेची गुंतवणुक मुदतीच्या ठेवीत किंवा शासकीय प्रतिबूती यात करणे या पुढील प्रक्रीया करणे गरजेचे आहे. वित्त विभागाने दोन्ही गुंतवणूकीच्या कार्यपद्धतीसाठी तपशीलवार पी पी टी तयार केली. वरील सर्व विषय पुढील एम एस पी सी च्या बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेतील एक मुद्दा म्हणून ग्यावा व कॉर्पस फंडची गुंतवणूक इत्यादीची पद्धत यावर अंतिम निर्णय घ्यावा असे प्रस्तारित करण्यात येते.

### टिपा ५२

सी इ आर सी च्या आदेशानुसार मागील काळातील उत्पन्न रु. १,३५८.४८ लाकाने (मा. वर्षी रु. ९,३५७.१७ लाख) तसेच मागील काळातील घसारा (नीव्वळ ) रु १३३.३१ लाख (मा. वर्षी रु. ७७.२३ लाख) या रकमा डब्ल्यू आर सी प्राप्तीला विलंब झाल्युने उलट फिरवण्यात आल्या. त्याचे पूर्नविचार झालेला नाही.

### टीप ५३

जमीन विकास खर्चाचा घसारा ३.३४ टक्के दराने वर्ष २०२२-२३ पर्यत इतर स्थापत्य कामे यांच्या पध्दतीने आकारण्यात येत असे. मात्र (वीज) उप-केंद्रांचा घसारा याचा दर ५.२८ टक्के असल्याने त्याचा पुन: मोजणी पूर्वलक्षी दराने करण्यात आलेली आहे. मात्र त्यातील फरकेची रक्कम अतिशय किरकोळ असल्याने त्या बाबतचे पून्हा निवेदन वित्तीय विवरण पत्रकात केलेले नाही.

### टीप ५४

कंपनी कायदा २०१३ च्या सुधारित अनुसूची ३ (विभाग २) नुसार अतिरिक्त प्रगटन

१) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता, समभाग धारकांना वितरित करण्याची प्रस्तावित अशी लाभांशाची कोणतीही रक्कम नाही.

२) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता, बँका आणि वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या आणि प्रतिभूतींच्या कोणत्याही बाबीच्या संदर्भात न वापरलेली अशी कोणतीही रक्कम नाही.

३) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता, वर्षामध्ये कंपनीने तिच्या मालमत्ता, कारखाना आणि उपकरणांचे पुनर्मूल्यांकन केलेले नाही.

४) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता, वर्षामध्ये कंपनीने प्रवर्तक, संचालक, केएमपी आणि कोणत्याही इतर व्यक्तीशी वेगवेगळे किंवा एकत्रितपणे अशा संबंधित पक्षांना कर्जाच्या स्वरुपात कोणतीही कर्जे किंवा अग्रिमे मंजूर केलेली नाहीत.

५) बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा, १९८८ (४५ / १९८८) आणि त्याखाली केलेल्या नियमांखाली बेनामी मालमत्ता धारण केल्याबद्दल कंपनीविरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरु केलेली नाही किंवा प्रस्तावित नाही.

६) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता, वर्षामध्ये चालू मत्तांच्या प्रतिभूतींच्या आधारे बँका किंवा वित्तीय संस्थांकडून कंपनीने कोणतीही कर्जे उभारलेली नाहीत.

७) कंपनीला कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था किंवा शासन किंवा कोणत्याही शासकीय प्राधिकाऱ्याने हेतुपुरस्सर कसूरदार घोषित केलेले नाही.

८) कंपनीचे पुसून (खोडून) टाकलेल्या कंपन्यांशी व्यवहार आहेत. टिप्पणी क्र.५६ पाहावी.

९) कंपनीचे सांविधिक कालावधीच्या पलिकडे कंपन्या निबंधकांकडे अद्याप नोंदवणे शिल्लक आहे असे कोणतेही आकार किंवा फेड रक्कम नाही.

१०) कंपनी स्तरांच्या संख्येचे अनुपालन करत आहे जी कंपन्या (स्तरांच्या संख्येवर बंधन) नियम २०१७ सह वाचलेल्या कंपनी कायदाच्या विभाग २ च्या कलम ८७ खाली विनिर्देशित केलेली आहे.

११) वित्तीय गुणोत्तरे  टिप्पणी क्र.५७ पाहावी

१२) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता, वर्षामध्ये कंपनी कायद्याच्या कलम २३० ते २३७ च्या संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांनी व्यवस्थेची कोणतीही योजना मंजूर केलेली नाही.

१३) कर्जाऊ निधी आणि समभाग प्रिमियमचा वापर

१) कंपनीने परदेशी संस्था (मध्यस्थ) सहित इतर कोणत्याही व्यक्ती संस्थांना किंवा त्यांच्यामध्ये कोणताही निधी (एकतर कर्जाऊ निधी किंवा प्रिमियम समभाग किंवा इतर कोणतेही स्त्रोत किंवा निधींचे प्रकार) हा अग्रिम किंवा कर्जाऊ दिलेला नाही किंवा गुंतवलेला नाही. येथे मध्यस्थ हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात कंपनीद्वारा किंवा कंपनीच्या वतीने (अंतिम लाभार्थी) कोणत्याही पद्धतीने अन्य व्यक्ती किंवा संस्था यांना कर्जाऊ देईल किंवा त्यात गुंतवेल किंवा अंतिम लाभार्थीच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा त्यासदृश काही देईल हे लिखित किंवा अन्य स्वरुपात अभिलिखित आकलनासहित करण्यात आले आहे.

२) कंपनीने परदेशी संस्था (निधी देणारे पक्ष) सहित कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थांकडून कोणतेही निधी स्वीकारलेले नाहीत. येथे मध्यस्थ हा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात कंपनीद्वारा किंवा कंपनीच्या वतीने (अंतिम लाभार्थी) कोणत्याही पद्धतीने अन्य व्यक्ती किंवा संस्था यांना कर्जाऊ देईल किंवा त्यात गुंतवेल किंवा अंतिम लाभार्थीच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा त्यासदृश काही देईल हे लिखित किंवा अन्य स्वरुपात अभिलिखित आकलनासहित करण्यात आले आहे.

१४) ३१ मार्च २०२४ आणि ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता आयकर कायदा १९६१ खाली कर निर्धारणाखाली असे कोणतेही अप्रगट उत्पन्न नाही जे कंपनीच्या लेखापुस्तकात नोंदवणे आवश्यक आहे.

१५) ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षामध्ये कंपनीने क्रिप्टो चलनात किंवा आभासी चलनात व्यापार किंवा गुंतवणूक केलेली नाही.

**टीप ५५**

कंपनी कायदा २०१३ च्या सुधारित अनुसूची ३ नुसार वित्तीय विवरणपत्रांच्या सुयोग्य सादरीकरणासाठी जिथे जिथे आवश्यक आहे तिथे तिथे मागील वर्षांचे आकडे पुनर्गठित केले आहेत.

## टीप ५६

या कंपनीने, कंपनीच्या अधिनियम २०१३ यातील कलम २४८ नुसार रद्द केलेल्या (स्टूक-ऑफ) खालील कंपन्यां सोबत काही व्यवहार केले. कंपनी कडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, या कंपन्यांची ओळख निश्चीत करण्यात आलेली आाहे.

| पुसून (खोडून) टाकलेल्या कंपनीचे नाव | कंपनीशी व्यवहाराचे स्वरुप | ३१ मार्च २०२४ रोजी थकित शिल्लक | कंपनीशी नातेसंबंध | ३१ मार्च २०२३ रोजी थकित शिल्लक | कंपनीशी नातेसंबंध |
|---|---|---|---|---|---|
| जे एस डब्ल्यू एजन्सी (रत्नागिरी) लि. * | प्राप्य | १,०६७.८० | ग्राहक | ५.१६ | ग्राहक |
| लोकमंगल ॲग्रो इंडस्ट्रीज लि. | प्राप्य | ०.२१ | ग्राहक | ०.२१ | ग्राहक |
| टॉपवर्थ उर्जा आणि मेट्ल्स लि. | प्राप्य | १.६७ | ग्राहक | १.६७ | ग्राहक |
| वाईन्ड वर्ल्ड इंडिया लि. | प्राप्य | २१.५४ | ग्राहक | २१.५४ | ग्राहक |
| वत्सला वाईन्ड फार्मस् * | प्राप्य | - | ग्राहक | ०.०७ | ग्राहक |
| जे एस डब्ल्यू पॉवर पॉवर ट्रेडिंग कंपनी लि. * | प्राप्य | ०.४३ | ग्राहक | ०.९२ | ग्राहक |
| विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. | प्राप्य | २.३८ | ग्राहक | २.३८ | ग्राहक |
| दि. टाटा स्टील बी एस एल लि. * | प्राप्य | ०.४५ | ग्राहक | ०.२३ | ग्राहक |
| अशियन कलर कोटेड इस्पत लि. * | प्राप्य | - | ग्राहक | ०.६८ | ग्राहक |
| अडानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड * | देय | (३१.४२) | विक्रेता | (३१.४२) | विक्रेता |
| अदित्य बिर्ला इंन्सुलेटर्स * | देय | (६२.३५) | विक्रेता | (६२.३५) | विक्रेता |
| अदित्य विद्युत अप्लायसेस लि. | देय | ०.९० | विक्रेता | ०.९० | विक्रेता |
| अल्स्तोम टी आणि डी इंडिया लिमिटेड (अरेवा) * | देय | ६६.६४ | विक्रेता | ६६.६४ | विक्रेता |
| बेन्नेट कोलेमन आणि कंपनी लि. | देय | - | विक्रेता | ०.३६ | विक्रेता |
| डी एम इंटरप्राझेस | देय | ०.०२ | विक्रेता | ६.१२ | विक्रेता |
| डायमंड कॅरीअर्स | देय | ३.९८ | विक्रेता | ३.६७ | विक्रेता |
| ईसन रीरोल लिमिटेड | देय | ७.८१ | विक्रेता | ८४.४५ | विक्रेता |
| हिंदुस्थान विद्युत प्रोड्युक्स् लि. | देय | १०.८२ | विक्रेता | १०.८२ | विक्रेता |
| केदार इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स | देय | १२.११ | विक्रेता | १६.८६ | विक्रेता |
| लुस्त्रे इंजिनिअरींग कॉर्पोरेशन | देय | ४.३९ | विक्रेता | ११.२९ | विक्रेता |
| एस पी पॉवर इंटरप्राझेस | देय | २७.७१ | विक्रेता | १८.३५ | विक्रेता |
| एस सी टी लि. * | देय | (०.०९) | विक्रेता | (०.०९) | विक्रेता |
| सीवानंदा इलेक्ट्रॉनिक्स | देय | (०.०१) | विक्रेता | (०.०१) | विक्रेता |
| तीरुपती इंजिनिअर्स | देय | २२.९९ | विक्रेता | १७.६२ | विक्रेता |
| यूनायटेड इंडस्ट्रीज | देय | ५६.६३ | विक्रेता | ५६.६३ | विक्रेता |
| युनिव्हर्सल इंडस्ट्रीअल कॉर्पोरेशन | देय | - | विक्रेता | ०.९० | विक्रेता |
| विक्ट्रान्स इंजिनिअर्स | देय | १६.७५ | विक्रेता | १६.७५ | विक्रेता |
| विमल कॉर्पोरेशन | देय | (०.१७) | विक्रेता | (०.१७) | विक्रेता |
| वोडाफोन सेल्यूलर लिमिडेल * | देय | ०.०१ | विक्रेता | ०.०१ | विक्रेता |
| वोडाफोन इंडिया लिमिडेल * | देय | ०.०२ | विक्रेता | ०.०२ | विक्रेता |
| श्री रेनुका एजन्सी लि. | प्राप्य | ०.१५ | ग्राहक | ०.१५ | ग्राहक |
| जी आर पॉवर स्वीच गीअर प्रायव्हेट लि. | देय | २.६२ | विक्रेता | (१००.००) | विक्रेता |

**कं.व्य.मं. मास्टर डेटा नुसार 'एकत्रीकृत / ईफायलिंगसाठी उपलब्ध नाहीत' अशा कंपन्या समाविष्ट आहेत.**

## टीप ५७ गुणोत्तर विश्लेषण

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | | | | ३१/०३/२०२३ रोजी | | | | मागील वर्षा च्या तुलनेत गुणोत्तरात तफावतीची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सूत्र | अंश (रु. लाखात) | छेद (रु. लाखात) | गुणोत्तर | अंश (रु. लाखात) | छेद (रु. लाखात) | गुणोत्तर | तफावत टक्केवारी % | |
| ए) चालू गुणोत्तर (पटीत) | चालू मत्ता / चालू दायित्व | ६,७८,४६५.२९ | २,०२,६०५.८२ | ३.३५ | ५,१७,३९०.६५ | १,८०,४२६.८९ | २.८७ | १६.७८ | |
| बी) ऋण- समभाग गुणोत्तर(पटीत) | =(कमी मुदतीचे ऋण + दीर्घ मुदतीचे ऋण + इतर निश्चित प्रदाने / समभाग धारकांचे समभाग) | ४,०३,५३६.४० | १५,९२,६४४.३१ | ०.२५ | ४,८३,६५१.७७ | १४,२६,०३७.८५ | ०.३४ | -२५.२९ | निधी उपलब्ध असल्याने कर्ज परतफेड/पुनर्रचना करण्यात आली आहे |
| सी) ऋण सेवा समाविष्ट बाबीगुणोत्तर (पटीत) | = EBEIDA / (व्याज मुद्दल परतफेड भाडेपट्टा दायित्व प्रदान त्या कालावधीत) | ३,४१,१९८.४९ | १,२१,८४०.५२ | २.८० | २,७६,००३.६३ | ६५,६४४.२६ | ४.२० | -३३.४० | म. वि. नि. आ. यांच्या आदेशानुसार परिचलनातून महसूल वाढल्यामुळे EBITA मध्ये वाढ |
| डी) समभाग गुणोत्तरावर परतावा(%) | = (करोत्तर नक्त नफा - प्राधान्य लाभांश, जर काही / समभागधारकांची इक्विटी) | १,७७,६४६.०२ | १५,९२,६४४.३१ | ११% | १०३६६८.१७ | १४,२६,०३७.८५ | ७% | ५३.४३ | परिचलनातून उत्पनात वाढ म. वि. नि. आ. यांच्या आदेशानुसार |
| इ) वस्तुसूची उलाढाल गुणोत्तर (दिवसांची संख्या) | = नक्त विक्री / सरासरी वस्तुसूची | ६,५५,५४२.३७ | ४१,८८९.२५ | १६ | ४,८९,५६३.४६ | ३२,७५६.७१ | १५ | ४.७१ | परिचलनातून उत्पनात वाढ म. वि. नि. आ. यांच्या आदेशानुसार |
| एफ) व्यापार प्राप्य उलाढाल गुणोत्तर (दिवसांची संख्या) | = परिचालनातून महसूल /सरासरी लेखा प्राप्य | ६,५५,५४२.३७ | ३,३१,७४७.१२ | २ | ४,८९,५६३.४६ | ३,४७,९८०.६७ | १ | ४० | |
| जी) व्यापार देय उलाढाल गुणोत्तर (दिवसांच्या संख्येत) | = एकूण ओ एण्ड एम खर्च /सरासरी व्यापार देय | १,०५,९८२.८० | २८,४५४.०८ | ४ | १,०३,८१०.७१ | २४,७८९.१४ | ४ | -११.०६ | |
| एच) निव्वळ भांडवल उलाढाल गुणोत्तर (पटीत) | = परीचालनातून महसूल /खेळते भांडवल (चालू मत्ता- चालू दायित्वे) | ६,५५,५४२.३७ | ४,७५,८५९.४७ | १.३८ | ४,८९,५६३.४६ | ३,३६,९६३.७६ | १.४५ | -५.१८ | |
| आय) निव्वळ नफा गुणोत्तर (%) | निव्वळ नफा/ परीचालनातून महसूल x १०० | १,६६,८३९.३४ | ६,५५,५४२.३७ | २५% | १,०२,८१६.६५ | ४,८९,५६३.४६ | २१% | २१.१८ | |
| जे) कामी लावलेल्या भांडवलावर परतावा (%) ROCE | = (करपूर्व नफा + व्याज खर्च ) / कामी लावलेले भांडवल | ३,०८,४३७.०१ | २२,३२,८३३.३१ | १४% | १,९४,५४१.४० | २१,५४,७३७.७६ | ९% | ५३.०० | परिचलनातून उत्पनात वाढ म. वि. नि. आ. यांच्या आदेशानुसार |
| के) गुंतवणुकीवर परतावा (%) | (व्याज उत्पन्न + लाभांश उत्पन्न) / (गुंतवणूक + मुदत ठेवी + दिलेली कर्जे) यांची सरासरी | २२,९१२.९० | ३,०८,३७५.७१ | ७.४३% | १०,६९२.८८ | १,५२,६३९.६४ | ७.०१% | ६.०७ | |

## स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल
## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, लि.
## एकत्रीत वित्तीय विवरण पत्रकाच्या लेखापरीक्षणाचा अहवाल

**सशर्त मत**

१ आम्ही येथे सोबत जोडलेले महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, लि. च्या (यापुढे हिला सुत्रधारी कंपनी असे संबोधिले आहे) आणि तिच्या सहयोगी कंपन्यांच्या दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्राकडे लेखा परिक्षण केले. यामध्ये दि. ३१ मार्च २४ रोजीचे एकत्रित ताळेबंद पत्रक, त्या वर्षाचे एकत्रित नफा – तोटा पत्रक (इतर सर्वांगिण उत्पन्न सामाविष्ट) वर्षाअखेरचे एकत्रित समभागातील बदलांची माहिती पत्रक आणि एकत्रित वि.वि. पत्रकांच्या दिपा, महत्वाच्या लेखा धोरण संक्षिप्त स्वरुपात आणि इतर स्पष्टिकरणात यांचा ही समावेश आहे.(या पुढे या सर्वांचा उल्लेख एकत्रित वि. वि. पत्रके असा केला आहे)

२ आमच्या मते आणि आम्हास दिलेली माहिती व विवरण पत्रके तसेच सहयोगी कंपन्यांचा वेगळ्या वि.वि. पत्रकांवर इतर लेखापरिक्षकांचे अहवाल यानुसार आणि आमच्या अहवालातील सशर्त मतांचा आधार या विभागात वर्णन केलेले विषयांचे संभाव्य परिणाम वगळता उपरोक्त एकत्रित वित्तीय विवरण पत्रके, कंपनी अधिनियम २०१३ (सदर अधिनियम) यानुसार आवश्यक माहिती पुरवितात. आणि ती माहिती आवश्यक त्या पद्धतीने दिली आहे. आणि ती अधिनियमनाचे कलम १३३ यांचे वाचन कंपन्याची (भा.ले.मानके) नियमावली २०१५ (दुरुस्त केल्याप्रमाणे) भा.ले.मा.) सोबत आणि भारतात स्वीकारलेली इतर लेखा धोरणे या सोबत होते त्यानुसार व त्यानुरुप माहिती देणारी त्यात सुत्रधारी कंपनीला तिचे सहयोगी कंपन्यां याचे एकत्रीत व्यवहाराचे दि. ३१ मार्च २०२४ रोजीचे सत्य व रास्त स्वरुप दर्शवितात आणि एकत्रीत नफा व तोटा वर्षातील इतर सर्वकष उत्पन्न एकत्रीत समभाग बदल व वर्षातील रोख प्रवाह दर्शवितात

**सशर्त मतांचा आधार**

३

ए इतर उत्पन्न यामध्ये पर्यवेक्षण शुल्क (सुपरव्हिजन फी) रु. १२,३८०.९२ लाख समाविष्ट आहे. कंपनी पर्यवक्षण शुल्क यास संपूर्ण कंत्राटाच्या मुदतीसाठी अग्रिम तत्वावर (अपफ्रंट) मान्यता देते. त्यामुळे वरील शुल्क भा. प्र. मानक ११५ ग्राहकांसोबतच्या कराराचा / कंत्राटाचा महसूल यातील तरतुदीनुसार आकारलेले नाही. परिणामी करपूर्व इतर उत्पन्न व नफा यांचे तेव्हढ्या रकमेने जादा वितरण झालेले असून इतर दायित्वे यांचे तेव्हढयाच रकमेने कमी विवरण झाले आहे.

बी इतर उत्पन्नात भंगार मत्ता व भंगार वस्तू मालसूची यांच्या विक्रीचा समावेश होतो ही रक्कम एकत्रितपणे रु. १,३५२.६६ लाख आहे. भंगार मत्ता / भंगार वस्तूमाल यांच्या विक्रीची संपूर्ण रक्कम संबंधित लेखांमध्ये जमा केली आहे. ती अशा विक्रीच्या नफा / तोटा या मध्ये मान्य करणे आवश्यक आहे. त्यामुळे ही कृती भा.ले. मानक १६: मालमत्ता, कारखाना व साधने, आणि भा.ले. मानक ०२ : "वस्तूमाल सूची" (इन्व्हेंटरीज) यातील तरतुदीनुसार केलेली नाही.

सी चालू दायित्वात प्राप्त मालाच्या रिसीट/बजिके(इन्व्हाईटरीज) रु.९,१३६.८३लाख यांचा समावेश होतो. ही रक्कम प्रदीर्घ काळापासून येणे आहे. बिजकांची प्रक्रीया विलंबाने झालेने ३१ मार्च २०२४ रोजी तीन पेक्षा जास्त वर्षाच विलंब झालेला आहे. या शिलकी हंगामी स्वरुपाच्या असल्याने त्यांच्या पूर्ण होण्याच्या व्यापारी देणी दायित्वे यावर भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

डी भा.ले. मानक १०१ : च्या "भारतीय लेखा मानकांचा प्रथम अंगिकार करणे" यातील तरतुदीनुसार कंपनीने तिच्या मालमत्ता, करारनामे व साधने (पी.पी.ई.ज्.) यांच्या लेखांकनासाठी खर्च/व्यय प्रारुप (मॉडेल) याचा पर्याय स्वीकारला आहे. त्यामुळे अशा पी.पी. इ यांचा जामीन परिचय / ठेवणावळ / धारण परिव्यय (कॅरींग कॉस्ट) संक्रमण तारखेच्या मुल्या नुसार धरण्यात आल्या आहेत. आणि त्यांच्या घसाऱ्याची मोजणी इलेक्ट्रॉनिक स्प्रेडशीट्स वर व्यक्तीश: हाताने करण्यात आली. त्यासाठी पी.पी इ च्या बाबींचा उपयुक्त शिल्लक आयुष्याचा विचार केला मात्र या करिता म.वि.नि. आयोगाचा विचार केला. मात्र या करिता म.वि.नि. आयोगाच्या नियमकांमध्ये दिलेला उर्वरित मूल्य मर्यादा विचारात घेतलेल्या नाहीत. परिणामी बऱ्याच प्रसंगी मत्तांची जादा घसारा आकारणी नोंदण्यात आली.

याशिवाय बऱ्याच प्रकरणात परिमंडळ किंवा प्रदेशातील मत्तांची घसारा मुख्यालयात हाताने मोजण्यात आला. कारण भांडवलीकरणाच्या तारखा, महत्वाच्या सुट्या भागाचे भांडवलीकरण इ. बाबत विसंगती होती. या प्रकरणात संपूर्ण माहिती/तपशील नसल्याने, अशा सदोष घसाऱ्याच्या एकत्रित परिणामाचे निधरिण करता येत नाही.वरिल कारणांमुळे पी पी इ च्या भंगार खर्च व निव्वळ धारणमुल्य यांच्या परिणामस्वरुप प्रभावावर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

इ दि. ३१ मार्च २०२४ रोजी पी पी इ रक्कम (ठोक गट) रु. २५,७६,८२५.०१ लाख आहे. कंपनीने या वर्षी किंवा त्यामागील वर्षी पी पी ई चे प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही, व त्यांच्या नोंदवहीत तपशील नाही. त्यामुळे या पी पी ई च्या अस्तित्वाबाबत भाष्य करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

कंपनी पी पी ई च्या घसाऱ्याची मोजणी म.वि. नि. आयोगाच्या (एम इ आर सी) नियमकांनुसार करते. त्यासाठी पायरी नुसार / टप्पानुसार मोजणी करणे कराननिवित्त आहे. (तशी अट आहे). कंपनीच्या लेखांकन पद्धतीत पी पी ई ची स्थिती कोणत्या पायरीवर आहे याचा तपशील दिला जात नाही. त्यामुळे घसाथयाच्या रु. १,२८,९८६.७३ लाख या रकमेची परिपूर्णता किंवा अचूकता याविषयी पी पी ई चे निव्वळ धारणमूल्य यावर आम्हास मत देता येत नाही.

एफ पी पी इ संबधित स्वमालकीच्या जमिनी संबधी नावाचे विलेख व कागदपत्रे सुत्रधारी कंपनीकडे उपलब्ध नाहीत या शिवाय काही मालकीच्या जमिनीचे वर्गीकरण भडेपट्टीच्या जमिनीत झाले आहे तर काही प्रकरणी या उलट नोंदी आहेत यामुळे जमिनीचे मालकी हक्क व भाडेपट्टी अशी वर्गवारी योग्य नसावी. यामुळे वापराच्या हक्काच्या जमिनी मत्ता आणि त्यांच्या कर्जफेडी यांची मोजणीवर परिणाम होऊ शकतो. भा. ले. मानक ११६ भाडे पट्या नुसार लेखा प्रक्रीया झाली नाही. याचे जर काही परिणाम एकत्रीत वि. वि. पत्रकावर होऊ शकतील तर त्याचा अंदाज करता येत नाही.

जी कंपनीच्या बील पारषण जाळ्याचा स्तर ६६ केव्ही पासून ७६५ केव्ही पर्यंतच्या क्षमतेचा आहे. आम्हास दिलेल्या माहितीनुसार, कंपनीचे ६६ केव्ही क्षमतेचे वीज जाळे रद्द / काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला अशा प्रकारची ६६ केव्ही क्षमतेच्या वीजकेंद्राच्या तारांचे कार्यान्वयन थांबवून ती महावितरण कंपनीकडे हस्तातरित करण्यात आली. उर्वरीत वीज उपकेंद्रे व वीजतारा - वाहिण्या यांचे हस्तांतरण महावितरणकडे करण्यात येईल किंवा शक्य झाल्यास त्यांचा दर्जा उंचावून ती महापारेषण द्वारे वापरण्यात येतील.

याशिवाय आम्हाला आणखी माहिती देण्यात आली की, भा. ले. मानक १६-मालमत्ता, कारखाना व साधने यांच्या नुसार अशा मत्तांची मान्यता रद्द करणे, त्यांची विल्हेवाट लावणे आणि त्यांचे हस्तांतरण निश्चिती साठी विचार करणे, या साठी सोपस्कारांचे निष्कर्ष निश्चित करणे या बाबत सुत्रधार कंपनीची तांत्रिक पथका सोबत चर्चा चालू आहे.

मात्र आमच्या लेखा परिक्षणाच्या कालावधीत यासंबधी अधिक माहिती / कागदपत्रे आम्हास दिली नाहीत. म्हणून स्थिर मत्तांच्या ठोक गट, संचित घसारा आणि निव्वळ धारणा मूल्य यांचे अनुक्रमे रु. १३,९७५.२३ लाख, इतके रु. १०,७७०.३० लाख अणि रु. ३,२०४.९३ लाख इतके अधिक विवरण झाले आहे. तसेच कंपनीने महावितरण कडून येणे रु. २,४७३.०० लाख तसेच पी पी इ. हस्तांतरणाच्या पोटी होणाऱ्या तोट्याची रक्कम रु. ७३१.९३ लाख या रकमांना मान्यता दिलेली नाही.

एच "वापरात नसलेल्या मत्ता" "विक्रीसाठी काढलेल्या" या संबधीच्या यांचे निव्वळ धारण मूल्य रु. ५,००९.८७ लाख दि. ३१ मार्च २०२४ रोजी होते. त्याचा तपशील आम्हाला मिळू शकलेला नाही. या शिवाय अशा मत्ता "कमी झालेले धारण मूल्य किंवा निव्वळ वसुली योग्य मूल्य" यानुसार करण्याऐवजी त्यांचे धारण मूल्य यानुसार केलेले आहे. ही कृती भा.ले. मानक १०५ - चालू नसलेल्या मत्ता - "विक्रीसाठी काढणे व खंडीत केलेली प्रवर्तने" यातील आवश्यकते नुसार नाही. जर त्याची काही प्रभाव या स्वायत्त वित्तेय वितरणपत्रावर खात्री करता येत नाही.

आय पूर्ण झालेल्या कंत्राटाच्या ठेवींचे समायोजन प्रगतीपथावरील भांडवली कामे (CWIP) सोबत केले. त्यामुळे नकारात्मक (ऋण चिन्हांकित) भांडवली खर्च शिडूक निर्माण झाली. त्याचा केलेल मेळ आम्हाला उपलब्ध झाली नाही. परिणामी ताळेबंदात उभारणी चालू असलेल्या मत्ता (AUC) / प्रगतीपथावरील भांडवली कामे (CWIP) यात तेव्हढा प्रमाणात कमी विवरण झाले. तसेच काही ए यू सी लाईन आयटेम्स बाबत गेल्या तीन वर्षात काहीच हालचाल नाही. भा. ले मानक ३६ - मत्ता कमी करण्याविषयी निर्धारण केले नाही. यामुळे त्याचा स्वायता वि.वि. पत्रकांवर होऊ शकणाऱ्या परिणामांवर आम्हाला मत देता येत नाही.

जे कंपनी सरळ योगदान देणारी कंत्राटे स्वीकारते. त्यासाठी संबंधितांकडून ठेवी मिळतात. या ठेवी अनामत रक्कम यांचे वार्षिक तत्वावर मुल्यांकन होत नाही आणि त्यांचा संबंधित प्रगतीपथावरील भांडवल कामाचे मुल्यांकन पूर्ण झालेल्या प्रकल्पाचे यांच्या शिलकी कमी करण्यासाठी होत नाही. दि. ३१ मार्च २०२४ रोजी ओ आर सी ठेवीची थकीत शिल्लक रक्कम रु. १,४९९.५१ लाख होती. काही प्रकरणात निव्वळ रक्कम इतर उत्पन्न यात करण्याऐवजी इतर संकीर्ण प्राप्ती मध्ये गटामध्ये (गृपमध्ये) करण्यात आली. (नॉन. जी एस टी) म्हणून सदर शिलकींची परिपूर्णता व अचूकता यावर आम्हास मत देता येत नाही.

के कंपनीने तिच्या काही मनोऱ्यांचे पायची रचना तसेच उभारलेले संपूर्ण मनोरे काढून टाकण्याचे ठरविले (सी डब्ल्यू आय पी) असून त्याची रक्कम रु. २,५१७ लाख आहे. कंपनीने सदर रक्कम निर्लेखित करण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी कृती केलेली नाही. हे भा.ले.मानक - १६ 'मालमत्ता कारखाना व साधन' या नुसार नाही.

एल कंपनी तिच्या वस्तूमालसूची (इन्व्हेटरी)च्या वसुली योग्य मूल्या संबधी तपशील ठेवीत नाही. वस्तूमालसूची मधील मूल्यांकन खर्चानुसार केले जाते. त्याऐवजी ते कमी झालेली किंमत आणि एन आर व्ही याप्रमाणे नमूद केले पाहिजे यामूळे दिपा क्र. २.१४ येथे निवेदन केलेल्या लेखा धोरणापासून विचलन झालेले आहे. अशा विचलनाचा स्वायत्ता वि.वि. पत्रकावर परिणाम होण्याची शक्यता असल्यास तो निश्चित करता येणार नाही.

एम परिमंडळ कार्यालयीन ट्रान्स्फार्मर्स व उपकरणातील काही साधने दुरुस्तीसाठी अन्य दूकानाकडे पाठवितात काही थोड्या परिमंडळात अशाप्रकारे साधने दुरुस्तीसपाठविणे व परत आणणे यातील दुरुस्तीनंतरची गुणवत्ता या संबधीची लेखी नोंदणी अहवाल जतन केलेले नाहीत.

| ईतर सर्वसमावेशक उत्पन्न | | | | (८५१.५२) | (८५१.५२) |
| **वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न** | - | - | - | **१,०२,६८४.५८** | **१,०२,६८४.५८** |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नात हस्तांतरित | - | - | - | ०.८९ | ०.८९ |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नाला हस्तांतरित | ७,३२३.०० | - | - | (७,३२३.००) | - |
| कॅपेक्स करिता वापर (म वि न आ ने परवानगी दिलेला) | - | - | (५२९.६८) | - | (५२९.६८) |
| एकूण सर्वसमावेशक उत्पन्न सहयोगीचे वर्षासाठी समभाग पद्धत वापरुन | - | - | - | २,९२५.४६ | २,९२५.४६ |
| **३१/०३/२०२३ रोजी शिल्लक** | **८५,३०१.००** | **१३,९३९.००** | **३,७५४.०८** | **४,२८,६७७.७२** | **५,३१,६७१.८०** |

येथे जोडलेल्या समान तारखेच्या आमच्या अहवालासोबत असलेल्या टिपा क्र. १ ते ५७ या कंपनीच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांचा एकात्मिक भाग आहेत.

**आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार**

**एम एस के ए अँण्ड असोसिएट्स करिता**
सनदी लेखापाल
संस्था नोंदणी क्रमांक १०५०४७ डब्ल्यु
**सही**
**अमरिश वैद्य**
भागीदार
आयसीएआय सदस्य क्र १०१७३९
ठिकाण मुंबई
दि. सप्टेंबर २७, २०२४

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**स्वाक्षरी**
**अंजु गुप्ता**
मुख्य महाव्यवस्थापिका (वित्त व लेखा)

**स्वाक्षरी**
**तृप्ती मुधोळकर**
संचालक (वित्त)
(डी. आय. एन. क्र .:०९०३३२४०)

**स्वाक्षरी**
**डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
(डी. आय. एन. क्र . ०८३५२२९५)

**स्वाक्षरी**
**विनिता श्रीवाणी**
कंपनी सचिव
(सदस्यत्व क्र.ऐ २१८१४)

# ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता एकत्रित वित्तीय विवरणपत्राच्या टीपा

## १ कंपनीची आणि सामान्य माहिती

एकत्रित वित्तीय विवरणपत्रात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण/कंपनी) आणि तिच्या सहयोगी जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेड (JPTL) आणि महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (MTCIL) यांच्या दि. ३१/०३/२०२४ ला संपलेल्या वर्षासाठीच्या वित्तीय विवरणपत्रांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) ही कंपनी अधिनियम १९५६ खाली ३१ मे २००५ रोजी विधी संस्थापित झाली. कंपनी रजिस्ट्रारकडून १५ सप्टेंबर २००५ रोजी व्यवसाय सुरु करण्यासाठीचे प्रमाणपत्र प्राप्त झाले. ही कंपनी ४ जून २००५ रोजी जारी केलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ (हस्तांतरण योजना असा यापुढे उल्लेख असलेली) च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार संस्थापित करण्यात आली. या आधी उल्लेखित अधिसूचनेनुसार, या आधीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पारेषण उपक्रमाचा भाग असलेल्या मत्ता आणि दायित्वांना (उक्त अधिसूचनेच्या अनुसूची अ मध्ये दिल्यानुसार) दि. ६ जून २००५ पासून कंपनीकडे हस्तांतरित आणि निहित करण्यात आले. शदर हस्तांतरण योजनेला महाराष्ट्र शासनाने दि. ३१.०३.२०१६ रोजी मान्यता दिली. उपरोक्त हस्तांतरण योजनेखाली महाराष्ट्र शासनाने मत्ता आणि दायित्वांचे हस्तांतरण केले. निर्णयानुसार, उपक्रमाच्या हस्तांतरणाकरिता मोबदला जो दायित्वावर मत्ता आधिक्य असल्यामुळे मराविमं सुत्रधारी कंपनीमर्यादित (धारक कंपनी) ला रु. ८९८४९७.४७ लाखांचे समभाग जारी करुन चुकता करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण किंवा कंपनी) ही देशातील आघाडीची राज्य पारेषण संस्था आहे. महापारेषण ही महाराष्ट्राच्या बहुतेक सर्व विद्युत पारेषण यंत्रणेची मालक आणि परिचालक आहे. कंपनी ही महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी संस्था असून ती विद्युत निर्मितीच्या ठिकाणाहून विद्युत वितरणाच्या ठिकाणापर्यंत विद्युत पारेषण करण्यासाठी या आधीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पुनर्रचना केल्यानंतर ३१ मे २००५ रोजी विधी संस्थापित आणि अधिवासी करण्यात आली.

कंपनीला विद्युत अधिनियम २००३ खाली राज्य पारेषण संस्था म्हणून अधिनियमित केले गेले आहे. त्यांचे नोंदणीकृत व्यवसायाचे कार्यालय प्रकाशगंगा, सी-१९, इ-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१, आणि ती मुख्यत्वे राज्यांतर्गत पारेषण प्रणालीचे नियोजन, कार्यान्वयन, परिचालन आणि परीक्षण यात गुंतलेली आहे.

## २.लक्षणीय लेखांकन धोरणांचे विवरणपत्र

### २.१) अनुपालन विवरणपत्र

ही वित्तीय विवरणपत्रे कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १३३, कंपन्या भारतीय लेखाकंन मानक नियम २०१५ आणि कंपनी अधिनियम २०१३ च्या संबंधित तरतुदी (अधिसूचित केलेल्या मर्यादेपर्यंत) कंपनी अधिनियम १९५६ अधिसूचित केलेल्या मर्यादेपर्यंत ) आणि लागू असलेल्या मर्यादेपर्यंत आणि त्यानंतर सुधारणा केल्यानुसार वीज अधिनियम २००३ च्या तरतुदी यानुसार तयार करण्यात आली आहेत.

### २.२ - तयारी आणि सादरीकरणाचा पाया

कंपनीच्या सहयोगींमध्ये कंपनीचा खालीलप्रमाणे असलेल्या हिश्शाचा विचार करुन कंपनीने एकत्रित वित्तीय विवरणपत्रे तयार केली आहेत.

| संस्थेचे नाव | स्वरुप | हिश्याचा टक्का |
|---|---|---|
| १) जयगड पॉवर ट्रान्सको लि. | सहयोगी | २६ |
| २) महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लि. | सहयोगी | ४९ |

एकत्रित वित्तीय विवरणपत्रात कंपनीची स्वायत्त वि.वि.समाविष्ट आहेत आणि सहयोगींमध्ये तिच्या गुंतवणुकी समभाग पद्धत वापरुन लेखांकित केल्या आहेत.

एकत्रित अहवालाच्या हेतूने समूहाच्या प्रतिवेदनाच्या दिनांकालाच सहयोगीची वि.वि.पण तयार करण्यात आली आहेत. सहयोगी ही एक संस्था असते जिच्यावर कंपनीचा लक्षणीय प्रभाव असतो. लक्षणीय प्रभाव हा गुंतवणूक केलेल्या संस्थेच्या वित्तीय आणि परिचालनीय धोरण निर्णयात सहभागी होण्याची शक्ती असतो पण तो ह्या धोरणावरील नियंत्रण किंवा सहनियंत्रण नसतो.

सदर वि.विवरणपत्रात सहयोगींना लेखांकनाची समभग पद्धत वापरुन एकत्र केले आहे. अपवाद म्हणजे जेव्हा गुंतवणूक किंवा तिचा भाग हा विक्रीकरिता राखून ठेवला आहे असे वर्गीकरण केले असेल जिथे तिला त्यांच्या वहन रक्कमेपेक्षा कमी किंमतीला आणि योग्य मूल्यास विक्रीच्या खर्चापेक्षा कमी मूल्यास मोजले असेल. समभाग पद्धतीत सहयोगीत केलेली गुंतवणूक सुरुवातीला मूळ किंमतीला एकत्रित ताळेबंदात मान्य केली जाते आणि नंतर सहयोगीच्या नफा किंवा तोटा आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्नातील समूहाचा हिस्सा मान्य करण्यासाठी समायोजित केली जाते. सहयोगीकडून प्राप्त वाटण्या गुंतवणुकीच्या वहन मूल्यास कमी करतात.

लेखांकनाची समभाग पद्धत लागू केल्यानंतर, सहयोगीत निव्वळ गुंतवणुकीच्या प्रारंभिक मान्यतेनंतर घडलेल्या एक किंवा अधिक घटनांचा परिणाम म्हणून हानीचा काही पुरावा आहे का आणि त्या घटनेचा (घटनांचा) विश्वासार्हतेने अंदाजित करता येऊ शकेल असा निव्वळ गुंतवणुकीतून अंदाजित भावी रोकडता प्रवाहावर काही परिणाम झाला आहे का हे समूह ठरवतो. जर हानीचा पुरावा अस्तित्वात असेल तर मग संबंधित मत्तेच्या वसूल होऊ शकणाऱ्या रक्कमेवर गुंतवणुकीच्या वहन रक्कमेच्या जास्त रकमेइतके हानीचे नुकसान समूह मान्य करतो. वसूल होणारी रक्कम ही योग्य मूल्य वजा संबंधित मत्तेच्या विक्रीचा खर्च असते.

महापारेषणला वीज मंत्रालय भारत सरकार यांनी पारेषण योजनांसाठी बोली प्रक्रिया समन्वयक म्हणून सुद्धा नेमले आहे. त्यानुसार कंपनीने स्वतंत्र पारेषण प्रकल्पांच्या संदर्भात विशेष हेतू संस्था म्हणून पूर्ण मालकीच्या दुय्यम कंपन्या विधीसंस्थापित केल्या आहेत. समूहाची सुद्धा खारघर विक्रोळी ट्रान्समिशन

प्रायव्हेट लिमिटेड (KVPTL) नावाची पूर्ण मालकीची दुय्यम कंपनी आहे जी दि. ३१ मार्च २०२० रोजी विशेष हेतू संस्था म्हणून स्वतंत्र पारेषण प्रकल्पांकरिता नोंदणीकृत केली आहे. ही कंपनी दि. २५ जून २०२० पासून उपकंपनी म्हणुन संपुष्टात आली.

भालेमा ११० च्या उद्दिष्टानुसार, जे जेव्हा एक संस्था एक किंवा अधिक इतर संस्था नियंत्रित करते तेव्हा एकत्रित वि.विवरणपत्रांच्या तयारी आणि सादरीकरणासाठी तत्वे स्थापन करते. वरील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी, भालेमा ११० ला एक संस्था (पालक) आवश्यक असते जी एकत्रित वि.वि. सादर करण्यासाठी एक किंवा अधिक संस्था नियंत्रित करते.

अ) नियंत्रणाचे तत्व स्पष्ट करते आणि एकत्रीकरणासाठी पायाच्या रुपात नियंत्रण स्थापित करते.

ब) गुंतवणूकदार गुंतवणूक केलेल्या कंपनीला नियंत्रित करतो का आणि त्यामुळे त्या कंपनीस समूहात एकत्रित करायचे का हे ओळखण्यासाठी नियंत्रणाचे तत्व कसे लागू करायचे हे ठरवते.

क) ए.वि.वि. तयार करण्यासाठी आणि भालेमा ११० वर शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी लेखांकन आवश्यकता ठरवते.

ड) गुंतवणूक संस्था निश्चित करते आणि गुंतवणूक संस्थेच्या विशिष्ट दुय्यम कंपन्यांना समूहात एकत्रित करण्यात अपवाद करायचा का हे ठरवते.

भालेमा ११० च्या मार्गदर्शक तत्वांच्या अर्थउकलीनुसार गुंतवणूकदार संस्थेशी त्याची गोवणूक काही असो, हा गुंतवणूक केलेल्या कंपनीला नियंत्रित करतो का याचे निर्धारण करुन तो पालक कंपनी आहे का हे ठरवेल. गुंतवणूकदार हा जेव्हा गुंतवणूक केलेल्या कंपनीताचा त्याच्या गोवणुकीतून बदलते. परतावे मिळण्याचे हक्क त्याला मिळतात तेव्हा गुंतवणूकदार हा गुंतवणूक केलेल्या कंपनीला नियंत्रित करतो (गुंतवणूक केलेल्या कंपनीवर आपल्या शक्तीद्वारा त्या परताव्यावर परिणाम करण्याची क्षमता बाळगतो)

त्यामुळे भालेमा ११० च्या परिच्छेद ४ आणि भालेमा २८ च्या परिच्छेद १७ नुसार महापारेषणला SPV कंपनी म्हणून विधीसंस्थापित तिच्या दुय्यम कंपनीकरिता ए.वि.वि. आणि रोकडता प्रवाह वि. तयार करणे/सादर करण्याची आवश्यकता नाही.

वित्तीय विवरणपत्रे ही उपार्जित तत्वावर आणि ऐतिहासिक मूल्य रुढीखाली तयार करण्यात आली आहेत. अपवाद योग्य मूल्याना मोजणी करण्यात आलेल्या खालील बाबींचा आहे.

- योग्य मूल्यांना मोजण्यात आलेल्या विशिष्ट वित्तीय मूल्ये आणि दायित्वे
- विक्रीसाठी धरुन ठेवलेल्या मत्ता- वहन रक्कमेपेक्षा कमी रकमेस किंवा योग्य मूल्यास मोजणी वजा विक्रीचा खर्च
- व्याख्यांकित लाभ योजना -योग्य मूल्यास मोजणी केलेल्या योजना मत्ता.

कंपनी ही सतत कार्यरत असलेली संस्था याच्या आधारे कंपनीने आपली वित्तीय विवरण पत्रके तयार केली आहेत.

**२.३ चालू आणि चालू नसलेले वर्गीकरण**

कंपनी चालू/चालू नसलेले वर्गीकरणावर आधारित अशा मत्ता आणि दायित्व बाबी ताळेबंदात सादर करते.

मत्तेला तेव्हा चालू मानले जाते जेव्हा

- ती विकून किंमत वसूल करणे अपेक्षित असते किंवा तिच्या विक्रिचा हेतू असो किंवा सामान्य परिचलनीय चक्रात तिचा वापर करायचा असतो.
- मुख्यत: व्यापाराकरिता ठेवलेली असेल
- प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर बारा महिन्यांच्या आत ती विकून किंमत वसूल करायची असेल किंवा
- रोख किंवा रोख समतुल्य फक्त अपवाद चलन म्हणून वापरण्यास प्रतिबंध असेल किंवा प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर किमान बारा महिन्यांकरिता दायित्व चुकवण्यासाठी वापरलेले असेल

अन्य सर्व मत्ता चालू नसलेल्या म्हणून वर्गीकृत केलेल्या आहेत.

दायित्वाला तेव्हा चालू मानले जाते जेव्हा

- जेव्हा ते सामान्य परिचलनीय चक्रात चुकवले जाणे अपेक्षित असते
- मुख्यत: व्यापाराकरिता ठेवलेली असेल
- प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर बारा महिन्यांच्या आत ती विकून किंमत वसूल करायची असेल किंवा
- प्रतिवेदनाच्या कालावधीनंतर किमान बारा महिन्यांकरिता दायित्वाचे चुकवणे मान्य असणे हा विनाअट हक्क नसेल

कंपनी इतर सर्व दायित्वांना चालू नसलेल्या म्हणून वर्गीकृत करते.

स्थगित कर मत्ता आणि दायित्वांना चालू नसलेल्या मत्ता आणि दायित्वे म्हणून वर्गीकृत केले आहे.

परिचलनीय चक्र हा प्रक्रियासाठी मत्ता संपादन करणे आणि त्यांची रोख आणि रोख समतुल्य या रुपात वसुली करणे यामधील कालावधी असतो.

कंपनीच्या सर्वसाधारण परिचालन (१२ महिने) चक्रानुसार १२ महिने असे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**२.४. रक्कमा पूर्णाकात करणे**

जर अन्यथा नमूद केले नसेल तर अनुसूची तीनच्या आवश्यकतानुसार वित्तीय विवरण पत्रे आणि टिपामध्ये दर्शवण्यात आलेल्या सर्व रक्कमा जवळच्या लाखात पूर्णाकांत करण्यात आल्या आहेत.

**२.५ अंदाज आणि निर्णयाचा उपयोग :**

महामंडळाच्या वित्तीय विवरणपत्रांच्या तयारीसाठी महसूल, खर्च, मत्ता, दायित्वे यांच्या प्रतिवेदित रक्कमा आणि आकस्मिक दायित्वांसह जोडलेली प्रकटने यावर परिणाम करणारे निर्णय, अंदाज आणि गृहितके करण्याच्या व्यवस्थापनाची आवश्यकता असते. ह्या गृहितके आणि अंदाजाविषयीच्या अनिश्चिततेचा परिणाम निष्पत्तीवर होऊ शकतो ज्यासाठी भविष्यातील कालावधीत प्रभावित होणाऱ्या मत्ता किंवा दायित्वांच्या वहन रकमांमध्ये प्रत्यक्ष समायोजन आवश्यक होईल. महामंडळ हे अगदी अलिकडे उपलब्ध माहितीच्या आधारे ह्या अंदाजांचे आणि गृहितकांचे सातत्याने मूल्यमापन करत असते.

विशेषत्वाने नमूद करायचे तर, वित्तीय विवरण-पत्रांमध्ये मान्य केलेल्या रक्कमावर ज्यांचा सर्वांत लक्षणीय प्रभाव असेल अशा लेखांकन धोरणांना लागू करण्यासाठी अंदाज आणि निर्णयांच्या लक्षणीय क्षेत्रांविषयीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

- मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे आणि अमूर्त मत्ता यांचे उपयुक्त आयुर्मान, हानी आणि अवशिष्ट मूल्यांचे अंदाज
- वस्तु साठ्याचे मूल्यांकन
- व्याख्याकिंत लाभ बंधने आणि विभागणितीय गृहितकांची मोजणी
- तरतुदी
- स्थगिती कर मत्तांच्या वसूली योग्यतेचे मूल्यनिर्धारण आणि
- आकस्मिकता

ज्या कालावधीत अंदाज सुधारित करण्यात आले त्यात आणि परिणाम होणाऱ्या भविष्यातील कोणत्याही कालावधीत नफा आणि तोटा विवरणपत्रात लेखांकन अंदाजातील सुधारणा संभवनीय स्वरुपात मान्य करण्यात आले आहेत.

**२.६ मालमत्ता, यंत्र आणि उपकरण (भालेमा १६)**

मालमत्ता, यंत्र आणि उपकरणांची सुरुवातीला मोजणी ही संपादन /बांधकाम खर्चानुसार केली जात आहे. आणि त्यात सदर मालमत्ता कामाच्या ठिकाणी आणण्यासाठी थेट लागू होऊ शकणारे कोणतेही खर्च आणि व्यवस्थापनाच्या उद्देशानुसार परिचालनासाठी सक्षम असण्यासाठी आवश्यक स्थिती यांचा त्या खर्चात समावेश असतो. प्रारंभीच्या मोजणीनंतर मालमत्ता यंत्र आणि उपकरण यांचे संचित घसारा, कर्जफेड तरतुद आणि असतील तर संचित हानी नुकसान वजा करुन त्या किंमतीला वहन केले जाते.

जेव्हा खर्चाशी निगडीत भविष्यातील आर्थिक लाभ हे कंपनीत प्रवाहित होतील अशी शक्यता असेल तेव्हाच फक्त पाठोपाठ येणाऱ्या खर्चाचे भांडवलीकरण केले जात आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या मत्तांच्या बदली संपादित केलेल्या मालमत्ता, यंत्र आणि उपकरणाचे भांडवलीकरण केले गेले आहे. आणि क्रियाशील वापरातून काढून घेतलेल्या निवृत्त केलेल्या त्यांच्या संबंधित बदली मत्तांना अमान्य केले आहे. बदली केलेल्या भागाची जिथे किंमत किंवा आधिचेपरीक्षण उपलब्ध नाही तिथे त्यासारख्या नव्या भागाची अंदाजित किंमत/ निरीक्षण यांचा निदर्शक वापर केला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या भागाची / तपासणी केलेल्या भागाची जेव्हा ती बाब संपदित केली किंवा निरीक्षण करण्यात आले होते.तेव्हा त्या भागाची किंमत काय होती याचे निदर्शक म्हणून हा वापर करण्यात आला आहे.

जिथे कंत्राटदाराशी देयकांचे अतिंम प्रदाने होणे बाकी आहे. अशा कार्यान्वित मत्ता, उपकेंद्रे आणि पारेषण लाईन्सचे बांधकाम अशा प्रकरणांमध्ये अंतिम प्रदानाच्या वर्षात केल्या जाणाऱ्या आवश्यक समायोजनांच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात भांडवलीकरण करण्यात आले आहे.

जमिनीच्या किंमती भरपाईसाठी प्रदाने/दायित्वे आणि जेव्हा जमिनीचा ताबा घेण्यात आला तेव्हा झालेले इतर खर्च यांचा समावेश आहे.

जमीन समतल करणे, साफ करणे आणि तिचे श्रेणीकरण करणे यावर होणारा खर्च हा जमिन विकासाचा खर्च म्हणून भांडवलीकरण केला आहे.

रु. १० लाखांपेक्षा जास्त किंमतीचे सुटे भाग तसेच मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यांचे मान्यता निकष गाठणारी बदली उपकरणे आणि सेवा उपकरणे यांचे भांडवलीकरण करण्यात आले आहे. मात्र, मवीनिआ कपेक्स विनियम २०२२ अंमलात आल्यामुळे ज्यात कोणतीही बदली योजना आणि राखीव सुटे भाग हे कपेक्स योजना म्हणून अनुज्ञेय होणार नाहीत आणि ते आर एण्ड एम योजनेखाली पार पाडावे लागणार आहेत. त्यामुळे, वि. व. २०२१-२२ पासून कंपनी मवीनिआ विनियम अनुसरत आहे आणि एक विनियामक व्यवसाय असल्यामुळे एआरआर हे मवीनिआद्वारा मान्य केले जात आहे.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यातील बाबींच्या उपयोगानंतर किंवा, विल्हेवाटीनंतर भविष्यकालीन आर्थिक लाभ अपेक्षित नाहीत अशा बाबी अमान्य करण्यात आल्या आहेत.

बांधकाम केलेल्या ओ आर सी खर्चाचे समायोजन ग्राहकांकडून मिळालेल्या संबंधित ओ आर सी ठेवी सोबत करण्यात आलेले आहे आणि अशा मत्तांना मान्यता नाममात्र मूल्य रु. १/- नुसार ओळख निश्चितीसाठी करण्यात आलेली असून तिच्या बांधकामाच्या खर्चानुसार मान्यता दिलेली नाही.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरणाच्या बाबींची विल्हेवाट किंवा निवृत्तीनंतर उद्भवणाऱ्या लाभ किंवा नुकसानीला निव्वळ विल्हेवाट रक्कम आणि मत्त्याची वहन रक्कम यातील फरक मानण्यात येतो आणि विल्हेवाट किंवा निवृत्तीच्या दिनांकास नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य करण्यात येतो.

**२.७ प्रगती पथावरील भांडवली कामे (भालेमा १६)**

मालाची किमंत, उभारणी आकार आणि मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यांच्या बांधकामासाठी झालेला खर्च हा भांडवलीकरणाच्या दिनांकापर्यंतच्या उभारणी कामाच्या प्रगती आधारे प्रगती पथावरील भांडवली कामेम्हणून दाखवण्यात आला आहे.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे यांच्या बांधकामास बहाल करता येण्याजोगा प्रकल्प कार्यालय आणि कंपनी कार्यालय यावरील खर्च ओळखण्यात आला आहे. आणि संबंधित मत्त्याच्या किंमतीला शास्त्रोक्त पध्दतीने नेमून दिला आहे.

कंत्राटाच्या बाबत किंमत कमी जास्त होणे चलन दर कमी जास्त होणे यासाठी पूर्ण फेड न झालेली दायित्वे ही कंत्राटाच्या शर्तीनुसार अंदांजित पायावर लेखांकीत करण्यात आली आहेत.

योजनेखाली मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या निश्चितीकरण, सर्वेक्षण आणि संभाव्यता अभ्यासावर झालेल्या खर्चाला त्याच्या अस्विकाराच्या कालावधी पर्यंत किंवा तीन वर्षांपर्यंत जे लवकर असेल ते प्रगती पथावरील भांडवली कामाखाली वेगळी बाब म्हणून दर्शवण्यात आले आहे. अस्वीकार केल्यास, अस्वीकाराच्या वर्षात सदर खर्च, नफा, आणि तोटा विवरण पत्रात खर्ची टाकण्यात आले आहेत.

**२.८ अमूर्त मत्ता (भालेमा ३८)**

अमूर्त मत्ताच्या किंमतीच्या प्रारंभीच्या मान्यतेला मोजण्यात आल्या आहेत. प्रारंभिक मान्यतेनंतर अमूर्त मत्ता ह्या किंमत वजा कोणत्याही संचित कर्जपरतफेड रक्कम आणि संचित हानी नुकसान या मूल्यास वहन केल्या आहेत.

आधीच भांडवलीकृत अमूर्त मत्त्यावर नंतर करण्यात आलेला खर्च हा तो जेव्हा सध्याच्या मत्त्यात समाविष्ट केलेले भविष्यकालीन आर्थिक लाभ वाढवतो. तेव्हा भांडवलीकृत केला आहे. आणि संभाव्य स्वरुपात परत फेड खर्च

म्हणून ठेवला आहे.

अंतर्गत वापरासाठी संपादित केलेल्या आणि लक्षणीय भविष्यकालीन आर्थिक फायद्यांमध्ये परिणत होणाऱ्या सॉफ्टवेअर (जे संबंधित हार्डवेअरचा एकात्मिक भाग नाही.) किंमतीला ज्यावेळी ते वापरासाठी तयार होईल त्यावेळी अमूर्त मत्ता म्हणून मान्य करण्यात आले आहे.

अमुर्त मत्त्याची कोणतीही बाब ही विल्हेवाटीनंतर किंवा त्यांच्या वापरातून किंवा विल्हेवाटीतून कोणतेही भविष्यकालीन आर्थिक लाभ अपेक्षित नाहीत.अशा वेळी त्याबाबीची मान्यता काढून घेण्यात येते ( मान्यता काढून घेण्यातून उद्‌भवणाऱ्या प्राप्ती किंवा नुकसानीना निव्वळ विल्हेवाट रक्कम आणि मत्याची वहन अमूर्त बाबींच्या रक्कम यातील फरक म्हणून मोजण्यात येत आहे. आणि जेव्हा मत्ता अमान्य केली जाते तेव्हा फायदा आणि तोटा विवरण पत्रात मान्य करण्यात येत आहे.

**२.९ घसारा / कर्जाची परतफेड तरतुद (भालेमा १६)**

पारेषण व्यवसायाशी संबंधित मत्त्यावर घसारा / कर्जाची परतफेड तरतुद ही वीज आकार वसूल करण्याच्या हेतूसाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने अधिसूचित केलेले दर आणि कार्यपध्दती अनुसरुन सरळ रेषा पध्दतीने पुरवण्यात आली आहे.

अमूर्त मत्तेच्या रुपात भांडवलीकरण केलेल्या सॉफ्टवेअरची किंमत ही निरंक नष्ट शेष मूल्यासह कायदेशीर हक्क वापर कालावधी किंवा चार वर्षे यापैकी जो आधी असेल त्यावर परतफेड तरतुद करण्यात आली आहे.

मोबाईल फोन्सला खरेदीच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या आत खर्ची टाकण्यात येत आहे.

वर्षभरात मालमत्ता यंत्र आणि उपकरण यातील वाढ/वजा यावरील घसारा/परतफेड ही ज्या दिनांकापासून मत्ता वापरण्यासाठी उपलब्ध आहे. किंवा विल्हेवाटीच्या दिनांकापासून प्रमाणशीर पध्दतीने खर्ची टाकण्यात येत आहे.

जिथे किंमत समायोजन, आकारातील बदल किंवा समान घटक यातील वाढ / घट यामुळे घसारायोग्य मालमत्ता, यंत्र आणि उपकरणाच्या किंमतीस बदल झाला आहे. तसेच अशा मत्तेचा परतफेड तरतुदी न केलेला शिल्लक भाग यांच मवीनीआ आकार विनियमन द्वारे अधिसूचित केलेल्या दर आणि कार्यपध्दती अनुसरुन पूर्वलक्षी प्रभावाने घसारा काढण्यात आला आहे. भांडवलीकरण झालेला सुटे भाग राखीव उपकरण आणि सर्विसिंग उपकरणांवर सरळ रेषा पध्दतीने घसारा काढण्यात आला आहे.

हा घसारा म वी नि आयोगाने अधिसूचित केलेले दर आणि कार्यापध्दती अनुसरुन, पारेषण व्यवसायाचा संबंधित मत्तेच्या उर्वरित उपयुक्त जीवनावर ज्या दिनांकापासून ह्या बाबी वापरासाठी उपलब्ध झाल्या त्या दिनांकापासून हा घसारा
काढण्यात आला आहे.

पारेषण व्यवसायाशी संबंधित नसलेल्या मत्ता व्यतिरिक्त इतर मत्तांची शेष मूल्ये, उपयुक्त आयुर्मान आणि घसारा काढण्यासाठी पध्दत यांचे प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी पुनर्विलोकन करण्यात येते आणि जिथे आवश्यकता असेल तिथे त्यांना संभाव्य स्वरुपात समायोजित करण्यात येते.

रु.५००० किंवा कमी मूल्यांच्या मालमत्ता, यंत्र आणि उपकरणे यांच्या मत्तांचा संपादनाच्या वर्षात पूर्ण घसारा काढण्यात येतो.

मविनिआ आकार विनियमात विनिर्देशित केलेल्या दर आणि कार्यपद्धतीनुसार भाडेपट्ट्यावरील जमीन (परिच्छेद २.१२ मध्ये संदर्भित केल्यानुसार भालेमा११६ खाली आरओयु म्हणून मानलेल्या जमिनीव्यतिरिक्त) ही भाडेपट्टा कालावधीकरिता पूर्णपणे कर्जफेड तरतूद म्हणून केलेली असते.

भाडेपट्ट्याच्या जमिनी (भा.ले.मा. ११६ अंतर्गत वापराचा हक्क (ROU) अशा प्रकारे विचारात घेतलेल्या जमिनी व्यतिरिक्त – परिच्छेद २.१२ यात संदर्भ दिल्या प्रमाणे)

विविध वर्गातील मत्तेसाठी वापरण्यात येणारे घसाऱ्याचे दर

| तपशील | दर |
|---|---|
| मूर्त मत्ता | |
| जलविषयक (हायड्रॉलिक) कामे | ५.२८ % |
| इमारत व इतर स्थापत्य कामे | ३.३४ % |
| कारखाने व यंत्रसामुग्री | ५.२८ % |
| पारेषण तारा. केबलचे नेटवर्क इ. | ५.२८ % |
| फर्निचर, जोडणी व कार्यालयीन साहित्य | ५.२८ % ते १५ % |
| वाहने | ६.३३ % |

असोसीएट्स कंपन्या स्ट्रेट लाइन मेथड(SLM) वर आधारित मालमत्तेवर घसारा आणि कर्जमाफी प्रदान करतात कंपनी कायदा २०१३ चे अनुसूची II.

**२.१० कर्जाचा खर्च (भालेमा २३)**

कर्जाच्या खर्चात निधीचे कर्ज काढण्याशी संबंधित व्याज आणि इतर खर्च यांचा समावेश आहे. कर्जाच्या खर्चात चलन फरक सुद्धा समाविष्ट असतो आणि तो कर्जाच्या खर्चाचे समायोजन ह्या मर्यादेपर्यंत मानला जातो.

वर दर्शविलेल्या २.७ येथे संदर्भित धोरणानुसार बांधकामा दरम्यानचे व्याज (IDC) आणि बांधकामासाठी वाटप केलेला खर्च (निव्वळ) हे CWIP खाली स्वतंत्र बाब म्हणून ठेवले आहेत आणि CWIP च्या शेवटच्या शिलकेच्या प्रमाणात भांडवलीकरण केल्या जात असलेल्या मत्तांना विभागण्यात आले आहे.

जिथे शक्य आहे तिथे योजनांकरिता प्रत्यक्ष IDC परिगणित केले आहेत. उर्वरित योजनांकरिता कर्ज समभागाचे ७५:२५ गुणोत्तर हे सुरुवातीच्या कॅपेक्सच्या तसेच वर्षभरात खर्ची पडलेल्या कॅपेक्सकरिता IDC परिगणित करण्याकरिता विचारात घेतली आहे. भांडवलीकरण विचारात घेताना FIFO पद्धत म्हणजेच मत्तांचे पहिले भांडवलीकरण हे कॅपेक्सच्या सुरुवातीच्या शिलकीतून आकारता येईल ही पद्धत अनुसरण्यात आली आहे.

IDC परिगणित करण्याकरिता प्रत्येक वित्तीय संस्था आणि बँकांचे व्याजाचे भारीत सरासरी दर वापरण्यात आले आहेत.

सशर्त मत्तांच्या संपादणूक किंवा बांधकामाला बहाल केल्या जाऊ शकणाऱ्या कर्जाच्या खर्चांना (म्हणजेच ज्या मत्ताच्या उद्देशित उपयोगाकरिता तयार होण्याकरीता ज्या भरपूर कालावधी घेतात.) अशा मत्तांच्या खर्चाचा भाग म्हणून भांडवलीकृत करण्यात येत आहे. इतर सर्व कर्जाचे खर्च हे नफा आणि तोटा विवरणपत्रात खर्ची टाकण्यात आले आहेत.

जेव्हा अर्हता प्राप्त मत्ता ह्या त्यांच्या उद्दिष्टानुसार उपयोगाकरिता तयार करण्यासाठी भरीवपणे आवश्यक सर्व कृती पूर्ण केल्या जातात तेव्हा कर्जाच्या रकमेचे भांडवलीकरण समाप्त होते.

सशर्त मत्तांवरील विशिष्ट कर्जांचा खर्च प्रलंबित आहे. अशा कर्जाच्या निधींच्या तात्पुरत्या गुंतवणुकीवर अर्जित केलेले गुंतवणूक उत्पन्न हे भांडवली करण्यासाठी पात्र कर्जाच्या खर्चातुन वजा करण्यात येत आहेत.

**२.११ विक्रीकरीता धरुन ठेवलेल्या चालू नसलेल्या मत्ता (भालेमा १०५)**

जर चालू नसलेल्या मत्तांची वहन रक्कम त्यांच्या सातत्यपूर्ण उपयोगाऐवजी विक्री व्यवहाराद्वारा वसूल केली जाणार असेल तर अशा मत्तांना विक्रीकरिता धरुन ठेवलेले म्हणून वर्गीकृत केले जात आहे. जेव्हा विक्री ही खूपच शक्य असेल आणि अशा मत्तांच्या विक्रीकरीता सामान्य आणि रुढ अशा शर्तीच्या अधीन व सध्याच्या स्थितीत सदर मत्ता तात्काळ विक्रीसाठी उपलब्ध असेल तर ही अट पाळली गेली आहे असे मानण्यात येत आहे.

विक्रीकरिता धरुन ठेवलेल्या म्हणून वर्गीकृत केलेल्या चालू नसलेल्या मत्ता ह्या वहन रक्कमेपेक्षा खालच्या रकमेला आणि योग्य मूल्य वजा विक्रीसाठीचा खर्च ह्या मूल्यास मोजल्या जातात.

विक्रीकरीता धरून ठेवलेल्या या रुपात वर्गीकृत केलेल्या मालमत्ता यंत्र आणि उपकरण आणि अमूर्त मत्तांचा घसारा काढला जात नाही. किंवा त्याच्या कर्जफेडीची तरतुद केली जात नाही.

**२.१२ भाडेपट्टा (भालेमा ११६)**

जर मोबदल्याच्या देवाणघेवाणीत ठरावीक कालावधी करिता निश्चित मत्त्याच्या वापराच्या नियंत्रणाचा हक्क एखादे कंत्राट बहाल करत असेल तर ते कंत्राट किंवा त्यात अंतर्भाव आहे ते भाडेपट्टा असेल.

**भाडेपट्टादाराच्या रुपात कंपनी**

कंपनी कंत्राटाच्या भाडेपट्टा नसलेल्या घटकांपासून वेगळे असे भाडेपट्टा म्हणून कंत्राटाच्या अंतर्गत असलेला प्रत्येक भाडेपट्टा घटक लेखांकित करते आणि भाडेपट्टा घटकांच्या संबंधित स्वतंत्र किंमतीच्या आणि भाडेपट्टा नसलेल्या घटकांच्या एकत्रित स्वतंत्र किंमतीच्या आधारे प्रत्येक भाडेपट्टा घटकाला कंत्राटात मोबदल्याचे वाटप करते.

कंपनी भाडेपट्टा प्रारंभ दिनांकास भाडेपट्टा कालावधी करिता अंतर्निहित मत्त्याच्या वापराच्या तिच्या हक्काचे प्रतिनिधित्व करणारा मत्त्याच्या वापराचा हक्क मान्य करते. प्रारंभाच्या वेळी मोजलेल्या मत्त्याच्या वापराच्या हक्काची किंमत ही प्रारंभ दिनांकास किंवा त्याआधी केलेल्या कोणत्याही भाडेपट्टा प्रदानाकरिता कोणत्याही प्राप्त प्रोत्साहन रक्कम वजा करुन समायोजित केली जाते तसेच त्यात ज्या ठिकाणी अंतर्निहित मत्ता स्थित असेल ते ठिकाण

किंवा अंतर्निहित मत्ता पुनर्स्थापित करण्यासाठी किंवा अंतर्निहित मत्ता सुटे करणे आणि ती तिथून हलवणे यासाठी भाडेपट्टा धारकाने कोणताही प्रारंभिक खर्च किंवा होणाऱ्या खर्चाचा अंदाज यांची भर घातली जाईल. वापराचा हक्क असलेली मत्ता ही कोणताही साठलेला संचयित घसारा आणि असेल तर संचयित हानी नुकसान वजा करुन किंमतीस नंतर मोजली जाते आणि भाडेपट्टा दायित्वाच्या कोणत्याही मोजणीसाठी समायोजित केली जाते. वापराचा हक्क असलेल्या मत्त्याचा घसारा हा कमी भाडेपट्टा कालावधी किंवा वापराच्या हक्काच्या मत्त्याच्या उपयुक्त आयुष्याकरिता प्रारंभाच्या दिनांकापासून सरळ रेषा पध्दत वापरुन काढला जातो. वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची अंदाजित उपयुक्त आयुर्मयादा ही मालमत्ता, कारखाना आणि उपकरण यांच्या अदाजित उपयुक्त आयुमर्यादेच्या धर्तीवरच निश्चित केली जाते. वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची वहन रक्कम वसूल होऊ शकत नाही असे कोणतेही लक्षण आढळले तर त्या मत्त्याच्या हानीची चाचणी घेतली जाते आणि हानीची नुकसान रक्कम, जर असेल तर, नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केली जाते.

कंपनी भाडेपट्टा दायित्वाची मोजणी ही भाडेपट्टा प्रारंभ दिनांकाच्या वेळी प्रदान न केलेल्या भाडेपट्टा प्रदानाच्या सध्याच्या मूल्यास करते. भाडेपट्टा प्रदाने ही भाडेपट्यात निर्विवाद असलेल्या आणि लगेचच निश्चित केल्या जाऊ शकत असलेल्या व्याजदराचा वापर करून डिस्काउंट केली जातात. जर हा दर लगेचच निश्चित केला जाऊ शकत नसेल तर कंपनी तिच्या एआरआर आदेशात मानक कर्जांवर व्याज खर्चाच्या मान्यतेदरम्यान म.वी.नि.आ. ने मान्य केलेला १०.०४ टक्क्यांचा कर्जाचा दर वापरते. जवळपास अशीच वैशिष्ट्ये असलेल्या भाडेपट्ट्यांसाठी कंपनी प्रत्येक भाडेपट्टा निहाय त्या त्या भाडेपटट्यांसाठी म्हणून विनिर्दिष्ट असा वाढता कर्जाचा दर स्वीकारेल किंवा सूचीतील सर्व भाडेपट्ट्यांसाठी एक असा वाढता कर्जाचा दर स्वीकारेल

किंवा सूचीतील सर्व भाडेपटट्यांसाठी एक असा वाढता कर्जाचा दर स्वीकारेल. भाडेपट्टा दायित्व हे नंतरच्या काळात पुन्हा मोजले जाईल. त्याकरिता भाडेपट्टा दायित्वावरील व्याज प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कम वाढवून, भाडेपट्टा दायित्वावरील व्याज प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कम कमी करून, केलेली भाडेपट्टा प्रदाने प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कम कमी करून आणि कोणतेही पुनर्मूल्यनिर्धारण किंवा भाडेपट्टा सुधारणा प्रतिबिंबित करण्यासाठी किंवा सुधारित निश्चित भाडेपट्टा प्रदाने प्रतिबिंबित करण्यासाठी वहन रक्कमेची पुन्हा मोजणी करून भाडेपट्टा दायित्व पुन्हा मोजले जाईल.

सुधारणेच्या स्वरुपावर आधारित मत्त्याच्या वापराच्या हक्काच्या समायोजनाच्या रुपात आणि नफा व तोटा विवरणपत्रात समायोजनाच्या रुपात सुधारणीमुळे भाडेपट्टा दायित्वाच्या पुनर्मोजणीची रक्कम कंपनी मान्य करते. जिथे वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची वहन रक्कम ही कमी होऊन शून्य होते आणि भाडेपट्टा दायित्वाच्या मोजणीत आणखी घट झालेली असते तिथे कंपनी नफा व तोटा विवरणपत्रात पुनर्मोजणीची कोणतीही उर्वरित रक्कम मान्य करते.

कंपनीने १२ महिने किंवा कमी भाडेपट्टा मुदत असलेल्या सर्व मत्तांना आणि कमी मूल्य असलेली अंतर्निहित मत्ता ज्यांची आहे अशा भाडेपटट्यांकरिता भालेमा ११६ ची आवश्यकता लागू न करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या भाडेपटट्यांशी निगडित भाडेपट्टा प्रदानास भाडेपट्टा मुदतीकरिता सरळ रेषा धर्तीवर खर्च म्हणून मान्य केले आहे.

स्थित्यंतराच्या वेळी, कंपनी उर्वरित भाडेपट्टा प्रदानाच्या सध्याच्या मूल्यास मोजलेले भाडेपट्टा दायित्व मान्य करते. वापराचा हक्क असलेल्या मालमत्ता ह्या जसे काही भाडेपट्टा प्रारंभापासून मानक लागू केले आहे पण १ एप्रिल २०१९ ला असलेल्या पट्टेदाराचा वाढीव कर्जाचा दर वापरुन सूट दिलेला अशा रितीने

सदर मालमत्तांच्या वहन रक्कमेस मान्य केलेल्या आहेत. कंपनीकडे अशा भाडेपट्या आहेत त्या भालेमा १७ लागू करुन वित्तीय भाडेपट्टा म्हणून वर्गीकृत केलेल्या होत्या. अशा भाडेपटट्यांकरिता वापराचा हक्क असलेल्या मत्त्याची वहन रक्कम आणि भालेमा ११६ च्या प्रारंभिक लागू दिनांकास असलेले भाडेपट्टा दायित्व हे स्थित्यंतराच्या दिनांकास भालेमा १७ लागू करुन भाडेपट्टा मत्त्याची वहन रक्कम आणि मोजलेले भाडेपट्टा दायित्व असते.

**पट्टाकार म्हणून कंपनी**

भाडेपटट्यांच्या प्रारंभी कंपनी तिच्या प्रत्येक भाडेपटट्यांस एकतर परिचालनीय भाडेपट्टा किंवा वित्तीय भाडेपट्टा म्हणून वर्गीकृत करते. कंपनी परिचालनीय भाडेपटट्यांखालील प्राप्त झालेल्या भाडेपट्टा प्रदानास भाडेपट्टा कालावधीत सरळ रेषा धर्तीवर उत्पन्न म्हणून मान्य करते.

वित्तीय भाडेपटट्यांच्या बाबत भाडेपटट्यांत पट्टाकाराच्या नक्त गुंतवणुकीवर परताव्याचा सातत्यपूर्ण नियतकालिक दर प्रतिबिंबित करणाऱ्या आकृतीबंधावर आधारित भाडेपट्टा कालावधीसाठीचे वित्तिय उत्पन्न म्हणून मान्य करते.

जर सदर व्यवस्थेत भाडेपट्टा आणि भाडेपट्टा नसलेले घटक समाविष्ट असतील तर कंत्राटातील मोबदल्याचे वाटप करण्यासाठी कंपनी भालेमा ११५ ग्राहकांशी कंत्राटातून उत्पन्न लागू करते.

कंपनीने भालेमा ११६ स्वीकृत केले आहे व १ एप्रिल २०१९ ला सुरु होणाऱ्या वार्षिक प्रतिवेदन

कालावधीपासून ते प्रभावी असेल आणि आपल्या भाडेपटट्यांना सुधारित भूतलक्षी पध्दतीने सदर मानक लागू केले आहे. त्यानुसार, कंपनीने तुलनात्मक माहिती पुनर्कथित केलेला नाही. कंपनीने केलेली भाडेपट्टा कंत्राटे ही मुख्यत्वे सामान्य स्वरुपात आपला व्यवसाय संचालित करण्यासाठी

भाडेपटट्यांवर घेतलेल्या जमीन आणि इमारतींशी संबंधित आहेत. कंत्राटानुसार कंपनीची बदलत्या भाडेदराप्रती कोणतीही भाडेपट्टा बंधने आणि बांधिलकी नाही.

कंपनी ज्यात भाडेपट्टादार म्हणून वागते त्यात भालेमा ११६ भाडेपट्टाकरिता यास स्थित्यंतर करताना कोणतीही समायोजने करण्याची तिला आवश्यकता नाही. कंपनीने तिचे भाडेपट्टे हे प्रारंभिक लागू होण्याच्या दिनांकापासून भालेमा ११६ च्या अनुसार हिशोबात घेतले आहेत.

**२.१३ वस्तुसुच्यां व्यतिरिक्त अवित्तीय मत्तां कमी करणे (भालेमा ३६)**

भा ले मा ३६ ' मत्ता कपात ' मध्ये रोकड निर्मिती एककांना ताळेबंदाच्या दिनांकास ओळखले जाते. ताळेबंदाच्या दिनांकास जर हानीचे काही संकेत असतील आणि जर रोकड निर्मीती एककाची वहन रक्कम ही तिच्या वसूलयोग्य रक्कमेपेक्षा जास्त होत असेल (म्हणजेच योग्य मूल्यापेक्षा जास्त वजा विल्हेवाटीचा खर्च आणि वापरात असतानाचे मूल्य) तर हानी नुकसान मान्य केले जाते. वहन रक्कम ही वसूलयोग्य रक्कमेपर्यंत कमी केली जाते. आणि ही घट नफा आणि तोटा विवरणपत्रात हानी नुकसान म्हणून मान्य केली जाते. आधीच्या लेखांकन कालावधीत मान्य केलेल्या हानी नुकसान हे वसूलयोग्य रक्कमेच्या अंदाजात वाढ करण्याच्या मर्यादेपर्यंत उलट केले जाते. हानी मोजदादीनंतर हानी झालेल्या मत्तांच्या उर्वरित उपयुक्त आयुर्मानावर अशा मत्ताच्या सुधारित वहन मूल्यावर घसारा काढण्यात येतो.

**२.१४ वस्तुसुच्या (भालेमा २)**

वस्तूसुच्या ह्या खर्चापेक्षा कमी आणि नक्त वसूलयोग्य मूल्यास मूल्यांकित केल्या जातात. ज्या भारीत सरासरी पायावर आणि निव्वळ वसूल होणाऱ्या मूल्यावर निश्चित केल्या जातात.

वस्तुसुच्यांच्या खर्चात खरेदीचा खर्च आणि सदर वस्तूसूच्या सध्यांच्या ठिकाणी आणि स्थितीत आणण्यासाठी झालेला इतर खर्च समाविष्ठ असतात.

वस्तूसुच्या ह्या प्रथम आगमन प्रथम निर्गमन पध्दतीवर दिल्या जातात. टाकाऊ, कमी वापर होणारे आणि कामासाठी उपयुक्त नसणारे साठे हे साठयांच्या प्रत्यक्ष पडताळणीच्या वेळी ओळखले जातात. आणि जिथे आवश्यक असेल तिथे अशा साठयांसाठी तरतूद करण्यात येते.

**२.१५ महसूल मान्यता (भालेमा ११५)**

महसूल हा प्राप्त झालेल्या किंवा वसूल होऊ शकणाऱ्या मोबदल्याच्या योग्य मूल्याला मोजण्यात येतो. महसूल म्हणून प्रकट केलेल्या रक्कमा ह्या प्राप्ती, व्यापार सूट , सवलती यांचा निव्वळ रक्कम असतात.

**पारेषण उत्पन्न**

वितरण अनुज्ञप्ती धारकांकडून प्राप्त झालेल्या वीजेच्या पारेषणातून मिळालेले उत्पन्न हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या मासिक राज्यांतर्गत पारेषण आदेशाच्या आधारे लेखांकित केले जाते.

खुला प्रवेश आकार एसएसडीसी आकार, पुन्हा वेळापत्रक आखण्याचे आकार यासारख्या परिचालनातून मिळणारा महसूल हा म वी नि आ आदेशानुसार मान्य केला जातो.

**लाभांश उत्पन्न**

जेव्हा प्रदान स्वीकार करण्याचा हक्क प्रस्थापित होतो. तेव्हा लाभांश उत्पन्न मान्य केले जाते.

**व्याज उत्पन्न**

व्याजाचे उत्पन्न हे उपार्जित तत्वावर लेखांकित केले जाते.

**भंगाराची विक्री**

भंगाराच्या विक्रीतून उत्पन्न हे प्रत्यक्ष वसूलीनंतर लेखांकित केले जाते.

**पर्यवेक्षण आकार**

थेट ग्राहक अशंदानातून प्राप्त झालेले पर्यवेक्षण आकार हे उत्पन्न जमा होण्याच्या वर्षात मान्य केले जाते.

**इतर उत्पन्न**

यास उपार्जन तत्वावर मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा असे उत्पन्न अनिश्चित असते तेव्हा अपवाद केला जातो.

**२.१६ कर्मचारी लाभ (भालेमा १९)**

**अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ :-**

अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ हे ज्या वर्षात संबंधित सेवा देण्यात आल्या त्या वर्षात नफा आणि तोटा विवरणपत्रात सूट न दिलेल्या रक्कमेला मान्य करण्यात येतात.

**इतर दीर्घकालीन कर्मचारी लाभ बंधने :-**

अर्जित रजा आणि आजारपणाच्या रजांची दायित्वे जी १२ महिन्यांच्या आत संपूर्णपणे चुकती करणे अपेक्षीत नसतात त्यांची अपेक्षित भविष्यकालीन प्रदानांचे सध्यांचे मूल्य या रुपात मोजणी करण्यात येते जी विमा गणिती शास्त्र मूल्यांकनावर आधारलेल्या प्रक्षेपित एकक क्रेडिट पध्दतीचा वापर करुन प्रतिवेदनाच्या कालावधीच्या शेवटी कर्मचाऱ्यांनी पुरवलेल्या सेवांच्या संदर्भात करावयाची आहेत.

हे लाभ प्रतिवेदन कालावधीच्या शेवटी कॉर्पोरेट बंधपत्रांचे उत्पन्न वापरुन कमी किंमतीला नोंदवले जातात. ह्या बंधपत्रांचा कालावधी हा संबंधित बंधनाच्या कालावधीच्या जवळ पास समान असतो. अनुभव समायोजन आणि विमागणित गृहीतकांतील बदलाचा परिणाम म्हणून पुर्नमोजणी ही नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य करण्यात येते.

**नोकरीनंतरचे लाभ :**

कंपनी खालील नोकरीनंतरचे लाभ योजना परिचालित करते.

१) उपदानासारख्या व्याख्यांकित लाभ योजना आणि

२) भविष्य निर्वाह निधीसारख्या व्याख्यांकित अशंदान योजना

**व्याख्यांकित लाभ योजना :-**

उपदानासारख्या व्याख्यांकित कर्मचारी लाभांप्रति दायित्वे ही प्रक्षेपित एकक क्रेडिट पध्दत वापरुन वर्षाच्या शेवटी स्वतंत्र विमा गणितीदवारे विमागणितीय मूल्याकनांवर निश्चित केली जातात.

व्याख्यांकित लाभ बंधनांचे सध्याचे मूल्य हे संबंधित बंधनांच्या कालावधीच्या समान कालावधी असणाऱ्या शासकीय बंधपत्रांच्या प्रतिवेदनाच्या कालावधीच्या शेवटी बाजार उत्पन्नाचा संदर्भ घेऊन अंदाजित भविष्यातील रोख बाह्यप्रवाहास सवलत देऊ निश्चित करण्यात येते अनुभव समायोजन आणि विमागणितीय गृहितकांतील बदलातून उद्‌भवणारे पुनर्मोजदाद लाभ आणि हानी हे इतर सर्वसमावेशक उत्पन्नात थेटपणे, ज्या कालावधीत घडतात त्याच कालावधीत मान्य केले जातात. ते समभागातील बदलाचे विवरणपत्रात आणि ताळेबंदात राखून ठेवलेले उत्पन्न याखाली समाविष्ट आहेत.

**व्याख्यांकित अंशदान योजना -**

भविष्य निर्वाह निधीसारख्या व्याख्यांकित अंशदान योजना ह्या जशा ओढवतील तशा नफा आणि तोटा विवरणपत्रात खर्ची टाकल्या जातात. तसेच विशिष्ट कर्मचाऱ्याकरिता भविष्य निर्वाह निधीसाठीचे मासिक अशंदान हे स्वतंत्र ट्रस्टला केले जाते. जे गटातील इतर कंपन्याचा निधी सुध्दा व्यावस्थापित करते. ट्रस्टद्वारे देय व्याजाचा किमान दर हा शासनाने अधिसूचित केलेल्या दराशी सुसंगत असतो. काही तूट उद्भावली तर ती भरुन काढण्याचे कंपनीवर बंधन आहे.

**२.१७ परकीय चलन व्यवहार (भालेमा २१)**

**१) कार्यात्मक आणि सादरीकरण चलन**

वित्तीय विवरणपत्रे भारतीय रुपयांमध्ये सादर करण्यात आली आहेत जे कंपनीचे कार्यात्मक आणि सादरीकरण चलन आहे.

**२) व्यवहार आणि शिल्लक**

परकीय चलनातील व्यवहार हे व्यवहाराच्या दिनांकास प्रचलित विनिमय दरास मान्य करण्यात येतात. परकीय चलन व्यवहार पूर्ण झाल्यानंतर मिळालेल्या नफा किंवा झालेले नुकसान हे नफा आणि तोटा विवरण पत्रात मान्य केले जातात.

आर्थिक परकीय चलन मत्ता आणि दायित्वे ही वर्षाच्या शेवटीच्या चलन दरांना रुपांतरित केली जातात आणि परिणाम स्वरुपी चलन फरक हे नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केले जातात.

**२.१८ सहयोगी कंपन्या आणि संयुक्त साहसी कंपन्यांमध्ये गुंतवणूक (भालेमा २७)**

**एकत्रीकरणाचे तत्त्व**

**समभाग पद्धत -**

समभाग पद्धतीत प्रारंभिक मान्यतेनंतर सहयोगी किंवा संयुक्त साहस कंपनीत गुंतवणूक ही किंमतीला मान्य केली जाते आणि ताब्याच्या दिनांकानंतर गुंतवणूक केलेल्या कंपनीच्या नफा किंवा तोट्यातील गुंतवणूकदार कंपनीचा हिस्सा मान्य करण्यासाठी वहन मूल्य वाढवले किंवा कमी केले जाते. गुंतवणूक केलेल्या संस्थांच्या नफा किंवा तोट्यातील कंपनीचा हिस्सा हा कंपनीच्या नफा किंवा तोटा विवरणपत्रात मान्य केला जातो. गुंतवणूक केलेल्या संस्थेकडून प्राप्त झालेल्या वाटप रकमा गुंतवणूकीचे वहन मूल्य कमी करतात. गुंतवणूक केलेल्या संस्थांच्या इतर सर्वसमावेशक उत्पन्नातील बदलातून उद्‌भवणाऱ्या अशा संस्थातील कंपनीच्या प्रमाणशीर हिश्यातील बदलाकरिता वहनमूल्यातील समायोजनेसुद्धा आवश्यक होऊ शकतात. ह्या बदलातील कंपनीचा हिस्सा कंपनीच्या इतर सर्वसमावेशक उत्पन्नात मान्य केला जातो.

**२.१९ अ) शासकीय अनुदान (भालेमा २०)**

शासनाकडून प्राप्त अनुदाने ही त्यांच्या योग्य मूल्यास मान्य केली आहेत. व इथे अनुदान प्राप्त होईल आणि कंपनी सर्वजोडलेल्या अटीची पूर्तता करेल असे उचित आश्वासन आहे.

जेव्हा एखादे अनुदान खर्चाच्या एखाद्या बाबीशी संबंधीत असेल जेव्हा संबंधित खर्च ज्या कालावधीसाठी भरपाई देण्याच्या हेतूने खर्ची टाकला जातो.
त्या कालावधीवर सदर बाब ही शास्त्रोक्त पध्दतीने नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केली जाते.

मालमत्ता, यंत्र आणि उपकरण यांच्या खरेदीशी संबंधित शासकीय अनुदाने ही स्थगित उत्पन्न या रुपात चालू नसलेलया दायित्वात समाविष्ट केली जातात. आणि संबंधित मत्तेच्या अपेक्षित आयुर्मानावर सरळ रेषा पध्दतीने नफा आणि तोटा विवरणपत्रात जमा केली जातात.

**ब) महाराष्ट्र विद्युत विभाग अभिकरण (मेडा) प्रकल्पांचे लेखाकंन:-**

अपारंपरिक स्त्रोताकडून विद्युत निर्मितीला प्रोत्साहन देण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार खाजगी विकासकांनी विकास केलेल्या अशा विद्युत निष्कासन प्रकल्पांचा ५० टक्के खर्च कंपनी करेल आणि उर्वरित ५० टक्के खर्चाचा मेडा विकासकांना परतावा येईल.

**क) ओआरसी कामांसमोर (ओआरसी योजना) ग्राहकांकडून प्राप्त अंशदानांचे लेखांकन**

प्राप्त झालेल्या आऊटराईट ग्राहक अंशदानांना खालीलप्रमाणे वागवण्यात येत आहे.

१) स्थिर मत्तांच्या निर्मिती करिता करावयाच्या खर्चाकरिता जर खर्चाच्याआधीचअग्रीम प्राप्त झाला असेल तर त्या स्थिर मत्तांची निर्मिती पूर्ण होईपर्यंत त्यास चालू नसलेले दायित्व म्हणून मानण्यात येत आहे.

२) जर फक्त पर्यवेक्षण आकार म्हणून अंशदान प्राप्त झाले असेल तर प्राप्त झालेल्या वर्षात त्यास इतर उत्पन्न म्हणून मान्य करण्यात येत आहे.

३) जर आधीच निर्माण केलेल्या मत्त्याकरिता अंशदान प्राप्त झाले असेल तर त्यास प्राप्त झालेल्या वर्षात सदर मत्त्या नुसार कमी करण्यात येते.

**२.२० तरतुदी आणि आकस्मिक दायित्वे (भालेमा ३७)**

**अ) तरतुदी -**

कंपनीला जेव्हा भूतकाळातील घटनेचा परिणाम म्हणून चालू बंधन कायदेशीर किंवा संरचनात्मक असते. तेव्हा हे बंधन भागवण्यासाठी आर्थिक लाभ समाविष्ट करणारे संसाधनाचे बाह्य प्रवाह आवश्यक असतील आणि बंधनाच्या रक्कमेतून एक विश्वासार्ह अंदाज काढला जाऊ शकतो अशा वेळी तरतुदी मान्य केल्या जातात. जर रक्कमेच्या समय मूल्याचा परिणाम प्रत्यक्ष असेल तर तरतुदीना सवलत दिली जाते. सवलत प्रगट करणे हे नफा आणि तोटा विवरणपत्रात वित्तीय खर्च म्हणून मान्य केला आहे. ताळेबंदाच्या प्रत्येक दिनांकास तरतुदींचे पुनर्विलोकन केले जाते. आणि सध्यांचे सर्वोत्तम अंदाज प्रतिबिबिंत करण्यासाठी समायोजित केले जातात.

**ब) आकस्मिकता :**

मागील  घटनातून काही संभाव्य बंधन उदभवणार असेल तर आकस्मिक दायित्वे प्रकट केली जातात. ज्यांचे अस्तिव हे कंपनीच्या संपूर्ण नियंत्रणात नसलेल्या एक किंवा अनेक अनिश्चित भविष्यकालीन घटनांच्या घडणे किंवा न घडण्यामुळे निश्चित केले जाते. किंवा मागील घटनांमुळे उदभवणाऱ्या सध्यांच्या बंधनांमुळे जिथे तो चुकता करण्यासाठी संसाधनांचा प्रवाह आवश्यक असेल अशी एकदर शक्यता नसेल किंवा जिथे विश्वासार्ह रक्कम करायची आहे. आकस्मित दायित्वा माहिती वित्तीय विवरणपत्रांवरची टिपांमध्ये प्रकट केलेली असते. तिथे आकस्मिक मत्ता मान्य केल्या जात नाहीत. यांचे प्रत्येक ताळेबंदाच्या दिनांकास पुनर्विलोकन केले जाते आणि सध्याचे व्यवस्थापकीय अंदाज प्रतिबिंबित करण्यासाठी समायोजित केली जातात.

**२.२१ योग्य मूल्य मोजणी (भालेमा ११३)**

कंपनी काही विशिष्ट वित्तीय साधनांना प्रत्येक प्रतिवेदन दिनांकांस योग्य मुल्यांस मोजते. काही विशिष्ट लेखाकंन धोरणांना आणि प्रगटनांना वित्तीय आणि वित्तीय नसलेल्या अशा दोन्ही मत्ता आणि दायित्वांकरिता योग्य मूल्यांची मोजणी आवश्यक असते. योग्य मूल्य ही एक अशी किंमत असते. जी तत्वत: मोजणी दिनांकास बाजार सहभागीदार दरम्यान क्रम असलेल्या व्यवहारात एक दायित्व हस्तांतरित करण्यासाठी प्रदान केलेली किंवा एक मत्ता विकण्यासाठी मिळालेली किंमत असते. तत्वत: मोजणी दिनांक नसेल तर त्या दिनांकास कंपनीला ज्या सर्वात उपयुक्त बाजारातील व्यवहारात दायित्वाचे योग्य मूल्य हे त्याच्या कामगिरी न करण्याचा धोका सुध्दा प्रतिबिबित करतो.

प्रारंभी मान्यतेच्या वेळी एखाद्या वित्तीय साधनाच्या योग्य मूल्याचा सर्वोत्तम अंदाज हा सामान्यत:व्यवहाराची किंमत म्हणजेच दिलेल्या किंवा मिळालेल्या मोबदल्याचे योग्य मूल्य हे असते. जर कंपनी हे निश्चित करते. की प्रारंभी मान्यतेच्या वेळी योग्य मूल्य हे व्यवहाराच्या किंमतीपेक्षा भिन्न आहे. आणि सदर योग्य मूल्य हे त्या समान मत्ता किंवा दायित्वाकरिता क्रियाशील बाजारातील उदधृत केलेल्या किंमतीने व्यक्त झालेले नाही.किंवा वेध घेतल्या जाऊ शकणाऱ्या बाजारातील दृश्य आकडेवारीच फक्त वापरणाऱ्या मूल्यांकन तंत्रावर ही आधारलेली नाही तेव्हा सदर वित्तीय साधन हे सुरुवातीला योग्य मूल्याला मोजली जाते. आणि प्रारंभ मान्यतेच्या वेळी असलेल्या योग्य मूल्य आणि व्यवहाराची किंमत यातील फरक लांबणीवर
टाकण्यासाठी समायोजित केले जाते.

या पाठोपाठ हा फरक वित्तीय साधनाच्या आयुर्मानावर उचित पध्दतीने नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केला जातो. पण वेध घेतला जाऊ शकणाऱ्या बाजारातील (दृश्य आकडेवारीच्या) मूल्यांकनाला संपूर्णपणे आधार देण्याआधी किंवा व्यवहार बंद केला जाण्याआधी हे केले जाते.

कोणत्याही मत्ता किंवा दायित्वाचे योग्य मूल्य मोजत असताना कंपनी शक्य होईल तितकी बाजारातील दृश्य आकडेवारी वापरते. योग्य मूल्ये ही योग्य मूल्य उतरंडीतील विभिन्न स्तरावर वर्गीकृत केली जातात. जे खालील प्रमाणे मूल्यांकन तंत्रात वापरलेल्या माहितीवर आधारित असते.

स्तर - १ एकसमान मत्ता किंवा दायित्वांकरिता क्रियाशील बाजारातील उदधृत किंमती (समायोजित न केलेल्या )

स्तर - २ मध्ये समाविष्ट उदधृत किंमती व्यक्तीरिक्त देण्यात आलेली माहीती जी एकतर थेट (म्हणजे किंमतीच्या रुपात ) किंवा अप्रत्यक्ष (म्हणजे किंमतीतून मिळवलेली) स्वरुपात मत्ता किंवा दायित्वांकरिता स्पष्ट व दृश्य आहे.

स्तर-३ जो दृश्य किंवा स्पष्ट बाजार आकडेवारी (दृश्य नसलेली माहिती) वर आधारलेली नसलेल्या मत्ता किंवा दायित्वा करिता माहिती.

जेव्हा एवाद्या साधनाकरिता क्रियाशील बाजारात उदधृत किंमत उपलब्ध असते. तेव्हा कंपनी ती किंमत वापरुन त्या साधनाचे योग्य मूल्य मोजते जर सदर मत्ता किंवा दायित्वाकरिता पुरेशा वारंवारतेने आणि आकारमानाने व्यवहार होतात.आणि सतत स्वरुपात किंमतीची माहिती पुरवली जाते.तर बाजार हा क्रियाशील आहे.असे मानले जाते.जर क्रियाशील बाजारात उदधृत केलेली किंमत नसेल तर संबंधित दृश्य माहितीचा महत्तम वापर करणाऱ्या आणि दृश्य नसलेल्या माहितीचा किमान वापर करण्याच्या मूल्यांकन तंत्राचा कंपनी वापर करते. एखाद्या व्यवहाराची किंमत काढण्यासाठी बाजार सहभागी पक्ष हे विचारात घेत असलेले सर्व घटक हे सदर निवडलेले मूल्यांकन तंत्र समाविष्ट करते.

कंपनी नियमितपणे लक्षणीय रित्यास्पष्ट नसलेल्या माहितीचे आणि मूल्याकन समायोजनाचे पूनर्विलोकन करते. जर योग्य मूल्ये मोजण्यासाठी ब्रोकर कोट किंवा प्राईसिंग यासारख्या तिसऱ्या पक्षाची माहिती वापरली गेली तर ही मूल्यांकने कोणत्या योग्य मूल्य उतरंडीतील स्तरावर वर्गीकृत करणे आवश्यक

आहे त्या स्तरासह मालेमाच्या आवश्यकता ही मूल्यांकन पूर्ण करतात.या निष्कर्षाला आधार देण्यासाठी कंपनी ह्या तिसऱ्या पक्षांकडून मिळालेल्या पुराव्याचे निर्धारण करते.

**२.२२ वित्तीय मत्ता (भालेमा ३२)**

**प्रारंभिक मान्यता आणि मोजणी**

व्यापार प्राप्य रकमा आणि ऋण हमी रक्कमा ह्या जेव्हा प्रथम अस्तित्वात येतात.तेव्हा त्यांना प्रारंभिक मान्यता दिली जाते. जेव्हा कंपनी ही वित्तीय साधनाच्या कंत्राटीय तरतूदीचा एक पक्ष होते. तेव्हा इतर सर्व वित्तीय मत्ता ह्या प्रारंभी मान्य केल्या जातात. त्या वित्तीय मत्ता नफा आणि तोटा द्वारा योग्य मूल्याला नंतरच्या काळात मोजल्या जातात त्यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व वित्तीय मत्ता ह्या योग्य मूल्य अधिक सदर वित्तीय मत्ताच्या संपादणुकीला बहाल केले जाऊ शकतात असे व्यवहार खर्च अशा मूल्यास सुरुवातीला मान्य केल्या जातात.

**नंतरच्या कालातील मोजणी**

ही संबंधित वित्तीय मत्तांच्या वर्गीकरणाच्या संदर्भाने निश्चित केली जाते. वित्तीय मत्ता व्यवस्थापित करण्यासाठीचा व्यवसाय नमुना आणि वित्तीय मत्त्याची कंत्राटीय रोकडता प्रवाह वैशिष्टये यांच्या आधारे कंपनी कर्जफेड तरतुदी नुसार नंतरच्या काळात मोजलेली आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्नादवारा योग्य मूल्य किंवा नफा आणि तोटा दवारा योग्य मूल्य या रुपात वित्तीय मत्ता वर्गीकृत करते

**कर्जफेड खर्चा नुसार साधने**

जर खाली दिलेल्या दोन्ही शर्ती पूर्ण झाल्या तर कर्जफेड खर्चाला ऋण साधनाची मोजणी केली जाते. अशा व्यवसाय नमुन्यात मत्ता धरुन ठेवली जाते जिचे उद्दिष्ट:-

कंत्राटीय रोकडता प्रवाह गोळा करण्यासाठी मत्ता धरुन ठेवणे आणि

- मत्याचा कंत्राटीय कालावधी विनिर्दिष्ट दिनांकांना जी प्रलबित मुद्दल रक्कमांवर (मुद्दल आणि व्याजाचे प्रदान असते अशा रोकडता प्रवाहांना उभारणी देतात.

प्रारंभिक मोजणी नंतर अशा वित्तीय मत्तांची प्रभावी व्याज दर पध्दत वापरुन कर्जफेड खर्चाला नंतरच्या काळात मोजणी केली जाते. प्रभावी व्याज दर पध्दतीचा एकात्मिक भाग असणाऱ्या कोणत्याही सूट किंवा प्रिमियम आणि शुल्क किंवा खर्च हे विचारात घेऊन कर्जफेड तरतूद खर्च परिगणित केला जातो. प्रभावी व्याज दर कर्जफेड तरतुद ही नफा आणि तोटा विवरणपत्रात वित्त उत्पन्नात समाविष्ट केले जाते. हानीतून उदभवणारे नुकसान हे नफा व तोटा विवरण पत्रात मान्य केले जातात.

**इतर सर्वसमावेशक उत्पन्नाद्वारा योग्य मूल्याला ऋण साधने (FVOCI)**

जर खाली दिलेल्या दोन्ही अटी पूर्ण होत असतील तर इतर सर्वसमावेशक उत्पन्नाद्वारा योग्य मूल्याला ऋण साधने मोजले जाते.

- सदर मत्ता व्यवसाय नमुन्यात धरून ठेवली जाते जिचे उद्दिष्ट कंत्राटीय रोकडता प्रवाह गोळा करणे आणि वित्तीय मत्ता विकणे याद्वारे व
- प्रलंबित मुद्दल रकमेवर मुद्दल आणि व्याजाचेच फक्त प्रदाने आहेत अशा रोकडता प्रवाहाचे विनिर्दिष्ट दिनांकांना कारण होणाऱ्या मत्ताच्या कंत्राटीय कालावधीद्वारे अशा दोन्ही बाबीद्वारे साध्य केली जाते.

प्रारंभिक मोजणीनंतर ह्या मत्ता नंतरच्या कालावधीत योग्य मूल्याला मोजल्या जातात. प्रभावी व्याज पध्दतीखाली व्याजाचे उत्पन्न परकीय चलन प्राप्ती आणि नुकसान आणि हानी नुकसान ह्या बाबी नफा आणि तोटा विवरण पत्रात मान्य केल्या जातात. इतर निव्वळ प्राप्ती आणि नुकसान हे इतर सर्वसमावेशक उत्पन्नात मान्य केले जाते.

**नफा आणि तोटा द्वारा योग्य मूल्याला ऋण साधन :- (FVTPL)**

नफा आणि तोटा द्वारा योग्य मूल्य हा ऋण साधनांना अवाशिष्ट प्रकार आहे. जे ऋण साधन कर्जफेड तरतूद खर्चाला वर्गीकरणासाठीचे किंवा - म्हणूनचे निकष पूर्ण करत नाही त्याचे FVTPL म्हणून वर्गीकरण केले जाते.

प्रारंभिक मोजणीनंतर कोणत्याही व्याज उत्पन्नासह कोणतेही योग्य मूल्य बदल परकीय चलन लाभ आणि नुकसान , हानी नुकसान आणि इतर निव्वळ प्राप्ती आणि नुकसान यांना नफा तोटा विवरणपत्रात मान्य केले जाते.

**समभाग गुंतवणूक**

भालेमा १०९ च्या कक्षेतील सर्व समभाग गुंतवणुकी योग्य मूल्यास मोजण्यात येतात. व्यापाराकरिता धरून ठेवलेली अशी समभाग साधने ही FVTPL म्हणून वर्गीकृत करण्यात येतात. इतर सर्व अशा समभाग साधनांकरिता कंपनी यांनी एकतर FVOCL किंवा FVTPL म्हणून वर्गीकृत करण्याचा निर्णय घेते. कंपनी अशी निवड साधन-बरं-साधन करते. सदर वर्गीकरण प्रारंभिक मान्यतेवर करण्यात येते आणि ते रद्द करता न येणारे असते. FVOCL म्हणून वर्गीकृत वेळेला समभाग साधनासांठी लाभांश वगळून, साधनांवरील सर्व योग्य मूल्यबदल हे इतर सर्वसमावेशक उत्पन्नात मान्य केलेले असतात. अशा समभाग साधनांवरील लाभांश हे नफा किंवा तोटा विवरणपत्रात मान्या केलेले असतात. FVTPL प्रकारांतर्गत समाविष्ट असलेली समभाग साधने ही नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केलेल्या सर्व बदलासह योग्य मूल्याला मोजली जातात.

**मान्यता काढून घेणे**

एवादी वित्तीय मत्ता (किंवा जिथे लागू असेल तिथे, वित्तीय मत्त्याच्या भाग किंवा समान वित्तीय मत्याच्या गटाचा भाग) ही तेव्हा मुख्यत:अमान्य (म्हणजेच कंपनीच्या ताळेबंदातून काढून टाकणे) केली जाते जेव्हा त्या मत्यापासून रोकडता प्रवाह मिळवण्याचा हक्क संपलेला असतो

किंवा कंपनीने ''पासथ्रु'' व्यवस्थेखाली मत्यापासून रोकडता प्रवाह स्वीकारण्याचे तिचे हक्क तिसऱ्या पक्षाला हस्तांतरित केले आहेत किंवा कोणताही भौतिक विलंब न लावता पूर्ण रूपात स्वीकृत रोकडता प्रवाह प्रदान करण्याचे बंधन स्वीकारले आहेत.

आणि एकतर

- कंपनीने त्या मत्याचे सर्व धोके आणि लाभ हे भरीव स्वरूपात हस्तांतरित केले आहेत किंवा

– कंपनीने त्या मत्त्याचे सर्व धोके आणि लाभ हस्तांतरितही केलेले नाहीत किंवा राखूनही ठेवलेले नाही पण सदर मत्त्याचे नियंत्रण हस्तांतरित केले आहे.

अमान्यता केल्यावर सर्व ऋण साधनांवर FVOCI ला मोजणी केलेल्या ऋण साधनांव्यतिरिक्त आणि समभाग साधनांवरील कोणतेही लाभ किंवा नुकसान हे नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य करण्यात येतात. FVTPL ला मोजणी केलेल्या ऋण साधनांच्या संदर्भातील लाभ आणि नुकसान आणि जे OCI मध्ये संचित झाले आहेत त्यांचे अमान्यते नंतर नफा किंवा तोट्याला पुनर्वर्गीकरण करण्यात येते. FVOCI येथे मोजण्यात आलेल्या समभाग साधनांवरील लाभ किंवा नुकसान जे OCI मध्ये मान्य आणि संचित केलेले आहे ते मान्यता काढून घेतल्यानंतर नफा किंवा तोटा येथे पुनर्वर्गीकृत केले जात नाही.

**वित्तीय मत्तांची हानी**

भालेमा १०९च्या अनुसार FVOCI येथे मोजलेल्या ऋण साधनांवरील आणि कर्जफेड तरतूद खर्चाला मोजलेल्या वित्तिय मत्तांवरील हानी नुकसानीच्या मोजणी आणि मान्यता याकरिता कंपनी ही अपेक्षित पत नुकसान ECL नमुना लागू करते. व्यापार प्राप्त रकमांवरील नुकसान सवलत ही प्रत्येक प्रतिवेदन दिनांकास पूर्ण कालीक ECL च्या समान रकमेला सरलीकृत पध्दत अनुसरून मोजली जाते. ऋण रोख आणि बँक शिल्लक यासारख्या इतर वित्तीय मत्तांच्या संदर्भात जर पत धोक्यात लक्षणीय परिस्थिती खालावलेली नसेल तरच नुकसान सवलत ही १२ महिन्यांच्या ECL ला मोजली जाते कारण मत्ताची प्रारंभिक मान्यता ही प्रतिवेदन दिनांकास कमी पत धोका प्राप्त करून घेण्यासाठी निश्चित केली जाते.

कंपनीने व्यापार प्राप्त रक्कमा आणि इतर वित्तिय मत्तांवर अपेक्षित पत नुकसान ECLमान्य केलेले आहे.ECLमध्ये मुख्यत्वे समय नुकसान (संपत्ती मूल्य) आणि पत नुकसान या दोन मुख्य घटकांचा समावेश असतो. समय नुकसान हे उचित सवलत दर विचारात घेऊन परिगणित केले जाते.

व्यवस्थापनाचा विश्वास आहे की, कर्मचारी लाभाचे विमागणितीय मूल्यांकन निश्चित करताना वापरण्यात आलेला दर हा संग्रहणातील विलंबामुळे त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या नुकसानीचा स्थितीदर्शक दर आहे. हा दर वर्षात एकदा पुनर्विलोकीत केला जातो. पत नुकसान हे ताळेबंदाच्या दिनांकानुसार १० वर्षांचा कालावधी असलेल्या कॉर्पोरेट बॉण्डच्या पत विस्ताराच्या आधारे परिगणित केले जाते.

व्यापार प्राप्त रक्कमा ह्या ECL ला परिगणित करण्यासाठी खालील प्रमाणे तीन गटांमध्ये वर्गीकृत केल्या जातात.

१. वितरण अनुज्ञाप्ती धारक (गट कंपन्या व इतर)

२. खुला प्रवेश ग्राहक (दीर्घ मुदत व लघु मुदत)

३. नियमित (इतर) ग्राहक

ह्या सर्व वर्गासाठी समय नुकसान हे सारखेच मानले जाते तर पत नुकसान हे कॉर्पोरेट बॉण्ड करिता पत विस्ताराच्या (FIMMDA ने प्रसिध्द केलेल्या) आधारे पुरवले जाते. वरील तिन्ही पैकी प्रत्येक गटासाठी व्यवस्थापनाने उचित पत गुणांकन अंदाजित केले आहे. गट कंपन्याच्या इतर प्राप्त रक्कमांवरील ECL हा समय नुकसानीच्या मर्यादेपर्यंत पुरवला जातो.

**२.२३ वित्तीय दायित्वे (भालेमा ३२)**

**प्रारंभिक मान्यता आणि मोजणी**

वित्तीय दायित्वे यांना जेंव्हा कंपनी कंत्राटातील तरतुदी नुसार एक बाजू (पार्टी) असेल, तेव्हा प्रारंभिक मान्यता दिली जाते. प्रारंभिक मान्यते नंतर वित्तिय दायित्वाचे वर्गीकरण केले जाते कारण वित्तीय दायित्वे नफा किंवा तोटा या मध्ये रास्त मूल्य या प्रमाणे तसेच योग्य कर्ज फेढीच्या खर्चाच्या नुसार नोंदल्या जातात.

**नंतरची मोजणी**

नंतरची मोजणी ही संबंधित वित्तीय दायित्वांच्या वर्गीकरणाच्या संदर्भात निश्चित करण्यात येते.

वित्तीय दायित्वांची मोजणी त्यांच्या वर्गीकरणांवर कशी अवलंबून असते त्याचे वर्णन येथे खाली दिलेले आहे:

नफा किंवा तोट्यातील रास्त मुल्यानुसार वित्तीय दायित्वे :

नफा किंवा तोटा यामध्ये व्यापाराची धारण केलेली वित्तीय दायित्वे त्यांच्या रास्त मुल्यानुसार तसेच वित्तीय दायित्वांच्या प्रारंभीच्या मान्यतेनंतर नफा किंवा तोट्याती रास्त मुंल्यांप्रमाणे निश्चित करुन समाविष्ट केली जातात.

वेगळी केलेली म्हणजे सेपरेटेड, एम्बेडेड डेरिव्हेटीव्हज् यांचे वर्गीकरण सुद्धा "व्यापारासाठी धारण केलेली"असे केले जाते. मात्र जर त्यांचा उद्देश 'हेजिंग इन्स्ट्रमेंटस्' असा नसावा. व्यापारासाठी धारण केलेल्या दायित्वापासूनची प्राप्ती किंवा हानी यांना नफा व तोटा पत्रकात मान्यता देण्यात येते.

**उसनवारी**

प्रारंभिक मान्यतेनंतर व्याजाची कर्जे व उसनवारी यांची नंतरची मोजणी कर्जफेडीच्या खर्चानुसार केली जाते. त्यासाठी प्रभावी व्याजदर (ई आय आर) पद्धत वापरली जाते. जेव्हा दायित्वांची मान्यता रद्द होते तसेच ई आय आर पद्धतीची कर्ज फेड प्रक्रिया केली जाते, तेंव्हा नफा व तोटा पत्रकात प्राप्ती व हानी यांना मान्यता दिली जाते. कर्ज फेडीच्या खर्चाचा हिशोब करतांना, कर्ज मिळविण्याठी कोणतीही सवलत किंवा अधिमुल्य दिले असेल तर त्यांचा, तसेच ई आय आर चा एकात्मिक भाग असलेले शुल्क किंवा अन्य खर्चांचा विचार केला जातो. नफा व तोटा पत्रकात कर्ज फेडीच्या ई आय आर चा वित्तीय खर्चात समावेश करण्यात येतो.

**उसनवारीचा खर्च**

जेव्हा एखादी मत्ता वापरासाठी ताब्यात घेणे, बांधकाम करणे किंवा उत्पादन करणे यासाठी बराच वेळ लागणार असतो किंवा मत्तेच्या भागाच्या खर्चाचे व विक्रीचे भांडवलीकरण केले जाते, तेव्हा यासाठीच्या थेट खर्चाला "उसनवारी खर्च" असे संबोधले जाते. या कालावधीत इतर सर्व उसनवारी खर्च केले जातात. उसनवारीचे निधी मिळवण्यासाठी लागणारे व्याज व इतर खर्च यांचाही समावेश उसनवारीच्या खर्चात केला जातो. याशिवाय उसनवारी खर्चाच्या समायोजनेसाठी त्या मर्यादत विनिमयातील फरकांचा समावेशही उसनवारी खर्चात होतो.

**नफा किंवा तोटा द्वारा योग्य मूल्यास वित्तीय दायित्वे (FVTPL)**

जर एखादे वित्तीय दायित्व हे प्रारंभिक मान्यतेच्या वेळी व्यापारासाठी धरुन ठेवले असेल किंवा तसे निर्देशित करण्यात आले असेल तर त्याला नफा किंवा

तोटा द्वारा योग्य मूल्यास वर्गीकृत करता येते. FVTPL येथील वित्तीय दायित्वे ही कोणत्याही व्याज खर्चासह आणि बदलासंह योग्य मूल्यास मोजली जातात आणि ती नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केली जातात.

**कर्जफेड तरतूद खर्चाला वित्तीय दायित्वे**

प्रारंभिक मान्यतेनंतर FVTPL म्हणून वर्गीकृत केलेल्या वित्तीय दायित्वांव्यतिरिक्त इतर वित्तीय दायित्वे ही प्रभावी व्याज दर पद्धत वापरुन कर्जफेड तरतूद खर्चाला नंतरच्या कालावधीत मोजली जातात.

कर्जफेड तरतूद खर्च हा EIR चा एकात्मिक भाग असलेल्या कोणत्याही सूट किंवा प्रिमियम आणि शुल्क किंवा खर्च हे विचारात घेऊन परिगणित केला जातो. EIR पद्धत वापरुन केलेली कर्जफेड तरतूद ही नफा आणि तोटा विवरणपत्रात वित्तीय खर्च म्हणून समाविष्ट केली जाते.

**अ-मान्यता**

जेव्हा दायित्वाखालील बंधनाची विल्हेवाट लावण्यात येते किंवा ते रद्द होते किंवा कालबाह्य होते तेव्हा सदर वित्तीय दायित्व अ-मान्य केले जाते. जेव्हा त्याच कर्जदाराकडून सध्याच्या वित्तीय दायित्वाऐवजी दुसरे दायित्व भरीव स्वरुपात भिन्न अटींवर बदली म्हणून दिले जाते किंवा सध्याच्या दायित्वाच्या शर्ती लक्षणीय रित्या सुधारित करण्यात येतात तेव्हा असा बदल किंवा सुधारणा ह्या मूळ दायित्वाची अ-मान्यता आणि नव्या दायित्वाची मान्यता म्हणून मानण्यात येते. संबंधित वहन रकमेतील फरक हा नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य करण्यात येतो.

**वित्तीय साधनांची भरपाई**

वित्तीय मत्ता आणि वित्तीय दायित्वे यांच्या निव्वळ रकमाच्या भरपाईसाठी व्याज अमलबजावणी करता येईल किंवा समझोता करण्याचा कायदेशीर अधिकार असेल आणि निव्वळ रक्कम ताळेबंदात नोंदली असेल किंवा एकचवेळ मत्ताची वसूली आणि दायित्वाची तडजोड करता येत असेल तर त्या मत्ता व दायित्वाची भरपाई करता येते.

**२.२४ उत्पन्नावर कर - (भालेमा १२)**

लागू होणाऱ्या आयकर दरावर आधारलेल्या सध्याच्या कालावधीच्या करपात्र उत्पन्नावर देय कर हा त्या कालावधीकरिता असलेला आयकर खर्च किंवा फेडिट हा आहे. जो तात्पुरत्या फरकांना आणि न वापरलेल्या कर नुकसानीला बहाल केल्या जाऊ शकणाऱ्या स्थगित कर मत्ता आणि दायित्वातील बदलांनी समायोजित केला जातो.

जिथे कंपनी आणि तिच्या दुय्यम कंपन्या आणि सहयोगी कंपन्या परिचालन करतात आणि करपात्र उत्पन्न निर्माण करतात अशा देशांमध्ये प्रतिवेदन कालावधीच्या शेवटी अधिनियमित केलेल्या किंवा भरीव स्वरुपात अधिनियमित केलेल्या कर अधिनियमांच्या आधारे सध्याचा आयकर आकार परिगणित केला जातो. ज्या परिस्थितीत लागू असणारे कर विनियम हे अर्थांतरणाच्या अधीन असतात अशा परिस्थितीच्या संदर्भात कर विवरणपत्रात घेतलेल्या भूमिकांचे व्यवस्थापन ठराविक कालावधीने मूल्यमापन करते.

कर प्राधिकाऱ्यांना देय असलेल्या अपेक्षित रकमांच्या आधारे विनियोजन ते स्थापित करते.

स्थगित आयकराची पूर्ण स्वरुपात तरतूद केली जाते त्यासाठी विवरणपत्रात मत्ता आणि दायित्वे यांचा कर पाया आणि त्यांची वहन रक्कम यांच्या दरम्यान तात्पुरत्या फरकावरील दायित्व पद्धत वापरली जाते. स्थगित आयकर हा प्रतिवेदनाच्या कालावधीच्या शेवटी अधिनियमित केलेल्या किंवा भरीव स्वरुपात अधिनियमित केलेल्या कर दरांचा (आणि अधिनियमांचा) वापर करुन निश्चित केला जातो. आणि जेव्हा संबंधित स्थगित आयकर मत्ता वसूल केला जातो किंवा स्थगित आयकर दायित्व चुकते केले जाते तेव्हा तो निश्चित केलेला आयकर लागू करणे अपेक्षित असते.

सर्व वजातयोग्य तात्पुरते फरक आणि नुकसान याचा वापर करण्यासाठी भविष्यकालीन करपात्र रक्कमा उपलब्ध असतील अशी शक्यता असेल तरच त्या फरक आणि न वापरलेल्या कर नुकसानीकरिता स्थगित कर मत्ता मान्य केल्या जातात. सध्याचा कर मत्ता आणि दायित्वे यांची भरपाई करण्याचा कायदेशीर अंमलात येऊ शकणारा हक्क असेल आणि जेव्हा स्थगित कर शिल्लकी ह्या त्याच कराधान प्राधिकाऱ्याशी संबंधित असतात, तेव्हा स्थगित कर मत्ता आणि दायित्वांचे प्रतितोलन केले जाते. जिथे कंपनीला प्रतितोलन करण्याचा कायदेशीररीत्या अंमलात येऊ शकणारा हक्क असेल आणि निव्वळ पद्धतीने तो चुकता करणे किंवा एकाच वेळी मत्ता वसूल करणे आणि दायित्व चुकते करणे हा कंपनीचा उद्देश असेल तर चालू कर मत्ता आणि कर दायित्वांचे त्या प्रकरणात प्रतितोलन केले जाते. चालू आणि स्थगित कर हे अनुक्रमे इतर सर्वसमावेशक उत्पन्नात किंवा थेट स्वरुपात समभागात मान्य केलेल्या बाबींशी संबंधित आहेत. ह्या मर्यादेव्यतिरिक्त ते नफा आणि तोटा विवरणपत्रात मान्य केले जातात. या प्रकरणात हा कर अनुक्रमे इतर सर्वसमावेशक उत्पन्नात किंवा थेट समभागात सुद्धा मान्य केला जातो.

जेव्हा गटातील प्रत्येक संस्था ही विनिर्दिष्ट कालावधी दरम्यान सर्वसाधारण आयकर प्रदान करेल असा जेव्हा खात्रीलायक पुरावा असेल तेव्हाच आणि त्या मर्यादेपर्यंतच किमान पर्यायी कर जमा ही स्थगित कर मत्ता म्हणून मान्य केली जाते. अशा मत्तेचे प्रत्येक ताळेबंद दिनांकास पुनर्विलोकन केले जाते आणि MAT जमा मत्त्याची वहन रक्कम ही त्या मर्यादेपर्यंत पुस्तकी मूल्यात घट करुन नोंदवली जाते जिथे विनिर्दिष्ट कालावधी दरम्यान कंपनी सर्वसाधारण आयकराचे प्रदान करेल अशा प्रभावाचा खात्रीलायक पुरावा आता अस्तित्वात नाही.

**२.२५ आधीच्या कालावधीतील बाबी -(भालेमा ८)**

पूर्व कालावधीतील प्रत्यक्ष चुका पूर्वलक्षी प्रभावाने केल्या जातात त्यासाठी सादर केलेल्या आधीच्या ज्या कालावधीत चुका झाल्या, त्या कालावधीकरिता तुलनात्मक रक्कमा पुनर्नमूद केल्या जातात किंवा सादर केलेल्या सर्वात आधीच्या कालावधीच्या सुद्धा आधी चुका झाल्या असतील तर वित्तीय स्थितीचे प्रारंभीचे विवरणपत्र पुनर्नमूद केले जाते.

**२.२६ प्रति समभाग मिळकत - (भालेमा ३३)**

प्रति समभाग मिळकत हा समभागधारकांना बहाल केला जाऊ शकणारा वर्षासाठीचा निव्वळ नफा वापरुन आणि वर्षादरम्यान प्रलंबित असलेल्या समभागांची भारीत सरासरी संख्या वापरुन संगणित केली जाते.

समभागधारकांना बहाल केला जाऊ शकणारा वर्षासाठीचा निव्वळ नफा आणि समभागांची आणि वर्षभरात प्रलंबित असलेल्या संभाव्य समभागांची भारीत

सरासरी संख्या वापरुन प्रति समभाग विरल मिळकत संगणित केली जाते. जिथे परिणाम हे विरल विरोधी असतील तिथे ह्या बाबीस अपवाद असेल.

**२.२७ रोकड आणि रोकड समतुल्य -(भालेमा ७)**

ताळेबंदातील रोकड आणि रोकड समतुल्य यात बँकेतील रोख, रोख रक्कम, हातातील धनादेश आणि धनाकर्ष आणि ज्या मूल्यात बदलाच्या अलक्षणीय धोक्याच्या अधीन आहेत. अशा तीन महिन्यांपेक्षा कमी मूळ मुदत असलेल्या मागणी ठेवी यांचा समावेश आहे.

रोकडता प्रवाहाच्या विवरणपत्राकरिता रोकड आणि रोकड समतुल्यात बँकेतील रोकड आणि हातातील रोख रक्कम, धनादेश आणि धनाकर्ष यांचा समावेश आहे. कंपनी ही तीन महिने किंवा कमी कालावधीच्या व विक्रीच्या दिनांकास उर्वरित सावधीसह आणि ज्ञात रोख रक्कमेला रोकड समतुल्यता त्वरित परिवर्तनीय असलेल्या सर्व उच्च रोकडसुलभ गुंतवणुकीचा विचार करते.

**२.२८ रोकडता प्रवाह विवरणपत्र - (भालेमा ७)**

रोकडता प्रवाह हे अप्रत्यक्ष पद्धत वापरुन प्रतिवेदित केले जातात जिथे करपूर्व निव्वळ नफा हा अ-रोकड स्वरुपाच्या, कोणत्याही भूतकालीन किंवा भविष्यकालीन परिचालनीय रोख प्राप्ती किंवा प्रदाने आणि रोकडता प्रवाहाची गुंतवणूक किंवा त्यास वित्तीय पुरवठा करण्याशी संबंधित असलेल्या उत्पन्न किंवा खर्चाच्या बाबी यांचे स्थगितीकरण किंवा उपार्जन या व्यवहारांच्या परिणामाकरिता समायोजित केला जातो.

परिचालन, गुंतवणूक आणि वित्तविषयक कार्यातील रोकड प्रवाह हा वेगवेगळा केला जातो.

**३) लेखांकन धोरणे आणि प्रकटने यातील बदल :-**

**३.१ नवीन आणि सुधारित मानके :-**

**प्रसारित केलेली पण अद्याप अंमलबजावणी झाली नसलेली मानके.**

कंपनी व्यवहार मंत्रालय (एम सी ए) आपल्या कंपनीज् (इंडियन अकांउटींग स्टँड्र्स) रुल्स यात दिलेल्या विद्यमान मानकांमधे दुरुस्त्या / सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी नवीन मानके अधिसूचित करत असते. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षा / करिता या मंत्रालयाने (एम सी ए) पारेषण कंपनीला लागू होती आणि अस्तित्वातील मानकात सुधारणा करणारी कोणतीही नवीन मानके अधिसूचित केली नाहीत.

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता एकत्रित वित्तीय विवरणपत्राच्या टीपा
## टिप ४.१ मालमत्ता, यंत्र आणि उपकरण

(रू. लाखात)

| तपशील | मोकळी जमीन | इमारती | यंत्र आणि उपकरणे | लाईन आणि केबल जाळे | जलविषयक कामे | इतर नागरी कामे | फर्निचर आणि जोडणी | वाहने | कार्यालयीन उपकरणे (संगणका सहीत) | सौर वीज निर्मिती उपकरणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्थूल वहन मूल्य** | | | | | | | | | | | |
| **१ एप्रिल २०२२ रोजी शिल्लक** | २६,०५४.३८ | ३१,३४६.७४ | १२,१३,३७६.३२ | ९,४७,३२९.४७ | २,८१३.०६ | १,२७,५७६.६३ | २,३९०.५२ | १,०३५.८६ | ५,६८०.४६ | ४९.६६ | २३,५७,६५३.१० |
| भर | १६४.६९ | ४७७.९२ | ६२,६९४.८८ | ४७,१५६.८९ | ७.२१ | ४,४९३.०१ | १३१.१६ | ९२३.२६ | १,१६०.११ | - | १,१७,२०९.१३ |
| विल्हेवाट | - | (२३.३३) | ४२,०५९.९३ | (४९१.४५) | - | (३१५.०९) | (१३.०२) | (३.७५) | (२६८.६१) | - | ४०,९४४.६८ |
| समायोजने | १०७.४८ | (१०९.५५) | (४९,२६९.११) | ३,४७६.७३ | - | (३४.५६) | - | (६.०७) | - | - | (४५,८३५.०८) |
| **३१ मार्च २०२३ रोजी शिल्लक** | २६,३२६.५५ | ३१,६९१.७८ | १२,६८,८६२.०२ | ९,९७,४७१.६४ | २,८२०.२७ | १,३१,७१९.९९ | २,५०८.६६ | १,९४९.३० | ६,५७१.९६ | ४९.६६ | २४,६९,९७१.८३ |
| भर | २४.३४ | ५०८.९० | ६०,४१३.४३ | ४२,७५३.९२ | ४.४० | ४,४३४.१५ | १३०.४६ | ६६.११ | ३,२४५.८४ | - | १,११,५८१.५५ |
| विल्हेवाट | (०.००) | - | (१,१०६.१५) | (१,२११.९४) | (०.७५) | (२५.४५) | - | (१३.३४) | (८५.७४) | - | (२,४४३.३७) |
| समायोजने | - | - | (२,३७७.५४) | १६१.२७ | - | (४७.९०) | - | (२०.६५) | (०.२१) | - | (२,२८५.०३) |
| **३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक** | २६,३५०.८९ | ३२,२००.६८ | १३,२५,७९१.७६ | १०,३९,१७४.८९ | २,८२३.९२ | १,३६,०८०.७९ | २,६३९.१२ | १,९८१.४२ | ९,७३१.८५ | ४९.६६ | २५,७६,८२४.९८ |
| **संचित घसारा** | | | | | | | | | | | |
| **१ एप्रिल २०२२ रोजी शिल्लक** | | १०,९७९.५५ | ४,१३,३१४.७३ | ३,१७,१४७.५२ | ९३९.३५ | ३०,०२४.६१ | ८८९.८४ | ३२०.४१ | २,८३२.४४ | ३.८८ | ७,७६,४५२.३३ |
| भर | | १,०६८.९१ | ६८,७६०.४३ | ४९,१६७.६६ | ११५.१८ | ५,३४५.९८ | १६५.११ | ११६.३६ | ४८४.५६ | २.६२ | १,२५,२२६.८१ |
| विल्हेवाट | | (०.१३) | ५,७६१.६२ | (६८.९०) | - | (२२.३८) | (०.१३) | (३.३७) | (१९.६८) | - | ५,६४७.०३ |
| समायोजने | | (३३.२९) | (८,८१५.०७) | १,१७७.३५ | - | (०.८४) | - | (५.४५) | ०.०१ | - | (७,६७७.२९) |
| **१ एप्रिल २०२३ रोजी शिल्लक** | - | १२,०१५.०४ | ४,७९,०२१.७१ | ३,६७,४२३.६३ | १,०५४.५३ | ३५,३४७.३७ | १,०५४.८२ | ४२७.९५ | ३,२९७.३३ | ६.५० | ८,९९,६४८.८८ |
| भर | | १,०५७.९१ | ६९,८३८.३७ | ४९,९९२.१६ | १०५.९६ | ४,८६६.५८ | १७०.३० | १३३.५३ | ९३०.२८ | २.६२ | १,२७,०९७.७१ |
| विल्हेवाट | | - | (४०३.९०) | (२८५.६०) | (०.२७) | (१०.७६) | - | (११.६७) | (८.६७) | - | (७२०.८७) |
| समायोजने | | ०.०३ | (१,४९६.८०) | (९.७२) | - | (१६.६३) | - | (१८.४३) | (०.१८) | - | (१,५४१.७३) |
| **३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक** | - | १३,०७२.९८ | ५,४६,९५९.३८ | ४,१७,१२०.४७ | १,१६०.२२ | ४०,१८६.५६ | १,२२५.१२ | ५३१.३८ | ४,२१८.७६ | ९.१२ | १०,२४,४८३.९९ |
| **निव्वळ वहन मूल्य** | | | | | | | | | | | |
| **३१ मार्च २०२४ रोजी शिल्लक** | २६,३५०.८९ | १९,१२७.७० | ७,७८,८३२.३८ | ६,२२,०५४.४२ | १,६६३.७० | ९५,८९४.२३ | १,४१४.०० | १,४५०.०४ | ५,५१३.०९ | ४०.५४ | १५,५२,३४०.९९ |
| **३१ मार्च २०२३ रोजी शिल्लक** | २६,३२६.५५ | १९,६७६.७४ | ७,८९,८४०.३१ | ६,३०,०४८.०१ | १,७६५.७४ | ९६,३७२.६२ | १,४५३.८४ | १,५२१.३५ | ३,२७४.६३ | ४३.१६ | १५,७०,३२२.९५ |

# कृपया टीप ३९ पहावी : सुरक्षा ठेवीच्या रुपात गहाण टाकलेल्या / तारण ठेवलेल्या मत्ता

- यात रु.१ मूल्याच्या मत्ता समाविष्ट आहेत ज्याकरिता ओआरसी ठेवींच्या स्वरुपात समर्पित ग्राहकाकडून खर्च वसूल करण्यात आला आहे.
- यात अशा मत्ता समाविष्ट आहेत ज्या अपारंपारिक स्त्रोतांतून वीज बाहेर काढण्यासाठीच्या योजनांखाली (मेडा योजना) ५०% मूल्यास निर्माण करण्यात आल्या आहेत.

**कंपनीच्या नावावर धारण न केलेले स्थावर मालमत्तेचे हक्कविलेख**

**खाली तक्त्यात दर्शवलेल्या बाबींव्यतिरिक्त कंपनीच्या नावे धारण केलेले मालमत्ता, कारखाना आणि उपकरणात समाविष्ट सर्व स्थावर मालमत्तेचे तपशील**

| ताळेबंदात प्रकट लाईन बाबी | मालमत्तेच्या बाबींचे वर्णन | स्थूल वहन मूल्य (रु. लाखात) | नावावर धारण हक्क विलेख | हक्कविलेख धारणकर्ता हा प्रवर्तक / संचालक / किंवा प्रवर्तक / संचालकाचा नातेवाईक किंवा प्रवर्तक / संचालकाचा कर्मचारी आहे का ? | कोणत्या दिनांकापासून मालमत्ता धारण केली आहे ? | कंपनीच्या नावे धारण न करण्याचे कारण निश्चित करता येण्यायोग्य नाही. | विवाद काही असतील तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मालमत्ता, कारखाना आणि उपकरण | जमीन | निश्चित करता न येणारे | महापारेषण - ४६३ पैकी ७२५ | लागू नाही | निश्चित करता न येणारे | पूर्वीच्या मराविमंशी संबंधित जमिनी सन २००५ मध्ये त्रिभाजन झाल्यानंतर महापारेषणला हस्तांतरित करण्यात आल्या. मात्र काही विशिष्ट जमिनी ज्या महावितरण, महानिर्मिती, मराविमं, मऔविम आणि खाजगी पक्ष यांच्या नावावर आहेत त्या अद्याप महापारेषणच्या नावे हस्तांतरित व्हायच्या आहेत. | लागू नाही |
| | | निश्चित करता न येणारे | मराविमं / महावितरण / महानिर्मिती (दुय्यम कंपन्या) - २६२ पैकी ७२५ | लागू नाही | निश्चित करता न येणारे | | |
| | | निश्चित करता न येणारे | भाडेपट्टा / मऔविमं / खाजगी / इतर २३८ पैकी ७२५ | लागू नाही | निश्चित करता न येणारे | | |
| | इमारत | निरंक | | | | | |

**टीप ४.२ प्रगतीपथावरील भांडवली कामे** (रू. लाखात)

| | ३१ मार्च २०२२ रोजी | वर्षभरात कॅपेक्स | भांडवली करण / वर्षभरात समायोजन | ३१ मार्च २०२३ रोजी | वर्षभरात कॅपेक्स | भांडवली करण / वर्षभरात समायोजन | ३१ मार्च २०२४ रोजी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | ३,४१,९३२.९१ | १,५३,९११.५७ | (१,१७,४६७.३४) | ३,७८,३७७.१४ | १,१८,२७२.७५ | (१,११,७३६.३५) | ३,८४,९१३.५४ |

३१ मार्च २०२४ पर्यंत सुरु असलेल्या भांडवली कामात नवीन सबस्टेशन आणि लाइन्स युनिटसाठीचा खर्च समाविष्ठ आहे

CWIP ची एकूण रक्कम रु. ३,८४,९१३.५४ लाख (३१ मार्च २०२३ रु. ३,७८,३७७.१४ लाख)

या वर्षी उसनवारी खर्चाच्या ररु. ६७५८.६० लाख या रकमेचे भांडवली करण करण्यात आले (३१ मार्च २०२३ ररु ६४४०.२३ लाख)

**प्रगतीपथावरील भांडवली कामांचे वय वेळापत्रक वि.व. २०२३-२४** (रू. लाखात)

| प्रगतीपथावरील भांडवली कामे | प्र.भां. कामातील रक्कम व तिचा कालावधी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | १ वर्षापेक्षा कमी | १-२ वर्षे | २-३ वर्षे | ३ वर्षांपेक्षा जास्त | |
| प्रगतीपथावरील प्रकल्प | १२,२६०.५२ | १४,७९१.९४ | १८,८८५.२२ | ३,३४,९३०.१८ | ३,८०,८६७.८६ |
| तात्पुरते स्थगित प्रकल्प | | | | ४,०४५.६८ | ४,०४५.६८ |
| **एकूण** | १२,२६०.५२ | १४,७९१.९४ | १८,८८५.२२ | ३,३८,९७५.८६ | ३,८४,९१३.५४ |

* प्रगतीपथावरील भांडवली कामांचे वय वेळापत्रक हे संबंधित प्रकल्पात कॅपेक्सचा प्रारंभ होण्याच्या वर्षावर आधारित तयार करण्यात आले आहे.

**प्रगतीपथावरील भांडवली कामांचे वय वेळापत्रक वि.व. २०२२-२३** (रू. लाखात)

| प्रगतीपथावरील भांडवली कामे | प्र.भां. कामातील रक्कम व तिचा कालावधी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | १ वर्षापेक्षा कमी | १-२ वर्षे | २-३ वर्षे | ३ वर्षांपेक्षा जास्त | |
| प्रगतीपथावरील प्रकल्प | १९,३४२.२३ | २१,५१४.३६ | ३२,४५८.५४ | २,९५,९४५.४१ | ३,६९,२६०.५४ |
| तात्पुरते स्थगित प्रकल्प | | | | ९,११६.६० | ९,११६.६० |
| **एकूण** | १९,३४२.२३ | २१,५१४.३६ | ३२,४५८.५४ | ३,०५,०६२.०१ | ३,७८,३७७.१४ |

* प्रगतीपथावरील भांडवली कामांचे वय वेळापत्रक हे संबंधित प्रकल्पात कॅपेक्सचा प्रारंभ होण्याच्या वर्षावर आधारित तयार करण्यात आले आहे.

**प्रगतीपथावीरल भांडवली कामांचे वय वेळापत्रक ज्यांची मूळ योजना यांच्याशी तुलना करता ज्यांचे पूर्णत्व हे वेळ टळलेले आहे किंवा ज्यांचा खर्च अधिक वेळ टळलेले आहे किंवा ज्यांचा खर्च अधिक झाला आहे अशी कामे आणि स्थगित प्रकल्प.**

(रू. लाखात)

| प्रगतीपथावरील भांडवली कामे | प्रगतीपथावरील भांडवली कामे | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | १ वर्षापेक्षा कमी | १-२ वर्षे | २-३ वर्षे | ३ वर्षापेक्षा जास्त | |
| प्रगतीपथावरील कामे / वेळ पूर्ण | | | | | |
| १३२ के व्ही नांदूरी | १४.७७ | - | | | १४.७७ |
| १३२ के व्ही जत तारोडी उपकेंद्र | ३०.६३ | - | | | ३०.६३ |
| १३२ के व्ही कणकवली-कुडाळ लाइन | ११९.४१ | - | | | ११९.४१ |
| १३२ के व्ही सिकॉम, चंद्रपूर येथे लेव्हल क्रिएशन | | ४,३९४.४० | | | ४,३९४.४० |
| १३२ के व्ही वाडजे उपकेंद्र | ४०५.४५ | - | | | ४०५.४५ |
| २२० के व्ही कृष्णूर | १,८२०.०७ | - | | | १,८२०.०७ |
| २२० के व्ही नरसी | | - | १,७८१.०८ | | १,७८१.०८ |
| २२० के व्ही पारतूर उपकेंद्र (लेव्हल दि.१८.११.२०२१ ) | १,५१४.७२ | - | | | १,५१४.७२ |
| २२०/१३२ के व्ही कुरुंदा उपकेंद्र (GIS) | ४,७५१.८३ | - | | | ४,७५१.८३ |
| २२० के व्ही भोकर | २०.९८ | - | | | २०.९८ |
| २२० के व्ही कराड-कोयना LL | १५४.४९ | - | | | १५४.४९ |
| २२० के व्ही नागपूर रींग मेन आर ११२/१२ च्या लाईन्स | | १७,३८३.४१ | | | १७,३८३.४१ |
| २२० के व्ही कुडूस (४०० के व्ही) उपकेंद्र आर इ व्ही साठी लाईन्स | २९,१७८.४१ | - | | | २९,१७८.४१ |
| २२० के व्ही पी जी सी आय एल (४०० केव्ही) साठी लाईन (कुमरी एस एस बाले) | २५३.८२ | - | | | २५३.८२ |
| २२० के व्ही लोनंद एम आय डी सी उपकेंद्र | ८७६.४३ | - | | | ८७६.४३ |
| २२० के व्ही नागेवाडी-भोकारदहान डी सी एल एल | २,९९८.२८ | - | | | २,९९८.२८ |
| २२० के व्ही नागपूर रींग मेन एस एस | १०,३०७.८१ | - | | | १०,३०७.८१ |
| २२० के व्ही पींपळगाव (रानवाड) एस एस | १,००९.१० | - | | | १,००९.१० |
| २२० के व्ही वालचंदनगर एस एस | २८४.७५ | - | | | २८४.७५ |
| २२० के व्ही वरुद एस एस | १३,११३.१९ | - | | | १३,११३.१९ |
| दुसरे सीकेटी स्ट्रिगींग ऑफ १३२ केव्ही वरधा - सेलु लाईन | | २३७.२८ | | | २३७.२८ |
| दुसरे सीकेटी स्ट्रिगींग अंडर अकोला आणि अमरावती | २८.४४ | - | | | २८.४४ |
| दुसरे सीकेटी स्ट्रिगींग अंडर सोलापूर सर्कल | | ११.३६ | | | ११.३६ |
| दुसरे सीकेटी स्ट्रिगींग अंडर औरंगाबाद सर्कल | | १३८.३७ | | | १३८.३७ |
| ४०० के व्ही औरंगाबाद - II (तप्ती तांडा) | | १५,०३९.५३ | | | १५,०३९.५३ |
| ४०० के व्ही अलकूद एस एस | १,७२६.६६ | - | | | १,७२६.६६ |
| ४०० के व्ही चंद्रपूर - II एस एस | ८२६.५४ | - | | | ८२६.५४ |
| ४०० के व्ही हिंजेवाडी जी आय एस, एस एस | | १९,८२१.५९ | | | १९,८२१.५९ |
| ४०० के व्ही कोराडी - II एस एस | ९,८५१.४७ | - | | | ९,८५१.४७ |
| २ ट्रान्स्फॉर्मरची भर इ एच व्ही कराड झोन | ८.६२ | - | | | ८.६२ |
| २ आय सी टीज् ची भर पुणे झोन उपकेंद्र | | ५३४.९२ | | | ५३४.९२ |
| २ आय सी टीज् ची भर कराड झोन उपकेंद्र | १४.९८ | - | | | १४.९८ |
| २ आय सी टीज् ची भर व बदलणे औरंगाबाद झोन | १३९.४३ | - | | | १३९.४३ |
| ४ आय सी टीज् ची भर अमरावती झोन | २७२.०० | - | | | २७२.०० |
| कळवा कॉम्पलेक्स येथे प्रशासकीय इमारत | ६६४.५६ | - | | | ६६४.५६ |
| नागपूर येथे प्रशासकीय इमारत | १,३३०.७० | - | | | १,३३०.७० |

| प्रगतीपथावरील भांडवली कामे | प्रगतीपथावरील भांडवली कामे | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | १ वर्षापेक्षा कमी | १-२ वर्षे | २-३ वर्षे | ३ वर्षापेक्षा जास्त | |
| पुणे येथे प्रशासकीय इमारत | १४१.७७ | - | | | १४१.७७ |
| अंभेरी-औंध १३२ के व्ही एस सी डी सी लाईन | ७८८.८७ | - | | | ७८८.८७ |
| अमरावती येथे प्रशासकीय इमारत | २४.४९ | - | | | २४.४९ |
| २ ट्रान्स्फॉर्मरची भर व बदलणे इ एच व्ही अमरावती झोन | ७.८९ | - | | | ७.८९ |
| मालेगाव व अंजनगाव येथे २२० केव्ही क्षमतावाढ | ३३.५४ | - | | | ३३.५४ |
| अहमदनगर एम आय डी सी - निंबलक टी एस एस उभारणी | ५३३.१९ | - | | | ५३३.१९ |
| जी इ सी पार्ट - १ नुसार टी एल उभारणी (ट्रांचे २) | ४,६४६.६७ | - | | | ४,६४६.६७ |
| ३३ केव्ही च्या नवीन बेज ची उभारणी - ए बी डी झोन | ५०.४३ | - | | | ५०.४३ |
| कोल्हापूर (२) - पुईखाडी एस सी एस सी चे एस सी एस मधे रुपांतर केले | १४८.४८ | - | | | १४८.४८ |
| जत-तारोडी येथे १३२/३३ केव्ही हायब्रीड जी आय एस उपकेंद्र स्थापना | ९,८४९.४८ | - | | | ९,८४९.४८ |
| अबितघर येथे २२० केव्ही / २२ केव्ही जी आय एस उपकेंद्रे स्थापना | | ६,७०१.१९ | | | ६,७०१.१९ |
| नागपूर सर्कीट मधे विविध जादा पी टी बेज स्थापन | १६९.३५ | - | | | १६९.३५ |
| सीरोंचा येथे १३२/३३ केव्ही उपकेंद्र स्थापना | | २,९९२.८४ | | | २,९९२.८४ |
| शेंद्रा येथे २२० केव्ही जी आय एस स्थापना | १३,३६२.१६ | - | | | १३,३६२.१६ |
| नागभीड येथे २२० / १३२ / ३३ केव्ही उपकेंद्र स्थापना | ६,७५९.१८ | - | | | ६,७५९.१८ |
| १३२ केव्ही जव्हार उपकेंद्र आर इ व्ही स्थापना | २१२.०७ | - | | | २१२.०७ |
| २२० केव्ही चाकण -२ उपकेंद्र स्थापना | २.६० | - | | | २.६० |
| ४०० केव्ही कुडूस उपकेंद्र स्थापन | ७४,७०६.७६ | - | | | ७४,७०६.७६ |
| ४०० केव्ही नॉन - एस ए एस - ४०० केव्ही व्ही एस एस एम झेड कार्यवाही | ११.०४ | - | | | ११.०४ |
| ४०० केव्ही पी जी सी आय एल - २२० केव्ही हिंजेवाडी पासून एल एल | | - | १,९१२.९५ | | १,९१२.९५ |
| २२० केव्ही चिंचवड उपकेंद्राचे आर ॲन्ड एम मंजुरी | २६३.९२ | - | | | २६३.९२ |
| अंजूर अर्थ इलेक्ट्रोड स्टेशनची जागा बदल | ७२३.२८ | - | | | ७२३.२८ |
| २२० केव्ही लाईन्स साठी डिस्क इन्शूलेटर बदलणे | ०.१३ | - | | | ०.१३ |
| नाशिक येथे २४५ केव्ही आणि १४५ केव्ही बदलणे | १९.५३ | - | | | १९.५३ |
| ३ डीसीज् चे एस आय टी सी | ३०.९८ | - | | | ३०.९८ |
| वाशी येथे विविध उपकेंद्राच्या बेज शक्तीशाली करणे | ३.५९ | - | | | ३.५९ |
| इ एच व्ही नेटवर्क शक्तीशाली | २२१.४६ | - | | | २२१.४६ |
| टी पी आय ट्रान्सड्यूसर चा पुरवठा इतर | १.४४ | - | | | १.४४ |
| १३२ केव्ही पालघरचा दर्जा २२० केव्ही असा वाढवणे | | ४८०.०३ | | | ४८०.०३ |
| **तात्पूरते स्थगित प्रकल्प** | | | | | |
| तारापूर विस्तार इ व्ही सी टी एन | | | | २,४७६.९७ | २,४७६.९७ |
| २२० केव्ही खांदळगाव - दस्तूरी लिंक लाईन | | | १,४३७.५२ | | १,४३७.५२ |
| १३२ केव्ही कमळेश्वर हिंगणा एल एल | | १२०.०५ | | | १२०.०५ |
| ४०० केव्ही तारापूर - पडघे लाईनच्या दोन्ही सर्कीटचे एल आय एल ओ | | | ११.०५ | | ११.०५ |
| **एकूण** | १,९४,४२९.८४ | ६७,८५४.९७ | ५,१४२.६० | २,४७६.९७ | २,६९,९०४.३८ |

## टिप ४.३ वापराचा हक्क असलेल्या मत्ता #

(रू. लाखात)

| तपशील | ३१ / ०३ २०२२ रोजी | वर्षभरात भर | वर्षभरात समायोजन | ३१ / ०३ २०२३ रोजी | वर्षभरात भर | वर्षभरात समायोजन | ३१ / ०३ / २०२४ रोजी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **भाडेपट्टा जमीन** | | | | | | | |
| स्थूल गट | १६,७२६.९१ | २९.२७ | (१.६२) | १६,७५४.५६ | – | – | १६,७५४.५६ |
| संचित कर्ज परत फेड तरतुद | ६९८.९६ | ७,१६३.५३ | ३३.१६ | ७,८९५.६५ | ४०५.४७ | | ८,३०१.१२ |
| **एकूण** | १६,०२७.९५ | –७,१३४.२६ | ३१.५४ | ८,८५८.९१ | (४०५.४७) | – | ८,४५३.४४ |
| **भाडेपट्टा जमीन** | | | | | | | |
| स्थूल गट | ६,७९१.६६ | ६१.९७ | – | ६,८५३.६३ | ८,५०३.२१ | – | १५,३५६.८४ |
| संचित कर्ज परत फेड तरतुद | ५,०७५.५८ | १,७०४.३७ | – | ६,७७९.९५ | १,७३५.९० | – | ८,५१५.८५ |
| **एकूण** | १,७१६.०८ | (१,६४२.४०) | – | ७३.६८ | ६,७६७.३१ | – | ६,८४०.९९ |
| वर्षा अखेरीस नक्त मुल्य | १७,७४४.०३ | (८,७७६.६६) | ३१.५४ | ८,९३२.५८ | ६,३६१.८४ | – | १५,२९४.४३ |

कृपया टिप्पणी ३१ पहावी

## टिप ४.४ इतर अमुर्त मत्ता (संगणक सॉफ्टवेअर आणि SAP/ERP सिस्टम परवाने)

(रू. लाखात)

| तपशील | ३१/ ०३/ २०२२ रोजी | वर्षभरात भर | वर्षभरात विल्हेवाट | ३१ / ०३ २०२३ रोजी | वर्षभरात भर | वर्षभरात विल्हेवाट | ३१/ ०३/ २०२४ रोजी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थूल गट | ७८१.४२ | २३३.५२ | (२३१.४६) | ७८३.४८ | १५४.८० | (१५४.८०) | ७८३.४८ |
| संचित कर्ज परत फेड तरतुद | ६१७.९७ | १३९.५६ | (३६.०३) | ७२१.५० | ७२.७३ | (१५.८९) | ७७८.३४ |
| **एकूण** | १६३.४५ | ९३.९६ | (१९५.४३) | ६१.९८ | ८२.०७ | (१३८.९१) | ५.१४ |

## ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता एकत्रित वित्तीय विवरणपत्रांसाठी टीपा

### ५ इक्विटी मेथड वापरासाठीच्या गुंतवणुकीचे लेखे

(रू. लाखात)

| तपशील | दर्शनी मूल्य | समभागांची संख्या ३१/०३/२०२४ रोजी | समभागांची संख्या ३१/०३/२०२३ रोजी | रक्कम ३१/०३/२०२४ रोजी | रक्कम ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|---|---|---|
| उद्धृत न केलेले - किमती नुसार | | | | | |
| अ) सहयोगी कंपन्यांचे इक्विटी इंस्ट्रूमेंट्स | | | | | |
| **जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेड** | १० | ३,५७,५०,००० | ३,५७,५०,००० | ७,६१३.७२ | ५,४३२.१४ |
| सहयोगीच्या नफा तोट्यातील वाटा -इक्विटी मेथड वापरासाठीचा लेखा - जे पी टी एल मधील कराची निव्वळ | | | | ८३८.६६ | ८५२.९५ |
| मागील वर्षातील नफा आणि लाभांश यांच्या गुंतवणूकी मधील ठेवण मूल्यानी वाटा | | | | | १,३२८.४१ |
| सहयोगीच्या इतर सर्वकष उत्पन्नातील वाटा-इक्विटी मेथड वापरासाठीचा लेखा - जे पी टी एल मधील कराची निव्वळ | | | | (०.३१) | ०.२२ |
| लाभांश मिळाल्याने ठेवण गुंतवणूकीतील कपात | | | | (१,६०८.७५) | - |
| गुंतवणूकीची निव्वळ वहन किंमत | | ३,५७,५०,००० | ३,५७,५०,००० | ६,८४३.३२ | ७,६१३.७२ |
| महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एम टी सी आय एल) | १० | ८८,०४,५७९ | ८८,०४,५७९ | ९७३.११ | ३६१.२९ |
| वर्षभरात इक्विटी मधे केलेली जादा गुंतवणूक | | ८८,०४,५७८ | | ८८०.४६ | |
| बोनस शेअर्स - संख्या - ३२,९४,६९१ | | ३९,६२,०४० | ३२,९४,६९१ | - | - |
| (२१,७२,२४२ शेअर्स २०१८-१९ मधे ११,२२,४४९ शेअर्स २०२१-२२ मधे आणि ६,६७,३४९ शेअर्स २०२३-२४ मधे | | | | | |
| शेअर्स धारणेचे पून्हा मोजणी केल्यामुळे गुंतवणूकीच्या निव्वळ ठेवण मूल्यात झालेली घट | | | | - | (१२.६८) |
| सहयोगी कंपनीच्या नफा-तोट्यातील वाटा-इक्विटी मेथडच्या वापरामुळे एम टी सी आय एल च्या कराची निव्वळ | | | | १,५४८.१२ | ७५६.५७ |
| वाटा -एम टी सी आय एल इक्विटी मेथडच्या वापरामुळे एम टी सी आय एल च्या कराची निव्वळ | | | | - | - |
| लाभांश मिळाल्याने गुंतवणूकीच्या ठेवण मूल्यातील घट | | | | (२२२.८१) | (१३२.०७) |
| **इक्विटी शेअर्स मधील गुंतवणूकींचे निव्वळ ठेवण मूल्य** | | **२,१५,७१,१९७** | **१,२०,९९,२७०** | **३,१७८.८८** | **९७३.११** |
| **बी) १५% असंचयी, सहभागातील, प्रतिपूर्तीचे पसंतीचे शेअर्स** | | - | - | - | - |
| महाराष्ट्र ट्रान्समिशन कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (एम टी सी आय एल) | १० | - | ८८,०४,५७८ | - | ८८०.४६ |
| वर्षभरात पसंतीच्या शेअर्समधील केलेली अधिक गुंतवणूक | | | | | |
| सहयोगी कंपनीच्या नफा-तोट्यातील वाटा-इक्विटी मेथडच्या वापराच्या लेख्यासाठी एम टी सी आय एल च्या कराची निव्वळ | | | | | |
| सहयोगी कंपन्याच्या इतर सर्वकष उत्पन्नातील वाटा-इक्विटी मेथडच्या वापराच्या लेख्यासाठी | | | | - | - |
| **पसंतीच्या शेअर्स मधील गुंतवणूकीचे निव्वळ ठेवणमूल्य** | | ० | ८८,०४,५७८ | ०.०० | ८८०.४६ |
| **एकुण** | | ५,७३,२१,१९७ | ५,६६,५३,८४८ | १०,०२२.२० | ९,४६७.२९ |
| उद्धृत न केलेल्या प्रतिभूतींच्या एकत्रीत रक्कम | | | | १०,०२२.२० | ९,४६७.२९ |
| उद्धृत केलेल्या प्रतिभूतींच्या एकत्रीत रक्कम | | | | - | - |
| उद्धृत केलेल्या प्रतिभूतींच्या बाजार मुल्य | | | | - | - |
| गुंतवणूक मूल्यातील कमी झालेली एकत्रीत रक्कम | | | | - | - |

टिपा क्र. ३८ अ पहावी

## ६ चालू नसलेल्या गुंतवणूकी

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **उद्धृत केलेले** | | |
| **कर्ज फेडीची तरतुद केलेल्या किंमतीला** | | |
| शासकीय प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक* | १,४४,५४७.६६ | १,२६,६८०.८६ |
| बंधपत्रामध्ये गुंतवणूक* | – | – |
| **एकूण** | **१,४४,५४७.६६** | **१,२६,६८०.८६** |

* आकस्मिक / विशेष राखीव निधी, एलडीसीडी निधी, ओआरसी जमा यासाठी बाजूला

(रू. लाखात)

| | | |
|---|---|---|
| आकस्मिक / विशेष राखीव निधी | ८५,७६०.६६ | ८७,३१३.०५ |
| ओआरसी ठेवी | ५८,७८७.०० | ३९,३६७.८१ |
| **एकूण** | १,४४,५४७.६६ | १,२६,६८०.८५ |
| उद्धृत न केलेल्या प्रतिभूतीची एकूण रक्कम | – | – |
| उद्धृत केलेल्या प्रतिभूतीची एकूण रक्कम | १,४४,५४७.६६ | १,२६,६८०.८६ |
| उद्धृत केलेल्या प्रतिभूतीचे बाजार मूल्य | १,४७,४०५.१५ | १,२९,४२०.१० |
| गुंतवणूकीच्या मूल्यातील हानीची एकूण रक्कम. | – | – |

## ७ चालू नसलेली कर्जे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **अप्रतिभूत अन्य नमूद नसेल तर चांगली** | | |
| कर्मचाऱ्यांना कर्जे आणि अग्रिमे | १३६.९३ | १३७.३५ |
| **एकूण** | **१३६.९३** | **१३७.३५** |

## ८ चालू नसलेले कर मत्ते (निव्वळ)

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| आयकराचे अग्रिम प्रदान<br>(कराकरिता तरतुदींची नक्त रक्कम रु. ९८,८७२.९७ लाख)<br>(मागील वर्षासाठी रु. ५३,८३४.७३ लाख) | ७८,२२९.०८ | ७७,८५६.५५ |
| **एकूण** | **७८,२२९,०८** | **७७,८५६.५५** |

## ९ इतर चालू नसलेल्या मालमत्ता

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **अप्रतिभूत अन्य नमूद नसेल तर चांगली** | | |
| भांडवली अग्रीमें | १,१७५.६१ | ६०२.१३ |
| कर्जफेडीची तरतुद न केलेला व्यवहार खर्च # | १,७०३.२३ | १,६३९.४२ |
| समूह कंपन्यामधील शिल्लक * | २,२११.०५ | २,०७७.९७ |
| सुरक्षा ठेवी | ५७४.६२ | १,३९८.०९ |
| पुरवठादारांना अग्रिमे | ३,५२०.२६ | ३,३९९.७२ |
| अग्रिमे आणि वसूलयोग्य रक्कमा, | १.७० | १.७४ |
| **एकूण** | **९,१८६.४७** | **९,११९.०७** |

# सरकारी सिक्युरिटीमधील गुंतवणुकीसाठी होणारा व्यवहार खर्च (प्रीमियम) यांचा समावेश होतो.
* टिप्पणी ३३ (३) पहावी

## १० वस्तुसुच्या

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| भांडार आणि सुटे भाग (किमती प्रमाणे) | ४७,४७१.६५ | ३८,४८६.४० |
| तपासणी प्रलबिंत असलेल्या आणि निरुपयोगी सामानामुळे साहित्य हानीची तरतुद | (१,०८९.७८) | (१,०८९.७८) |
| **एकूण** | **४६,३८१.८७** | **३७,३९६.६२** |

भांडारे व सुटेभाग यात समाविष्ट केलेल्या, ज्यांची चौकशी प्रलंबित आहे असे सामान व भांडारातील जुनाट-निरुपयोगी मालसाठा त्याच्या हानीची नोंद झालेली नसल्याने त्यासाठी तरतूद (भागदारासह)

## ११.१ चालू गुंतवणूकी

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **उद्धत केलेले** | | |
| **कर्ज फेडीची तरतुद केलेल्या किंमतीला** | | |
| शासकीय प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक* | ११,२२६.९० | १,७३७.४० |
| बंधपत्रामध्ये गुंतवणूक* | ९९२.२० | १,००१.८४ |
| **एकूण** | **१२,२१९.१०** | **२,७३९.२४** |

*तारण ठेवलेल्या मत्ता जपान इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून कर्जाप्रीत्यर्थ आकस्मिक / विशेष राखीव निधी, एलडीसीडी निधी, ओआरसी निधी आणि परकीय चलन चढउतार यासाठी चिन्हांकित.

| | | |
|---|---|---|
| आकस्मिक राखीव निधी | १२,२१९.१० | २,७३९.२४ |
| परकीय चलन चढउतार | - | - |
| **एकूण** | **१२,२१९.१०** | **२,७३९.२४** |

| | | |
|---|---|---|
| उद्धृत न केलेल्या प्रतिभूतीची एकूण रक्कम | ०.०० | ०.०० |
| उद्धत केलेल्या प्रतिभूतीची एकूण रक्कम | १२,२१९.१० | २,७३९.२४ |
| उद्धत केलेल्या प्रतिभूतीची बाजार मूल्य | १२,६४३.४२ | २,७०८.६६ |
| गुंतवणूकीच्या मूल्यातील हानीची एकूण रक्कम. | - | - |

## ११.२ व्यापारी येणे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **अप्रतिभूत व अन्य काही नमुद नसेल तर चांगली मानली गेलेली** * | | |
| अपेक्षित क्रेडिट लॉस मॉडेल नुसार सूट | २,८६,७३०.७० | ३,७६,७६३.५४ |
| शंकास्पंद मानली गेलेली | ११,६१३.५९ | ११,६१३.५९ |
| शंकास्पदसाठी सूट | (११,६१३.५९) | (११,६१३.५९) |
| **एकूण** | **२,८६,७३०.७०** | **३,७६,७६३.५४** |

* टिप्पणी ३७ पहावी

## ११.३ रोख आणि रोकड समतुल्य

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| बँकेतील शिल्लक | | |
| चालू खात्यात | ३,८५०.७४ | ७,७०६.९३ |
| मुदत ठेवी खात्यात (तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधी असलेला मूळ मुदतसमाप्ती) | ८,४४१.१२ | ३३,९८७.७० |
| रोख आणि हातातील स्टॅम्प | ११.६३ | १२.५७ |
| म.वी.नि.आ. च्या विनियमाच्या संज्ञेत परिचालित आणि परीरक्षित निर्दिष्ट चालू खात्यात @ | ८,५५२.८३ | २१,२६६.१० |
| **एकूण** | **२०,८५६.३२** | **६२,९७३.३०** |

@ टिप्पणी ५१ पहावी

## ११.४ रोख व रोख समतुल्य व्यतिरिक्त बँक शिल्लक

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| मुदतीच्या ठेवींच्या खाती (मूळ मुदत पूर्ण होण्याचा कालावधीन३ महिन्यापेक्षा जास्त पण १२ महिन्यापेक्षा कमी)# | २,८९,०३१.०९ | २३,८६१.७८ |
| **एकूण** | **२,८९,०३१.०९** | **२३,८६१.७८** |

# तारण या संबध (च्या खाली तारण) टिप्पणी ३९ पहावी

## ११.५ चालू कर्जे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **अप्रतिभूत चांगली मानली गेलेली** | | |
| कर्मचाऱ्यांना कर्जे आणि अग्रिमे | ३१३.०५ | २६५.३४ |
| **एकूण** | **३१३.०५** | **२६५.३४** |

समुहाने प्रवर्तक, संचालकांना कर्जाच्या स्वरुपात कोणतेही कर्ज किंवा अग्रिम मंजूर केलेले नाही KMPs एकतर कठोरपणे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस सयुक्तपणे

## ११.६ इतर चालू वित्तीय मत्ता

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| अप्रतिभूत व अन्य काही नमुद नसेल तर चांगली मानली गेलेली | | |
| क्तिमळणारे व्याज | ६,४५९.४७ | ३,१९६.५० |
| इतर येणी | ११,९६४.८१ | ६,५७३.९३ |
| बँका कडील मुदतीच्या ठेवी* | ३,७५४.०८ | २,९७१.०० |
| **एकूण** | **२२,१७८.३६** | **१२,७४१.४३** |

*एल डी सी डी फंडासाठी बाजूला ठेवलेले

## १२ इतर चालू मत्ता

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **अप्रतिभूत चांगल्या मानलेल्या** | | |
| पूर्वदत्त खर्च | २९७.६२ | ५३१.१३ |
| **इतर येणी** | | |
| चांगले मानले गेलेले | ४५७.१८ | ११८.२६ |
| शंकास्पद मानले गेलेले | १४९.११ | १४९.११ |
| शंकास्पद ऋणांसाठी तरतुद | (१४९.११) | (१४९.११) |
| **एकूण** | **७५४.८०** | **६४९.३९** |

## १३ विक्रीसाठी काढलेल्या असे वर्गीकरण केलेल्या मत्ता

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| वापरात नसलेल्या मत्ता | १३६६७.७५ | १४६९५.१२ |
| वापरात नसलेल्या मत्तांचा संचित घसारा | (९,४०६.१४) | (९,९५३.९९) |
| मत्ता विक्री निपटारा (क्लिअरींग) | (७.५९) | ३८.८३ |
| पुनर्वापरासाठी घेतलेल्या मत्तांचा एकत्रित घसारा | (१,२३१.३८) | (४७८.००) |
| पुनर्वापरासाठी घेतलेल्या मत्ता | १९७९.८५ | ८०९.७० |
| चौकशी प्रलंबित असलेल्या स्थिर मत्तांमुळे हानी | ७.४३ | ७.४३ |
| **एकूण** | **५,००९.९२** | **५,११९.०९** |

## १४ समभाग भांडवल

(रू. लाखात)

| | तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | | ३१/०३/२०२३ रोजी | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | (रु. लाखात) | संख्या | (रु. लाखात) |
| अ) | **अधिकृत**<br>प्रत्येक रू. १०/- चे समभाग | १५,००,००,००,००० | १५,००,०००.०० | १५,००,००,००,००० | १५,००,०००.०० |
| ब) | **वितरीत केलेले, अभिदत्त व पूर्ण भरणा केलेले**<br>प्रत्येक रू. १०/- चे समभाग | ८,९८,४९,७४,७३३ | ८,९८,४९७.४७ | ८,९८,४९,७४,७३३ | ८,९८,४९७.४७ |
| | **एकूण** | **८,९८,४९,७४,७३३** | **८,९८,४९७.४७** | **८,९८,४९,७४,७३३** | **८,९८,४९७.४७** |

**क) समभागाशी संलग्न अटी व हक्क**

कंपनीचे एकाच वर्गाचे समभाग असुन त्याचे सममूल्य प्रत्येकी रु. १०/- आहे प्रत्येकी भागधारक प्रत्येक भागासाठी एक मत देण्यास पात्र आहे. संचालक मंडळाने प्रस्तावित केलेला लाभांश हा नंतर होणाऱ्या वार्षिक सर्वसाधरण सभेत भागधारकांच्या मंजुरीच्या अधीन असतो. मात्र अंतरिम लाभाचा त्याला अपवाद आहे. कंपनीचे परिसमापन झाले तर अधिमानच्या सर्व रक्कमांचे वाटप झाल्यानंतर कंपनीच्या उर्वरित मत्तांचा भाग सर्व भागधारकांना त्यांच्या भागधारणेच्या प्रमाणानुसार मिळण्यास पात्र आहे.

**ड) वर्षाच्या आरंभीस व अखेरीस उर्वरीत समभागांच्या संख्येचा मेळ घालणे.** (रू. लाखात)

| समभाग | ३१/०३/२०२४ रोजी | | ३१/०३/२०२३ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | (रु. लाखात) | संख्या | (रु. लाखात) |
| समभाग वर्षारंभी शिल्लक समभाग | ८,९८,४९,७४,७३३ | ८,९८,४९७.४७ | ८,९८,४९,७४,७३३ | ८,९८,४९७.४७ |
| अधिक:वर्षभरात दिलेले समभाग | - | - | - | - |
| **वर्षाच्या अखेरीस उर्वरीत भाग** | **८,९८,४९,७४,७३३** | **८,९८,४९७.४७** | **८,९८,४९,७४,७३३** | **८,९८,४९७.४७** |

**इ) वर्षअखेरीस प्रवर्तकाने धारण केलेले समभाग** (रू. लाखात)

| प्रवर्तकाचे नाव | पदनाम | समभागांची संख्या | एकूण समभागांपैकी % | वर्षभरात बदल % |
|---|---|---|---|---|
| मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित | | ८,९८,४९,७४,६७३ | ९९.९९% | निरंक |

**एफ) सूत्रधारी / अल्टीमेट होल्डींग कंपनी अणि तिच्या उपकंपन्या / सहयोगी संस्था यांनी धारण केलेले शेअर्स** (रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | | ३१/०३/२०२३ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | % | संख्या | % |
| **समभाग**<br>मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित | ८,९८,४९,७४,६७३ | ९९.९९ % | ८,९८,४९,७४,६७३ | ९९.९९ % |

**जी) शेअरहोल्डर्सकडे असलेले शेअर्स प्रत्येकी ५% पेक्षा जास्त शेअर्स धारण करतात** (रू. लाखात)

| भागधारकांचे नाव | ३१/०३/२०२४ रोजी | | ३१/०३/२०२३ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | % | संख्या | % |
| **समभाग**<br>मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादित | ८,९८,४९,७४,६७३ | ९९.९९ % | ८,९८,४९,७४,६७३ | ९९.९९ % |

कंपनीचे दस्ताऐवज रजिस्टर ऑफ शेअर होल्डर्स / सदस्य आणि भागधारकांकडून मिळालेले कामा संबधीचे स्वरस्य - हितसंबध यांची कागदपत्रे यांच्यातील नोंदीनुसार वरील भागधारणा ही कायदेशीर आणि लाभा विषयीची मालकी या दोन्हींचे प्रतिनिधीत्व करते

**एच) प्रतिवेदनाच्या दिनांकाच्या लगेच आधीच्या पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान रोख व्यतिरिक्त मोबदल्याकरिता जारी केलेल्या समभागांची एकूण संख्या**

(रू. लाखात)

| भागधारकांचे नाव | २०२३-२०२४ | | २०२२-२०२३ | |
|---|---|---|---|---|
| | समभागांची संख्या | रक्कम रु. लाखात | समभागांची संख्या | रक्कम रु. लाखात |
| दि. ३१ मार्च २०१६ रोजी महाराष्ट्र शासनाने मान्य केल्यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत सुधारणा हस्तांतर योजना २००५ च्या अनुरोधाने मराविमं सूत्रधारी कंपनी मर्यादितच्या समभागधारकांना पूर्णपणे भरणा केलेले या रुपात वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये जारी केलेले प्रत्येकी रु. १० चे समभाग | ८,९८,४९,७४,७३३ | ८,९८,४९७.४७ | ८,९८,४९,७४,७३३ | ८,९८,४९७.४७ |

**आय) बोनस समभागांद्वारे आणि इतर विचारात घेण्यासाठी समभागांचा कोणताही वर्ग पूर्णपणे पेड अप शेअर्स म्हणून जारी केलेला नाही अहवाल देण्याच्या तारखेच्या तत्काळ अगोदर पाच वर्षांच्या कालावधीत रोख रक्कमेपेक्षा**

**१५) इतर समभाग**

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| अ) आकस्मिक राखीव निधी (खालील टीप (अ)पहावी.) | ९३,००८.०० | ८५,३०१.०० |
| ब) विशेष राखीव निधी (खालील टीप (ब) पहावी.) | १३,९३९.०० | १३,९३९.०० |
| क) भार प्रेषण केंद्र सबलीकरण राखीव निधी (LDCD) (खालील टीप (क) पहावी.) | ५,९८८.२० | ३,७५४.०८ |
| ड) राखून ठेवलेले उत्पन्न | ५,८५,८९७.९२ | ४,२८,६७७.७२ |
| **एकूण** | **६,९८,८३३.१२** | **५,३१,६७१.८०** |

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **राखीव आणि आधिक्य** | | |
| **ए) आकस्मिक राखीव निधी (खालील टीप अ पहावी.)** | | |
| आरंभीची शिल्लक | ८५,३०१.०० | ७७,९७८.०० |
| राखून ठेवलेल्या उत्पन्नातून हस्तांतरित | ७,७०७.०० | ७,३२३.०० |
| **एकूण** | **९३,००८.००** | **८५,३०१.००** |
| **बी) विशेष राखीव निधी (खालील टीप (ब) पहावी.)** | | |
| आरंभीची शिल्लक | १३,९३९.०० | १३,९३९.०० |
| अधिक : या वर्षातील भर | – | – |
| **एकूण** | **१३,९३९.००** | **१३,९३९.००** |
| **सी)भार प्रेषण केंद्र सबलीकरण राखीव निधी (LDCD) (खालील टीप (क) पहावी.)** | | |
| सुरुवातीची शिल्लक | ३,७५४.०८ | ४,२८३.७६ |
| अधिक– वर्षभरात भर/ उलट फिरवणे वर्षभरात | २,४६७.०० | – |
| वजा – कॅपेक्स करिता वापर | (२३२.८८) | (५२९.६८) |
| (म वि न आ ने परवानगी दिलेला) | **५,९८८.२०** | **३,७५४.०८** |
| **डी) राखून ठेवलेले मिळकत** | | |
| आरंभीची शिल्लक | ४,२८,६७७.७२ | ३,३०,३८९,७८ |
| राखून ठेवलेल्या मिळकती LDCD निधी रकमेचे विनियोजन | (२,४६७.००) | ०.८९ |
| या वर्षातील नफा | १७५४४०.८२ | १,०३,५३६.१० |
| इक्विटी पध्दतीचा वापर करुन असोसिएट/जॉइंट व्हेंचरच्या निव्वळ नफ्याचा वाटा | २,७६०.४२ | २,९२५.२५ |
| वर्षाकरीता इतर सर्व समावेशक उत्पन्न | (१०,८०६.६८) | (८५१.५२) |
| असोसिएट्सच्या इतर सर्व समावेशक उत्पन्नाचा वाटा वापरुन | (०.३०) | ०.२२ |
| **वर्षाकरीता एकूण सर्व समावेशक उत्पन्न** | **१,६७,३९४.२६** | **१,०५,६१०.०४** |
| आकस्मिक राखीव याकडे स्थानांतरण | (७,७०७.००) | (७,३२३.००) |
| विशेष राखीव निधीकडे स्थानांतरण | – | – |
| | **५,८५,८९७.९२** | **४,२८,६७७.७२** |
| **एकूण** | **६,९८,८३३.१२** | **५,३१,६७१.८०** |

इतर समभागातील प्रत्येक राखीवाच्या स्वरुप आणि हेतूचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**अ) आकस्मिक राखीव निधी –**

आकस्मिक राखीव निधीमध्ये मवीनिआ (एमवायटी) विनियम २०१५ च्या नियम ३६ अनुसार योगदान करणे आवश्यक आहे. आणि ते विनियमाच्या विहित मर्यादेत (प्रत्येक वर्षी स्थिर मत्तांच्या मूळ किंमतीच्या ०.२५% पेक्षा कमी नाही आणि ०.५% पेक्षा जास्त नाही) आहे आणि ते भारतीय विश्वस्त संस्था कायदा १८८२ खाली प्राधिकृत केलेल्या रोख्याच्या मान्य वर्गात गुंतवणे आवश्यक आहे.

**ब) विशेष राखीव निधी –**

मवीनिआ विनियम २००५ नुसार नियंत्रणयोग्य बाबींप्रित्यर्थ लाभ किंवा हानी वाटून घेण्यासाठीच्या कार्यपद्धतीच्या अनुसार विशेष राखीव निधीमध्ये योगदान करणे आवश्यक आहे. विनियम १९.१ (ब) नुसार अशा लाभाच्या एक तृतीयांश रक्कम ही नियंत्रणयोग्य घटकांच्या प्रित्यर्थ कोणत्याही भविष्यकालीन हानीचा परिणाम शोषून घेण्याकरिता विशेष राखीव निधीत राखून ठेवणे आवश्यक आहे.

**क) भार प्रेषण केंद्र सबलीकरण राखीव निधी** (LDCD)

भार प्रेषण केंद्र (एल डी सी डी ) सबली करण राखीव निधी प्रति योगदान हे सीईआरसी (आर एल डी सी चे शुल्क आणि आकार आणि इतर संबंधित बाबी) २०१५ च्या विनियम १२ च्यानुसार केले आहे. उक्त निधी हा भांडवली खर्चाच्या प्रशासनाकरिता वापरायचा आहे. समभागांवरील परतावा, कर्जावरील व्याज,नोंदणी शुल्कासह विभागीय भार प्रेषण केंद्रे आणि राष्ट्रीय भारप्रेषण केंद्रे यावरील घसारा यावरील आकार हा संवैधानिक कर आवश्यकतांची पूर्तता केल्यानंतरभार प्रेषण केंद्रे सबलीकरण निधीत जमा केले जाईल.

## १६.१ चालू नसलेली कर्जे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **ए) प्रतिभूत कर्जे** | | |
| I) बँके कडून दीर्घ मुदतीची कर्जे (टिपा क्र १६.१ अ ) | ७६,६४२.५१ | १,१८,०१७.३५ |
| II) इतरां कडून दीर्घ मुदतीची कर्जे (टिपा क्र १६.१ ब) | २,४१,३३६.२१ | २,७८,२७९.८९ |
| **एकूण** | **३,१७,९७८.७२** | **३,९६,२९७.२४** |

(कर्जाच्या शर्ती, हमीचे स्वरुप, परतफेडीच्या शर्ती इ. विषयी तपशीलाकरिता टीप ३९ व ४१.२ पहावे)

## १६.१ अ – बँकांकडून मुदतीची कर्जे

(रू. लाखात)

| बँकेचे नाव | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| कॅनरा बँक | ५,१९१.४८ | १४,०८०.७४ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ३४,७७४.७९ | ५०,०१४.५३ |
| बँक ऑफ इंडिया | ०.०० | १,९५८.८३ |
| आय सी आय सी आय बँक | ५,३३९.१४ | १०,८६२.५७ |
| बँक ऑफ इंडिया -२ | १६,८६२.५६ | २२,८७५.५८ |
| बँक ऑफ इंडिया -३ | १४,४७४.५४ | १८,२२५.१० |
| **एकूण** | **७६,६४२.५१** | **१,१८,०१७.३५** |

## १६.१ ब – इतर पक्षांकडून दीर्घ मुदतीची कर्जे

(रू. लाखात)

| वित्तीय संस्थांचे नाव | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मर्यादित | १,९५,६९१.४२ | २,२३,२५२.९५ |
| वीज वित्त महामंडळ मर्यादित | २८,७४७.६३ | ४०,७१५.७२ |
| दिर्घकालीन विशेष सहाय्य योजना महाराष्ट्र शासन | १२,०००.०० | ८,४४६.२० |
| केएफडब्ल्यू बँक | ४,८९७.१६ | ५,८६५.०२ |
| **एकूण** | **२,४१,३३६.२१** | **२,७८,२७९.८९** |

# टिप्पणी ५० पहावी

## १६.२ इतर चालू नसलेली वित्तीय दायित्वे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| राखून ठेवलेली रक्कम | १,०५,२३६.८८ | १,१३,००६.०५ |
| सुरक्षा ठेवी * | २८,३४४.५१ | २३,३५७.८१ |
| इतर ठेवी | २४०.२२ | ३,७५४.८४ |
| **एकूण** | **१,३३,८२१.६१** | **१,४०,११८.७०** |

*सुरक्षा ठेव – भारतीय सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या भालेमा ११३ मध्ये केलेल्या मार्गदर्शनानुसार विक्रेते / कंत्राटदार / ग्राहक यांच्या सुरक्षा / इतर ठेवी ह्या वित्तीय दायित्व म्हणून गणल्या जात नसल्यामूळे त्या योग्य मूल्य म्हणून मानलेल्या नाहीत.

## १७. चालू नसलेली तरतूद

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **कर्मचारी लाभासाठी तरतूद** | | |
| उपदानासाठी तरतूद (विना अनुदानित)* | ६५,१२६.२८ | ४६,७२९.५२ |
| रजा रोखीकरणासाठी तरतूद (विना अनुदानित)* | ७६,२४५.४७ | ५४,९६७.४४ |
| भांडवली खर्चाकरिता तरतूद | १२,५७३.५७ | १२,६८०.६१ |
| **एकूण** | **१,५३,९४५.३२** | **१,१४,३७७.५७** |

* टिप्पणी ३२ पहावी

## १८. स्थगित कर दायित्वे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **स्थगित कर दायित्वे** | | |
| मालमत्ता, यंत्रे आणि उपकरणे (अमूर्त मत्ता, आणि पुनर्मूल्यांकन परिणामासह) | २,९०,१४६.३३ | २,९०,०५१.०४ |
| अमूर्त मालमत्ता, | ३४८.९४ | २८९.०१ |
| **स्थगित कर दायित्वे** | २,९०,४९५.२७ | २,९०,३४०.०५ |
| **स्थगित कर मत्ता** | | |
| वापराचा हक्क असलेल्या मत्ता आणि त्याचे भाडेपट्टा दायित्व | (५,७७२.४८) | (२,९१८.६४) |
| कर्जेफेडीची तरतूद नसलेले व्यवहारीक खर्च | ८२०.३४ | ८२०.३४ |
| कर्मचारी लाभ | ४२,४०१.६३ | ३१,६४१.७९ |
| व्यापारी येण्यांची कपात | ९६३.०९ | ९६३.०९ |
| शासकीय अनुदान | २,५३०.१९ | १,८२८.५९ |
| शासकीय प्रतिभूतीतील गुंतवणूकीच्या परत फेडीची तरतुद | १,६१६.४३ | १,६१६.४३ |
| इतर | ७,७७८.४१ | ७,७७८.४१ |
| **स्थगित कर मत्ता** | **५०,३३७.६१** | **४१,७३०.०१** |
| सुरुवातीच्या स्थगित कर दायित्वेचे उलट फिरवणे | ३,४९९.९२ | ३,४९९.९२ |
| **नक्त (स्थ क म) / स्थ क दा** | **२,३६,६५७.७४** | **२,४५,११०.१२** |

*टीप ३६ पहावे

## १९ इतर चालू कर दायित्वे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| आयकर दायित्वे<br>(करासाठी तरतूदीचे निव्वळ रु. ९८,८७२.९७ लाख मागील वर्ष रु.५३,८३४.७३) | ४२४०८.०२ | ४२४०८.०२ |
| **एकूण** | **४२४०८.०२** | **४२४०८.०२** |

## २० इतर चालू नसलेली दायित्वे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| अनुदान - वीज प्रणाली विकास | ५,५३९.७३ | ६,०६२.५६ |
| अनुदान - भांडवली मत्तांच्या खर्चासाठी | १३,१४२.०७ | १३,९०७.०० |
| अनुदान - प्रकल्पांकरिता हरित उर्जा कॉरिडॉर | ७,०६५.१९ | ७,४०५.१२ |
| अनुदान - जनजातीय उपयोजना क्षेत्र (टीएसपी) | १,७९०.४० | १,८३२.३० |
| अनुदान - आर इ एम सी मालमत्तेसाठी पिजीसीआयएल कडून मदत | १८९.५५ | ३२०.६७ |
| ओआरसी योजनांखाली ग्राहकांकडून प्राप्त ठेवी | १,५९,९८७.७१ | १,२४,९८८.८५ |
| **एकूण** | **१,८७,७१४.६५** | **१,५४,५१६.५०** |

*टीप ३४ पहावे

## २१.१ वर्तमानातील कर्ज

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| **मागणीवर परतफेडयोग्य कर्ज** | | |
| **प्रतिभूत** | | |
| बँकांकडून दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या चालू परिपूर्ती | ४२,२८०.८६ | ४३,७९८.१२ |
| इतर पक्षांकडून दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या चालू परिपूर्ती | ४३,२७६.८२ | ४३,५५६.४१ |
| **एकूण** | **८५,५५७.६८** | **८७,३५४.५३** |

(कर्जाच्या शर्ती, हमीचे स्वरुप, परतफेडीच्या शर्ती इ. विषयी तपशीलाकरिता टीप ३९ व ४१.२ पहावे)

## २१.२ व्यापार देय

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| सूक्ष्म व लघू उद्योगांची देणी (पहा टीप ३७) | २,५५९.३५ | ४३०.१३ |
| (उदयोगाची एकूण देणी यासाठी टिप क्र. ४१ पहवी) | २९,८१५.६५ | २४,१०३.०३ |
| इतराची देणी | | |
| (सुक्ष्म व लघु उध्योजक) | | |
| **एकूण** | **३२,३७५.००** | **२४,५३३.१६** |

टीप ३७ पहावे

## २१.३ इतर चालु वित्तीय दायित्वे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| इतर चालू आर्थिक दायित्वे-कर्जफेड खर्चा नुसार | | |
| कर्जाचे उपार्जित पण देय न नसलेले व्याज | २,१३७.३९ | २,३२३.२७ |
| कर्मचारी संबंधीत देय | ४,७६८.७९ | ४,८४८.३९ |
| समूह कंपन्यांना देय | २,६००.०८ | ३,४९८.६४ |
| इतर देणी | २,४१९.९९ | १,९९२.२९ |
| **एकूण** | **११,९२६.२५** | **१२,६६२.५९** |

*कृपया टिप्पणी ३३(३) पहावी

## २२. अल्प मुदतीच्या तरतूदी

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| उपदानासाठी तरतुद (विना निधी)* | ६,२०४.९३ | ५,७८४.९१ |
| रजा रोखीकरणासाठी तरतुद (विना निधी)* | ५,०३२.७८ | ९,६०८.२३ |
| सीएसआर खर्चासाठी तरतुद @ | ८,७८०.०० | ८,३१२.१९ |
| सेवाकरावर उशीरा व्याज प्रदानासाठी तरतूद | २६४.४३ | २६४.४३ |
| झाडे/जमीन भरपाईकरिता तरतूद | १,७२१.८० | १,६०६.३४ |
| वेतन सुधारणेसाठी तरतूद | २३,२८५.९९ | ०.०० |
| भविष्य निर्वाह निधी दायित्वावर तूट तरतूद | ४,२५५.०० | ५४४.७३ |
| इतर तरतूद # | ३५७७.२५ | ३७९२.१७ |
| **एकूण** | **५३,१२२.१८** | **२९,९१३.००** |

* कृपया टिप्पणी क्र.३२ पहावी
@ कृपया टिप्पणी क्र.४९ पहावी
# इतर तरतुदींमध्ये दुरुस्ती व देखभाल आणि इतर खर्चाच्या तरतुदींचा समावेश आहे

## २३ इतर चालू दायित्वे

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी | ३१/०३/२०२३ रोजी |
|---|---|---|
| देय कर आणि शुल्के | ६,७०२.३२ | १,५३१.४२ |
| म. रा. वि. मं. सीपीएफ ट्रस्ट ना देय | २,२६८.९६ | २,०९४.०९ |
| ग्राहकांकडून अग्रीमे | १२५.५९ | १७६.८७ |
| इतर दायित्व – तिसरा पक्ष (नक्त) म.वी.नि.आ. च्या विनियमाच्या संज्ञेत परिचालित आणि परीरक्षित निर्दिष्ट चालू खात्यात च्या संदर्भात दायित्व | ८,५५२.८३ | २१,२६६.१० |
| इतर देणी | ५३६.६५ | ८५९.२६ |
| **एकूण** | **१८,१८६.३५** | **२५,९२७.७४** |

@ पहा टिप्पणी क्र.५१

## २४ प्रवर्तनापासून महसूल

(रू. लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता | ३१/०३/२०२३ रोजी संपलेल्या वर्षाकरिता |
|---|---|---|
